
महात्मा फुलेंची बदनामी एक सत्यशोधन

हरि रामचंद्र नर

म. ग्र. सं. ठाणे.
विषय निबंध
क्र. 3322



REFBK-0025892

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.

सूचना :—खाली दिलेल्या तारखेपर्यंत पुस्तक/मासिक परत करावे, तसे न केल्यास घटना नियम क्र. ५ [८] नुसार प्रतिदिनी ५ पैसे जादा वर्गणी भरावी लागेल.

12 JUL 1989

9 AUG 1989

12 AUG 1989

8 FEB 1990

25 FEB 1990

2 MAY 1990

(क्र. मा. पहा)
५०००—११—८६

संदर्भ निबंध
3322
३५८९८
३०/५/८९

महात्मा फुलेंची बदनामी : एक सत्यशोधन

हरि नरके

प्रस्तावना

प्रा. डॉ. य. दि. फडके
टाटा इन्स्टिटयूट ऑफ सोशल सायन्सेस, मुंबई



सुगावा प्रकाशन, पुणे

म. फुलेंची बदनामी : एक सत्यशोधन

Mahatma Fulenchi Badnami– Ek Satya Shodhan

(Research Work)

– Hari Narke

© सर्वाधिकार– हरि नरके

(चंद्रपूर येथील ९ व्या अखिल भारतीय दलित साहित्य संमेलनात ४-३-१९८९ रोजी प्रकाशित झाले.)

प्रथमावृत्ती– ४ मार्च १९८९

किंमत २५ रु.

मुखपृष्ठ– रविमुकुल, पुणे

प्रकाशक

उषा वाघ

सुगावा प्रकाशन

८६१/१, सदाशिव पेठ,

पुणे ४११०३०

मुद्रक

विलास वाघ

सुगावा मुद्रण

५१६, दत्तवाडी,

पुणे ४११०३०

मुद्रणस्थळ

हंस प्रिंटिंग प्रेस

४७४/१, सदाशिव पेठ,

पुणे ४११०३०

प्रती ३०००

पृष्ठे १२८+१२




जन्म २।१०।१९०८ मृत्यू १।१२।१९८८

महात्मा फुल्यांच्या समाजक्रांतिकारक विचारांचे आधुनिक भाष्यकार, थोर समीक्षक आणि परिवर्तनाच्या चळवळीचे मुक्त विद्यापीठ अण्णा (प्रा. गं. बा. सरदार) यांचा माझ्या वैचारिक घडणीत सर्वाधिक वाटा आहे.

माझ्यासारख्या सर्व तरुणांच्या वतीने त्यांच्या स्मृतीला कृतज्ञतापूर्वक अर्पण !



श्री. कृष्णकांत कुदळे, पुणे
महात्मा फुलेंच्या समाजप्रबोधक
विचारांच्या प्रसारकार्यात क्रियाशील
असणारे, ज्यांनी मला या ग्रंथ-
लेखनासाठी सतत प्रोत्साहन दिले,
त्याबद्दल मी कृतज्ञ आहे.



प्रस्तावना

डिसेंबर १९८८ मध्ये डॉ. विश्वनाथ वैजनाथ ऊर्फ बाळ गांगल यांनी महात्मा जोतीराव फुल्यांचे माहात्म्य तपासून पहाण्यासाठी 'सोबत' साप्ताहिकात दोन लेख प्रसिद्ध केले. गांगलांच्या मनात जोतीरावांसंबंधी आठ लेख लिहावयाचे होते. पण त्यांच्या पहिल्या दोन लेखांमध्ये त्यांनी जोतीरावांचे 'अव्वल दर्जाचा स्वधर्मद्रोही', 'त्याच दर्जाचा स्वजनद्रोही आणि देशद्रोही' 'विघ्नसंतोषी महात्मा' 'द्वेषाच्या, खुनशीपणाच्या, आकसाच्या आगीत' सतत जळणारा महात्मा अशा शब्दांत वर्णन केल्याने महाराष्ट्रात सर्वत्र खळबळ उडाली. गांगलांचा आणि त्यांचे लेख प्रसिद्ध करणाऱ्या सोबतकार बेहेऱ्यांचा निषेध करण्यासाठी मोर्चे निघाले. सोबतच्या अंकाची काही ठिकाणी होळी करण्यात आली. सोबतकारांनी आपली 'तब्बेत चांगली नसल्यामुळे' आपले 'दुर्लक्ष' झाले आणि त्यामुळे हा लेख छापला गेला, असे कारण सांगून लेख छापल्याबद्दल दिलगिरी व्यक्त केली. 'माझा आवाज बंद पाडला गेला असल्यामुळे मी यापुढचे लेख लिहिणार नाही, वस्तुतः महात्मा फुल्यांविषयीचा आदर आणि त्यांचे सामाजिक योगदान मी पुढील नियोजित लेखांत व्यक्त करणार होतो' असे गांगलांनी सांगितल्याचे इंडियन एक्स्प्रेसने वृत्त प्रसिद्ध केले. गांगल हे विनोदी लेखकही आहेत असे म्हणतात. त्यांची वरील विधाने विनोदीच आहेत. गांगलांच्या मते फुल्यांची बुद्धिमत्ता 'सब–स्टँडर्ड' होती, त्यांची 'उपजत बुद्धी बेताची' होती आणि त्यांना 'अभ्यास करण्याची कुवत आणि इच्छा' नव्हती. फुले 'स्वजन–स्वधर्म–स्वदेश घातकी' लोकांचे आदिपुरुष होते असे गांगलांनी म्हटले आहे. महात्मा फुल्यांबद्दल अशी मुक्ताफळे उधळल्यानंतरही एखाद्याने आपल्याला त्यांच्याविषयी आदर वाटतो असे सांगितले तर तोच एक विनोद ठरतो. खरे म्हणजे गांगलांनी

उरलेले ६ लेख लिहावेत म्हणजे त्यांनी हाती घेतलेले 'पुनर्मूल्यांकनाचे' कार्य पुरे होईल. ते असे अपुरे टाकणे डॉ. गांगलांना शोभत नाही.

डॉ. गांगलांच्या लेखांमुळे संतापून सोबतचे अंक जाळणे किंवा निषेधाचे मोर्चे काढणे अगर दुकाने बंद ठेवणे हे योग्य नाही. विचारांचा मुकाबला विचाराच्या पातळीवरच व्हावयास हवा, हे लक्षात घेऊन गांगलांच्या लेखातील युक्तिवादाचे खंडन करण्याचा प्रयत्न श्री. हरी नरके यांनी करण्याचे ठरविले आणि 'म. फुल्यांची बदनामी : एक सत्यशोधन' या शीर्षकाचे पुस्तक त्यांनी लिहिले आहे. संशोधनाची शिस्त पाळून कोणाही महापुरुषाचे, तसेच ग्रंथाचे पुनर्मूल्यांकन करण्याचा प्रत्येक अभ्यासकाला अधिकार असतो हे श्री. नरके यांना मान्य आहे. आपल्या वकुबानुसार गांगलांनी महात्मा फुल्यांचे पुनर्मूल्यांकन करण्याचा प्रयत्न केला याला श्री. नरके यांनी आक्षेप घेतलेला नाही.

संशोधनपर लेखमाला किंवा पुस्तक लिहिणाऱ्याने काही प्राथमिक नियम पाळावयाचे असतात तेही गांगलांनी कसे धाब्यावर बसवले आहेत हे श्री. नरके यांनी उदाहरणे देऊन सिद्ध केले आहे. 'अवतरण अस्सल ग्रंथातून मुळाबरहुकूम घ्यायला हवे. अवतरण देताना ते संदर्भापासून तोडणे, खोटे संदर्भ देणे, अवतरणातील अर्थनिर्णायक शब्द वगळणे, अवतरण उद्धृत करताना पाळावयाची शिस्त न पाळणे' हा श्री. नरके म्हणतात त्याप्रमाणे 'ज्ञानाच्या क्षेत्रातील आत्मवंचना आणि परवंचना करणारा गुन्हा आहे.' हा गुन्हा गांगलांनी फुल्यांसंबंधी लिहिलेल्या दोन लेखांमध्ये कसा केला आहे ते श्री. नरके यांनी नेमके दाखवले आहे.

डॉ. गांगलांच्या लेखातील वेजबाबदार आणि भडक भाषा ही संशोधनपर लेखाची भाषा ठरू शकत नाही हा श्री. नरके यांनी घेतलेला आक्षेप रास्तच आहे. खुद्द सोबतकार बेहऱ्यांनीही लेख छापल्याबद्दल दिलगिरी व्यक्त करताना 'या लेखांतील भाषा व मांडणी आक्षेपार्ह आहे हे विधान कुणी केले तर ते मुळीच चूक नाही' अशी कबुली दिली आहे हे विसरून चालणार नाही.

डॉ. गांगलांनी फुल्यांबद्दलचे लेख लिहिताना श्री. चिंतामणी गणेश ओक यांनी १९८४ साली प्रसिद्ध केलेल्या 'जोतीबा फुले : कार्य व वाङमय यांचे सत्यस्वरूपदर्शन' या पुस्तिकेतील मजकूर कसा उचलला आहे तेही 'डॉ. गांगलांचे वाङमयचौर्य' या प्रकरणात श्री. नरके यांनी उघडकीस आणले आहे. जिझिया करावाबतची माहिती देताना ती आपण सर जदुनाथ सरकार यांनी औरंगजेबाबद्दल लिहि-

लेल्या पुस्तकातून घेतली आहे असेही डॉ. गांगलांनी कोठे म्हटलेले नाही. ऋणनिर्देश न करता अन्य ग्रंथकारांच्या ग्रंथातील ऐवजावर सरळसरळ डल्ला मारून आपले लेख सजविण्याची डॉ. गांगलांना अवगत असलेली कला बिचाऱ्या जोतीराव फुल्यांना माहीत नव्हती. फुले प्रामाणिकपणाने अन्य ग्रंथकारांचे ऋण मान्य करीत असत. एवढेच नव्हे तर आपले लेखन 'शुद्ध करण्याविषयी मदत' करणाऱ्या बाबा पदमनजी, गंगाधरशास्त्री आणि विनायकराव भांडारकर वगैरे स्नेहयांचा ते कृतज्ञतापूर्वक नामनिर्देशही करीत असत.

शिवछत्रपतीबद्दलचा आपला 'पवाडा' 'अति जुनाट यवनी व मेसर्स ग्रांडफ, मरी वगैरे इंग्रज लोकांच्या बहुतेक लेखी आधारावरून' केला असल्याचे पवाडयाच्या प्रस्तावनेतच सुरुवातीस त्यांनी म्हटले आहे. त्या काळात छत्रपती शिवाजी राजांविषयी फुल्यांना जे वाचावयास मिळाले त्यावरून शिवछत्रपती निरक्षर होते असा त्यांचा समज होणे साहजिकच होते. १८५७ च्या उठावाविषयी फुल्यांच्या हयातीत जे ग्रंथ उपलब्ध होते त्यांचा आधार घेऊन फुल्यांनी लिहिणेही स्वाभाविक होते. उपलब्ध अपुऱ्या माहितीमुळे फुल्यांनी काही चुकीची विधाने केली तर ती समर्थनीय नसली तरी समजण्यासारखी आहेत. गांगलांनी मात्र १८५७ च्या स्वातंत्र्य समरासारखा सावरकरांचा विख्यात ग्रंथही वाचलेला दिसत नाही. तो त्यांनी वाचला असता तर इंग्रज बायका-मुलांच्या कानपूरच्या कत्तलीचे फुल्यांनी केलेले वर्णन आणि स्वातंत्र्यवीर सावरकरांनी केलेले वर्णन बरेचसे मिळते-जुळते असल्याचे त्यांच्या लक्षात आले असते. १८५७ च्या उठावाचे नेते नानासाहेब पेशवे यांच्या आठदहा वर्षांच्या मैना नावाच्या मुलीला इंग्रजांनी जिवंत जाळले असे डॉ. गांगलांचे म्हणणे आहे. याउलट नानासाहेबांना मैना नावाची कुणी मुलगीच नव्हती असे आनंदस्वरूप मिश्रा म्हणतात. डॉ. गांगलांनी आनंदस्वरूप मिश्रांचे पुस्तक वाचण्याचीही तसदी घेतली नाही. त्यांची सर्व भिस्त चिंतामण गणेश ओक यांच्या चोपडयावर! ओकांच्या पुस्तिकेचा नामनिर्देशही न करता, तसेच त्यांच्या विधानांना कोणता आधार आहे हे न पहाता, बेलाशक, डॉ. गांगलांनी कशी विधाने केली आहेत हे श्री. नरके यांनी पुराव्यानिशी सिद्ध केले आहे.

महात्मा फुले यांच्याबद्दलच्या दोन लेखांत डॉ. गांगलांनी वापरलेली विशेषणही अशीच उसनी घेतलेली आहेत. १९२५ साली केशवराव जेध्यांनी महात्मा फुले यांचा पुतळा पुण्याच्या नगरपालिकेने बसवावा अशा आशयाचा ठराव मांडला होता. तेव्हा 'सत्यशोधक का ख्रिस्तसेवक?' या शीर्षकाची पुस्तिका गणपतराव नलावडयांनी

प्रकाशित केली होती. या पुस्तिकेला प्रस्तावना लिहिणाऱ्या विश्वनाथ महादेव फुले या गृहस्थांनी जोतीरावांना 'स्वधर्म व स्वकुल बाटगा पुरुष' असे म्हटले होते. पुस्तिकेच्या अनामिक लेखकाने फुल्यांना 'ख्रिस्त्यांनी हिंदू धर्माविरुद्ध सोडलेले एक पगारी प्रचारक' म्हटले होते. त्याचीच री चितामण गणेश ओक, तसेच डॉ. गांगल ओढीत आहेत.

विष्णुशास्त्री चिपळुणकरांपासून ते डॉ. गांगल यांच्यापर्यंतच्या विद्वानांनी महात्मा फुले हे ब्राह्मणद्वेष्टे आहेत असे समजून त्यांच्यावर ते स्वधर्मद्रोही व स्वदेशद्रोही असल्याचा आरोप केला आहे. डॉ. गांगलांच्या लेखांमधून व्यक्त झालेल्या या विषारी प्रवृत्तीची पाळेमुळे खोलवर रुजलेली आहेत. या घातक प्रवृत्तीवर प्रकाश टाकण्याचे महत्त्वाचे कार्य श्री. हरी नरके यांनी हे पुस्तक लिहून पार पाडले आहे. त्यांच्या या उपक्रमाचे वाचक स्वागत करतील असा विश्वास वाटतो.

२४ मार्च १९८९

य. दि. फडके
३ आनंदवन,
'साहित्य सहवास'
वांद्रे (पूर्व) मुंबई–४०० ०५१

मनोगत

प्रिय वाचक,

'महात्मा फुलेंची बदनामी: एक सत्यशोधन' हा ग्रंथ आपल्या हाती सोपविताना मला कर्तव्यपूर्तीचा आनंद होत आहे. 'म. फुल्यांचे टीकाकार–एक चिकित्सक अभ्यास' अशा स्वरूपात म. फुल्यांवरील आजवरच्या सर्व टीकेचा परामर्श घ्यावयाचा माझा हेतू होता. परंतु वेळेची घाई आणि साधनांची अनुपलब्धता यामुळे हा भाग त्रोटक स्वरूपात हाताळून सर्व भर डॉ. बाळ गांगल यांच्या 'साप्ता. सोबत' मधील लेखनातील सत्यासत्य तपासण्यावर दिलेला आहे. या ग्रंथात प्रमाणग्रंथांचा सढळ हाताने मी वापर केला आहे.

म. फुलेंच्या बदनामीचा अनेक स्तरांमधून निषेध झाला. या संबंधातील माझी भूमिका नमूद करू इच्छितो.

वैचारिक लेखनाचा निषेध वैचारिक पातळीवरच व्हावा असे मी मानतो. त्याला अंक जाळणे, मोर्चे– बंदचे वळण लागणे यातून एकप्रकारची वातावरणनिर्मिती होते, परंतु त्यात धोका असा असतो की हचा प्रकाराचा गैरवापर झाल्यास त्यातून एक प्रकारचा दहशतवाद निर्माण होऊ शकतो की जो निकोप विचारसमीक्षेला विघातक ठरू शकतो. चिकित्सा आणि पुनर्मूल्यमापन यासाठी समाजात खुले वातावरण असले पाहिजे असे मी मानतो. विभूतिपूजेचा जुनाट विकार जडलेल्या आपल्या समाजात सातत्याने मूल्यमापन करीत राहणे गरजेचे आहे. म. फुलेच काय, परंतु कोणाही महापुरुषाचे संशोधकीय मूल्यमापन करण्याचे अभ्यासकांचे स्वातंत्र्य अबाधित राहिले पाहिजे असा माझा आग्रह आहे. गतिशील, चैतन्यदायी आणि निकोप समाजजीवन घडविण्यासाठी याची गरज आहे.

संशोधन- विद्वत्ता या गोष्टींबद्दल आपल्या समाजात जी आदरभावना आहे तिचा गैरफायदा घेतला जात असेल तर या निषेधार्ह गोष्टीचा त्वरित प्रतिवाद झाला पाहिजे असे मी मानतो. डॉ. गांगल यांच्या विद्वत्तेबद्दल आदर व्यक्त कर-

ण्याची माझी इच्छा असूनही त्यांनी संशोधकीय मूल्यांशी प्रतारणा केल्यामुळे मला तसे करता येत नाही याला माझा नाईलाज आहे. त्यांचे प्रस्तुत लेखन हे अभिरुचीहीन भाषेतील, भडक राजकीय स्वरूपाचे, प्रचारी लेखन आहे. मराठीला संशोधकांची एक अभिमानास्पद परंपरा लाभलेली आहे. या लेखनाला 'संशोधन' म्हणणे हा 'संशोधन' या गंभीर आणि व्यापक संकल्पनेचाच अपमान आहे. एकतर ही भाषा संशोधनाची नाही. गृहीत कल्पनांवर आधारित आततायी निष्कर्ष काढण्याची ही पद्धत संशोधनाची नाही. शिवाय 'साप्ताहिक सोबत' हे संशोधनपर लेखन प्रसिद्ध करण्याचे नियतकालिक माध्यम आहे का यावरही मतभेद होऊ शकतील. महाराष्ट्रात आजवर शेकडो विद्वान झाले, आजही आहेत; परंतु स्वतःच स्वतःला 'विद्वान' म्हणवून घेणारे डॉ. गांगल माझ्या माहितीप्रमाणे एकटेच !

हे जर संशोधकीय लेखन आहे तर मग राजकीय कारणांखातर संपादकांनी माफी का मागितली ? वैचारिक लेखनात माफीचा प्रश्नच उद्भवत नसतो. 'आता माफी मागितली आहे ना, मग कशाला गदारोळ करता ?' असा एक बालिश युक्तिवाद काही मंडळी करीत असतात. दुसरीकडे 'आम्हाला लेखनस्वातंत्र्य नाही काय ?' हा लेखक- संपादकद्वयाचा प्रश्न आहे. आहे ना ! लेखनस्वातंत्र्य जरूर आहे ! परंतु त्यातच निषेध करण्याच्याही स्वातंत्र्याचा अंतर्भाव आहे हे सोयिस्करीत्या विसरले जात आहे त्याचे काय, असा माझा प्रश्न आहे.

एकतर संपादकांची दिलगिरी ही सशर्त आहे. दुसरीकडे, प्रत्यक्ष लेखकाने दिलगिरी व्यक्त केलेलीच नाही. उलट, त्याने नवीन आरोपांचा भडिमार केलेला असून 'माझे मूळचे प्रश्न अनुत्तरित आहेत' असा दावा केलेला आहे. त्याचवेळी, हया लेखनाचा 'शोधलेखन,' 'पुनर्मूल्यमापन,' इ. इ. गौरव सुरू असून त्याला पाठिंबाही दिला जात आहे. या सर्व प्रकारांवरून यामागे काहीतरी वेगळाच हेतू असावा अशी शंका घ्यायला जागा आहे.

मला अभ्यासान्ती असे दिसून आले की डॉ. गांगल यांनी म. फुल्यांची अवतरणे जाणीवपूर्वक विकृत करून उद्धृत केलेली आहेत. म. फुल्यांनी जे म्हटलेच नाही त्याबद्दल ओढून-ताणून त्यांना जबाबदार धरले आहे. त्यांच्या विधानांचा हेतुतः विपर्यास करून म. फुल्यांवर डॉ. गांगलानी अनेक खोडसाळ आरोप केले आहेत. हा सर्वच प्रकार अतिशय संतापजनक आहे. पी. एच. डी. च्या भांडवलावर हा निंद्य प्रयत्न निभावून न्यायची धडपडही त्यामुळेच केविलवाणी वाटते.

म. फुले यांचे विचार आणि कार्य हया गोष्टी दोषमुक्त असल्याचा दावा मला मान्य नाही. कारण मी 'फुलेभक्त' नाही. त्यामुळे म. फुलेंचे दोषदिग्दर्शनही मी साधार केलेले आहे. मात्र त्यांच्या तात्कालिक उणीवा आणि स्वभावातील दोष यांचा बाऊ करून त्यांच्या समग्र योगदानाकडे हेतुतः दुर्लक्ष करणे मला मान्य नाही.

शालेय अभ्यासक्रमातून प्रथम म. फुल्यांच्या विचारांचा परिचय झाला. पुढे समतावादी चळवळीशी संबंध आल्यावर 'म. फुले समग्र वाङमयाचे' वाचन केले.

बी. ए. च्या अभ्यासक्रमात आणि पुढे एम. ए. ला 'एक स्वतंत्र पेपर' म्हणून या विषयाचा बारकाईने अभ्यास केला होता. आता एम. फिल. प्रबंधिकेच्या लेखनासाठी 'म. फुले व आगरकर यांचे स्त्री सुधारणांविषयक विचार– एक चिकित्सक अभ्यास' या विषयावर काम चालू असतानाच डॉ. गांगल यांचे लेख प्रसिद्ध झाले. त्यावर त्वरित प्रतिवाद करणारे काही लेख मी सकाळ, लोकसत्ता, केसरी, संचार, पुरोगामी सत्यशोधक, साधना, घोषणा, बंडखोर, सुगावा, परिवर्तनाच्या पाऊलखुणा आदी दैनिक नियतकालिकांतून स्वतंत्र संयुक्तरीत्या लिहिले होते. परंतु या विषयाचा सर्व बाजूंनी विचार करण्याची गरज लक्षात घेऊन माझे मित्र आणि मार्गदर्शक यांच्या सूचनेवरून हा ग्रंथ लिहिला आहे.

विधायक वादविवाद आणि तत्त्वचर्चा यावर माझा विश्वास आहे. माझ्या विचारांतील दोष कुणी साधार दाखवून दिले तर ते कबूल करण्याची माझी सदैव तयारी आहे. वाचकाला साधकबाधक विचार करून आपले मत ठरविता यावे यासाठी परिशिष्टात डॉ. गांगल यांचे दोन्ही मूळ लेख, संपादकांची दिलगिरी आणि डॉ. गांगलांची नवीन आरोप करणारी मुलाखत यांचा समावेश केला आहे. अनेकांना मूळ लेख वाचायला मिळाले नसल्याने या वादाची नेमकी कल्पना आलेली नाही. ती यथार्थतेने यावी यासाठी हे साहित्य या ग्रंथात सा. सोबत व डॉ. बाळ गांगल यांच्या सौजन्याने उपलब्ध करून दिले आहे.

वेळे अभावी ग्रंथसूची देता आलेली नाही याबद्दल दिलगीर आहे. बरीच धडपड करूनही या ग्रंथात काही उणीवा आणि तांत्रिक दोष राहिले असल्याची शक्यता आहे. त्याची मला जाणीव आहे. पुढील आवृत्तीची संधी मिळाल्यास दुरुस्ती केली जाईल. वाचकांनी या लेखनातील दोष आणि आपले सडेतोड अभिप्राय अवश्य कळवावेत.

आपला स्नेहांकित,

पुणे दि. ४।३।१९८९

हरि नरके

एम सी- १।३०१ अजमेरा कॉलनी,
पिंपरी, पुणे ४११०१८

कृतज्ञता

डॉ. य. दि. फडके, डॉ. स. गं. मालशे, डॉ. मा. प. मंगुडकर, डॉ. सीताराम रायकर, डॉ. राम बापट, डॉ. बाबा आढाव, विनायकराव कुलकर्णी, प्रा. नलिनी पंडित, डॉ. विद्याधर पुंडलिक, शांता शेळके, डॉ. पुष्पा भावे, डॉ. भालचंद्र फडके, डॉ. द. दि. पुंडे, डॉ. आनंद यादव, डॉ. अशोक कामत, डॉ. राजेंद्र व्होरा, डॉ. कल्याण काळे, डॉ. सु. रा. चुनेकर, डॉ. सुधाकर भोसले, प्रा. अरुण कांबळे, प्रा. रमेश ढावरे, रा. प. नेने, डॉ. विद्युत् भागवत, विद्या वाळ, प्रा. अंजली मायदेव, डॉ. नरेश दधिच, साधना दधिच, डॉ. नीलम गोऱ्हे, कॉ. अहिल्या रांगणेकर, प्रा. ग. प्र. प्रधान, ॲड. जयदेव गायकवाड, अजित सरदार, वसुधा सरदार, डॉ. देवदत्त दाभोळकर, बाळकृष्ण रेणके, दादासाहेब मोरे, उत्तम कांबळे, ॲड्. शंकर पाटील, डॉ. रमेश जाधव, किशोर बेडकीहाळ, रामनाथ चव्हाण, राजाराम फुले, सुरेशचंद्र पाध्ये, अरुण खोरे, प्रसन्नकुमार अकलूजकर, सदा डुंबरे, मधु वागी, सुलोचना वाणी, शरद गोखले, मोरेश्वर जोशी, दिलीप करंबेळकर, निरंजन आगाशे, डॉ. अच्युत माने, डॉ. भीमराव गस्ती, प्रा. प्रभाकर गुमास्ते, श्रीनिवास कुलकर्णी, विनय हर्डीकर, मोनिका पुंडलीक, सिद्धार्थ आगळे, उज्वला मेहेंदळे, प्रशांत कोठाडिया, शेवंताबाई झोडगे, ॲड्. सुरेश बोराटे, के. टी. गिरमे, मोहन धारिया, पु. ल. देशपांडे, सौ. सुनीता देशपांडे, लक्ष्मण गायकवाड, संगीता रेणके या सुहृदांशी झालेली चर्चा आणि त्यांनी आपुलकीने उपलब्ध करून दिलेले लेख, ग्रंथ इ. साहित्यामुळेच हे लेखन होऊ शकले. मी या सर्वांचा कृतज्ञ आहे.


विलास वाघ आणि उषा वाघ यांनी हा ग्रंथ माझ्याकडून अक्षरशः लिहवून घेतलेला आहे. त्यांनी सतत पाठपुरावा करून विलक्षण त्वरेने लेखन, मुद्रण, प्रकाशन घडवून आणले म्हणूनच इतक्या देखण्या स्वरूपात आणि इतक्या लवकर हा ग्रंथ वाचकांच्या हातात पडत आहे.

या ग्रंथासाठी प्रा. डॉ. य. दि. फडके यांनी आस्थापूर्वक प्रस्तावना लिहिली हे माझ्यासारख्या नवख्या अभ्यासकाला फार मोठे प्रोत्साहन आहे. त्यांच्या संपूर्ण मार्गदर्शनामुळेच या ग्रंथाला अभ्यासाची बैठक मिळू शकली. त्याबद्दल मी कृतज्ञ आहे.

या ग्रंथाच्या प्रकाशनासाठी म. फुले यांच्या विचारप्रसाराच्या कार्यात क्रियाशील असणारे श्री. कृष्णकांत कुदळे यांनी सुरुवातीपासून प्रोत्साहन दिले. त्याबद्दल मी त्यांचा आभारी आहे.

सुगावा प्रेसमधील अशोक खुडे, ब. स. देशमुख, सौ. गुलाब साठे, बाळासाहेब साळुंखे, सौ. लता खुडे या सर्वांचे व माझे मित्र, सामाजिक कार्यकर्ते श्री. तरुण खाटडिया यांचाही मी मनःपूर्वक आभारी आहे.

—हरि नरके



अनुक्रमणिका

	प्रस्तावना– प्रा. डॉ. य. दि. फडके	तीन
	मनोगत	सात
	कृतज्ञता	दहा
१.	आव संशोधनाचा– हेतू बदनामीचा	१
२.	जुनाट दुखणें	३०
३.	म. फुलेकृत शिवाजी गौरव	३७
४.	शेतकरी– देशाचा भाग्यविधाता	५१
५.	डॉ. गागल यांचे वाङ्मयचौर्य	६२
६.	म. फुले आणि १८५७ चे बंड	६७
७.	म. फुल्यांचे कार्य माणुसकीच्या सुगंधासाठी	८२
८.	संदर्भ-सूची	९४
९.	परिशिष्टे	१०३

१) शिवाजी महाराजांना शिव्या देणाऱ्या ह्या महात्म्याचे माहात्म्य तपासून पहा !

२) हा कसला महात्मा– फुले म्हणविणारी ही केवळ दुर्गंधी !

३) एक दिलगिरी

४) Scholar clarifies criticism of Phule.

५) विचारकलहाचे पडसाद

शुद्धिपत्र

पान नंबर	ओळ	असे आहे	असे वाचावें
६	वरून १०	बदनामीचा	बदनामीच्या
३३	खालून ५	बाबूराव	बाबूराव
५०	खालून ३	मातवंदना	मानवंदना
५४	खालून ७	observatifon	observation
		that our	that four
५६	खालून ४	(इ. स. १८७३)	(१८८३)
५६	खालून २	व्युप्तत्तिकोशात	व्युत्पत्तिकोशात
५८	वरून १२	नश्चितपणे	निश्चितपणे
	खालून ५	नि निर्देश	निर्देश
	खालून ४	दवंगत	दिवंगत
६३	खालून १	नकळत	नकळत
६६	वरून ७	बंहेरे	वेहेरे
	वरून ८	नमूद करतो की	नमूद करणे आवश्यक आहे की
६७	वरून ८	आडवे पडल्याने	पेशवे ब्राह्मण असल्यामुळे ते म्लेंच्छांपुढे आडवे पडल्याने
६९	वरून १८	सयुक्तिक	संयुक्तिक
७०	खालून १६	सावदा	सावडा
७१	खालून १२।११	cult vator	cultivator
७९	खालून १३	केला म्हणून	केला नाही म्हणून

टीप:– ग्रंथाचे शीर्षक 'म. फुल्यांची बदनामी : एक सत्यशोधन' असे वाचावे.

आव संशोधनाचा-
हेतू बदनामीचा

डॉ. विश्वनाथ वैजनाथ ऊर्फ बाळ गांगल, (मुंबई, डबल एम. ए. पीएच. डी.) यांनी पुण्यातील 'सोबत' या साप्ताहिकात महात्मा जोतीराव फुले ह्यांचे विचार व कार्य या विषयाचे मूल्यमापन करणारे दोन सविस्तर लेख लिहिले आहेत.

१) 'शिवाजी महाराजांना शिव्या देण्याऱ्या ह्या महात्म्याचे माहात्म्य तपासून पहा' (सोबत दि. ४।१२।१९८८ पृ. १४-१५)

२) 'हा कसला महात्मा-फुले म्हणविणारी ही केवळ दुर्गंधी' (सोबत ११।१२।१९८८, पृ. १२-१३)

या दोन लेखांत डॉ. बाळ गांगल यानी महात्मा फुल्यांच्या 'महात्मा' या पदवीला आव्हान दिले असून त्यांना 'महात्मा' म्हणणे हा गाढवपणा असल्याचा निष्कर्ष काढला आहे. महात्मा फुल्यांनी शिवाजी महाराजांना शिवीगाळ केली असल्याचे महत्त्वपूर्ण संशोधनही डॉ. गांगल यांनी प्रथमच पुढे आणले आहे. याशिवाय त्यांनी महात्मा फुल्यांवर अनेक आरोप केले आहेत. डॉ. गांगल यांच्या या लेखनाचा संताप येऊन नागपूरच्या 'बहुजन संघर्ष समिती' आणि अन्य समतावादी संघटनांनी त्याविरुद्ध आवाज उठविला. 'भटांना म. फुल्यांची दुर्गंधी येत आहे' असे पत्रक काढून त्यांनी महाराष्ट्राच्या विधिमंडळ अधिवेशनाचे लक्ष या विषयाकडे वेधून घेतले. दि. १९।१२।८८ रोजी विधानसभेत लेखक व संपादक यांच्या विरुद्ध हक्कभंग ठराव मांडण्यात आला. यातील दि. ११।१२।८८ च्या 'हा कसला महात्मा-फुले म्हणवणारी ही केवळ दुर्गंधी' ह्या लेखाने सभागृहाचा अवमान केल्याचे मान्य करून विधानसभा व विधानपरिषद या दोन्ही सभागृहांमध्ये हक्कभंग ठराव एकमताने मंजूर झाले. महाराष्ट्रातल्या सर्व वर्तमानपत्रांमधून ही बातमी प्रसिद्ध होताच या एका लेखाकडे अनेकांचे लक्ष वेधले गेले. लेखक, संपादकांविरुद्ध संतापाची लाटच उसळली. काही ठिकाणी निषेधाचे, अंकाची होळी करण्याचे कार्यक्रम केले गेले. दै. तरुण भारत, पुणे दि. २१।१२।८८ 'जोतिबा फुले महात्माच!', दै. लोकमत,

औरंगाबाद दि. २३।१२।८८ 'रोगट मनोवृत्तीची साहित्यिक दुर्गंधी,' दै. मराठवाडा औरंगाबाद, दि. २६ व २७।१२।८८ 'होय, फुले महात्माच होते–,' १-२, साप्ताहिक साधना, पुणे दि. ३१।१२।८८ 'सोबत प्रवृत्तीचे निर्मूलन करा,' असे अग्रलेख लिहिले गेले. तर याविषयावरचा अतिशय अभ्यासपूर्ण, चिकित्सक, प्रभावी लेख दै. सकाळ, कोल्हापूर (दि. २८।१२।८८) मधून प्रा. रमेश ढावरे यांनी लिहिला. निषेधाचा गदारोळ निर्माण होताच 'एक दिलगिरी :– महात्मा फुले– ग. वा. बेहेरे आणि बाळ गांगल' (सोबत दि. १।१।१९८९, पृ. १) हा लेख प्रसिद्ध करण्यात आला. त्यात म्हटले होते, 'गेल्या सोबतच्या अंकात फुले यांच्यावरील एका लेखाने महाराष्ट्रात खूप खळबळ उडाली. विधानसभेत हक्कभंग प्रस्ताव एकमताने स्वीकारला गेला. पुणे म. न. पा. त निषेधाचा ठराव पास झाला व मोर्चा काढून सोबत कचेरीसमोर अंक जाळण्यात आला. इतरही अनेक लहान-मोठ्या संघटनांनी त्या लेखाचा निषेध केला. शिवसेनेचे रमेश प्रभू, भा. ज. प. चे राम कापसे इथपासून सर्वजण या हक्कभंग प्रस्तावात एकमुखाने सामील झाले. याचा अर्थ लोकांच्या भावना प्रक्षुब्ध व्हाव्यात असे काहीतरी या लेखात होते. या लोकक्षोभाची नोंद मी घेतली आहे आणि इतक्या लोकांच्या रागाला कारणीभूत होणाऱ्या घटनेशी आपला संबंध आला याबद्दल मला वाईटही वाटते.' अग्रलेखात संपादक पुढे म्हणतात, 'माझी तब्बेत चांगली नसल्यामुळे माझ्या दुर्लक्षामुळे हा लेख छापला गेला. तरीही हा लेख छापल्याने येणारी जबाबदारी मी टाळू इच्छित नाही. जे काही लेखन छापले गेले आहे, त्याच्या परिणामांची जबाबदारी लेखकाइतकीच माझीही आहे, असे मी मानतो. त्यात मी पळपुटेपणा करणार नाही .....'

'बाळ गांगल हे विद्वान आहेत, पण त्यांना लोकांच्या गळी एखादी गोष्ट कशी उतरवावी याचे ज्ञान दिसत नाही. या लेखातील भाषा व मांडणी आक्षेपार्ह आहे, हे विधान कुणी केले तर ते मुळीच चूक नाही. पण हा लेख सोबतमध्ये छापला गेला त्या संधीचा फायदा घेऊन माझ्यावर असणारा अनेकांचा राग नव्याने उफाळून येतो आहे, हे पाहून मात्र वाईट वाटते.' असे नमूद करून संपादक पुढे म्हणतात– 'पण दलितांनी माझ्या विरोधात भूमिका घ्यावी यासारखे दुःख दुसरे कोणते नाही. त्यांची बाजू मी सतत घेतलेली आहे... तेव्हा फुल्यांचे सामाजिक असे जे योगदान आहे, त्याबद्दल माझ्या मनात यत्किंचितही शंका नाही. पण अलिकडे हिंदूधर्मावर वाटेल तशी बेफाम टीका करण्याची प्रवृत्ती वाढत चालली आहे. हिंदूधर्मात काही दोष आहेत. .. पण हिंदूधर्म सुधारण्याच्या दृष्टीने त्याच्या उणीवा शोधणे निराळे आणि उगाच सनसनाटी निर्माण करण्यासाठी अर्वाच्य विधाने करणे वेगळे. हिंदूधर्मावरील या टीकेचा आरंभ केव्हा झाला याचा विचार करता हे लक्षात आले की, फुले यांचा हेतू कितीही चांगला असला तरी हिंदू धर्मशास्त्राची त्यांनी केलेली चिकित्सा ही अशास्त्रीय आहे.... आज हिंदूधर्मावर जे नानाविध आरोप केले जातात त्याचा उगम शंभर वर्षांपूर्वी झाला आहे.... तीन हजार वर्षांपूर्वी होऊन

गेलेल्या रामायण, महाभारत या ग्रंथांतील घटना टीकाविषय होऊ शकतात, तर मग फुल्यांची विधाने टीकाविषय झाली तर रागावण्याचे काय कारण ?... मोठे उद्दिष्ट साधायचे असेल त्यांनी लहान उद्दिष्टांचा त्याग केला पाहिजे असे माझे मत आहे. माझ्या लेखी हिंदुत्व हे एक मोठे उद्दिष्ट असल्याने त्याची नुकसानी होऊ देणे मला परवडणारे नाही. आणि त्यासाठी, प्रसंगी वैयक्तिक अहंकाराचा त्याग करून, माझ्या हातून हा लेख छापला गेला याबद्दल मी दिलगिरीही व्यक्त करतो. हा जो हिंदुत्वाचा जयजयकार होतो आहे त्यावर माझ्या वागण्याचा कोणताही परिणाम होऊ नये, अशी इच्छा आहे. मात्र याचा अर्थ मी पळपुटेपणा करतो आहे असा करू नका. पण माझ्यामुळे पुष्कळांच्या हातात जे कोलीत मिळाले आहे, की जे जागृत झालेल्या आक्रमक हिंदुत्ववादाला धोकादायक आहे, ते विझवण्यासाठी, मी कितीही भांडखोर व आग्रही असलो तरी, दिलगिरी व्यक्त करणे हे आवश्यक आहे.'

या लेखातून पुढील गोष्टी स्पष्ट होतात–

१) ही दिलगिरी सशर्त आहे.

२) लेखाच्या शीर्षकात जरी 'बेहेरे– गांगल' असा संयुक्त उल्लेख असला तरी प्रत्यक्षात ही दिलगिरी फक्त संपादक बेहेरे यांचीच आहे.

३) संपादकांनी लेखातील भाषा आणि मांडणी आक्षेपार्ह असल्याचे म्हटले असले तरी लेखात व्यक्त केलेल्या एकाही आरोपाबद्दल त्यांनी दिलगिरी व्यक्त केलेली नाही. म्हणजे आरोप कायम आहेत.

४) संपादकांना 'शिवसेनेचे रमेश प्रभू, भाजपचे राम कापसे' असा निर्देश करावा लागतो यावरून त्यांना वरील 'पक्ष आणि नेते' निषेध करतात यामुळे लोकक्षोभाची नोंद घ्यावीशी वाटते, असे दिसते.

५) 'आक्रमक हिंदुत्ववादाचे नुकसान होऊ नये या एका राजकीय उद्दिष्टासाठी' ते दिलगिरी व्यक्त करीत आहेत.

६) हिंदू धर्मावर सनसनाटी निर्माण करण्यासाठी अर्वाच्य विधाने करून टीका करण्याचा आरंभ म. फुल्यांनी केला, असा सोबतकारांचा आरोप आहे.

७) रामायण-महाभारताप्रमाणेच म. फुल्यांवर टीका झाली तर त्यात रागावण्यासारखे काय आहे, असाही प्रश्न सोबतकार उपस्थित करतात.

या उपरोक्त गोष्टी लक्षात घेऊनच या दिलगिरीचा विचार करावा लागतो. त्याशिवाय पी. टी. आय. वृत्तसंस्थेमार्फत संपूर्ण देशभर दि. २ जानेवारी रोजी डॉ. गांगल यांच्या सोबतमधील म. फुल्यांवरील आरोपांचे सार प्रसारित करण्यात आले असून त्यात डॉ. गांगल यांनी आपले सर्व प्रश्न 'अनुत्तरित' आहेत असा दावा करून म. फुल्यांवर पुन्हा नवीन आरोप केले आहेत. (दि टाईम्स ऑफ इंडिया ३।१।८९) या वृत्तात डॉ. गांगल म्हणतात, 'मी 'सोबत' मधून याआधीच दिलगिरी व्यक्त केली आहे.' प्रत्यक्षात डॉ. गांगलांनी अशी कोणतीही दिलगिरी व्यक्त केलेली नाही ही वस्तुस्थिती लक्षात घेता डॉ. गांगल 'असत्य' बोलत असल्याचे

स्पष्ट होते. डॉ. गांगल असेही म्हणतात की, 'मी म. फुल्यांवर एकूण आठ लेख लिहिणार होतो, परंतु या दोन लेखांवरच वादळ निर्माण करून माझा आवाज बंद पाडला गेला असल्यामुळे मी यापुढचे लेख लिहिणार नाही. वस्तुतः म. फुल्यांविषयीचा आदर आणि त्यांचे सामाजिक योगदान मी पुढील नियोजित लेखात व्यक्त करणार होतो.' (इंडियन एक्स्प्रेस पुणे, दि. २।१।८९)

एकीकडे संपादक दिलगिरी व्यक्त करीत असतानाच दुसरीकडे लेखक मात्र सर्व आरोपांचा पुनरुच्चार करून नवीन आरोप करतो आहे आणि त्याच वेळी 'शिवसेनेच्या' तिसऱ्या राजव्यापी मेळाव्याच्या जाहीरसभेत बोलताना श्री. बाळासाहेब ठाकरे "सोबत' साप्ताहिकात महात्मा फुले यांच्याविषयी टीका करणारा लेख प्रसिद्ध झाल्यानंतर या प्रकरणाचा उपयोग हिंदुत्ववाद्यांची शक्ती खच्ची करण्यासाठी आणि शिवसेनेत फूट पाडण्यासाठी केला जात आहे' असा आरोप करतात.

'सोबतचे संपादक ग. वा. बेहेरे यांनी दिलगिरी व्यक्त केल्यानंतरही अंक जाळण्याचे प्रकार का सुरू आहेत ? डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या 'रिडल्स' प्रकरणी विचारस्वातंत्र्य आणि लेखनस्वातंत्र्याचा जो न्याय लावला गेला त्यापेक्षा वेगळा न्याय 'सोबत' प्रकरणी लावला जात आहे. लेखनस्वातंत्र्य हे एकाला आहे आणि दुसऱ्याला नाही, असे का?' असाही प्रश्न ठाकऱ्यांनी उपस्थित केला. (केसरी, पुणे दि. १।१।८९ पृ. १)

हे संशोधन असल्याचा दावा

१) 'सोबतकार बेहेरे यांना अटकपूर्व जामीन मंजूर' अशी बातमी दै. पुणे सकाळमध्ये २९।१२।८९ रोजी प्रसिद्ध झाली असून त्या बातमीत म्हटले आहे, '११ डिसेंबरच्या अंकात वाळ गांगल यांचा वादग्रस्त ठरलेला लेख हा त्यांच्या पी. एच. डी. च्या निबंधाचा विषय आहे. त्याबद्दल मुंबई विद्यापीठाने त्यांना पी. एच. डी. ही दिली आहे.' वस्तुस्थिती अशी आहे की या लेखनाचा पी. एच. डी. शी कुठलाही सबंध नाही. असे असतानाही अशी हवा का निर्माण केली जाते ? यामागे पी. एच. डी. पदवीच्या वजनाचा दबाव जनमतावर निर्माण करून नागरिकांमध्ये हया लेखनाबद्दल एक 'वलय' तयार करण्याचा तर प्रयत्न नाही ना ?

२) डॉ. गांगल यांनी, वेदवेदान्त, संस्कृत, पाली, अर्धमागधी, बौद्ध-धम्म हया विषयांचे अभ्यासू विद्यार्थी; डॉ. आंबेडकरांनी आपल्या अनुयायांना दीक्षा देण्यापूर्वीपासून 'बौद्ध' मतानुयायी, पण अंधश्रद्ध नव्हे; आंबेडकरांच्या लिखाणाची-मतांची चिकित्सा होऊ शकते, असे मानणारा विद्वान!" असे स्वतःबद्दल लिहिले आहे. (सोबत १८।१२।८८ पृ. ७) पुढे डॉ. गांगल म्हणतात, 'डॉ. आंबेडकरांनी अत्यंत अरसिकपणे, असहिष्णुतेने, उथळपणाने, तर्कदुष्टपणाने जी 'Riddles of Rama & Krishna' लिहिली त्यांचा परामर्श रामायण–महाभारत– पुराणाचा मुळातून अभ्यास करून मी घेतला. अत्यंत संयमाने, कुठेही सभ्यतेची मर्यादा न

सोडता ! चांद्यापासून बांद्यापर्यंतच्या सभ्य मराठी वाचकांची माझ्या घरी किंवा 'सोबत' कडे जी पत्रे आली त्यांत युक्तिवादाच्या बिनतोडपणाबरोबरच किंवा अधिक कौतुक 'संयमपूर्ण' लिखाणाचे होते... विद्वत्तापूर्ण वादविवाद करण्याची ज्यांची लायकी नाही आणि त्यासंबंधी सुसंगत विचार करता यावा म्हणून थोडा अभ्यास करण्याची ज्यांची इच्छाही नाही आणि कुवतही नाही अशी माणसे माझ्या सारख्या विद्वानाला शिवीपत्रे लिहितात, कारण ती लिहायला (पोस्टेज आणि) भरपूर शिव्या एवढी सामग्री पुरते.'

३) डॉ. क. कृ. क्षीरसागर, १२९४ शुक्रवार पेठ, पुणे २ हे डॉ. बाळ गांगल यांच्या लेखावर आपली प्रतिक्रिया कळविताना लिहितात– 'डॉ. बाळ गांगल यांचा म. ज्योतिबा फुले यांच्या 'माहात्म्या' संबंधीचा अभ्यासपूर्ण शोधलेख वाचला. आजवर अंधारात राहिलेले अनेक खेदजनक महत्त्वाचे पैलू त्यांनी प्रकाशात आणले.' (सोबत दि. २५।१२।८८ पृ. ३)

४) 'दि. ४।१२।८८ चे सोबत मध्ये श्री. बाळ गांगल यांचा लेख अप्रतिम वाटला. श्री. फुले काय अगर श्री. शाहू छत्रपती काय, हे साधारण बुद्धिमत्तेचे, स्वातंत्र्याचे विरोधक व ब्रिटीश सरकारचे एजंट होते. श्री. फुले हे तर ब्रिटीशांच्या प्रमाणेच मिशनऱ्यांचेही हस्तक होते.... स्वातंत्र्यचळवळीला अपशकून करण्यासाठी हया दोन ब्रिटिशांचे हस्तकांनी हा सामाजिक चळवळीचा बुरखा पांघरला होता. भोळी जनता प्रचाराला फसते, बळी पडते. परंतु बेडूक फुगला तरी बैल होऊ शकत नाही. गारगोटीची हिरकणी होत नाही.' गं. सि. गरूड, गरूड बाग, धुळे. (सोबत दि. २५।१२।८८ पृ. १६)

३) वा. ना. उत्पात, घोंगडे गल्ली, पंढरपूर जि. सोलापूर लिहितात- 'महाराष्ट्रातील हिंदुत्ववादी विचारवंतांना न्यूनगंड झाला आहे. फुले–आंबेडकर म्हटले की त्यांच्या लेखण्या पांगुळतात व जिभा लुळ्या पडतात. शत्रूंनीसुद्धा हिंदू धर्माला जेवढ्या शिव्या दिल्या नाहीत तेवढ्या किंवा त्यापेक्षा जास्त घाणेरड्या शिव्या या दोघांनी दिल्या आहेत. त्यांचा बुरखा फाडला पाहिजे. तो आपण धाडसाने फाडला याबद्दल अभिनंदन.' (सोबत दि. १।१।८९ पृ. १४ ; हयाच अंकात संपादकांची दिलगिरीही आहे !)

४) प्रसिद्ध समीक्षक श्री. शंकर सारडा यांनी 'लेखनस्वातंत्र्यावर हल्ले चालूच' या मुद्यावर लिहिताना 'सोबतमधील महात्मा फुले यांच्यावरील बाळ गांगल यांच्या लेखानेही वादळ माजले. कुठल्याही प्रकारे पुनर्मूल्यमापन, आत्मचिंतन करण्याची आपली तयारी नाही हे त्यावरून जाणवते' असे 'कुसुमाग्रज– जी. एंनी गाजलेले वर्ष' (साहित्य १९८८) या लेखात लिहिले आहे. (रविवार सकाळ, १।१।८९ पृ. ६) श्री. सारडा यांच्या या मताची चिकित्सा करणारा प्रस्तुत लेखकाचा 'सारडा गांगल आणि महात्मा फुले' (रविवार सकाळ, १५।१।८९)हा लेख प्रसिद्ध झाल्यानंतर पुन्हा सारडांनी महाराष्ट्र साहित्य पत्रिका (फेब्रु. ८९)अंकाच्या

संपादकीयात अधिक चतुराईने डॉ. गांगल यांची भलावण केली आहे.

म्हणजे जाणकार समीक्षकांना हे लेखन पुनर्मूल्यमापन- आत्मचिंतन या प्रमाण-पत्रांनी गौरविण्यायोग्य वाटते.

५) अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्ष के. ज. पुरोहित ऊर्फ शांताराम यांनी 'मुंबई मराठी पत्रकार संघाच्या' वार्तालाप कार्यक्रमात बोलताना "सोबत' साप्ताहिकात डॉ. बाळ गांगल यांचा जो लेख प्रसिद्ध झाला तो संशोधनात्मक होता ; परंतु लेखाला साजेसे शीर्षक नव्हते' असे सांगितले. (सकाळ, पुणे दि. ११।१।८९ पृ. ७)

६) सांगली येथे झालेल्या (डिसें. ८८)अ. भा. नाट्य संमेलनाच्या विषय-नियामक समितीच्या बैठकीत म. फुले बदनामीचा निषेधाचा ठराव आला असताना त्याला विरोध करताना श्री. बाबा ओक म्हणाले, 'समजा, उद्या सोबतकारांनी फुल्यांच्या लेखाबाबत पुरावे सादर केले तर संमेलनाची भूमिका काय राहील? त्यामुळे हा ठराव करू नये.' (महाराष्ट्र टाइम्स २५।१२।८८ पृ. ६)

७) 'सोबत-फुले वाद रस्त्यावर आणू नका' या सविस्तर लेखात श्री. अरविंद कुलकर्णी यांनी 'डॉ. गांगल हे मुंबई विद्यापीठातून बी. ए. व एम्. ए. ला प्रथम श्रेणीत प्रथम आलेले आणि इतिहास, संस्कृत या दोन विषयांत पीएच. डी. मिळविलेले, पन्नाशीतील उत्साही, तरुण, विद्वान गृहस्थ असून ते संस्कृत, इंग्रजी, हिंदी, मराठी, पाली आणि गुजराती भाषा यांतले तज्ज्ञ आहेत' असे म्हटले आहे. 'डॉ. बाळ गांगल हे मुंबईच्या 'अनंताचार्य इंडॉलॉजिकल रिसर्च इन्स्टिटचूट' मध्ये संशोधनकार्य करीत असून, ते अनेक विद्यार्थ्यांना पी. एच. डी. चे गाईड म्हणून मार्गदर्शन करीत आहेत. त्यांचे चार कथासंग्रह प्रसिद्ध झाले असून 'शुद्ध व निखळ' संशोधनाच्या प्रेरणेतूनच त्यांनी हे लेखन केले आहे. डॉ. गांगल यांनी ह्या लेखात दलित विरोधात अथवा बहुजनसमाज विरोधात अक्षरही लिहिलेले नाही. म. फुले यांना इतिहास विषयात गती नव्हती तरीही बेधडकपणे त्यांनी शिवाजीला मूर्ख, अडाणी, लुटारू म्हटले, हे डॉ. गांगलांना आवडले नाही व जो शिवाजीची बदनामी करतो त्यास महात्मा का म्हणावे असा प्रश्न डॉ. गांगलांनी उत्पन्न केला' अशा पद्धतीने श्री. कुलकर्णींनी डॉ. गांगलांची जोरदार भलावण केली आहे. ('सत्यता,' संपा. अनिकेत जोशी, उपेंद्रनगर, दादर, मुंबई. दि. १०।१।८९ पृ. ३ व ६)

८) 'महात्मा फुल्यांचे ढोंगी कैवारी' ह्या साप्ताहिक 'स्वराज्य' (पुणे) मधील लेखात 'अरविंद' नावाने लिहिलेल्या लेखात 'ढोंगी समाजवाद्यांना निषेधाचा नैतिक अधिकारच काय?' असा प्रश्न उपस्थित केला आहे. अशाप्रकारे एकीकडून माफीनंतरही गदारोळ का, असा प्रश्न विचारला जात आहे, तर दुसरीकडून नवीन आरोप करणे, या सर्व लेखनाला संशोधन म्हणून गौरविणे असा प्रकार चालू आहे. तिसरीकडे जनमताचा रेटा निर्माण होताच ज्याप्रमाणे 'दिलगिरी' व्यक्त होते, तद्वतच लोकांच्या भूमिकाही बदलताना दिसतात. उदा. के. ज. पुरोहितांनी

मुंबईत ज्या लेखाला 'संशोधन' म्हटले त्याबद्दलच अमरावती साहित्य संमेलनात लोकमताचा प्रचंड दबाव पाहून 'समाजात वैमनस्य निर्माण करणाऱ्या लेखनाला संशोधन म्हणता येणार नाही' असे उद्‌गार काढल्याचे प्रसिद्ध झाले आहे.

या सर्व पार्श्वभूमीवर एक संशोधकीय मूल्यमापन करण्यासाठी डॉ. गांगल यांच्या या लेखनाचा विचार करावा ही माझी भूमिका आहे. एक तटस्थ अभ्यासक या दृष्टीने सर्वप्रथम मी डॉ. गांगल यांच्या लेखनस्वातंत्र्याला संपूर्ण पाठिंबा व्यक्त करतो. विभूतिपूजा हा भीषण रोग जडलेल्या आपल्या समाजात कोणाही महापुरुषाचे संशोधकीय पुनर्मूल्यमापन होऊन शकते, नव्हे त्याची अत्यंत आवश्यकता आहे असे माझे स्पष्ट मत आहे. संशोधनाची शिस्त पाळून जे काही 'मूल्यमापन' पुढे येईल त्याचा आदर करण्याचीच माझी भूमिका आहे. अर्थातच संशोधनाची शिस्त काय असते हे मी डॉ. गांगल यांना सांगण्याची गरज नसावी. ते विद्वान आहेत. परंतु माझ्या स्वतःच्याच माहितीसाठी तिची एकदा उजळणी करावी म्हणतो.

'संशोधनात अज्ञात तत्त्वांचा शोध आणि त्यांचे पुनर्मूल्यांकन ह्या दोन्ही प्रक्रियांना महत्त्व असते. अज्ञाताचा शोध (Search) आणि ज्ञानाचे पूनर्मूल्यांकन (Research) हे अर्थ ह्या संज्ञेत अभिप्रेत आहेत. संशोधन ही एक व्यापक आणि गंभीर संकल्पना असून कोणत्याही सिद्धान्ताच्या शोधासाठी केले गेलेले समीक्षणात्मक अध्ययन किंवा परीक्षण ह्या गोष्टी त्यात अंतर्भूत असतात. शोधाची प्रक्रिया संशोधकाच्या आलोचनात्मक चिंतनपद्धतीची निदर्शक असते. शोध म्हणजे विचारांची सुव्यवस्थित आणि सुसंस्कारित रचना असते. निखळ सत्याचा शोध हे संशोधकाचे सर्वश्रेष्ठ उद्दिष्ट असते.' (भाषा आणि संशोधन, खंड–१, संपादक वसंत स. जोशी, महाराष्ट्र साहित्य परिषद, पुणे १९८१ पृ. १–२) 'संशोधन' ही एक वृत्ती असावी लागते. जिज्ञासा आणि सत्यनिष्ठा हे त्या वृत्तीचे महत्त्वाचे गुणधर्म असतात. ही वृत्ती केवळ विशिष्ट अभ्यासापुरतीच सीमित नसून ती एक जगण्याची, विचार करण्याची रीतीच होऊ शकते. शोध घेत राहणे, त्याचा सातत्याने पाठपुरावा करणे, त्यामध्ये सत्यशोधकाची वृत्ती बाळगणे, 'सत्यासत्याशी ग्वाही' देण्याइतकी तटस्थता असणे, संकुचित स्वार्थापासून अलिप्तता राखणे हे संशोधकाचे प्रारंभिक अत्यावश्यक गुण आहेत. सत्यजिज्ञासा व सत्यप्रतिपादन ही संशोधकाची पहिली प्रतिज्ञा हवी. प्रामाणिकपणा, निष्ठा हे मूलभूत गुणधर्म अंगी असल्याशिवाय संशोधनाला सुरुवातच होऊ शकत नाही. संशोधकाच्या संशोधनाची विश्वसनीयता ही सर्वांत महत्त्वाची. सर्वसाधारण वाचक सरळपणे संशोधकावर विश्वास ठेवून चालतात. अशावेळी एखादा जरी त्याचा आधार फसवा/खोटा निघाला तरी त्या संशोधकाच्या सर्वच कामावरचा विश्वास नष्ट होतो. म्हणून संशोधकाच्या प्रामाणिकपणावरील टीका ही सर्वांत गंभीर बाब मानली जाते.

अभ्यासकाची भूमिका पूर्वग्रहांनी दूषित, बांधलेली असू नये. नाहीतर संशोधन 'खोटे' होते. त्याला 'संशोधकीय मूल्य' उरत नाही. एखाद्या विशिष्ट मताचा

अभिनिविष्ट प्रचारक म्हणून जर संशोधक काम करू लागला तर स्वतःचे ग्रह निश्चित करूनच त्याला अनुकूल तेवढेच आधार गोळा करीत जाण्याची त्याची पद्धत ही संशोधकीय शिस्तीत बसत नाही.

संशोधनकार्याच्या तीन पायऱ्या असतात– १) प्रथम, माहितीचे संशोधन–संकलन २) नंतर तिचे पृथःकरण, मीमांसा ३) आणि अखेर अन्वय, निष्कर्ष. संशोधनात साधकबाधक प्रमाणांनी विषयाचा विचार करणे आणि तर्कसंगत पद्धतीने निष्कर्षाप्रत पोहचणे हा क्रम हवा.

(डॉ. सु. रा. चुनेकर, संशोधन : स्वरूप आणि पद्धती, शिक्षण प्रसारक संस्था, संगमनेर, १९८३ पृ. बारा ते तीस.)

अवतरण अस्सल ग्रंथातून आणि मूळाबरहुकूम घ्यायला हवे. अवतरण देताना ते संदर्भापासून तोडणे, खोटे संदर्भ देणे, अवतरणातील अर्थनिर्णायक शब्द वगळणे, अवतरण उद्धृत करताना पाळावयाची शिस्त न पाळणे हा ज्ञानाच्या क्षेत्रातला आत्मवंचना आणि परवंचना करणारा गुन्हा आहे. संशोधनाची भाषा ही घोटीव, पिळदार आणि स्पष्ट हवी. तर्कशुद्ध मांडणी आणि अचूक शब्दयोजना हवी. विशेषणांचा अतिरेकी वापर किंवा वारेमाप उधळपट्टी न करण्याची जाणीव हवी. शब्दबंबाळ पांडित्य आणि शब्दच्छल टाळावा. आधार देताना त्याबद्दलच्या सर्व नोंदी अचूक द्यायला हव्यात.

या संशोधनाच्या शिस्तीत डॉ. गांगल यांचे हे म. फुलेंविषयक लेखन बसते काय?

ही भाषा संशोधनाची नाही

डॉ. गांगल यांनी हया दोन्ही लेखांत जी बेजबाबदार आणि आक्रमक भाषा वापरली आहे ती संशोधनाची भाषा ठरूच शकत नाही. कारण अनाठायी संताप आणि अवाजवी भडकपणा व्यक्त करण्यासाठी ते या लेखनात विशेषणांची नुसती खैरात करतात. त्यामुळे विवेचनाचा कसदारपणा ते हरवून बसतात. व्यक्तिद्वेष, विद्वत्तेचा उग्र अहंकार आणि पूर्वग्रहदूषित निष्कर्षपद्धती या अपप्रवृत्तींनी डॉ. गांगल यांची भाषा ही सवंग बाजारू लेखनाची भाषा झाली आहे. ते लिहितातः—

१) हा अशा अगाध व्युत्पत्ती–अज्ञानावर ब्राह्मणद्वेषाचे आणि शिवाजी निंदेचे प्रचंड इमले बांधणाऱ्या माणसाला आपण कुणाच्या चिथावणीवरून महात्मा म्हणू लागलो, कुणास ठाऊक!

२) ज्योतीराव फुले हा माणूस अव्वल दर्जाचा स्वधर्मद्रोही तर होताच, पण त्याच दर्जाचा स्वजनद्रोही आणि देशद्रोही होता.

३) नानासाहेब पेशव्याने इंग्रजांची कत्तल केली म्हणून हा स्वजनद्रोही महात्मा ढळढळा रडतो, पण त्याच नानासाहेब पेशव्याच्या आठदहा वर्षांच्या मुलीला, मैनेला, इंग्रजांनी जिवंत जाळली, तिच्याबद्दल ह्या विघ्नसंतोषी महा-

त्म्याच्या बेलगाम लेखणीतून एक करुणेचा नव्हे, सहानुभूतीचा नव्हें, साधा माणुसकीचा शब्द निघालेला नाही. असल्या स्वजनद्रोही माणसाला आपण महात्मा बनवून ठेवलं आहे.

४) तसाच आनंद तत्पूर्वी शहाण्णव वर्षे आधी झालेल्या मराठ्यांच्या पानिपतावरील पराभवामुळे आपल्या विघ्नसंतोषी महात्म्याला झाला आहे. आणि आपला हा आसुरी आनंद ह्या महात्म्याने असा व्यक्त केला आहे– 'दांभिक पेशवे पानीपती जाती, पालथी पडती, म्लेच्छांपुढे.' पेशवे ब्राह्मण असल्यामुळे ते म्लेंच्छांपुढे आडवे पडल्याने महात्म्याला आनंदाच्या उकळचा फुटणे साहजिकच आहे.

५) इतका स्वजनद्रोही माणूस पृथ्वीतलावर दुसरा सापडायचा नाही. आणि त्याला महात्मा ठरविणारेही नतद्रष्ट आमच्यासारखे आम्हीच.

६) हिंदूधर्माच्या आणि तो हिंदूधर्म फक्त भटा-ब्राह्मणांची मिरास आहे अशी आपली समजूत करून घेतल्याने त्यांच्या द्वेषाच्या, खुनशीपणाच्या, आकसाच्या आगीत हा महात्मा सतत जळत होता.

७) उपजतबुद्धी बेताची, अभ्यास करण्याची कुवत आणि इच्छा नाही, चियावणी आणि (खोटं) मोठेपण देऊन छू करायला टपलेले परकीय राज्यकर्ते आणि मिशनरी ह्यांतील 'एकैकमप्यनर्थाय', पण फुल्यांच्या ठायी हे सर्व एकत्र आलेले होते.

८) आपल्या महात्म्याने त्याबाबतीत डोळे आणि मन गच्च मिटून घेतले होते आणि धादांत खोटी विधाने शिवराळ भाषेत करताना त्याला विलकूल संकोच वाटत नसे.

९) ज्या गरिबांच्या नावाने वेळी– अवेळी आपला महात्मा चौपदरी गळा काढून रडतो त्या गोरगरिबांना जिझियाचा फटका सर्वांत अधिक बसला.

१०) शिवाजी महाराजांच्या जीवितकार्याचे मूल्यमापन एखादा माणूस इतक्या अधम पातळीला जाऊन करू शकतो म्हणून संतापावे की अशा माणसाला आपण महात्मा पदवी देऊन गौरविले म्हणून शरमेने मान खाली घालावी?

११) आपल्या देशात ज्या स्वजन–स्वधर्म–स्वदेश घातकी लोकांना आपण, परधार्जिणेपणा करून महात्मापदी प्रतिष्ठापित केले आहे त्या सर्वांचे पूनर्मूल्यांकन झाले पाहिजे. त्यातील महाराष्ट्रातला आदिमहात्मा म्हणजे ज्योतिबा फुले. आपल्या राज्याच्या विधानभवनासमोर सदरहू महात्म्याचा पुतळाही उभा करण्यात आलेला आहे. ज्योतीबांपाशी असं काय होतं? एतद्देशीय समाजाचा मनोभंग करण्यासाठी सर्व प्रकारचे उपाय योजणारे ब्रिटीश राज्यकर्ते आणि मिशनरी ह्यांचा भक्कम पाठिंबा आणि शिव्यांचा प्रचंड साठा. शिव्या द्यायला शहाणपण लागत नाही, ज्ञानही लागत नाही. ज्योतीबांजवळ ह्या दोन्ही गोष्टींची तीव्र टंचाई होतीच.

१२) कोठल्याही गोष्टीचा अर्थ लावण्यासाठी आवश्यक ती उपजतबुद्धीही ज्योतिबांजवळ नव्हती आणि अर्जित विद्वत्ताही नव्हती.

१३) ज्यांचे अभ्यासाशी वाकडे आणि विद्वत्तेशी वैर त्यांनी काय वाट्टेल ते बोलावं आणि आपण त्यांना 'महात्मा' म्हणावं.

१४) विद्वान माणसांना ठामपणे बोलायला भीतीच नाही, तर शंका वाटते. मूर्ख आणि महात्मे मात्र निर्भीक आणि निःशंक असतात.

१५) अवतारकल्पना समजून घ्यायची तर डोकं आणि हृदय स्वच्छ पाहिजे. त्यात फक्त गलिच्छ शिव्या भरलेल्या असतील तर ज्ञानाचा शिरकाव होत नाही.

१६) वराह अवतार म्हणजे खरं म्हणजे रानडुक्कर. पण डुक्करच. तेव्हा ज्योतिबांची गालिप्रसू लेखणी हर्षातिरेकाने घाणीत बुचकळ्या घेईल ह्यात नवल ते काय?

१७) शिव्या देणे एवढे एकच काम वाणी-लेखणीचे, असे मानणाऱ्या मंडळींना ज्ञानाचे वावडे असते. अशांपैकी एका माणसाला 'महात्मा' म्हणणे हा आपला गाढवपणा.

१८) वामन आणि परशुराम ब्राह्मण असल्याने त्यांच्यासंबंधी लिहिताना ज्योतीबांची लेखणी नरकाची दुर्गंधी ओकील ह्यात काय नवल नव्हे? पण राम आणि कृष्ण चरित्रावर बालिश बुद्धिवादी आक्षेप घेणारे त्यांना जवळजवळ ब्राह्मणच मानतात त्याचे आश्चर्य वाटते.

१९) आपला महात्मा ही गलिच्छ भाषा लिहितो आणि आपल्या पुरोगामी बुद्धिवाद्यांना वाटते 'वा! काय विनतोड सवाल!' घाणीचा नुसता निर्देश करून ज्योतिबांचे समाधान होत नाही. कोपरापर्यंत हात बुडवून ती व्यवस्थितपणे ढवळून काढली नाही तर आपल्या माहात्म्याला उणेपणा येईल असे त्यांना वाटत असावे.

२०) मराठीत इतके गलिच्छ लिखाण दुसऱ्या कोणी केले नसेल.

२१) घाण चिवडावी फुल्यांसारख्या महात्म्यांनी. आपल्यासारख्या सहृदय रसिकांनी नेहमीच वाच्यार्थाच्या पलिकडे पहायचं–जाणायचं असतं.

२२) पुढे तर सगळ्या मराठी भाषिकांनी लाजेने मान खाली घालावी अशी घाणेरडी भाषा ज्योतिबांनी लिहून ठेवली आहे.

२३) शी: ! असल्या माणसाला चारचौघांसारखा सभ्य गृहस्थ सुद्धा म्हणता येणार नाही. त्याला आपण महात्मा करून ठेवलाय.

२४) अडाणी, असंस्कृत आणि शिस्तोदराच्या पलिकडे ज्याला कशात इंटरेस्ट नाही अशा मंडळीच्या हाती ही पुराणकथा पडली की तिला जे अनेक फाटे फुटतात त्यांचे वर्णन करणे कठीण.

२५) हे समजण्याइतकी विद्वत्ताही फुल्यांजवळ नव्हती आणि सहृदयताही. गलिच्छपणा मात्र भरपूर होता.

२६) ज्योतीराव फुल्यांनी मात्र गलिच्छ, वीभत्स, उबगवाणं, जुगुप्सा उत्पन्न करणारं लिखाण सदैव केलं. महाराष्ट्राच्या समाजकारणात, राजकारणात जी परस्परद्वेषाची गटारगंगा आजपर्यंत दुथडी भरून वहात आहे तिची गंगोत्री फुल्यांच्या

लिखाणात आढळते. असल्या माणसाचं महात्मापण टिकवून धरणं म्हणजे ती घाण perpetuate करणं. महाराष्ट्राचं नष्टचर्य संपलं नसेल, तर हेही दळभद्री कृत्य आपण आणखी काही पिढ्या करीत राहू!

२७) साम्राज्यवादी इंग्रजांनी हवा भरभरून कुजवलेलं हे घाणीचं बोचकं 'महात्मा' म्हणून खांद्यावर घेऊन (कुठवर) मिरवत राहणार आहोत?

ही आहे डॉ. गांगल यांची अभिरुचीहीन भाषा! असली भाषा खरं तर पी. एच. डी. झालेला, 'विद्वान' म्हणवणारा माणूस लिहितो याचाच खेद वाटतो.

ही संशोधनाची पद्धत नाही

संशोधनामध्ये कुठलेही अवतरण आधारासाठी देताना ते संदर्भापासून तोडून देऊ नये, त्याचा अर्थविपर्यास होईल अशा रीतीने ते बाजूला काढू नये अशी शिस्त आहे. त्याचबरोबर अवतरणाच्या शेवटी कंसात ग्रंथकर्ता, ग्रंथनाम, प्रकाशक, स्थळ, काळ, पृष्ठक्रमांक आदी नोंदी अचूकपणे देणे बंधनकारक मानले जाते. ह्या नोंदी अस्सल ग्रंथातून आणि मुळाबरहुकूम घ्यायच्या असतात.

डॉ. गांगल यांनी विविध अशा विपुल संदर्भांचा वापर लेखनात केला आहे. त्यात ते कुठेही ही संपूर्ण शिस्त पाळीत नाहीत.

१) एक सरकारी अहवाल म्हणतो,... असे सांगून डॉ. गांगल एक इंग्रजी अवतरण देतात. आजवर लाखो सरकारी अहवाल तयार झाले असतील. त्यातला हा कोणता अहवाल? हे 'अवतरण' पडताळून पाहण्यासाठी वाचकाने हे लक्षावधी अहवाल वाचून मगच पडताळा मिळवावा अशी डॉ. गांगलांची इच्छा आहे काय?

२) 'महात्म्याला आवडणाऱ्या इंग्रज जातीचा एक इतिहासकार म्हणतो'... या नोंदीला संशोधनात काडीचीही किंमत नाही. इंग्रज जातीचे शेकडो इतिहासकार आणि त्यांचे हजारो इतिहासग्रंथ असू शकतात. तेव्हा असला भोंगळपणा संशोधनात बसूच शकत नाही.

३) अ. भि. शहांनी म्हटलं आहे...

४) आर. सी. मुजुमदार म्हणतात ..

५) भारतीय विद्याभवनाने प्रकाशित केलेल्या मिळमिळीत इतिहासातसुद्धा खालील माहिती मिळते...

६) भगवान देवाधिदेव बुद्धानें संयुत्त निकायात कुम्मूपम सुत्तन्तात म्हटलेच आहे...

७) त्रिपिटकातील मज्झिम निकायात वम्मीक सुत्तन्तात भगवान बुद्ध स्वतः कूर्त पाच उपादान–स्कंध असल्याचे सांगतात.

८) इस्लाममधील समता ही एक मिथ आहे, असं मे. पुं रेग्यांनी साधार दाखवून दिले आहे.

९) डॉ. इरावती कर्व्यांनी हे व्यवस्थितपणे सिद्ध केले आहे...

अशा उल्लेखांतून ग्रंथनाम सांगितलं तर, त्याचा लेखक कोण, प्रकाशक कोण, आवृती कितवी, पृष्ठक्रमांक किती ही माहिती डॉ. गांगल सांगत नाहीत आणि ग्रंथकार सांगितला तर त्याच्या ग्रंथाचे नाव आणि इतर माहिती सांगत नाहीत.

एकूण नोंदींबाबत सावळा गोंधळ!

१०) 'महाराष्ट्र शासनाने प्रकाशित केलेल्या 'फुले गौरवग्रंथात' थोर समाजवादी विचारवंत गं. बा. सरदार म्हणतात'... अशी ग्रंथनाम, ग्रंथकार/लेखकार नाम देणाऱ्या नोंदीतही पृष्ठ क्रमांक आणि इतर माहिती नाहीच.

११) औरंगजेबाने २ एप्रिल १३७९ रोजी जिझियाकर लागू केला, असे सांगून डॉ. गांगल त्याचा सगळा तपशील देतात, परंतु तो त्यांनी कुठल्या ग्रंथातून घेतलाय त्याबद्दलच्या कुठल्याही नोंदी ते देत नाहीत. १३७९ साली औरंगजेबाचा जन्म तरी झाला होता काय?

१२) ग्रीम, फ्रेझर आदींची नावे सांगितली जातात, त्यांचे उतारेही दिले जातात, परंतु ग्रंथनाम व इतर नोंदी दिल्या जात नाहीत.

१३) 'नरहर कुरुंदकरांनी एका ठिकाणी 'शिवाजीच्या नावाला बाजारभाव आहे' असे सवंग, अशिष्ट विधान केले आहे' असे विधान लेखाच्या सुरुवातीलाच गांगल देतात. परंतु हे विधान कुरुंदकरांनी कुठल्या ग्रंथात केले आहे हे ते सांगतच नाहीत. कुरुंदकरांचे तीस–चाळीस ग्रंथ आजवर प्रसिद्ध झाले असावेत. त्यातून 'हे' विधान वाचकाने शोधावे कसे?

एकूणच संशोधनाची म्हणून जी प्राथमिक शिस्त असते तीही डॉ. गांगल पाळीत नाहीत. याला संशोधनाची बैठक म्हणता येत नाही.

हे निष्कर्ष कसे काढले ?

१) महात्मा फुल्यांना हिंदुधर्माबद्दल आत्यंतिक द्वेष वाटत असे.

२) ज्योतीराव फुले हा माणूस अव्वल दर्जाचा स्वधर्मद्रोही तर होताच, पण त्याच दर्जाचा स्वजनद्रोही आणि देशद्रोही होता.

३) फुल्यांनी आपली सबस्टँडर्ड बुद्धिमत्ता दयाळू इंग्रज सरकारच्या चरणी वाहिली होती.

४) विद्वत्तेशी हाडवैर असलेल्या महात्म्याला हे कळणं शक्य नाही.

५) तर्कतीर्थ, गं बा. सरदार यांनी खूप बोटचेपेपणा करून इतिहासाचे विकृतीकरण केले.

६) (ज्योतीबांची) उपजतबुद्धी बेताची, अभ्यास करण्याची कुवत आणि इच्छा नाही.

७) ब्रिटीश राज्यकर्ते आणि मिशनरी यांचा म. फुल्यांना भक्कम पाठिंबा होता.

८) ज्योतिबा विद्यावैरी होते, ज्ञानशत्रू होते.

९) महाराष्ट्राच्या समाजकारणातील – राजकारणातील परस्परद्वेषाची

गटारगंगा दुथडी भरून वहात असून तिची गंगोत्री फुल्यांच्या लिखाणात आहे.

असे अनेक निष्कर्ष धडाधड डॉ. गांगल नोंदवीत जातात. परंतु हे निष्कर्ष कुठल्या पुराव्यांवर आधारून काढले आहेत? हे निष्कर्ष कुठे, कुणी, केव्हा सिद्ध केले आहेत ? डॉ. गांगल यांनी स्वत: अगर अन्य कुणी इतरत्र तसे सिद्ध करून दाखविले असल्यास त्याचा संदर्भ तरी द्यायचा होता.

असले बेछूट निष्कर्ष आणि निराधार आरोप यांना संशोधनात थारा नसतो. ही आहे बेलगाम शेरेबाजी आणि ताशेरेबाजी !

हा तर संशोधनातला अधम गुन्हा

डॉ. गांगल हे विद्वान संशोधक फक्त संशोधनाची शिस्त पाळीत नाहीत एवढीच तक्रार असती तर ती समजून तरी घेता आली असती, परंतु जो संशोधनाच्या क्षेत्रातला अतिशय मोठा गुन्हा मानला जातो असा **अप्रामाणिकपणाचा; असत्य वर्तनाचा** अधम प्रकार डॉ. गांगल करतात, तो म्हणजे ते म. फुल्यांची म्हणून जी अवतरणे घेतात त्यांतील अर्थनिर्णायक शब्द जाणीवपूर्वक वगळून त्यांचा अर्थ बदलून टाकतात. ती विधाने विकृत आणि भोंगळ बनवतात आणि मगच उद्धृत करतात

डॉ. गांगल यांनी असे करून सामान्य वाचकांची आणि अभ्यासकांची जी फसवणूक केली आहे त्यातून त्यांनी स्वत:ची सगळी विश्वासार्हताच संपुष्टात आणली आहे. 'महात्मा ज्योतिराव फुले म्हणतात, 'इराणातून पहिली टोळी लहान लहान मचव्यांतून आली. ते माशांसारखे चालत म्हणून टोपणनाव मत्स्य पडले. (गुलामगिरी पृ. ९८)' असे एक अवतरण ग्रंथनाम आणि पृष्ठक्रमांक यांसह डॉ. गांगल यांनी उद्धृत केले आहे. यातही अर्थातच प्रकाशक, आवृत्ती, प्रकाशनकाल आदी माहितींची नोंद त्यांनी दिलेली नाहीच, परंतु तरीही एवढ्यावरून सुद्धा सामान्य वाचकाची दिशाभूल होऊ शकते. ग्रंथनाम, पृष्ठक्रमांक एवढ्या अपुऱ्या नोंदीवरूनच वाचकाला हे अवतरण अस्सल असणार असा विश्वास वाटू शकतो. वाचक कशाला मूळ ग्रंथ उघडून पाहील? डॉ. गांगल यांनी मुळातल्या अवतरणातील अर्थनिर्णायक शब्द गाळून ते अवतरण उद्धृत केले आहे आणि पुढे म. फुल्यांवर तोफ डागली आहे. 'ह्या एका वाक्यात महात्मा जोतिबांनी इतिहास, भूगोल आणि व्युत्पत्तीशास्त्र ह्या तीन शास्त्रांचा व्यवस्थित खून पाडला आहे. 'आर्य इराणातून आले' ह्या विधानाला तर्कतीर्थांची मऊ मऊ भाषा वापरायची तर 'आता विशेष पुष्टी मिळत नाही.' -आणि स्पष्ट सांगायचं तर काडीमात्र पुष्टी मिळत नाही. बरं, समजा आर्य लोक इराणातून आले, पण ते लहान लहान (म्हणजे किती लहान?) मचव्यांतून आले ह्याला पुरावा काय? महात्म्याचे वचन एवढाच पुरावा ! ते मचवे म्हणे, माशांसारखे चालत ठीक आहे, चालू देत. म्हणून टोपणनाव मत्स्य पडले? मनुष्याने लहान लहान मचवेच काय लहान लहान होड्या, नोहास अर्क किंवा मनूची नौका बघण्यापूर्वी कित्येक लक्ष वर्षं माणूस पृथ्वीवर

रहात होता आणि मत्स्य पाण्यात रहात होता. तेव्हा टोपणनाव पडायचेच तर ते मत्स्यवरून मचवा पडणार की मचवावरून मत्स्य? हा प्रश्न तुम्हाआम्हाला अभ्यास करणारांना पडणार! ज्यांचे अभ्यासाशी वाकडं आणि विद्वत्तेशी वैर त्यांनी काय वाट्टेल ते बोलावं आणि आपण त्यांना 'महात्मा' म्हणावं.

'कृ. पां. कुलकर्णींनी संपादिलेल्या व्युत्पत्तिकोशात 'मचवा' चा प्रवास संस्कृत मंच मल्याळम् मचि–मल्याळमधून पोर्तुगीज भाषेत, तेथून पुन्हा मराठीत मचवा असा वर्णिला आहे. Dravidian Etymological Dictionary (प्रविष्ट ४६३८ असे अर्थ देते. मंचि (तमिळ) Cargo boat with a raised platform, मंचि (मल्याळम) A large sort of boat, single masted pattimer in coasting trade, holding 10–40 tons, कानडी मध्ये हेच रूप मच्चिवे असे आहे. हे सगळे देऊन झाल्यावर द्रविडियन शब्दकोशाचे विद्वान संपादक अतिसावधपणे 'Possibly IA' मंचवरून हे सगळे शब्द उद्भवले असावेत असे सांगतात. विद्वान माणसांना ठामपणे बोलायला भीतीच नाही तर शंका वाटते; मूर्ख आणि महात्मे मात्र निर्भीक आणि निःशंक असतात.' आता वस्तुस्थिती पाहूया.

'गुलामगिरी' हा म. फुल्यांचा ग्रंथ १८७३ मध्ये प्रथम प्रकाशित झाला. ' (ब्राह्मणी धर्माच्या आडपडद्यात)' 'गुलामगिरी' (सुधारल्या इंग्लिश राज्यात.) हे लहानसे पुस्तक जोतीराव गोविंदराव फुले यांनी लोकहितार्थ केले. ते पुणे येथे पूना सिटी प्रेस' छापखान्यांत छापले'[१], असे प्रथमावृत्तीच्या मुखपृष्ठावर नमूद केलेले असून हया ग्रंथाचे अपूर्व वैशिष्टय असे की याची 'किंमत १२ आणे' छापली असून त्याच्याच खालच्या ओळीत मात्र 'गरीब शूद्रादिअतिशूद्रांस ६ आणे'[२] असे लिहिलेले आहे. यावरून समाजाच्या तळातल्या थरापर्यंत हे पुस्तक पोहोचावे हा म. फुल्यांचा हेतू असावा असे वाटते. 'लोकहितार्थ केले' या नोंदी मागे आणि निम्मी किंमत या वरून हा ग्रंथ प्रामुख्याने शुद्रातिशूद्र यांच्या प्रबोधनासाठी लिहिण्याचा म. फुल्यांचा उद्देश स्पष्ट दिसतो. त्यावेळी हा दलित–मागासवर्गीय समाज नुकताच कुठे शिकायला लागला होता. तेव्हा त्याला समजेल, पटेल आणि रूचेल या भाषेत आणि उदाहरणांनी हा ग्रंथ लिहिला गेला आहे. या ग्रंथाची प्रेरणा 'इतिहाससंशोधनाची' नाही. या ग्रंथाची अर्पणपत्रिका महात्मा फुल्यांच्या वैश्विक मानवतावादाची आणि विशाल अंत.करणाची साक्ष देणारी आहे. म. फुले अर्पणपत्रिकेत म्हणतात "युनैटेडस्टेटस् मधील सदाचारी लोकांनी गुलामास दास्यत्वापासून मुक्त करण्याच्या कामात औदार्य, निरपेक्षता, व परोपकार बुद्धी दाखवली यास्तव त्यांच्या सन्मानार्थ हे लहानसे पुस्तक त्यांस परम प्रीतिने नजर करितो, आणि माझे देशबांधव त्यांच्या त्या स्तुत्य कृत्याचा कित्ता, आपले शूद्रबांधवांस ब्राह्मणलोकांच्या दास्यत्वापासून मुक्त करण्याच्या कामात घेतील अशी अशा बाळगतो. ग्रंथकर्ता.'[३]

१ जानेवारी १८६३ रोजी अमेरिकेत गुलामांच्या दास्यमुक्तीचा जाहीरनामा प्रसृत करण्यात आला.[४] या घटनेचा म. फुल्यांना झालेला आनंद त्यांनी त्यानंतर

लिहिलेल्या या पहिल्याच गद्य ग्रंथाच्या या अर्पणपत्रिकेत व्यक्त केलेला दिसतो. त्याचबरोबर आपल्या देशबांधवांनी ब्राह्मणांच्या गुलामगिरीतून शूद्रबांधवांना मुक्त करण्यासाठी या घटनेपासून बोध घ्यावा अशी आग्रहाची सूचना केलेली आहे. परंतु जर बोध घेतला गेला नाही तर मग या गुलामगिरीविरुद्ध संघर्ष होईल आणि शूद्रातिशूद्र निश्चितच त्यात यशस्वी होतील असा निर्धारही सूचित केलेला आहे. म. फुल्यांची दृष्टी देशाच्या सीमांपलिकडं पाहणारी आहे. त्यांचे शिक्षण मॅट्रिकपर्यंतही झालेले नव्हते, परंतु त्यांना वैचारिक ग्रंथ मूळ इंग्रजीतून वाचण्याची आवड असावी असे त्यांनी उद्धृत केलेल्या या ग्रंथाच्या आणि इतर ग्रंथांच्या तळटीपांतून आणि अवतरणांमधून स्पष्ट दिसते. म. फुल्यांनी संशोधनाची कुठलीही पीएच. डी. पदवी मिळविलेली नव्हती, तरीही ते अनेक ठिकाणी आपल्या विधानांसाठी इंग्रजी ग्रंथांचा, ग्रंथकाराचा नाव आणि पृष्ठक्रमांकासह निर्देश करताना आढळतात. १८६३ मध्ये घडणाऱ्या अमेरिकेतील घटनेचा बारकाईने अभ्यास त्वरित करण्याइतपत म. फुले जागृत होते, हेच या अर्पणपत्रिकेतून दिसून येते. म. फुल्यांनी हया ग्रंथाची प्रस्तावना मराठीबरोबरच इंग्रजीतूनही लिहिली आहे. म. फुल्यांची या ग्रंथातील मराठी भाषा रांगडी आणि तिखट आहे, आक्रमक आहे. परंतु त्याचवेळी इंग्रजी मात्र प्रौढ आणि डौलदार आहे. यामागेही फुल्यांचा हेतू असावा असे मानायला जागा आहे. इंग्रजी वाचणाऱ्यांपुढे त्यांना हा प्रश्न काय आहे तो फक्त उलगडून दाखवायचे होते. परंतु मराठीत लिहिताना मात्र ते जेव्हा आक्रमक भाषा वापरतात तेव्हा त्यामागे शूद्रातिशूद्रांचे प्रबोधन हा हेतू तर आहेच, परंतु त्यांना आपल्या गुलामगिरीची जाणीव व्हावी आणि त्यांनी त्या जाणिवेतून पेटून उठावे; बंडासाठी तयार व्हावे, त्यांना गुलामगिरीची चीड यावी यासाठी फुल्यांनी जाणीवपूर्वक अशी आक्रमक भाषा वापरली असावी असे वाटते. त्याकाळात उपलब्ध असलेल्या इंग्रजी ग्रंथांच्या आधारे म. फुल्यांनी या शूद्रांना 'जागवण्याची' एक रणनीती आखली आणि ती या ग्रंथाद्वारे पुढे आणली असावी.

या पुस्तकाची सुरूवातच ' The day that reduces a man to slavery takes from him the half of his virtue "[५] (' ज्या दिवशी मनुष्य गुलाम होतो, त्या दिवशी त्याचा अर्धा सद्गुण जातो ') या प्रसिद्ध कवी होमर यांच्या वचनाने झालेली आहे. "हिंदुस्थानचा इतिहास हा या देशातील बहुसंख्यांक समाजावर लादलेल्या गुलामगिरीचा इतिहास असल्याने या देशातल्या सामान्य माणसाला देशाच्या इतिहासात जेवढे दारिद्र्य, दैन्य, मानहानी आणि पारतंत्र्य आले तेवढे क्वचितच एखाद्या देशाच्या वाटचाला आलेले असेल. ही गुलामगिरी धर्मदास्यातून निर्माण झालेली आहे, म्हणून हे धर्मदास्य झुगारून सामान्य माणूस मुक्त केला पाहिजे. जोतीरावांच्या अंतरीच्या या इच्छेचे प्रतिबिंब त्यांच्या (या) ग्रंथात पडलेले स्पष्ट जाणवते."[६] हा ग्रंथ प्रश्नोत्तरांच्या स्वरूपात लिहिलेला आहे. आपला इतिहास समजून घेण्याच्या अपार कुतूहलापोटी धोंडीबा प्रश्न विचारतो. याठिकाणी

'धोंडीबा' हा शूद्रातिशुद्र समाजाचा एक प्रतिनिधी म्हणून येतो. शिक्षणाने त्याला आपल्या 'अस्तित्त्वाची' जाणीव झालेली असल्याने प्रश्नांचे काहूर त्याच्या मनात निर्माण होते आणि अस्वस्थ धोंडीबा आपल्या धर्मांबद्दल आपल्या इतिहासाबद्दल प्रश्न उपस्थित करतो आणि जोतीराव त्याला उत्तरे देतात. अशा प्रश्नोत्तरांच्या नाटचपूर्ण गतिमानतेतून हा ग्रंथ सिद्ध झालेला आहे. ही सर्व पार्श्वभूमी लक्षात घेतल्यावर आता आपण डॉ. गांगल यांनी उद्धृत केलेल्या पहिल्या अवतरणाची तपासणी करूया.

या ग्रंथाच्या दुसऱ्या भागात, धोंडीबाने दुसरा प्रश्न विचारला, इराणातून या देशात आलेल्या आर्यांची टोळी जलमार्गाने लढाऊ गलबतावरून आली किंवा कशी? त्यावर उत्तर देताना जोतीराव सांगतात, "जो.- **लढाऊ गलबते त्या काळी नव्हती, सबब** ती टोळी लहान लहान मचव्यांतून आली, **व** ते **मचवे** माशासारखे त्वरेने **पाण्यावरून चालत असत**, म्हणून **त्या टोळीच्या अधिकाऱ्यांचे** टोपणनाव मत्स्य पडले **असावे**." [७]

हे अवतरण घेताना त्यातील अर्थनिर्णायक **जाड ठशातील** शब्द वगळून डॉ. गांगल प्रथम विकृत करतात आणि मग म. फुल्यांवर प्रश्नांचा भडिमार करतात. अशा बदललेल्या अवतरणाद्वारे एखादा संशोधक आपली विद्वता प्रदर्शित करू लागला तर, खरे तर, त्याचा हे अवतरण विकृत करण्यामागील अप्रामाणिकपणा लक्षात घेऊन त्याच्या पुढच्या विवेचनाकडे लक्ष देण्याचे कारण उरत नाही. 'असावे' या शब्दाने म. फुल्यांनी आपला तर्क व्यक्त केल्याचे स्पष्ट दिसत असताना, डॉ. गांगल मात्र म. फुल्यांवर बेछूट ताशेरे मारण्याची संधी साधण्यासाठी तो शब्दच गाळून टाकतात. डॉ. गांगल यांनी कंसात गुलामगिरी पृ. ९८ अशी नोंद केली आहे. संशोधनाच्या दृष्टीने ही नोंद फक्त अपुरीच नाहीतर चुकीचीही आहे. ९८ हा पृष्ठक्रमांक 'म. फुले समग्र वाङ्मय, संपादक–धनंजय कीर, स. गं. मालशे, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई, आ. २ री, १९८०,' या ग्रंथाचा आहे. स्वतंत्र 'गुलामगिरी' या ग्रंथाचा नाही. त्यामुळे हे ग्रंथनाम चूक आहे.

डॉ. गांगल यांनी पुढे कृ. पां. कुलकर्णी यांच्या व्युत्पत्ति कोशाचा संदर्भ दिला आहे, परंतु या कोशाच्या संदर्भातील आवश्यक संशोधकीय नोंदी त्यांनी दिलेल्या नाहीत. प्रत्यक्षात तो संदर्भ सदर कोशात पुढीलप्रमाणे आहे.

'मचवा. पु. मालाची मोठी नाव, शीड, A kind of boat (मल्याळ–मंजी < मंची (< सं. मंच, मंचक=खाट) हचा मल्याळी शब्दाचा पोर्तुगीज अपभ्रंश मांचुआ असा आहे. (संस्कृत- मल्याळी– पोर्तुगीज- मराठी असा हचा शब्दाचा प्रवास आहे.)' कृ. पां. कुलकर्णी, मराठी व्युत्पत्तिकोश, (ऐतिहासिक व तौलनिक) श्री लेखन वाचन भांडार, पुणे, दुसरी आवृत्ती, जाने १९६४, पृ. ६१७

Dravidian Etymological Dictionary (प्रविष्ट ४६३८) असा दुसरा आधार पुढे नोंदवितानाही डॉ. गांगलांनी इतर आवश्यक नोंदी दिलेल्या नाहीत

(प्रविष्ट ४६३८) ही नोंदही चुकीची दिलेली आहे. मूळ नोंद पुढीलप्रमाणे आहे.

'Ta mañci cargo boat with a raised platform. Ma mañci a large sort of boat, single-masted Pattimar in coasting trade, holding 10-40 tons; vañci a large boat, ka mañji a large boat with one mast used in coasting trade. Tu. mañji a long boat, a single-masted country vessel.' (3789), A Dravidian Etymological Dictionary By T. Burrow & M. B. Emeneau; The Clarendon Press, (Oxford University Press, Ely House, London W. I) Oxford, Rp. 1970, P. 305'

'हे सगळे देऊन झाल्यावर द्रविडियन शब्दकोशाचे विद्वान संपादक अतिसावधपणे Possibly I A मंचवरून हे सगळे शब्द उद्भवले असावेत असे सांगतात' हा शेरा डॉ. गांगल यांनी मनाचा घातलेला आहे. कोशात हा शेरा नाही. म. फुल्यांचे प्रतिपादन हा एक तर्क आहे हे त्यांच्या विधानातूनच स्पष्ट होते. अर्थात तरीही हे त्यांचे मत दोषमुक्त आहे असे मी मानत नाही. परंतु त्यांचा काळ, त्यांच्यासमोरचा वाचकवर्ग, त्यांचा लेखनामागील हेतू आणि उपलब्ध सामग्री यांचा विचार करूनच त्यावर मतप्रदर्शन करायला हवे. उपरिनिर्दिष्ट दोन्ही कोश अनुक्रमे १९४१ आणि १९६१ साली प्रथम प्रकाशित झाले आहेत. म. फुल्यांच्या उणीवा जरूर दाखवाव्यात, परंतु काही काळाचे भान आणि शेरेबाजीचा विवेक पाळून !

तमीळ मराठी शब्दकोशात, मच्चम ना. १. मासा २. मत्स्यावतार ३. मीन राशी ४. फाल्गुन महिना ५. मत्स्य पुराण ६. मत्स्य देश ७. नमुन्यासाठी ठेवलेला सोन्याचा तुकडा ८. सुगावा, मागमूस ९. चामडीवरचा तीळ, असे अर्थ दिलेले आढळतात. (तमीळ मराठी शब्दकोश, संपा. रमाबाई जोशी पु. दि. जोशी, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई, १९७६, पृ. ५२४)

इतरही अवतरणे विकृत

डॉ. गांगल यांनी म. फुल्यांची इतरही अवतरणे जाणीवपूर्वक बदलून उद्धृत केली असल्याचे आढळते.

डॉ. गांगल लिहितात– 'अशा तऱ्हेने माशाचं कालवण वाढून झाल्यावर सदरहू महात्मे आपल्याला कासवाचं जेवण वाढतायत. 'इतक्यात इराणातून दुसरी टोळी कचव्यामधून बंदरात येऊन उतरली. कचवे मचव्यापेक्षा मोठे असल्यामुळे पाण्यावर कासवासारखे चालत म्हणून टोपण नाव कच्छ पडले.' कासव पाण्यावर चालतं काय? सर्रास सारी कासवे साऱ्या माशांपेक्षा मोठी असतात काय? १० ते ४० टन माल वाहून नेणारे मचवे जर लहानलहान तर मोठे मोठे 'कचवे' किती मोठे असतात? बाकी सगळे इतिहास–भूगोल-व्युत्पत्तिशास्त्रविषयक प्रश्न आहेतच. फुल्यांच्या माहात्म्याचा अंश आपल्यालाही लाभावा म्हणून त्यांची जाडजूड चरित्रे

लिहिणाऱ्यांनी, ज्योतिबांच्या ह्या अकाट ज्ञानाविषयी थोडा खुलासा करावा. अवतारकल्पना समजून घ्यायची तर डोकं आणि हृदय स्वच्छ पाहिजेत. त्यात फक्त गलिच्छ शिव्या भरलेल्या असतील तर ज्ञानाचा शिरकाव होत नाही.' (सोबत ११।१२।८८ पृ. १२) डॉ. गांगल यांच्या मते ह्या सर्व अवतारांच्या कथा म्हणजे सुंदर कविकल्पना आहेत आणि त्या तशाच समजून घ्यायला. 'ह्यात हे सगळे एक मिथ आहे' असे त्यांचे मत आहे.

म. फुले यांचे मूळ अवतरण पुढीलप्रमाणे आहे.

इतक्यात इराणातून आर्यलोकांची दुसरी एक मोठी टोळी कचव्यामधून बंदरात येऊन उतरली व ते कचवे मचव्यांपेक्षा काहीसे मोठे असल्याने पाण्यावर कासवांसारिखे सावकाश चालत असत, या कारणामुळे त्या टोळीच्या अधिकाऱ्याचे टोपण नाव कच्छ पडले.'[१८]

ज्या अवतारकथांना आपण आज कविकल्पना अथवा दैवतकथा (myth) म्हणून मान्यता देतो त्या १८७३ मध्ये ('गुलामगिरी'च्या लेखनकाळात) सत्यकथा मानल्या जात होत्या. व्यवहारामध्ये सर्वसामान्य अज्ञानी लोक ह्या कथांचा भक्तिभावाने स्वीकार करीत असत. गावोगावी कीर्तनकार, प्रवचनकार ह्या कथा सांगून सामान्य लोकांकडून भरमसाठ दक्षिणा मिळवीत असत. अडाणी लोक या चमत्कारावर पूर्ण विश्वास ठेवून अंधश्रद्धांना कवटाळून बसलेले होते. त्यामुळे ह्या कथा कल्पित आहेत, लोक समजतात तशा खऱ्या नाहीत, हे त्यांना पटवून देण्यासाठी म. फुल्यांनी समोरच्या अडाणी लोकांना समजेल अशा भाषेत, त्यांना आवडेल अशा उदाहरणांनी प्रस्थापित समजुतींवर प्रखर हल्ला केला.

'गुलामगिरी'च्या प्रस्तावनेत म. फुले लिहितात, 'या ग्रंथाचा मुख्य उद्देश असा आहे की, आज शेकडो वर्षे शूद्रादिअतिशूद्र ब्राह्मण लोकांचे राज्य झाल्यापासून सतत दुःखे सोशीत आहेत व नाना प्रकारच्या यातनेत संकटात दिवस काढीत आहेत. तर या गोष्टीकडेस त्या सर्वांचे लक्ष्य लागून त्यांनी तिजविषयी नीट विचार करणे व येथून पुढे भटब्राह्मण लोकांचे अन्यायी जुलमापासून आपली सुटका कशी करून घेणे हाच काय तो आहे. या देशात भट लोकांचे राज्य होऊन सुमारे तीन हजार वर्षापासून अधिक काळ लोटून गेला असावा, असे अनुमान होते. ते लोक परकीय देशातून येऊन या देशातील मूळचे राहणारे लोकांस जिंकून त्या सर्वांस त्यांनी आपले दास केले व त्यांस अनेक तऱ्हेची क्रूर शासने दिली .... पुढे, त्यांस भट लोकांनी ज्ञानहीन करून टाकिले, याजमुळे भट लोकांचे पांचपेंच त्यांचे लक्षात मुळीच आले नाहीत. त्यांनी त्यांच्यावर वर्चस्व मिळवून त्यांस अक्षय आपले ताब्यात ठेवण्याकरिता केवळ स्वहितास अनुलक्षून पुष्कळ बनावट ग्रंथ करून ते आपणा सर्वांस ईश्वरापासून प्राप्त झाले, असे त्या वेळचे अज्ञानी लोकांस सांगून त्यांचे मन सर्वस्वी वळविले. त्या ग्रंथांत त्यांनी असे लिहिले की, शूद्रांस ईश्वराचा उत्पन्न करण्याचा हेतू इतकाच आहे की त्यांनी सदासर्वदा भट लोकांच्या सेवेत

तत्पर असावे व जणेकरून त्यांची मर्जी खूष राहील असे करावे; म्हणजे ते ईश्वराला पावन होऊन त्यांचे देहाचे व जन्मास येण्याचे सार्थक झाले.'[९]

हे सर्व ग्रंथ परमेश्वरनिर्मित नसून ते मानवनिर्मित असल्याची स्पष्ट घोषणा करून म. फुल्यांनी एक क्रांतिकारक पाऊल उचलले. त्यांच्या मते 'अशा ग्रंथापासून सर्वशक्तिमान, सर्व जगाचा व त्यातील सर्व वस्तूंचा उत्पन्नकर्ता जो परमेश्वर त्याच्या समसृष्टीला मोठे गौणत्व आणले, असे आमचे जे हल्लीचे शहाणे भट बंधू, ज्यास बंधू म्हणण्यास मोठी लज्ज्या प्राप्त होते, कारण त्यांनी एके वेळी शूद्रादि अतिशूद्रांस फार दुःखे दिली व हल्लीही ते धर्माच्या योगाने त्यापासून दुःखे सोशीत आहेत आणि एकमेकास दुःख देणे हा बंधुधर्म नव्हे, तथापि त्यांस आम्हा सर्वांचे उत्पन्नकर्त्याच्या संबंधाने बंधु म्हणणे भाग पडते, तर ते देखील उघड रीतीने असे म्हणण्यास सोडणार नाहीत, मात्र त्यांनी स्वहिताकडेस लक्ष्य न देता केवळ न्यायास अनुसरून विचार केला पाहिजे.'[१०] म. फुल्यांचा हल्ला विषमतेवर आहे, अन्यायावर आहे, या अन्यायाने कळवळून ते लिहितात, 'भट लोक आपले पोट भरण्याकरिता आपले स्वार्थी ग्रंथांतून वारंवार जागोजाग अज्ञानी शूद्र लोकांस उपदेश करतात, त्याजमुळे त्यांच्या मनामध्ये त्यांजविषयी पूज्यबुद्धी उत्पन्न होऊन त्यांस त्यांनी (भट लोकांनी) ईश्वरालाच मात्र जो योग्य सन्मान तो आपणास देवविण्यास लाविले आहे, हा काही लहानसहान अन्याय नव्हे. याजबद्दल भट लोकांस ईश्वराजवळ जबाब द्यावा लागेल.'[११] ही पूज्यबुद्धी नष्ट केल्याशिवाय शूद्रातिशूद्र समाज ताठ मानेने जगू शकणार नसेल तर मग मुळावरच आघात करायचा म्हणून म. फुल्यांनी या बनावट ग्रंथांनाच आव्हान दिले, त्यातल्या कथांची टर उडवली. बोचरा उपरोध आणि तिरकस उपहास यांनी सरसकट रेवडी उडवीत त्यांनी या कथांचा धुव्वा उडविण्याचा चंग बांधला. शूद्रातिशूद्रांची मानसिक गुलामगिरी नष्ट करण्यासाठी म. फुल्यांना हे गरजेचे वाटले. 'रणनीती' म्हणून मग त्यासाठी जे जे करावे लागले ते ते सर्व त्यांनी केले. गुलामांना अस्मिता देण्यासाठी एक स्वतंत्र इतिहास 'घडविला.' शूद्रातिशूद्रांचे भीषण दुःख वेशीवर टांगताना म. फुले म्हणतात, 'त्यांस जी दुःखे प्राप्त झाली ती ऐकूनच मात्र पाषाणहृदयी मनुष्याचे अंतःकरण तर काय, परंतु प्रत्यक्ष मूर्तिमंत काहाराचा पाषाणही कलकल उकलून आतून दुःखाश्रूचे लोटचे लोट चालून त्याजमुळे पृथ्वीवर इतके जळ होईल की ज्यांचे पूर्वजांनी शूद्रादिअतिशूद्रांस गुलाम केले त्यांचे जे वंशज हल्लीचे भटबंधू त्यांपैकी जे आपले पूर्वजांसारखे कठोर हृदयाचे नसून कोमल अंतःकरणाचे आहेत, त्यांस असे वाटेल की, हा एक जलप्रलयच आहे.'[१२]

शूद्रातिशूद्र एकमेकांत मिसळू नयेत व त्यांच्यात कायमचा वाकडेपणा रहावा यासाठी भट लोकांनी जातिभेदाचे थोतांड उपस्थित केले व त्याला स्वहितसाधक ग्रंथाचा आधार दिला, असे सांगून म. फुल्यांनी माळी–कुणबी, सोनार, शिंपी, लोहार, सुतार आणि महार, मांग यांचे सर्वांचे पूर्वज एकाच घराण्यातील आहेत असा समाजक्रांतिकारक विचार प्रसृत केला. या सर्व जातींमध्ये रक्ताचे नाते स्थापन

करून पोलादी भ्रातृभाव निर्माण करण्याचा म. फुल्यांचा हा प्रयत्न अभूततपूर्व तर होताच, परंतु अस्पृश्य जातींचा स्वाभिमान जागृत करणारा, त्यांना बुलंद अस्मिता देणारा होता. त्याकाळी नुसती अशी कल्पनाही असंभव असताना म. फुले त्याची जाहीर दवंडी पिटतात हे विलक्षण धाडसाचे कृत्य होते. म. फुल्यांसारखा निधड्या छातीचा, द्रष्टा योद्धाच ते करू जाणे ! बारा बलुतेदार आणि अलुतेदार यांच्या जोडीला सर्व अतिशूद्रांची आणि स्त्रियांची फौज एकत्र करून एक महाशक्ती उभारणारी फळी निर्माण करण्याचा हा एक समाजक्रांतीचा प्रयत्न होता. डावपेचाचा भाग म्हणून जरी म. फुल्यांनी धर्मग्रंथाची चिकित्सा करताना अवतारकथांची टर उडविली असे मानले, तरी त्यातही त्यांच्या मांडणीचा काही भाग आजही ग्राह्य ठरतो हे विशेष. 'बळी व वामन यांच्या कथेचे तात्पर्य सत्य असावे असे म्हणावयास हरकत नाही. ब्राह्मणेतर प्रजेमध्ये या प्राचीन धार्मिक चालीरीती उत्सव, सण, व्रते रूढ आहेत. त्यांच्या समुच्चयास फुले यांनी येथील प्रजेचा मूळधर्म' असे म्हटले आहे. फुले हे ब्राह्मणेतरांच्या अवैदिक देवतांचा जो अर्थ लावतात तो भारतीय समाजशास्त्राच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचा आहे'[१३] असा तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांचा अभिप्राय आहे. याच पृष्ठाच्या तळटीपेत श्री. जोशी म्हणतात, 'असीरियाच्या प्राचीन संस्कृतीचे ऐतिहासिक संशोधन अलिकडे बरेच झाले आहे. त्यावरून असीरियातील प्राचीन लोकांची म्हणजे असुरांची संस्कृती जगातील अत्यंत प्राचीनतम होय, असे बहुतेक संशोधकांचे मत झाले आहे. हिंदूंच्या वेदांत असुर हे प्रजापतीचे ज्येष्ठ पुत्र होत असे वारंवार म्हटले आहे... जोतिरावांच्या कयासास यामुळे दुजोरा मिळतो.'[१४]

'म. फुले यांचा 'गुलामगिरी' हा ग्रंथ अनेकांना विध्वंसक वाटला. मी स्वतःही त्याचे विध्वंसक स्वरूप मान्य करतो. परंतु ज्या पारंपरिक सामाजिक मूल्यांना नकार देऊन फुले त्यांचा विध्वंस करू पहात होते, त्याचबरोबर त्याऐवजी नवीन मूल्यांचीही समाजात प्रतिष्ठापना करण्याचे काम शिरावर घेत होते. जुने नाकारायचे काय आणि नवे स्वीकारायचे काय, याची स्वच्छ आणि स्पष्ट जाणीव त्यांच्या लिखाणात दिसते. कोणती नवी मूल्ये स्वीकारायची हे त्यांनी आपल्या सार्वजनिक सत्यधर्मात स्पष्ट केले आहे. सार्वजनिक सत्यधर्माची स्थापना करू इच्छिणारे म. फुले समजावून घेतल्याशिवाय 'गुलामगिरी' तील नकाराचे व विध्वंसाचे आकलन होणार नाही. 'गुलामगिरी 'आणि 'सार्वजनिक सत्यधर्म' हे ग्रंथ म. फुल्यांच्या विचारांचे दोन महत्त्वाचे पैलू आहेत. त्यांचा सुटा विचार होणार नाही, तो एकत्रच करावा लागेल. यापुढे जाऊनही असे म्हणता येईल की, या दोन महत्त्वपूर्ण चळवळी होत्या. या दोन चळवळी एकमेकींवर इतक्या अवलंबून होत्या की एक यशस्वी झाल्याशिवाय दुसरी यशस्वी होण्याची सुतराम् शक्यता नव्हती.'[१५]

म. फुले यांचे गुलामगिरीतील लेखन दोषमुक्त मानण्याची गरज नाही. परंतु त्याचवेळी डॉ. गांगल यांनी ज्या मायथॉलॉजीद्वारे अवतारकथांचा अर्थ शोधण्याचा

प्रयत्न केला आहे ते शास्त्र म. फुल्यांच्या काळात नुकतेच कुठे उदयाला येत होते ही गोष्ट लक्षात घेऊनच म. फुल्यांची चिकित्सा व्हायला हवी.

'परंपरागत समाजसंस्था नष्ट करून त्या जागी स्थानापन्न करावयाच्या सामाजिक संस्था हचा ज्या तत्त्वांवर आधारलेल्या असल्या पाहिजेत ती तत्त्वे त्यांनी 'सार्वजनिक सत्यधर्म' या पुस्तकात विशद करून सांगितली आहेत. ती तत्त्वे म्हणजे आधुनिक मानवी स्वातंत्र्य, समता आणि विश्वबंधुत्व ही होत. ही तत्त्वें गृहीत धरली म्हणजे जोतिबांना दिसलेल्या सत्याचे पूर्ण स्वरूप दृष्टीसमोर येते. 'सार्वजनिक सत्यधर्म' या पुस्तकाचे योग्य व आवश्यक तितके मूल्यमापन केल्याशिवाय जीवनातील जे सत्य शोधण्यासाठी जोतिबा जीवनसंग्राम चालवीत होते, त्याचा खराखुरा अर्थ कळणे अशक्य आहे. हे पुस्तक जोतिबांनी अर्धांगाचा झटका आल्यानंतर, उजवा हात लुळा झाल्यावर, शरीरातील व्यथा सहन करीत, डाव्या हाताने लिहून पुरे केले आहे. 'गुलामगिरी मध्ये जे सत्य दाखवले आहे, ते अर्धसत्य आहे, त्याची दुसरी बाजू लक्षात घेतली नाही तर ते भयानक ठरेल,' अशी त्यांची भूमिका होती. म्हणून शारीरिक व्यथा सहन करीत त्यांनी हे पुस्तक लिहून पार पाडले. **जोतिबांच्या विश्वकुटुंबवादाचा 'सार्वजनिक सत्यधर्म' हा जाहीरनामा आहे. भारतीय लोकशाही क्रांतीची मूलभूत तत्त्वे विशद करून सांगणारा तो जाहीरनामा आहे. सार्वजनिक सत्यधर्मामध्ये जोतिबांच्या महात्मतेचे तेजोवलय पूर्ण प्रकट झाले आहे.** या तेजोवलयाचे तीन भाग आपल्या दृष्टीसमोर पडतात. ते म्हणजे **मूलभूत मानवी हक्क**, त्यावर आधारलेला विश्वकुटुंबवाद, आणि जीवनाचे व विश्वाचे सत्यस्वरूप प्रकट करणारा **बुद्धिवाद** हे होत. पश्चिमेकडून म्हणजे आधुनिक पाश्चिमात्य संस्कृतीकडून जोतिबांना या तीन प्रेरणा मिळाल्या. या तीन प्रेरणांतच त्यांची लोकशाही जीवनदृष्टी सिद्ध होते "[१६] असा तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशींचा अभिप्राय आहे.

महात्मा फुल्यांनी हा जाहीरनामा ३३ कलमांमध्ये विशद केला आहे

* 'आपल्या सर्वांच्या निर्माणकर्त्याने एकंदर सर्व प्राणीमात्रांस उत्पन्न केले. त्यापैकी स्त्रीपुरुष हे उभयता जन्मताच स्वतंत्र व एकंदर सर्व अधिकारांचा उपभोग घेण्यास पात्र केले आहेत.'[१७] ('स्वराज्य हा माझा जन्मसिद्ध हक्क आहे' ही लोकमान्य टिळकांची घोषणा झाली त्याच्या पंचवीस वर्षे आधी म. फुल्यांनी 'स्वातंत्र्य हा आमचा जन्मसिद्ध हक्क आहे' अशी स्पष्ट घोषणा केलेली आढळते.)

* ' आपल्या सर्वांच्या निर्माणकर्त्याने एकंदर सर्व मानव स्त्रीपुरुषांस धर्म व राजकीय स्वतंत्रता दिली आहे, ज्यापासून दुसऱ्या एखाद्या व्यक्तीस कोणत्याही तऱ्हेचे नुकसान करिता येत नाही, अथवा जे कोणी आपल्यावरून दुसऱ्या मानवाचे हक्क समजून इतरांस पीडा देत नाहीत, त्यांस सत्यवर्तन करणारे म्हणावेत.'[१८]

* ' आपल्या सर्वांच्या निर्माणकर्त्याने एकंदर सर्व स्त्रियांस, अथवा पुरुषांस एकंदर सर्व मानवी हक्कांविषयी आपले पाहिजेल तसे विचार, आपली पाहिजेल तशी मते बोलून दाखविण्यास, लिहिण्यास आणि प्रसिद्ध करण्यास स्वतंत्रता दिली

आहे, परंतु त्या विचारांपासून व मतांपासून कोणत्याही व्यक्तीचे, कोणत्याही तऱ्हेचे नुकसान मात्र होऊ नये म्हणून खबरदारी [ठेवायला हवी.]'[१९]

* 'स्त्री अथवा पुरुष, जे आपल्या हितासाठी दुसऱ्याचे नुकसान करण्याकरिता लबाड बोलत नाहीत अथवा लबाड बोलणारास मदत करीत नाहीत, त्यांस सत्यवर्तन करणारे म्हणावेत.'[२०]

* 'स्त्री अथवा पुरुष, जे व्यभिचार करीत नाहीत अथवा व्यभिचाऱ्यांचा सन्मान ठेवीत नाहीत, त्यांस सत्यवर्तन करणारे म्हणावेत.'[२१]

* 'स्त्री अथवा पुरुष, जे आपल्या सर्वांच्या निर्मिकाने निर्माण केलेल्या प्राणिमात्रांपैकी मानव स्त्रीपुरुषांमध्ये कोणत्याच तऱ्हेची आवडनिवड न करता त्यांचे खाणे-पिणे व लेणेनेसणे यांविषयी कोणत्याच प्रकारचा विधीनिषेध न करिता त्यांच्याबरोबर शुद्ध अंतःकरणाने आचरण करितात त्यांस सत्यवर्तन करणारे म्हणावेत.'[२२]

*'**या पृथ्वीच्या पृष्ठभागावर जेवढी म्हणून मानवांनी धर्मपुस्तके केली आहेत त्यांपैकी एकही ग्रंथात आरंभापासून शेवटपर्यंत सारखे सार्वजनिक सत्य नाही.** कारण प्रत्येक धर्मपुस्तकामध्ये काहीएक व्यक्तींनी त्यावेळच्या प्रसंगास अनुसरून हेकडपणा केल्यामुळे ते धर्म एकंदर सर्व मानवी प्राण्यांस सारखे हितकारक न होता, सहजच त्यांमध्ये अनेक फळचा होऊन त्या एकमेकांचा मनापासून हेवा व द्वेष करू लागतात.

'सारांश, आपल्या या सूर्यमंडळासह आपण वस्ती करणाऱ्या पृथ्वीचा निर्माणकर्ता जर एक आहे, तर तिजवरील अनेक देशांतील लोकांचा एकमेकांशी वैरभाव माजून प्रत्येकामध्ये देशाभिमान व धर्माभिमानाचे खूळ व्यर्थ का माजले आहे ?'[२३]

* 'जगातील सर्व धर्मग्रंथ पुरुषांनी लिहिले असून त्यांत स्त्रियांच्या हक्कांची पायमल्ली केली आहे, व पक्षपाताने स्त्रियांना दुय्यम दर्जा दिला आहे.'[२४]

* 'जगातील सर्व धर्म हे गैरसमजावर व अंधश्रद्धेवर उभारलेले आहेत.'[२५]

* 'सर्व धर्मग्रंथ हे सत्पुरुषांनी लिहिलेले आहेत. त्यांना काळाच्या मर्यादा असल्याने त्यात मर्यादित अर्थानेच सत्य आढळते. त्यामुळे कोणत्याही एका कुटुंबातील एका स्त्रीने बौद्ध धर्मातील तत्त्वे आवडल्यास बौद्ध धर्म स्वीकारावा, तिच्या पतीने त्याच्या मर्जीनुरूप ख्रिस्ती व्हावे, त्यांच्या कन्येने कुराण वाचून आवडल्यास मुस्लीम व्हावे, त्यांच्या पुत्राने सार्वजनिक सत्यधर्माची तत्त्वे आवडल्यास सार्वजनिक सत्यधर्मी व्हावे आणि कोणी कोणाच्या धर्माचा हेवा अगर द्वेष न करता, प्रेमाने, गोडीगुलाबीने सहजीवन जगावे.'[२६] अशी आहे म. फुल्यांची उदात्त, निरामय, निकोप आणि नैतिक सत्याचा पुरस्कार करणारी विचारसरणी !

'मी लहान असताना, माझे आसपासचे शेजारी मुसलमान खेळगडी यांच्या संगतीने मतलबी हिंदुधर्माविषयी व त्यातील जातिभेद वगैरे कित्येक खोट्या मतांबद्दल माझ्या मनात खरे विचार येऊ लागले, त्याबद्दल त्यांचे उपकार स्मरतो.'[२७]

धर्मग्रंथ सर्वांना वाचण्याची परवानगी, सर्वांना शिक्षण घेण्यास अनुमती, सर्वांनी एकत्र नमाज पढण्याची पद्धत, कोणालाही अस्पृश्य न मानण्याची वृत्ती, परमेश्वर एकच आहे ही श्रद्धा, मूर्तिपूजेचा तिटकारा, या गुणांमुळे म. फुल्यांनी इस्लामबद्दल अनेकवेळा सार्थ शब्दांत आदर व्यक्त केला आहे. म. फुल्यांची एकूणच विचारधारा ही सर्व धर्मांना समान मानणारी असल्याने त्यांनी इतर धर्मांचा द्वेष कधीही केला नाही. हिंदुधर्मातील शूद्रातिशूद्रांना विद्याबंदी, अस्पृश्यता, अनेक देवता विचार, मूर्तिपूजेचे अवडंबर, जातिभेदाचे खूळ, ब्राह्मणांचे वर्चस्व, स्त्रियांचे दुय्यम स्थान, अस्पृश्यांना मंदिरप्रवेश निषिद्ध, ब्राह्मणेतरांना धर्मग्रंथ वाचण्याची, ऐकण्याची बंदी या सर्व प्रकारांविरुद्ध बंड करणारे म. फुले, तुलनात्मक दृष्टीने विचार करता, प्रचलित हिंदूधर्मापेक्षा मुसलमान धर्म गौरव करण्याजोगा मानतात. ' हिंदूधर्मावरील, विशेषत: ब्राह्मणप्रधान हिंदूसमाजरचनेवरील व ब्राह्मणप्रधान संस्कृतीवरील, त्यांचा हल्ला एका तत्कालीन ऐतिहासिक विशिष्ट सामाजिक व राजकीय परिस्थितीची तीव्र प्रतिक्रिया होती व ती तीव्र प्रतिक्रिया तटस्थ रीतीने पाहणाऱ्या आधुनिक विचारवंतास मर्यादित अर्थाने समर्थनीयच वाटेल यात शंका नाही व ती समर्थनीय आहेच! '[२८] असा स्पष्ट निर्वाळा तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशींनी दिला आहे.

याच संदर्भात लिहिताना म. फुले समग्र वाङ्मयाचे संपादकीय म्हणते, 'जोतीरावांचे वाङमय वाचताना विचारवंत वाचकांनी त्यांचा कालखंड आणि त्यातील सामाजिक, आर्थिक, धार्मिक, सांस्कृतिक आणि शैक्षणिक परिस्थितीचे भान राखणे हे जसे आवश्यक आहे, तद्वतच वाङ्मयीन टीकाकारांनी त्यांच्या वाङ्मयातील अभिव्यक्तीच्या बहिरंगाकडे न पाहता त्यातील आशयाच्या अंतरंगाकडे पाहणे आवश्यक आहे.'[२९] म. फुले प्रेषित महंमदाला ' मानव महंमद[३०]' म्हणतात. ते त्याचा दैवी वर्ख नाकारतात, सर्व धर्म, जातींना समान लेखतात याचा पुरावा स्वच्छपणे त्यांच्या एका अखंडात आढळतो.

' ख्रिस्त महंमद मांग ब्राह्मणासी । धरावे पोटाशी बंधूपरी ॥'[३१]

या पार्श्वभूमीवर डॉ. बाळ गांगल यांनी आजच्या काळातील स्वत:च्या मनातील मुस्लिमविषयक विखार फुलवून दाखविण्यासाठी महात्मा फुल्यांच्या विधानांचा कसा विपर्यास केला आहे आणि त्यांच्या अवतरणांतील शब्द गाळून-त्याचा अर्थ कसा बदलून विकृत केला आहे हे पाहणे उद्बोधक ठरेल.

डॉ. गांगल लिहितात- ' भारतात मुसलमानी राज्य आले, ही घटना आपल्या महात्म्याला अत्यंत स्वागतार्ह वाटत होती. अर्थात इतिहासाचे ज्ञान काडीमात्र नसल्यामुळे ' सार्वजनिक सत्यधर्म पुस्तक ' नावाच्या चोपडचात पृ. ३६ वर महात्मा फुले म्हणतात– 'दयाघन निर्माणकर्त्याने कृपाळू होऊन धूर्त आर्यभट्टांच्या दास्यत्वापासून पंगू शूद्रादिअतिशूद्रांस मुक्त करण्याकरिता, जातिभेदाचा समूळ नाश करणारे मुसलमान लोकांस या देशात पाठविले.' त्या दयाघन निर्माणकर्त्याने ज्या कामासाठी जाहांमर्द मुसलमानास भारतात पाठविले, ते म्हणजे सर्वांची सुन्ता करण्याचे

काम मुसलमानांनी केले नाही हयाबद्दल महात्मा फुले चक्क खंतही व्यक्त करतात. उपर्युक्त चोपडयात (पृ. ६४) महात्मा जोतीराव म्हणतात, 'शूद्रादिअतिशूद्रांस मुसलमान करून त्या सर्वांस आपल्यासारखे पवित्र मानवी अधिकाराचा उपभोग घेण्यास लावले नाही ही सर्व बेफाम मुसलमानांची चूक आहे म्हणून मी कबूल करतो.' अरेरे ! महात्म्याच्या कुसुमकोमल मनाला केवढे हें कष्ट ! मुसलमानांनी सर्व शूद्रादिअतिशूद्रांची सुन्ता केली असती तर महात्म्याचे वैचारिक वारसदार पु. ल. देशपांडे हयांना पोटतिडकीने शूद्रांनी 'खुशाल' मुसलमान व्हावे, असा आदेश देण्याची पाळी आली नसती.' (सोबत– ४।१२।८८ पृ. १५)

'सार्वजनिक सत्यधर्म' या ग्रंथात (पृ. ३६५ ते ३७१) म. फुल्यांनी जातिभेदांची चिकित्सा केली आहे. म. फुल्यांच्या मते भारतात प्रथम जातिभेद अजिबात नव्हते. परंतु इराणातून इथे आलेल्या भटब्राह्मणांनी इथल्या क्षत्रियांना जिंकून आपले दास बनविले व त्यांच्यातील जे विशेष शूर होते, महावीर होते, त्या मांग-महारांना अस्पृश्य ठरवून इतर जातींना त्यांचा द्वेष करावयास शिकविले. त्या जातीजातीत फूट पाडून, त्यांना विद्याबंदी करून, अज्ञानात ठेवन अनेकवर्षे ब्राह्मण फसवीत आले. यावर प्रश्नकर्ता यशवंत विचारतो की, जर आपला सर्वांचा निर्माणकर्ता दयेचा सागर व परमन्यायी आहे असे तुम्ही म्हणता तर मग त्याला या सर्वोपरी गांजलेल्या शूद्रातिशूद्रांची कीव कशी आली नाही ?

या प्रश्नाला उत्तर देताना जोतीराव म्हणतात, 'आपल्या सर्वांच्या दयाघन निर्माणकर्त्याने कृपाळू होऊन धूर्त आर्यभट्टांच्या दास्यत्वापासून पंगू शूद्रादिअतिशूद्रांस मुक्त करण्याकरिता, आपण सर्वांचा निर्माणकर्ता एक मानून, जातिभेदाचा समूळ नाश करणारे मुसलमान लोकांस या देशात पाठविले, परंतु मुसलमान लोकांनी त्याचे हेतूस धाब्यावर बसवून आपण सर्व प्रकारचे मिष्टान्न खाणे, ख्यालीखुशाली, गाणे बजावणे वगैरे ऐष-आरामात लंपट झाले व ऐश्वर्याच्या मरात मदांध होऊन त्यांना दोन बोटे आकाश उरले होते. त्यामुळे आपल्या निर्माणकर्त्यास संताप होऊन त्याने या बलिस्थानातील मुसलमान लोकांस तोंडघसी पाडून त्यांचे एकंदर वैभव नष्ट केले.'[११] डॉ. गांगलानी या अवतरणांचा पृष्ठक्रमांक चुकीचा दिला आहे.

डॉ. गांगल यांनी या अवतरणातील जाड ठशातील शब्द गाळले, एवढेच नाही तर वाक्याचा अर्थ बदलणारा 'परंतु' पुढील महत्त्वाचा भाग हेतुपूर्वक गाळून टाकला आहे, यावरून हया संशोधकाचा अप्रामाणिकपणा निःसंदिग्धपणे स्पष्ट होतो.

पुढे- पृ. ३७८ ते ३८५ वर म. फुल्यांनी नीती म्हणजे काय याचे स्पष्टीकरण केले आहे. भागवत, रामायण हे इतिहासग्रंथ नाहीत असा फुल्यांचा दावा आहे. 'हा इतिहास त्यावेळच्या गप्पाडया-नाटक्यांनी केवळ लोकांची मने रिझवण्याकरिता कल्पून रचिला असावा.'[११] त्यांच्या मते या गोष्टींना इतिहास मानल्याने अंधश्रद्धा आणि चुकीची मूल्ये रुजतात. यापेक्षा 'इसापनीती' अधिक बरी! ती निदान रंजक आणि हितकारक तरी आहे ! मुख्य म्हणजे घातक नाही.

एकीकडे अथर्ववेदात 'बंधुभाव– ऐक्याचा' संदेश दिला जातो आणि व्यवहारात मात्र अनुभव दाहक जातिभेदाचा येतो या दांभिकपणावर कोरडे ओढून म. फुले या पार्श्वभूमीवर इस्लाममधील व्यावहारिक समतेचे मोठेपण मान्य करतात. आर्यभट ब्राह्मणेतरांना वेदातील एक शब्दसुद्धा ऐकू देत नसत. यावर यशवंताचा प्रश्न असा की, मग हिंदूधर्मात जर अशी दांभिकता होती आणि इस्लाममध्ये व्यावहारिक समता, तर मग मुसलमानांनी शूद्रातिशूद्रांस धूर्त आर्यभट्टांच्या कृत्रिमी दास्यत्वातून मुक्त का केले नाही ? यावर उत्तर देताना म. फुले म्हणतात, **'धूर्त आर्य भट्टांनी आपल्या सोवळचात लपवून ठेवलेल्या त्यांच्या वेदाचा तपास काढून त्यातील एकंदर सर्व खोडसाळपणा तपासून शूद्रादिअतिशूद्रांस मुसलमान करून त्या सर्वांस आपल्यासारखा पवित्र मानवी अधिकाराचा उपभोग घेण्यास लावले नाही म्हणून असा अनर्थ घडून आला,** ही सर्व बेफाम मुसलमानांची चूक आहे म्हणून मी कबूल करितो.'[१४] डॉ. गांगलाचा हाही पृष्ठक्रमांक चुकीचा आहे.

या अवतराणांतील अर्थनिर्णायक भाग वगळून डॉ. बाळ गांगल यांनी संशोधनाचा आव आणून म. फुलेंना बदनाम करण्याचा हेतू साध्य करून घेण्याचा प्रयत्न केला आहे हे स्पष्टपणे जाणवते.

वेदांची चिकित्सा मुसलमानांनी केली नाही म्हणून हा अनर्थ झाला असा हया अवतरणाचा अर्थ निघत असतानाच इस्लाममध्ये हिंदूधर्माच्या पार्श्वभूमीवर समता दिसते असा म. फुल्यांचा जो रोख आहे तो वादग्रस्त ठरू शकतो. अलिकडच्या संशोधनातून इस्लाममध्येही विषमता आहे ही गोष्ट पुढे आली आहे हे नाकारण्याचे कारण नाही. कदाचित 'दुरून डोंगर साजरे' या म्हणीप्रमाणे म. फुल्यांनी इस्लामची खोलात जाऊन चिकित्सा केली नसावी किंवा रणनीतीचा एक भाग म्हणून, त्यांच्या चळवळीला पाठिंबा देणाऱ्या मुसलमानांना दुखवू नये यासाठी कदाचित, त्यांनी इस्लामवर टीका केली नसावी असे वाटते. मात्र 'अस्पृश्यांची कैफियत' या आजवर अनुपलब्ध असणाऱ्या पुस्तिकेत आणि आता 'म. फुले समग्र वाङ्मय' कीर-मालशे, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई, तिसरी आवृत्ती, १९८८, पृ. ५५७ ते ५७७ या ग्रंथात समाविष्ट पुस्तिकेत म. फुल्यांनी एक अस्पृश्य आपली कैफियत इंग्लंडच्या राणीसमोर मांडीत आहे अशी कल्पना करून 'मुस्लीम राजवटीत अस्पृश्यांची अवस्था पेशवाई इतकीच दुर्दैवी होती' असे म्हटले आहे. या निबंधात म. फुल्यांनी इस्लामी राजवटीवर टीका केलेली आहे. म्हणजेच शूद्रातिशूद्र आणि सर्व स्त्रिया यांना सुखकारक नसणाऱ्या कुठल्याही व्यवस्थेवर म. फुल्यांचा हल्ला होता ही गोष्ट उघड दिसते.

'तारतम्य' या ग्रंथात प्रा. डॉ. स. गं. मालशे हे फुले वाङ्मयाचे चिकित्सक अभ्यासक म्हणतात– 'रामायणात एक कथा आहे. हनुमंताला रत्नमाला मिळते. तो प्रत्येक रत्न फोडून पाहतो. त्याला त्यात 'राम' आढळत नाही. तो रत्नमालेतील

रत्ने फेकून देतो. शूद्रातिशूद्रांचे ज्यात हित होत नाही, ते ज्योतीरावांनी असेच त्याज्य मानले.'[३५]

स्त्री- शूद्रातिशूद्रांचे सर्वाधिक अनहित प्रस्थापित वैदिक धर्माने केले आहे असे दिसताच म. फुल्यांनी सर्व आयुधे वापरून त्यावर हल्ला चढविला. म्हणून कदाचित त्यांचे इतर धर्मांच्या चिकित्सेकडे जावे तितके लक्ष गेले नसावे, अथवा हेतुतः त्यांनी तसे केले नसावे असें वाटते. कारण काहीही असो, महात्मा फुले इस्लाम आणि ख्रिश्चन धर्मावद्दल लिहिताना जपून लिहितात ही गोष्ट खरी आहे. पण म्हणून त्यांना इस्लामधार्जिणे अगर ख्रिश्चनधार्जिणे ठरविणे अन्यायकारक आहे. श्री. मालशे यांनी आपल्या उपरिनिर्दिष्ट ग्रंथात 'म. फुले आणि ख्रिस्ती धर्म' हा लेख लिहिला असून त्या लेखात त्यांनी म. फुल्यांच्या ख्रिश्चनधर्मविषयक विचारांची चिकित्सा केली असून अंतिम निष्कर्ष पुढीलप्रमाणे काढला आहे– 'गुलामगिरी'तील अनावृत पत्र, जुन्नरच्या व्याख्यानातील विधान, आण्यावारूंच्या पुस्तिकेवरील प्रतिक्रिया आणि बाबा पद्मनजींची अखेरची आठवण या चारी पुराव्यांचा एकत्रित विचार केल्यास असे दिसते की, विद्यमान धर्मांपैकी ख्रिस्तीधर्म आणि त्याचा संस्थापक येशू ख्रिस्त यांच्याविषयी त्यांच्या मनात परमादराची भावना असली, तरी ख्रिस्तांगीकार केल्याखेरीज आत्म्याचे तारण होत नाही, अशा तऱ्हेच्या भाबडचा कल्पना म. फुल्यांनी बाळगलेल्या नव्हत्या.'[३६]

म. फुल्यांनी ब्राह्मण विधवांसाठी जे बालहत्त्याप्रतिबंधकगृह काढले होते त्यामुळे ख्रिस्ती मिशनऱ्यांकडे अनाथ मुले जाणे बंद झाले[३७] असे धनंजय कीरांनी म. फुल्यांच्या चरित्रात म्हटले आहे. म. फुल्यांवर केला जाणारा ख्रिश्चन धार्जिणेपणाचा आरोप कसा निरर्थक आहे, हे स्पष्ट करणारे काही ठोस पुरावे नव्याने उजेडात आले आहेत.

महात्मा फुल्यांची प्रेरणा अस्सल भारतीय

म. फुल्यांची हिंदू धर्मग्रंथांची चिकित्सा करण्याची प्रेरणा ही अस्सल भारतीय मातीतील प्रेरणा होती याची साक्ष म. फुल्यांचे समकालीन तुकाराम हनुमंतराव पिंजण यांच्या लेखनातून मिळते. ते लिहितात, 'ज्ञानगिरीबाबा कबीराने केलेल्या बीजक नावाच्या ग्रंथातील विप्रमती भाग वाचून दाखवीत असत. विप्रमती भाग ब्रिज भाषेत लिहिला असल्यामुळे 'ज्ञानगिरीबाबा पुराणिक जमलेल्या श्रोत्यांना त्याचा अर्थ मराठीत करून सांगत असत. त्या भागात ब्राह्मणाच्या स्वार्थाचे, स्वभावाचे व वर्तणुकीचे फारच बहारीचे वर्णन केले आहे. अगोदरच ब्राह्मणवर्गाने धर्माचे नावाखाली ब्राह्मणेतर हिंदूंवर कसे वर्चस्व स्थापले व केवळ आपले हितासाठी त्याने पुष्कळ बनावट ग्रंथ रचून सर्व ब्राह्मणेतर हिंदूस त्याने कसे बौद्धिक गुलाम करून सोडले हे जोतीरावास कळून चुकले होते.'[३८] म. फुल्यांनी चिकित्सेची प्रेरणा 'संत कबीर' यांच्यापासून घेतली होती हे यावरून स्पष्ट होते. श्री. पिंजण

यांनी पुढे याच प्रेरणेतून 'सत् म्हणजे खरे, शोधक म्हणजे शोधून काढणारे, समाज म्हणजे मंडळ अशा नावाने जोतीरावांनी २४ सप्टेंबर १८७३ रोजी जूना गंज [पेठ] घर नंबर ५२७, पुणे येथे समाजाची स्थापना केली.'[३९] अशी माहिती दिली आहे. म. फुल्यांचे निकटचे सहकारी आणि अनेक वर्षे त्यांचे लेखनिक म्हणून काम केलेले गोंविद गणपत काळे आपल्या आठवणीत लिहितात– '(सत्यशोधक) समाजाचा नवीन सभासद होणाऱ्या गृहस्थास बेलभंडार व तळी उचलून समाजाची तत्त्वे मी पाळीन अशी प्रतिज्ञा करावी लागत असे.'[४०] या आठवणीवर संपादकीय टीपा देताना प्रा. डॉ. सीताराम रायकर हे सत्यशोधक वाङ्मयाचे चिकित्सक अभ्यासक लिहितात, 'म. जोतीरावांनी हा विधी [तळी उचलणे व बेलभंडार] महाराष्ट्रातल्या शूद्रांच्या जीवनपद्धतीतून उचलला हे पाहण्यासारखे आहे. परमहंस मंडळींचा पाव खाण्याचा विधी हा याबाबतीत किती परका होता हेही ध्यानात येते. कबीरपंथीय विप्रमतीचे वाचन आणि बेलभंडार यावरून म. फुल्यांचे एतद्देशीय ब्राह्मण्यविरोधी परंपरांशी असलेले नाते स्पष्ट होते. ब्राह्मणी वर्चस्वापासून आपण स्वत:ला मुक्त करीत आहोत याचीच ती खूण होती.'[४१]

श्री. काळे यांच्या महितीला स्पष्ट दुजोरा देणाऱ्या आठवणी म्हणून म. फुल्यांचे एक नातू गजानन गणपतराव फुले,[४२] आणि श्री. पिंजण[४३] यांच्या लेखनाकडे पाहता येते. डॉ. य. दि. फडके यांनी या सर्व पुराव्यांवरून पुढीलप्रमाणे सार्थ निष्कर्ष काढला आहे– 'वज्रसूची सारख्या ब्राह्मणावर व जातीभेदावर झोड उठविणाऱ्या ग्रंथातील विचारांनी किंवा कबीरासारख्या संतांच्या विचारांनीही सत्यशोधकांना प्रेरणा दिली.'[४४]

अनेक वर्षे महात्मा फुल्यांवर डोळे झाकून लोक 'मिशनऱ्यांचा हस्तक' वगैरे शिक्का मारीत आले. अभ्यासकही यातील तथ्य शोधण्याच्या फंदात पडलेले दिसत नाहीत. या संदर्भात डॉ. य. दि. फडके यांनी कोल्हापूरच्या 'पी. बी. साळुंखे व्याख्यानमालेत' (दि. १५–१६ जाने. ८९) पुढील मुद्दा उपस्थित केला. 'म. फुल्यांवर ख्रिश्चन मिशनऱ्यांचा प्रभाव होता इथपासून म. फुले ख्रिश्चन झाले होते इथपर्यंत विविध वदंतांनी धुमाकूळ घातलेला आहे. प्रत्यक्षात ज्या काळात आजूबाजूला **टिळक, गद्रे, बापट, काणे** अशा आडनावांचे चित्पावन कोकणस्थ ब्राह्मण ख्रिश्चन धर्म स्वीकारीत होते त्याच काळात म. फुले तर सोडाच, परंतु त्यांच्या सत्यशोधक समाजातील एकही सभासद ख्रिश्चन झालेला नाही याचा अर्थ काय?'

म. फुले ब्राह्मण्यावर हल्ला करीत म्हणून ते ख्रिश्चन झालेले असावेत किंवा त्यांचे हस्तक असावेत अशा बाजारगप्पा पसरविण्यात भल्याभल्यांचा वाटा असावा याचा खेद वाटतो. याची सुरुवात विष्णुशास्त्री चिपळूणकरांपासून होते. 'एकूण येवढा पटाईत शिष्य ज्या गुरूने तयार केला असेल त्याने आमच्या देशास केवढी जोड करून दिली बरे! हा गुरू कोणी भट जातीचा असेलसे वाटत नाही, त्यांतूनही कोणी प्रथमत: असलाच तर त्याची दुष्ट विद्या जोतीबांनी लवकरच ओकून टाकून

कोणा महासमर्थ मिशनरींच्यापासून चांगला अनुग्रह घेतला असेल !'[४५] एवढेच सांगून थांबतील तर ते चिपळूणकर कसले ? 'आमचे जोतीरावही सत्य शोधता-शोधता दमून शेवटी कदाचित येरुशलेमास तीर्थयात्रा करून आकाशातील बापाच्या पुत्राच्या ज्योतीस जाऊन मिळतील!'[४६]

आगरकर आणि म. फुले

प्रख्यात बुद्धिप्रामाण्यवादी आणि विवेकनिष्ठ सुधारक गोपाळ गणेश आगरकर यांच्या समग्र वाङ्मयात म. फुल्यांचा फक्त एकाच ठिकाणी निर्देश आला असून तो म. फुल्यांबद्दल पूर्वग्रहदूषित आणि अनुदारता प्रकट करणारा आहे. आगरकरांनी ९।६।१८९० रोजी 'सामाजिक स्थिति आणि गति' या लेखात लिहिले आहे, 'ज्यांना समाजघटना कशी होत जाते हे ठाऊक नाही, अशा अप्रबुद्ध भोळ्या लोकांनी ब्राह्मण-क्षत्रियादि चातुर्वर्ण्याची उत्पत्ति ब्रह्मदेवाचे तोंड, हात, ऊरू व पाय यांपासून झाली असे म्हटल्यास त्यांस फारसा दोष देता येत नाही, किंवा रेव्हरंड जोतीबा सारख्यांनी दुराग्रहामुळे किंवा अविचारामुळे हिंदुस्थानातील वर्णव्यवस्था अप्पलपोट्या ब्राह्मणांनी केली आहे असे प्रतिपादिल्यास अशांच्या तोंडाला हात लावण्याची सोय नाही असे म्हणून स्वस्थ बसले पाहिजे हे जरी खरे आहे, तरी अर्वाचीन शोधक लोकांनी या संबंधाने जे विचार स्थाईक पायावर आणून ठेविले आहेत ते ज्यांच्या अवलोकनात आले असतील, त्यांनी जुन्या लोकांकडून पाठ थोपटून घेण्यासाठी, किंवा मनास जे बरोबर दिसते ते बोलून दाखविले असता सामान्य लोकांचा आपणांवर होणारा रोष टाळण्यासाठी सत्यगोपन करण्यास प्रवृत्त होणे हे त्यांच्या बहुश्रुतपणास अत्यंत लाजिरवाणे होय!'[४७]

'मिशनऱ्यांच्या नादी लागून स्वराज्याच्या प्रयत्नात विघ्न आणणारा एक ब्राह्मणद्वेष्टा माणूस यापलिकडे केसरीने, एवढेच नव्हे तर आगरकरांसारख्या सुधारक समकालीनांनीही जोतीरावांचे मूल्यमापन केलेले दिसत नाही. केसरीप्रमाणेच सुधारकानेही जोतीरावांच्या मृत्यूची दखलदेखील घेतलेली नाही, ही वस्तुस्थिती आहे.'[४८]

रा. भि. गुंजीकर यांनी ६ नोव्हेंबर १८७३ च्या 'विविधज्ञानविस्तार' मध्ये गुलामगिरीवर परीक्षण लिहिताना म्हटले, 'ब्राह्मणी धर्माच्या आडपडद्यात गुलामगिरी' या नावाचे मूर्खत्वमय निंदाप्रचुर चोपडे (त्याला पुस्तक म्हणण्यास शरम वाटते) बरेच दिवसांपूर्वी छापून निघाले आहे. त्याचे कर्ते ज्योतीराव गोविंदराव फुले कोणी आहेत. या चोपड्याचे तात्पर्य इतकेच की सरकारने सर्व ब्राह्मणांचे निःसंतान करावे, त्यांना कोणत्याही प्रकारे आश्रय देऊ नये, ते दुष्ट आहेत, त्यांचे सर्व अधिकार काढून ख्रिस्त्यांस द्यावे, ख्रिस्त्यांना गावोगाव इनामे द्यावी, म्हणजे सर्व गोष्टी चांगल्या होतील. हे चोपडे कोणी ख्रिस्ती होऊन फसलेल्या मत्सरी, खुजट, निराश मनुष्याने उत्पन्न करून फुल्यांना टिक्याचा अधिकार दिला

आहे असे उघड दिसते. सारांश, हे चोपडे शिव्यांनी, अभद्र भाषणांनी आणि असह्य गोष्टींनी भरले आहे.'[४९]

हे परीक्षण किती विपर्यस्त आणि भडक आहे हे वेगळे सांगायला नको. डॉ. गांगल यांनी सरकारी गॅझेटमधील अशाच १८७३ च्या 'गुलामगिरी'च्या परीक्षणाचा संदर्भ दिला आहे. ' A most virulent production, mostly consisting of most wild and ludicrous fancies. In a few places, it is even indecent." (इंडियन एक्सप्रेस २-१-८९) (धनंजय कीर: मराठी भाषांतर "ब्राह्मण धर्मावरील एक निंद्य चोपडे, हे पराकाष्ठेच्या दुष्ट भावनांनी भरलेले पुस्तक आहे आणि याचा बहुतेक भाग पराकाष्ठेच्या पोरकट अद्वातद्वा गप्पांनी भरलेला आहे. कित्येक स्थळी हे बीभत्सही आहे." असे देतात. आणि 'कदाचित तो अभिप्राय ब्राह्मण अधिकाऱ्याने किंवा ब्राह्मण सहकाऱ्याच्या मदतीने सरकारी अधिकाऱ्याने दिला असावा ' असे पुढे स्वत:चे मतही नोंदवतात.)[५०]

डॉ. बाळ गांगल यांनी मूळ गॅझेटमधून हा उतारा घेतल्याचे भासविले असले तरी तो त्यांनी 'आधुनिक मराठी वाङ्मयाचा इतिहास-' भाग पहिला, या अ. ना. देशपांडेंच्या ग्रंथातून घेतला आहे.[५१]

'आधुनिक भारत' या ग्रंथात आचार्य जावडेकर म. फुल्यांबद्दल लिहितात, 'शेतकरी सुखी तर देश सुखी, याची जाणीवही त्यांना (जोतीरावांना) झाली असून प्रत्येक दीनदुबळ्याबद्दल त्यांचे अंत:करण तुटत असे. त्यांनी लोकसेवेत आपले आयुष्य घालविले व एका महाराष्ट्रव्यापी चळवळीची सुरुवात केली. समाजसुधारणेची खेड्यात पोहोचलेली पहिली चळवळ हीच होय. हे श्रेय कोणत्याही ब्राह्मण सुधारकाला मिळत नाही. ज्योतिराव फुले यांना ब्रिटिशांचे राजकारण व ख्रिस्ती मिशनऱ्यांचा कावा समजला नाही असे म्हणणे भाग असले, तरी राजा राममोहन रॉयपासून सर्वच सुधारकांवर थोड्याबहुत अंशाने लागू होणाऱ्या या आरोपाला त्यांच्याच बाबतीत विशेष महत्त्व देण्याचे कारण नाही.' [५२] आचार्य जावडेकर यांच्या वरील अवतरणातून फक्त 'जोतीराव फुले यांना ब्रिटीशांचे राजकारण व ख्रिस्ती मिशनऱ्यांचा कावा समजला नाही ' एवढाच अर्धवट भाग घेऊन डॉ. अ. ना. देशपांडे,[५३] डॉ. द. न. गोखले [५४] यांनी सोयीनुसार वापर केल्याचे आढळून येते.१८७६ च्या वार्षिक प्रतिवृत्तावर 'विविध ज्ञानविस्तार' ने लिहिले, 'या (सत्यशोधक) समाजाच्या मागून पुणे येथे जन्मास आलेले समाज लयास गेले अशी वदंता असता हा समाज अद्याप कायम आहे; इतकेच नव्हे तर, वृद्धिगत होत आहे व त्याचे स्तुत्य व सत्य उद्देश समजून बाहेरगावची मंडळी सभासद होत आहे हे या सत्यशोधकास भूषणास्पद आहे... हिंदू धर्माचा मोड करून परधर्माची सोयीसोयीने वृद्धी करावी व तिसरे ब्राह्मणादी ज्ञाती व इतर ज्ञाती यांमध्ये द्वेष उत्पन्न करावा हे शेवटले ब्राह्मणांस व तद्ग्रंथास दु:सह विशेषण पुष्पांजली वाहिली आहे त्यावरून स्पष्ट होते.'[५५] म. फुल्यांच्या मतांचा विपर्यास या उदाहरणांनी स्पष्ट व्हावा!

जुनाट दुखणे

१९२५ साली म. फुल्यांच्या पुतळ्यावरून पुण्यात जोरदार वाद झडले. पुणे नगरपालिकेने म. फुल्यांचा पुतळा बसवावा असा ठराव ४ जुलै १९२५ रोजी केशवराव जेध्यांनी नगरपालिकेकडे पाठवला होता. तेव्हा म. फुल्यांच्या पुतळ्याला विरोध करणाऱ्या मंडळींनी जोतीरावांची प्रतिमा कलंकित करण्याचे निंद्य प्रयत्न चालविले होते. **'सत्यशोधक का ख्रिस्तसेवक?'** या नावाची एक पुस्तिका गणपतराव नलावडे यांनी प्रकाशित करून नगरपालिका सदस्यांना वाटली होती. विश्वनाथ महादेव फुले* या जोतीरावांच्या चुलत भावाच्या नातवाने या पुस्तिकेच्या प्रस्तावनेत लिहिले होते, 'असा स्वधर्म व स्वकुलबाटगा पुरुष आमच्या वंशात होऊन गेला हे सांगणे-देखील मोठे लाजिरवाणे आहे.' पुस्तिकेच्या लेखकाने पुरावे न देता ऐकीव माहितीवर विसंबून जोतीरावांवर खोटेनाटे आरोप केले होते. 'जोतीराव फुले म्हणजे ख्रिस्त्यांनी हिंदुधर्माविरुद्ध सोडलेले एक पगारी प्रचारक होते. तेव्हा असल्या स्वधर्मशत्रूचे स्मारक म्युनिसिपालिटीने उभे करणे म्हणजे हिंदूधर्माच्या मुडद्यावर ख्रिस्ताचा सांगाडा उभा करणे होय. जोतीरावांनी आपल्या घरी वाढविलेले अनाथ मूल हे त्यांच्यापासून एका विधवेला झालेले मूल होते'[५६] असले बेछूट आरोप त्या पुस्तिकेत केलेले होते.

काळाने सूड उगविला

'आपल्या राज्याच्या विधान भवनासमोर सदरहू महात्म्याचा पुतळाही उभा करण्यात आलेला आहे. ज्योतिबांपाशी असं काय होतं? एतद्देशीय समाजाचा मनोभंग करण्यासाठी सर्व प्रकारचे उपाय योजणारे ब्रिटीश राज्यकर्ते आणि मिशनरी ह्यांचा भक्कम पाठिंबा आणि शिव्यांचा प्रचंड साठा! शिव्या देण्याला शहाणपण लागत नाही, ज्ञानही लागत नाही. ज्योतिबांपाशी ह्या दोन्ही गोष्टींची तीव्र टंचाई होतीच. पण साधी खरी माहितीसुद्धा करून घेण्याच्या भानगडीत हा महात्मा पडला नाही.' (सोबत, ११-१२-८९ पृ. १२) डॉ. गांगल यांच्या या मताचा मूलस्रोत १९२५ सालात आहे. उपरोक्त पुतळावादंग प्रकरणात 'भाला'कार भोपटकरांनी

---

* श्री. अनंतराव फुले यांनी डॉ. य. दि. फडके यांच्या निदर्शनाला आणले की विश्वनाथ महादेव फुले यांनी पुढे त्यांच्या या लेखनाबद्दल जाहीर माफी मागितली

२० जुलै १९२५ रोजीच्या अग्रलेखात लिहिले होते, 'पुण्यातील नागरिकांची कोणती सेवा कै. जोतीरावांनी केली की त्यामुळे त्यांचे सार्वजनिक स्मारक करून त्यांचे उतराई व्हावे? कै. जोतिराव हे 'पब्लिक' म्हणजे सार्वजनिक गृहस्थ नसून 'सेक्शनल' म्हणजे विशिष्ट पंथीय होते. श्री. जेधे यांनी आपला ठराव मुकाट्याने मागे घ्यावा अशी त्यांना आमची मित्रत्वाची सूचना आहे.'[५७]

केशवराव जेध्यांनी मात्र हा ठराव लावून धरला. ४ सप्टेंबर १९२५ च्या नगरपालिकेच्या सभेत ठराव चर्चेला आला. त्यावेळी बोलताना केशवराव जेधे यांनी 'पुणे नगरपालिकेने टिळक व चिपळूणकर या दोन भटांचे पुतळे उभे केले आहेत' असे म्हणताच अध्यक्ष रा. ब. लक्ष्मणराव आपटयांनी 'भट' हा शब्द परत घेण्याबद्दल त्यांना इशारा दिला. त्यानंतर चर्चेचा गदारोळ उडाला आणि प्रचंड बहुमताने 'म. फुल्यांचा पुतळा बसविण्याचा ठराव' फेटाळला गेला, एवढेच नाही तर जेध्यांविरुद्ध निंदाव्यंजक ठरावही पास करण्यात आला होता.[५८]

'सत्यशोधक की ख्रिस्तसेवक?' या पुस्तिकेचे प्रस्तावनाकार विश्वनाथ महादेव फुले यांनी म. फुल्यांच्या विरुद्ध का लिहिले याचा खुलासा म. फुल्यांचे एक नातू गजानन गणपत फुले यांच्या लेखनात मिळतो. वडिलोपार्जित जमिनीच्या तंटयातून उद्भवलेल्या 'भाऊबंदकीच्या दुष्मनीपोटी' उपरोक्त विश्वनाथ फुले आणि बाबुराव फुले यांनी म. फुल्यांवर असले निंद्य आरोप केले होते अशी माहिती देऊन गजानन फुले पुढे लिहितात, 'आम्ही त्यांच्याशी सुतक-देवक तोडले असून बाबू फुल्यांनी महात्मा जोतीरावांना ख्रिस्ती म्हटल्यापासून आम्ही फुले मंडळी तर त्याच्यावर चिडलोच आहोत, पण त्यामुळे सर्व माळी जातीने त्याला जातीबाहेर (वाळीत) टाकले आहे.'

डॉ. बाळ गांगल यांना म. फुल्यांचा विधानभवनासमोर पुतळा उभारल्याबद्दल राग येण्याचे कारण फार जुने आहे. त्यांचा राग आपण समजून घेतला पाहिजे. १९२५ साली पुतळयाचा वाद गाजला त्याला एक ऐतिहासिक कारण होते. आणि हेच कारण डॉ. गांगल यांच्या रागामागे आहे. ही कहाणी आहे विष्णुशास्त्री चिपळूणकरांची. त्यांनी निबंधमालेच्या ४४ व्या अंकात लिहिले होते– 'हल्लीच्या काळी आमच्या जोतिबासारख्या पठ्ठयांनी निर्धास्तपणे ब्राह्मणांवर भोंकले असता त्यांत त्यांची कितपत बहादुरी आहे व वेळेनुसार तोंडावर तुकडा टाकणाऱ्या धन्यांच्या पुढे लाळ घोटण्यात कितपत राजनिष्ठा व सत्यनिष्ठा आहे, तसेच हल्लींच्या देशस्थितीत एकमेकाला शिव्या देण्याकरिता समाज स्थापणे यात कितीसे शहाणपण आहे इत्यादि सर्व गोष्टींविषयी विचार करावा लागेल. पण ज्या अर्थी जोतीबांचा समाज अद्याप बाल्यावस्थेतच आहे, एकीकडे हडपसर व दुसरीकडे भांबुरडे याच त्याच्या प्रचंड सीमा होत, त्याअर्थी असल्या 'क्षुद्र' सभेवर हत्यार धरण्यास आम्ही उत्साह पावत नाही. स्वामींच्या आर्यसमाजाप्रमाणे त्याचा जेव्हा अवाढव्य विस्तार होईल व सत्यसमाज-मंदिराच्या अग्रभागी जोतीरावांचा संगमरवरी पुतळा त्यांच्या

शुभ्र यशाचे स्मारक म्हणून स्थापला जाईल, तेव्हा त्याच्या मतांच्या यथार्थत्वाविषयी विचार करता येईल.'[९०] १९२५ चा ठराव फेटाळला गेला त्यानंतर ३१ मे १९६९ रोजी पुणे मनपा भवनासमोर म. फुल्यांचा पूर्णाकृती भव्य पुतळा उभा राहिला. चिपळूणकरांनी हे लिहिल्यानंतर शंभर वर्षांनी म. फुल्यांचा अतिभव्य पुतळा महाराष्ट्राच्या विधान भवनासमोर उभा राहिला. त्यापूर्वी आणि त्यानंतरही गावोगाव म. फुले यांचे पुतळे उभे राहात आहेत. चिपळूणकरांचा अर्धपुतळा मात्र 'सोबत' कार्यालयाच्या जवळ न्यू इंग्लिश स्कूलच्या दारात कोपऱ्यात ३१ जानेवारी १९७१ पासून आहे, आणि म. फुल्यांचा पुतळा डॉ. गांगलांच्या कार्यालयाजवळ विधानभवनापुढे डौलात उभा आहे. एकूण हे दुखणे जुनाट आहे.

एखाद्या व्यक्तीचे विचार आणि कार्य यांचे मूल्यमापन आकारावरून (पुतळ्यांवरून) करण्यात अर्थ नसतो, एवढा तरी बोध डॉ. गांगल यातून घेतील काय? आकारावर नाही तर विचारांवर आधारित मूल्यमापन करण्याची दृष्टी स्वीकारण्यावर प्रस्तुत लेखकाचा भर आहे. आकाराची पूजा हा भक्तीचा प्रांत झाला, विचारांची समीक्षा हा अभ्यासकाचा प्रांत आहे. मला विचारसमीक्षेत रस आहे. प्रश्न आहे तो हा की डॉ. गांगल चिपळूणकरांच्या लेखनापुढे जाणार की नाही? चिपळूणकरांनीही म. फुल्यांचे, मर्यादित का होईना, योगदान मान्य केले होते. डॉ. गांगलांकडे तितकीही गुणग्राहकता नसावी हे काळ पुढे सरकल्याचे उदाहरण मानायचे की मागे?

विष्णुशास्त्री चिपळूणकरांनी ४८ व्या अंकात लिहिले होते–' मि. फुले यांस सूचना अशी की, जर त्यांस आपल्या जातिबंधूंची सुधारणा कर्तव्य असेल तर ती 'गुलामगिरीच्या' सारखे ग्रंथ तयार केल्याने व जे आपणांहून सर्व प्रकारे श्रेष्ठ त्यांस नुसत्या शिव्या दिल्याने ती होणार आहे असे मुळीच नाही. ब्राह्मण कितीही लबाड असले व कितीही दुष्ट असले तरी एक गोष्ट निर्विवाद आहे की ज्ञानभांडाराच्या किल्ल्या त्यांच्या कंबरेला आहेत. त्यांच्या साहाय्याशिवाय इतर जातींस ज्ञानाचा लाभ होण्याचा बहुधा मुळीच मार्ग नाही.'[९१] हाच ज्ञानसत्तेचा अहंकार आणि 'मान्यतेचे शिक्कामोर्तब' करण्याचा राखीव अधिकार आणि जन्मसिद्ध हक्क फक्त आपल्याकडेच असल्याची परंपरागत उग्र जाणीव या दोहोंचा आविष्कार डॉ. गांगल यांच्या लेखनात दिसतो. म. फुल्यांच्या 'महात्मा' या जनतेने उत्स्फूर्तपणे दिलेल्या पदवीला आव्हान देताना डॉ. गांगल यांना खरे तर असे म्हणायचे आहे की 'आम्ही' ज्यांना 'महात्मा' ठरविलेले नाही त्यांना तुम्ही आमच्या 'परवानगीशिवाय' महात्मा कसे म्हणू शकता? 'ते (महात्मा फुले) आमच्या मते ब्राह्मणविरोधी होते म्हणजे स्वजनद्रोही होते, स्वधर्मद्रोही होते; एवढेच नाही तर स्वदेशद्रोहीही होते' अशी डॉ. गांगलाची घोषणा आहे. खरे तर म. फुले ब्राह्मणविरोधी होते हाच मुळातला अज्ञानमूलक समज आहे. आणि डॉ. बाळ गांगल यांना ब्राह्मणांचे प्रतिनिधित्व कुणी बहाल केले? 'नागपूर तरुण भारत'चा 'महाराष्ट्राचा हक्कभंग' हा अग्रलेख म्हणतो– 'श्री. गांगल व संपादक श्री. बेहेरे यांनी सकृत्दर्शनी हक्कभंग

केला की नाही हे विधानसभेचे सभापती ठरवतील व योग्यवेळी योग्य निर्णय देतीलच. त्यांचा निर्णय कोणताही होवो, पण श्री. गांगल बेहेरे यांनी महाराष्ट्राचा हक्कभंग मात्र निश्चितच केला आहे याबद्दल शंका बाळगण्याचे कारण नाही.... 'हा कसला महात्मा ?' यासारखा हलकट प्रश्न उपस्थित करून संबंधित लेखकाने सूर्यावर थुंकण्याचाच प्रयत्न केला आहे, पण असल्या थुंकण्याचा सूर्यावर परिणाम होत नसतो. उलटपक्षी सूर्याच्या तेजाचे थुंकणाऱ्यालाच चटके बसतात हे गांगल-बेहेरे यांनी विसरता कामा नये.'[६२]

या संदर्भात आणखी दोन गोष्टींची नोंद करणे गरजेचे आहे.

१) 'ज्योतीरावांनी इ. स. १८५१ त आपल्या अनेक ब्राह्मण मित्रांच्या साहाय्याने बुधवार पेठेतील अण्णासाहेब चिपळूणकरांच्या वाडचात मुलींची शाळा स्थापन केली. कार्यकारी समितीत कृष्णशास्त्री चिपळूणकर होते.'[६३] कृष्णशास्त्री चिपळूणकरांनी म. फुल्यांना केलेले सहकार्य आणि त्यांचे सुपुत्र विष्णुशास्त्री यांनी आपल्या निबंधमालेतून म. फुल्यांवर उठविलेली टीकेची झोड याला उद्देशून ख्यातनाम साहित्यिक वि. द. घाटे म्हणतात, 'छोटचा शास्त्रीबोवांना फुले समजले नाहीत, पण मोठ्यांना समजले. बेटेसे बाप सवाई निघाला.'[६५] अगदी हीच गोष्ट 'इतिहासाची पुनरावृत्ती होते' असे म्हणतात त्या अंगाने सुचवावीशी वाटते. प्रबोधनकार ठाकरे यांनी आयुष्यभर म. फुल्यांच्या विचारांचा वसा स्वीकारून कार्य केले, त्यांचे सुपुत्र शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांनी मात्र म. फुल्यांवर अभिरुचीहीन टीका करणाऱ्या डॉ. गांगलांची भलावण करावी ना ?

२) पुण्याच्या याच शिवसेनेच्या अधिवेशनात मुंबईचे माजी महापौर आणि आमदार छगन भुजबळ यांनी आपण स्वत: माळी असल्याने आपल्यालाच म. फुल्यांबद्दल बोलायचा अधिकार आहे, म्हणूनच म. फुल्यांवरील या टीकेला पाठिंबा देतो आहोत, कारण लेखनस्वातंत्र्य आणि संशोधनाचा आदर करण्याची आपली भूमिका आहे असे सांगितले. म. फुले माळी जातीत जन्माला आले होते तरी त्यांनी आयुष्यभर कार्य मात्र सर्व स्त्रिया आणि शूद्रातिशूद्र यांच्यासाठी आणि जातिव्यवस्थाअंतासाठी केले हे विसरून 'म. फुल्यांवर फक्त माळ्यांचीच मक्तेदारी आहे' असे मान्य करणे शक्य नाही. प्रश्न आहे तो हा की श्री. भुजबळ स्वत:ला कुठल्या शाखेचे समजतात– महात्मा फुले यांच्या की **बाबूराव फुले– यांच्या** !

टीकाकारालाही मदत

विष्णुशास्त्री चिपळूणकरांनी म. फुल्यांवर बोचरी आणि अनुदार टीका करूनही प्रत्यक्षात म. फुल्यांनी मात्र हंटर कमिशनसमोर साक्ष देताना १९ ऑक्टोबर १८८२ रोजी श्री. विष्णुशास्त्री चिपळूणकर हे खाजगी शाळा पुण्यात चालवून गौरवास्पद कार्य करीत असल्याचे नमूद केले व त्यांना पुरेसे अनुदान देण्याची शिफा-

रस केली.[५] ज्या माणसाने आयुष्यभर म. फुल्यांवर टीकाच केली त्याचेही कौतुक करण्याचा मनाचा मोठेपणा म. फुल्यांकडे होता, कारण त्यांची भूमिका होती-

'आजारी शत्रूच्या जाई खबरीस। साहचकारी त्यास खरा शूर।
झाले गेले सर्व आणू नये मनी। सूड कारस्थानी वर्तू नये।
नीट झाल्यावर त्यास उभा करी। कुस्तीगीरापरी त्याशी लढे।
सत्यआचरणी यश मिळवावे। जगा दाखवावे जोती म्हणे।'[६६]

'दैववशात् विष्णुशास्त्री हे अकालीच काळाच्या दाढेत सापडले. त्यांच्या अंतकाळाची हकीकत अगदी हृदयद्रावक अशी आहे ! प्रसिद्ध कोल्हापूरकर प्रकरणात केवळ भीतीने शास्त्रीबुवांनीच खुद्द मुद्दामच आपल्यावर अपघाताने मृत्यु ओढवून घेतला असा आरोप ठेवून जेव्हा सरकारी पोलीस अधिकाऱ्यांनी त्यांचे शव ताब्यात घेऊन त्या शवाची सरकारी सर्जनाकडून चीरफाड करण्याचा प्रयत्न केला, तेव्हा दीन मुखाने डोळे मिटून घेतलेल्या आपल्या प्रतिस्पर्ध्याच्या त्या शवाला आमच्या जोतिरावांनीच थोर दिलाने सहाय्याचा हात दिला! आपले जिवलग शिष्य डॉ. (पुढे रा. ब.) विश्राम रामजी घोले या प्रसिद्ध व वजनदार सर्जनची साक्ष देऊन पोलीस अधिकाऱ्यांची जोतीरावांनी समज घातली आणि आपल्या जोडीदाराच्या गैरहजेरीत त्याच्या त्या प्रिय कलेवरावर कोणताही वार न होऊ देता मोठ्या सन्मानाने त्याला अखेरच्या स्थानी पोहोचविले!'[६७]

दुसरा मुजरा

विष्णुशास्त्री चिपळूणकरांच्या कडवट टीकेचा परिणाम काय झाला याचा विचार करताना वि. द. घाटे यांची कबुली फार काही सांगून जाते.

'मानाचा दुसरा मुजरा जोतीराव फुल्यांना... नुसता मुजरा चालायचा नाही, लोटांगणच घातले पाहिजे. माफी मागितली पाहिजे. माझ्या हातून तसाच अपराध घडला आहे. लहानपणी जोतीबांची अवहेलना केली. आधी 'निबंधमाला' वाचली होती, मग 'गुलामगिरी.' निबंधमालेने मनाचा बिघाड केला, माझा आणि माझ्या पिढीचा. विष्णुशास्त्र्यांनी लोकहितवादी व फुले यांची हवी तितकी हेटाळणी केली. ती हेटाळणी प्रौढ, सुसंस्कृत आणि प्रगल्भ भाषेत असल्यामुळे मनास पटली. उलट लोकहितवादी आणि फुले यांची भाषा ओबडधोबड, थोडी हेंगाडी, फटकळ वाक्यरचना, चमत्कारिक शब्द, कधी ग्राम्य तर कधी अशिष्ट. साहजिकच सुश्लिष्ट आणि प्रगल्भ भाषेस सवकलेल्या माझ्या मनाला ते रोखठोक लेखन आवडले नाही... त्या वयात चांगल्या विचारांपेक्षा चांगले शब्द आवडले आणि म्हणून लोकहितवादींची आणि फुल्यांची हेळसांड झाली. काळाने सूड मात्र चांगला घेतला. चिपळूणकरांनी ज्यांची टवाळी केली त्यांना आजचा ब्राह्मण-ब्राह्मणेतर महाराष्ट्र अर्घ्य प्रदान करीत आहे.'[६८]

म. फुल्यांची अवहेलना त्यांच्या हयातीत तर झालीच, परंतु त्यांच्या निधनानंतरही अनेक वर्षे का चालू राहिली हे वि. द. घाटे यांच्या निवेदनावरून लक्षात आल्याशिवाय रहात नाही. पुढे महर्षी विठ्ठल रामजी शिंदे, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, केशवराव जेधे, शाहू महाराज, कर्मवीर भाऊराव पाटील अशी म. फुल्यांच्या विचारांतून प्रेरणा घेऊन स्त्रिया, शूद्रातिशूद्र यांच्या सर्वांगीण उन्नतीसाठी झटणाऱ्या महापुरुषांची परंपराच निर्माण झाली.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि म. फुले

त्यांनी खऱ्या अर्थाने म. फुल्यांची उपेक्षा थांबवली. डॉ. बाबासाहेब आंबेडकर आपला 'Who Were The shudras?' हा ग्रंथ म. फुल्यांना अर्पण करताना म्हणतात, 'Inscribed to the memory of MAHATMA JOTIBA FULE (1827–1890) The Greatest Shudra of Modern India, who made the lower classes of Hindus conscious of their slavery to the higher classes and who preached the gospel that, for India, social democracy was more vital than independence from foreign rule.' [६९]

(महात्मा ज्योतिबा फुले यांच्या स्मरणार्थ, १८२७-१८९०) आधुनिक भारतातील एक महान शूद्र नेता, यांनी हिंदू समाजातल्या खालच्या वर्गातील लोकांच्या गुलामगिरीची जाणीव त्यांना आणि उच्चवर्णीय समाजातील लोकांना करून दिली आणि या देशाला स्वातंत्र्यापेक्षा प्रथम सामाजिक लोकशाहीची अत्यंत जरूरी आहे हे पटवून दिले.)

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी भ. गौतम बुद्ध, संत कबीर आणि म. फुले यांना गुरुस्थानी मानले आणि त्यांची समाजक्रांतीची चळवळ देशभर पसरविली, तिला गतिमान केले. म. फुल्यांनी भविष्यासंबंधी वर्तविलेली भाकिते डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी प्रत्यक्ष कृतीत उतरवून दाखवली. 'शूद्रादि अतिशूद्रांस दास करण्यासंबंधी ग्रंथ जर आर्य धूर्त भट्टांनी समूळ नाहीसे केले नाहीत, तर ईश्वर परमन्यायी असून सर्वसमर्थ आहे, यास्तव तोच थोड्या दिवसात शूद्रादि अतिशूद्रांच्या हातून परस्पर धूर्त आर्यभट्टांचा व त्यांच्या पाखंडी ग्रंथांचा धिःक्कार करवील, असे मी भविष्य करितो.'[७०]

'मनुस्मृती आहे पाखांडाची मुळी।
गिर्वाणाची तळी विळ पळे।।
विद्या शिकवूनी मग XX गप्पा।
मनुमत कापा तुम्ही सर्व ।।
पक्षपाती मनु नेत्री सलतात कानू।
'मांग म्हार निंदा ठावी नाही व्यथा। जाळी आर्यग्रंथा अग्निमध्ये ।।'[७१]

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी महाड येथे २५ डिसेंबर १९२७ रोजी 'मनुस्मृती'चे विधिपूर्वक दहन करून म. फुल्यांचे हे भाकित कृतीत उतरविले.[७२]

चिपळूणकर व गांगल

विष्णुशास्त्री चिपळूणकर व डॉ. बाळ गांगल या म. फुल्यांच्या टीकाकारांमध्ये एक धागा समान आहे.

शिवाजीचा पहिला पोवाडा लिहून प्रसिद्ध करणाऱ्या म. फुल्यांवर टीकेची झोड उठविणारे विष्णुशास्त्री चिपळूणकर स्वतःला 'मराठी भाषेचा शिवाजी' म्हणवून घेत होते, तर डॉ. गांगल यांनी 'म. फुल्यांनी शिवाजी महाराजांना शिव्या दिल्याचा' तथाकथित शोध लावला आहे.

'I am the Shivaji of the Marathi language who had not his equal either to precede or succeed him.'[७३]

१) चिपळूणकरांना 'शिवाजी' ही इतरांनी दिलेली पदवी नाही, तर त्यांनी स्वतःच स्वतःला ती लावून घेतली आहे.

२) 'मराठी भाषेचे शिवाजी' असल्याची ही घोषणा मात्र त्यांनी इंग्रजीतून केली आहे.

३) आपण स्वतःला मराठी भाषेचे शिवाजी कोणत्या अर्थाने संबोधीत आहोत हे त्यांनी स्पष्ट केले नाही.

*

म. फुलेकृत शिवाजीगौरव

डॉ. वाळ गांगल शिवाजी महाराजांच्या नावाचा वापर करून एका विशिष्ट समाजाला दुसऱ्याविरुद्ध चिथावणी देत असावेत अशी शंका त्यांची भाषा आणि असत्य किंवा विपर्यस्त निष्कर्षांची त्यांनी मांडलेली रास पाहून कोणाला वाटल्यास त्यात वावगे काही नाही.

'शिवाजी महाराजांना शिव्या देणाऱ्या ह्या महात्म्याचे माहात्म्य तपासून पहा' (सोबत ४।१२।८८ पृ. १४, १५) या भडक शीर्षकाच्या लेखाची सुरुवात भूषण कवीच्या एका वचनाने करून ते म्हणतात,' 'साऱ्या भारताची सुन्ता करण्याचा पाक मुसलमानी इरादा हाणून पाडण्यास कारणीभूत झाल्यामुळे शिवाजीबद्दल ज्यांच्या मनात थोडा किंवा बहुत आकस आहे किंवा होता अशा नतद्रष्टांची यादी करता येईल.... महाराष्ट्रात अलिकडे होऊन गेलेले विद्वान म्हणजे नरहर कुरुंदकर आणि गेल्या शतकात होऊन गेलेले अविद्वान म्हणजे 'महात्मा' जोतिराव फुले. एरवी विद्वत्तापूर्ण, शिष्ट, पंडिती भाषेत लिहिणाऱ्या, बोलणाऱ्या नरहर कुरुंदकरांनी एका ठिकाणी 'शिवाजीच्या नावाला बाजारभाव आहे' असे सवंग, अशिष्ट विधान केले आहे. आणि कधीही कुणीही (त्या अर्थाने) न केलेला दावा 'शिवाजी हिंदूंचा धर्मनेता होता काय?' विनाकारण उपस्थित करून त्याचे आपल्या विकृत समाजवादी प्रणालीने खंडन केले आहे. पण एवढेच !'

नरहर कुरुंदकर

डॉ. गांगल यांनी लेखनाची सुरुवातच किती विपर्यस्त केली आहे हे पाहाण्यासाठी कुरुंदकरांचे मूळ विधान पहायचे तर डॉ. गांगल ग्रंथनाम, प्रकाशक, आवृत्ती, पृष्ठक्रमांक काहीही नोंदी देत नसल्याने अभ्यासकाचे काम बिकट होऊन बसते. **'परिचय'** या ग्रंथातील मूळ अवतरण पुढीलप्रमाणे आढळले- 'महाराष्ट्रीय पंडितांनी गेल्या चार पिढ्यांत जे इतिहाससंशोधन केले त्याचा फार मोठा व्याप शिवाजीशी निगडीत आहे. आमच्या मनात असणाऱ्या स्वातंत्र्यप्रवृत्तीचे, महाराष्ट्राच्या अस्मितेचे शिवाजी कायमचे प्रतीक होऊन गेला. त्यामुळे चालुक्यांचा अगर वाकाटकांचा

किंवहुना यादवांचा आणि कृष्ण देवरायाचाही इतिहास ज्या निर्विकारणे लिहिला–तपासला जाऊ शकतो तो निर्विकारपणा शिवाजीच्या बाबतीत संभवत नाही. महाराष्ट्रात तर हे अधिकच कठीण आहे. अजूनही त्याच्या नावाला 'बाजारभाव' शिल्लक उरला आहे हे नाकारता येणार नाही.'[७४] या अवतरणात सवंग अगर अशिष्ट असे काय आहे?

दुसरे विधान कुरुंदकरांच्या 'छत्रपती शिवाजीमहाराज–जीवनरहस्य' या ग्रंथातील आहे. 'अनेकांच्या मनात वर्तमानकाळातील हिंदूंविरोधी मुसलमान अशा प्रकारचा झगडा असतो. स्वत:च्या मनातील हा असत्य आणि अनुचित संघर्ष मागच्या इतिहासामध्ये पाहण्याची काही जणांची धडपड असते. या दृष्टीने शिवाजी महाराजांकडे हिंदूंचा राजा म्हणून आणि त्यांच्या कार्याकडे मुसलमानांच्या विरुद्ध हिंदूंचा उठाव म्हणून पाहणे काही जणांना आवडते. प्रत्यक्ष शिवाजी महाराजांच्या चरित्रात अशा धार्मिक संघर्षाला फारसा वाव नाही. ते स्वत: आपल्या राज्यात हिंदूंच्या धार्मिक राजवटीच्या निर्मितीसाठी झगडत नव्हते. आपल्या राज्यात हिंदूंच्या धार्मिक आदेशांनुसार श्रुति-स्मृति–पुराणांना अनुसरून एक राज्य निर्माण करण्याची त्यांची इच्छाही नव्हती, तसा त्यांचा प्रयत्नही नव्हता... प्रत्यक्ष त्यांच्या स्वत:च्या आरमारात दर्यासारंग दौलतखान, इब्राहीमखान असे अनेक मुस्लीम अधिकारी होते... त्यांना आयुष्यभर ज्या वतनदारांविरुद्ध लढावे लागले ती नुसती त्यांच्या धर्माची माणसे नव्हती, तर त्यांच्या सोयरसंबंधातील माणसे होती. घोरपडे, निंबाळकर, जाधव, सावंत, सुर्वे असे अनेक वतनदार नेहमीच त्यांच्या विरुद्ध राहिले.

एतद्देशीयांचे राज्य हा उद्देश

ते जसे हिंदूंचे धार्मिक नेते नव्हते तसेच ते महाराष्ट्राचे अगर मराठ्यांचेही नेते नव्हते. शिवाजीच्या मोठेपणाला महाराष्ट्राच्या चौकटीत घालून आपण त्यांच्यावर फार मोठा अन्याय करीत आहोत... त्यांनी स्वत:ला जनतेचे प्रतिनिधी आणि तिचे मुक्तिदाते मानले.'[७५] यातील विनाकारण उपस्थित केलेला प्रश्न कोणता? आणि त्याचे खंडन विकृत समाजवादी प्रणालीचे कसे ठरते ते संशोधक डॉ. बाळ गांगलच जाणोत ! डॉ. गांगल –'महात्मा ज्योतिबा फुल्यांनी मात्र शिवाजीच्या व्यक्तिमत्त्वावर आणि कार्यकर्तृत्वावर जी चिखलफेक केली आहे ती मन विषण्ण करणारी आहे. अशा माणसाला 'महात्मा' म्हणणारे आपण सर्व अत्यंत अडाणी तरी असलो पाहिजे किंवा अत्यंत कोडगे. 'महात्मा फुल्यांच्या शिवराळपणाचे लक्ष्य शिवाजी महाराज का बनले? त्याचे मुख्य कारण शिवाजीचा हिंदूधर्माभिमान. महात्मा फुल्यांना हिंदुधर्माबद्दल आत्यंतिक द्वेष वाटत असे ... हचा अशा अगाध व्युत्पतिअज्ञानावर ब्राह्मणद्वेषाचे आणि शिवाजी–निंदेचे प्रचंड मजले बांधणाऱ्या माणसाला आपण कुणाच्या चिथावणीवरून महात्मा म्हणू लागलो कुणास ठाऊक! ...ज्योतिराव फुले हा माणूस अव्वल दर्जाचा स्वधर्मद्रोही तर होताच, पण त्याच

दर्जाचा स्वजनद्रोही आणि देशद्रोही होता. त्याच्या गद्य–पद्य लिखाणात परकीय आक्रमकांना आणि अत्याचाऱ्यांना लावलेली विशेषणे आणि केलेली वर्णने आणि स्वकीयांना व शिवाजी महाराजांना लावलेली विशेषणे ह्यांची तुलना बरीच उद्‌बोधक ठरेल.... एवढेच करून ते थांबत नाहीत तर गो–ब्राह्मण- प्रतिपालक क्षत्रिय कुलावतंस सिंहासनाधीश्वर छत्रपती शिवाजी महाराजांस अक्षरशत्रू, दुधखुळा, बावळट ठरवतात ...अखिल हिंदुस्थानातल्या मुसलमानी पातशाहयांना आपल्या तलवारीने आणि मुत्सद्दीपणाने चळचळा कापायला लागणारे शिवाजी महाराज काशीकर गागाभट्टाकडून हातोहात फसविले गेले असे हा महात्मा खुशाल सांगतो आणि शिवाजी महाराजांबद्दल मतलबी किंवा सार्थ आदर बाळगणारे कट्टर कम्युनिस्टांपासून तो अचल हिंदुत्ववाद्यांपर्यंत आपण सर्व निमूटपणे ऐकून घेतो हे हास्यास्पद आहे की लांछनास्पद?... हिंदूंवर जिझिया कर लादण्याच्या मुसलमानांच्या कुराणदत्त अधिकाराचा अधिक्षेप शिवाजीने केला म्हणून कदाचित आपल्या महात्म्याचा शिवाजीवर राग असेल... शिवाजीमहाराजांच्या जीवितकार्याचे मूल्यमापन एखादा माणूस इतक्या अधम पातळीला जाऊन करू शकतो म्हणून संतापावे की अशा माणसाला आपण महात्मा पदवी देऊन गौरविले म्हणून शरमेने मान खाली घालावी?'

कल्पनेचा खेळ

डॉ. बाळ गांगल यांनी आव तर असा आणलाय की जणू महात्मा फुल्यांनी शिवाजी महाराजांना अशा काही शिव्या दिल्या असाव्यात की त्यामुळे तळमळून म. फुल्यांवर टीका करणे गांगलांना भाग पडले असावे असे वाटावे. प्रत्यक्षात हा सगळाच हातचलाखीचा आणि धादांत खोटचा विवेचनावर आधारलेला डोलारा आहे. डॉ. गांगल यांचा अप्रामाणिकपणा या ठिकाणी ढळढळीतपणे उघडा पडतो. कारण केवळ 'एका शब्दावर' आधारित असा कल्पनेचा खेळ त्यांनी उभारला आहे. विद्‌वत्तेचा हा एक प्रकारे गैरवापर आहे. म. फुल्यांनी शिवाजी महाराजांना इतक्या गौरवपूर्ण शब्दांत भावांजली अर्पण केलेली आहे की ती मुळातून वाचणारा डॉ. गांगलांच्या या धडधडीत खोटारडेपणामुळे संतापल्याशिवाय राहणार नाही.

म. फुल्यांनी जून १८६९ मध्ये म्हणजे १२० वर्षांपूर्वी 'छत्रपती शिवाजी राजे भोसले यांचा पवाडा' नावाचा ग्रंथ लिहून लोकहितार्थ प्रसिद्ध केला. हा पोवाडा ९२४ पंक्तींचा आहे. त्याला सुटसुटीत प्रस्तावनाही आहे. हा पोवाडा प्रसिद्ध समाजसेवक व परमहंस सभेचे अध्यक्ष रामचंद्र बाळकृष्णजी यांना अर्पण. केला आहे.

शिवाजी महाराजांविषयीचा आदर म. फुल्यांनी चार प्रकारे व्यक्त केला आहे. १) पोवाडा २) गद्य लेखन ३) रायगडावरील शिवाजी महाराजांच्या समाधीचा शोध करून तिचा जीर्णोद्‌धार करण्याची धडपड ४) शिवाजी महाराजांच्या वंशजाची बाजू घेऊन तुरुंगवास भोगल्याबद्दल टिळक-आगरकरांचा म. फुल्यांनी

केलेला जाहीर सत्कार आणि त्यांना दिलेले मानपत्र.

टिळक–आगरकरांचा सन्मान

'पुणे येथे स्वतः जोतीरावांनी टिळक नि आगरकर यांचा निर्भयपणे जाहीर सत्कार केला. जोतीरावांनी टिळक आणि आगरकर यांच्या स्वागतसमारंभात जो भाग घेतला त्याचे कारण एकतर त्या दोघांनी जोतीरावांना अभिमान असलेल्या शिवाजीच्या वंशजाची बाजू घेतली. आणि दुसरे असे की, त्यांनी सत्याने प्रेरित होऊन संकटास तोड देण्याचे धैर्य दाखविले. सत्यशोधकांचे मुखपत्र 'दीनबंधु' हे शिवाजीच्या वंशजाच्या बाजूने लढणारे देशभक्त टिळक आणि आगरकर यांचा केवळ सत्कारच करून थांबले नाही, तर त्या साप्ताहिकाने रायगडावरील शिवाजी महाराजांची समाधी मोडकळीला आलेली होती तिच्याकडे सर्व महाराष्ट्राचे लक्ष वेधले. जोतीराव आणि लोखंडे यांनी शिवाजी महाराजांच्या समाधीच्या दुरुस्तीसाठी निधी गोळा करण्यासाठी मुंबई आणि पुणे या ठिकाणी अनेक सभा घेतल्या. जेव्हा महाराष्ट्रातील समकालीन नेते शिवाजी महाराजांच्या अमर कृतीला विसरले होते, तेव्हा जोतीरावांनी त्यांच्या पराक्रमाचे नि वैभवशाली राजवटीचे पोवाडे गायिले होते... जोतीरावांनी रायगड किल्ल्याला भेट देऊन शिवाजीमहाराजांच्या अष्टकोनी समाधीवरील पालापाचोळ्याचा ढीग दूर केला आणि ती स्वच्छ केली. ह्यानंतर जेम्स डगलस यांनी आपल्या 'ए बुक ऑफ बाँबे' नावाच्या ग्रंथात मराठ्यांनी शिवाजी महाराजांच्या समाधीकडे दुर्लक्ष केल्याबद्दल त्यांची खूप हजेरी घेतली. अशा रीतीने १८८० साली जोतीरावांनी शिवाजी महाराजांच्या समाधीविषयी जे कार्य सुरू केले ते टिळकादी पुण्यातील नेत्यांनी १८९५ साली तडीस नेले.'[७१] डॉ. गांगल यांनी ह्या गोष्टींकडे एकवार नजर टाकावी म्हणजे इतके धडधडीत खोटे लिहिण्यास ते धजावणार नाहीत. 'शिवाजी महाराजांच्या स्मारकाचे आपल्या देशातील ते (ज्योतीराव) पहिले पुरस्कर्ते होऊन गेले, हे कोणासही दिसून येईल.'[७२]

'टिळक-आगरकरांना जामीन राहण्यासाठी उरवणे शेटची तयारी म. फुल्यांच्या प्रोत्साहनामुळेच होऊ शकली'[७३] असे ३ ऑक्टोबर १८८२ च्या केसरीत म्हटले आहे. टिळक-आगरकरांना दिलेल्या मानपत्रात म. फुले म्हणतात, 'आमचे कर्तव्यकर्म आहे की सार्वजनिक कामी पडलेल्या गृहस्थांस दुःख प्राप्त झाले असल्यास त्याचे शांतवन करावे... यास्तव भोगलेल्या सजेविषयी आपण तीळमात्र संदेह मनात न ठेविता पूर्ववत आपला क्रम न्यायदृष्टीने व एकाच पक्षी विचार न ठेविता सर्व जातीचे लोक आपल्या कुटुंबातीलच आहेत असे समजून वर्तन ठेवीत जावे म्हणजे हल्लीपेक्षाही आपणास लोक जास्त मान देतील.' (म. फुले समग्र वाङ्मय, ३ री आवृत्ती, १९८८ पृ. ५७८ ते ५८०)

शिवाजी राजांचा गौरव

पोवाड्याच्या प्रस्तावनेत म. फुले म्हणतात, 'शिवाजी राजाच्या ह्या पवाड्याचे आठ भाग केले आहेत. दरएक भागात विषयांतर होऊ नये ह्या भयास्तव सर्व भाग एक सारखे केले नाहीत. अति जुनाट यवनी व मेसर्स ग्रांडफ, मरी वगैरे इंग्रज लोकांच्या बहुतेक लेखी आधारावरून हा पवाडा केला आहे. कुणबी, माळी, माहार, मांग वगैरे पाताळी घातलेल्या क्षुद्रांच्या उपयोगी हा पवाडा पडावा असा माझा हेतू आहे. लांबच लांब मोठाले संस्कृत शब्द मुळीच घातले नाहीत. व जेथे माझा उपाय चालेना तेथे मात्र लहानसहान शब्द निर्वाहापुरते घेतले आहेत. माळी कुणब्यांस समजण्याजोग्या चालीने रचना केली आहे.'[७९]

श्री. बाबासाहेब पुरंदरे, रणजित देसाई, शिवाजी सावंत या कलावंतांचा शिवाजी जसा वेगवेगळा आहे तद्वतच म. फुल्यांचा या पोवाड्यातील शिवाजीही 'खास महात्मा फुल्यांचा असा वैशिष्टपूर्ण शिवाजी' आहे. त्याच्याकडे पाहण्याची म. फुल्यांची विशिष्ट दृष्टी आहे. पोवाड्याच्या आधी आलेल्या अभंगातून ती व्यक्त होते.

'अति महारथी क्षत्रियाचा बाळ। यवनाचा काळ त्रेतायुगी।
स्वभावेतो शूर रणीं भीडणार। लढे अनिवार देशासाठी।'[८०]

पोवाड्याची सुरुवात करताना डफावर थाप कडकडावी तसे शब्द कडकडतात

'कुळवाडी-भूषण पवाडा गातो भोसल्याचा।
छत्रपती शिवाजीचा।'[८१]

अर्वाचीन मराठी साहित्यात शिवछत्रपतींचे पराक्रम व कर्तृत्व यांकडे प्रथम लोकांचे लक्ष वेधण्याचे श्रेय जोतीरावांच्या ह्या पोवाड्याला आहे.

'शिवराज भूषण' 'शिवबावानी' हे शिवाजीचा गुणगौरव करणारे दोन काव्यग्रंथ लिहिणारा कवी भूषण जातीने ब्राह्मण होता. उलट या पवाड्याचा कर्ता हा 'कुळवाडीभूषण' शेतजमीन कसणाऱ्या समाजाचा प्रतिनिधी आहे, कष्टकरी कुळवाड्यांचा शाहीर आहे, असा त्यांच्या ह्या ओळींचा इत्यर्थ आहे. शिवाजीचा उल्लेख त्यांनी पराक्रमी शूद्राचा पुत्र व ब्राह्मण पेशव्याचा मुख्य धनी असा केला आहे. शूद्रातिशूद्र हेच येथील मूळचे रहिवासी, क्षेत्रपती होते असा त्यांचा दावा आहे. शूद्र संज्ञेविषयी त्यांच्या मनात अजिबात न्यूनगंड नव्हता. ब्राह्मणशाहीतील वर्णवर्चस्व आणि धार्मिक व सामाजिक गुलामगिरी यांचे ते कडवे विरोधक होते. या ऐतिहासिक पोवाड्यातही आपल्याला त्याची प्रचीती आल्याखेरीज राहात नाही.[८२]

'लंगोटयांस देई जानवी पोषींदा कूणब्यांचा।
काळ तो असे यवनांचा।'[८३]

'कुणब्यांचा पोशिंदा आणि यवनांचा काळ' असणाऱ्या शूद्रांच्या राजाला मानाचा पहिला मुजरा करून म. फुले त्याच्या जन्माचा गौरवपूर्ण उल्लेख करताना म्हणतात–

'शिवनेरी किल्ल्यामध्ये बाळ शिवाजी जन्मले।
जिजाबाईस रत्न सापडले ।।
हातापायांची नखबोट शुभ्र प्याजी रंगीले।
ज्यानी कमळा लाजविले ।।
सान कटी सिंहापरी छाती मांस दुनावले।
नाव शिवाजी शोभले।
राजहौसी उंच मान माघे मांदे दोंदीले।
जसा का फणीवर डोले।
सरळ नीट नाक विशाळ डोळचा शोभले।
विषादे मृग वनी गेले।'[८४]

शिवाजीराजांच्या राजबिंडचा आणि विलक्षण तेजस्वी, रूपाचे चित्रमय वर्णन म. फुले शब्दांकित करतात. 'जिजाबाईचे हे रत्न कसे आहे हे वर्णन करताना, त्याची हातापायांची बोटे म्हणजे जणू कमळाच्या पाकळचा, सिंहकटीचा, राजहंसासारखी उंच मान जणू फडा काढलेला नागराजच आणि डोळे इतके विलक्षण देखणे की मृगांना त्याचा हेवा वाटला आणि ते विषाद वाटून वनात निघून गेले!' वा! म. फुल्यांनी वर्णनाची काय बहार उडवून दिलीय. कोणाला हे वर्णन सांकेतिक वाटण्याचीही शक्यता आहे. परंतु मला वाटते, एका शूद्राच्या मुलाचे असे वर्णन करण्यामागे साभिप्रायता असावी. कारण रानफूल कमळ, सिंह, नागराज, मृग हा या रानप्रतिमा जाणीवपूर्वक योजल्या आहेत असे मानायला जागा आहे.

जिजाबाई राजांना बालपणी गोष्टी सांगतात, **स्वाभिमानाच्या**! मालोजी राजे हे महाराजांचे आजोबा जनतेसाठी तळी खोदीत असत याचा म. फुल्यांनी आवर्जून उल्लेख केला आहे.

'उपाय नाही जाणोन चाकर झाला यवनाचा।
शिपाई होता बाणीचा।'[८५]

मुसलमानी राजवट

नाईलाजास्तव चाकरी करीत असला तरी मूळ प्रेरणा स्वातंत्र्याची होती! लहानपणाच्या या गोष्टी पारंपरिक गोष्टी नाहीत. तर क्षत्रिय आणि आर्य संघर्षाच्या कथा जिजाबाई शिवाजीला सांगते. ह्या संघर्षात देश निःक्षत्रिय झाल्यामुळे यवनांचे फावले आणि त्यांनी हा देश जिंकला. यवनांनी इथे नाना अत्याचार केले असे म फुल्यांचे मत आहे.

'पींडीस फोडी। देऊळे पाडी।
चित्रास तोडी। लेण्यास छेडी।
गौमांसी गोडी। डुकरा सोडी।
खंडयास ताडी। जेजूरी गडी।

... झाडीस तोडी । लुटली खेडी ।
... राज्यास बेडी । कातडी काढी ।
गर्दना मोडी । कैलासा धाडी ।
... माताबोध मनी ठसता राग आला यवनांचा
बेत मग केला लढण्याचा ।।'[८६]

शिवाजीच्या पूर्ववयात दादोजी कोंडदेवाची शिकवण व मार्गदर्शन यांचा त्याला पुष्कळच उपयोग झाला असा सार्वत्रिक समज होता. जोतीरावांनी या रूढ समजुतीला धक्का दिला आहे. शिवाजीच्या घराण्यात निदान दोन पिढ्यांत तरी राजकारण खेळले जात होते. त्याच्या भोवताली मर्दुमकीचे व मुत्सद्दीपणाचे वातावरण होते. लहानपणापासून अशा वातावरणात वाढलेल्या शिवाजी राजासारख्या प्रज्ञावंताला दुसऱ्या कुणाकडून तरी राजकारणाचे धडे घेण्याची काय गरज?

'मासा पाणी खेळे गुरू कोण असे त्याचा?' असा जोतीरावांचा रोकडा सवाल होता. रामदासांना शिवाजीने गुरू मानले हे खरे; परंतु ते केवळ 'लोकप्रीतीकरता' असा जोतीरावांचा अभिप्राय आहे.'[८७]

मुस्लीम राजवटीचे स्वागत तर राहूद्याच, परंतु विलक्षण त्वेषपूर्ण शब्दांत म. फुल्यांनी तिच्या अत्याचारी स्वरूपाचा धिःक्कार केलेला आहे. 'इशारा' या पुस्तिकेत म. फुले म्हणतात, 'पुढे काही काळानंतर मुसलमान लोकांनी (अफगाण, मोगल वगैरे) या देशावर स्वाऱ्या केल्या. ... वर जे लोक सांगितले, त्यांपैकी पहिले दोन म्हणजे आर्यब्राह्मण व मुसलमान यांपासून प्रजेस (येथे व पुढे प्रजा शब्दाचा अर्थ शूद्रादिअतिशूद्र लोक समजावा) फारच त्रास उत्पन्न झाला. ते स्वतः कपट, मत्सर, क्रूरता, आपलपोटेपणा वगैरे अवगुणांचे केवळ मूर्तिमंत पुतळेच होते, यात काही संशय नाही. त्यांनी आपले अविचाराचे हेतू सिद्धीस जावे, म्हणून हातांमध्ये अंमलरूपी अतितीव्र कोरडा घेऊन या देशातील हस्तगत झालेले दीनप्रजेचे अंगावर फडाफड उडवीत गेले. त्या वेळेस ते, प्रजेस ज्या हितकारक व सौख्यकारक गोष्टी त्याजमध्ये सुधारणा न करिता तिचा कसा छळ करावा, त्याजमध्ये मोठे प्रवीण होते. इतिहासावरून पाहिले असता असे समजते की कित्येकांनी आपल्या मिथ्या व क्षुल्लक कारणाकरिता प्रजेपैकी शेकडो मनुष्यांस त्रस्त करून शेवटी त्यांस मोठे दुष्ट रीतीने जिवानिशी मारावे, कित्येकांनी आपल्या दुष्ट वासना तृप्त करण्याकरिता कुलीन, पतिव्रता आणि सुंदर अशा दुसऱ्याच्या स्त्रियांचा जुलमाने अभिलाष धरावा आणि लहानसहान अपराधाकरिता मनुष्याचे हालहाल करून त्यास देहान्त शिक्षा द्यावी. तात्पर्य, त्या वेळेस प्रजेस दुःख देण्याच्या कामांत जी काही सुधारणूक झाली होती, ती अन्य देशांतील प्रजेच्या दुःखाशी तुलना करून पाहिली असता, हटकून पहिले बक्षिस हिजला मिळायचेच! ... ते प्रजा याचा अर्थ काडी, कस्पट, ढेकूण अथवा काही एक प्रकारची जनावरे समजत. त्यांचा उपयोग म्हटला म्हणजे त्यांनी राजे व त्यांचे जातीचे लोकांकरिता, त्यांचे स्त्रियांकरिता व मुला-

बाळांकरिता धान्य उत्पन्न करावे, वस्त्रे विणावी, त्यांच्याकरिता उन्हातान्हात खपावे आणि त्यांस ज्या ऐषआरामाच्या गोष्टी लागतात, त्या सर्व पुरवाव्यात, ह्याशिवाय दुसरा काही नाही.'[८८] म. फुल्यांनी या वर्णनात अत्यंत कळवळून प्रजेची कातडी सोलणे, त्यांना चाबकाचे फटके मारणे, हत्तीच्या पायी तुडविणे, सुळावर देणे, कडेलोट करणे, तोंडात उकळते तेल, शिसे, शेंदूर ओतणे, शेतसारा चुकविला म्हणून मिरच्यांची धुरी देणे अशा अनेक क्रूर शिक्षांचा धि:कार केला आहे. डॉ. गांगल यांना यातच मुस्लीम राजवटीचे म. फुल्यांनी कौतुक केल्याचे दिसत असेल तर धन्य त्यांची !

तर्कतीर्थ आणि डॉ. गांगल

दुसऱ्याही एका बनावट संदर्भाचा परामर्श याच ठिकाणी घेऊन टाकूया.

डॉ. गांगल यांनी आपल्या लेखात म्हटले आहे, 'कारण मुळातच शिवाजी महाराजांनी स्वराज्यसंस्थापनेसाठी केलेला खटाटोप मूर्खपणाचा होता, असे फुल्यांचे मत होते. महाराष्ट्र सरकारने प्रकाशिलेल्या फुले गौरवग्रंथात पृ. १०९ वरील तळटीपेत लक्ष्मणशास्त्री जोशींनी हे मत नमूद केले आहे, 'शिवाजीराजाने मुसलमानी राज्य हाणून पाडले व नवीन हिंदू राज्य स्थापिले याची काही गरज नव्हती, मुसलमानी राज्य काही वाईट नव्हते.' (सोवत ४।१२।८८ पृ. १५)

१) हे अवतरण डॉ. गांगल यांनी अर्धवट घेतले आहे.

मूळ अवतरण पुढीलप्रमाणे आहे. 'लोकांच्या श्रद्धेला असाच धक्का देणारा दुसरा विचार जोतीरावांनी शिवाजीबद्दल मांडला आहे. ते म्हणतात, 'शिवाजीराजाने मुसलमानी राज्य हाणून पाडले व नवीन हिंदूराज्य स्थापिले याची काही गरज नव्हती; मुसलमानी राज्य काही वाईट नव्हते. मुसलमानी राज्यांत जातिभेदांचे प्रस्थ कमी होत चालले होते, जातिनिष्ठ पक्षपात नाहीसा होत चालला होता.'[८९]

२) तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशींनी हे अवतरण म. फुल्यांच्या कोणत्या ग्रंथातून, कोणत्या पृष्ठावरून घेतले आहे हयाच्या कुठल्याही नोंदी येथे दिलेल्या नाहीत.

३) 'म. फुले समग्र वाङ्मय' संपा. कीर–मालशे या अधिकृत फुले वाङ्मयातील एकाही ग्रंथात असे अवतरण नाही. तर्कतीर्थांशी पत्राद्वारे संपर्क साधून त्यांना हे अवतरण कुठून घेतले अशी विचारणा केली असता त्यांचे उत्तर अद्याप आले नाही.

४) कुठलेही अवतरण हे मूळ ग्रंथातूनच घ्यायला हवे हा संशोधनातला नियम, किंवा ते जर दुय्यम साधनांवरून उद्धृत करायचे असेल तर त्याचा मूळ नोंदीसह संदर्भ त्याठिकाणी असला तरच त्याचा वापर करणे अन्यथा नाही या गोष्टी डबल पीएच. डी. असणाऱ्या डॉ. गांगलांना माहीत नाहीत काय ?

५) बनावट अवतरण, तेही अर्धवट घेऊन त्याचा सोयिस्कर वापर करणे हे डॉ. गांगल यांचे एकूणच लेखनातील वैशिष्टय दिसते.

६) तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांनी हे अवतरण मुळात १९४७ साली

लिहिलेल्या 'ज्योतिनिबंध' या आपल्या व्याख्यानाच्या पुस्तिकेत दिलेले होते. ती पुस्तिका आता दुर्मिळ झाली आहे. १९४७ नंतर तर्कतीर्थांनी म. फुल्यांवर पुष्कळ ठिकाणी लेखन केले आहे, परंतु त्यांनी हे अवतरण पुन्हा कोठेही वापरलेले नाही. हे पुढे गाळण्यामागे तर्कतीर्थांचा काही हेतू असावा काय?

७) समग्र वाङमयाला प्रस्तावना लिहिताना १९६९ साली या पुस्तिकेतील जवळजवळ सर्व विचार पुनश्च मांडून तर्कतीर्थांनी एवढेच एक अवतरण मात्र गाळले आहे, याचा अर्थ काय घ्यायचा?

८) ही पुस्तिका 'म. फुले गौरवग्रंथा'त १९८२ साली पुनर्मुद्रित केल्यामुळे हा घोटाळा झाला आहे.

९) कुठल्याही ग्रंथाची सर्वांत अलिकडची आवृत्ती संशोधकाने प्रमाण मानायला हवी हे पाहता डॉ. गांगल यांनी या पुस्तिकेऐवजी (१९४७) तर्कतीर्थांच्या १९६९ च्या समग्र वाङमयाच्या प्रस्तावनेतील मतांचा विचार करायला हवा होता.

म. फुल्यांनी शिवाजीच्या पोवाडयात राजांचा गौरव केला आहेच, शिवाय पुढेही त्याचा इतरत्र दोन ठिकाणी पुनरुच्चार केला आहे–'गुलामगिरी' या १८७३ च्या ग्रंथात पृ. ११७ वर आणि मामा परमानंदांना पत्र लिहिताना जून १८८६ मध्ये म. फुले म्हणतात, 'आज दिनपावेतो युरोपियन लोकांनी जे काही इतिहास तयार केले आहेत, ते सर्व शूद्र आणि अतिशूद्रांची वास्तविक स्थिती ताडून न पाहता XXX झाकून आर्य भटब्राह्मणांचे ग्रंथांवर व भटकामगारांचे सांगण्यावर भरंवसा ठेवून तयार केले आहेत. व अलिकडे भटब्राह्मणांची विद्वान पोरेसोरे नवीन पोवाडे करून हळूच मैदानात आणीत आहेत. त्यांपैकी माझे पहाण्यात बरेच आले आहेत आणि त्यातील शूद्रांनी कमविलेल्या मोत्या-पोवळ्यांचा चारा चरणारे भागवती, गो-ब्राह्मणासह दादोजी कोंडदेवास फाजील आगांतुकी करावयास लावल्यामुळे तसल्या बनावट पवाड्यांचा मी संचय केला नाही.'[९०] याच पत्रात म. फुले हे शंकर तुकाराम यांनी छापलेल्या पवाड्यांची प्रत आपल्याजवळ नाही व ती पाहिल्याशिवाय त्यांना त्याविषयी काहीही कळविता येणार नाही, असे स्पष्ट करतात. यावरून म. फुले कुठलीही गोष्ट स्वतः तपासल्याशिवाय तिच्यावर विश्वास ठेवीत नसत हे स्पष्ट होते. म. फुल्यांच्या हयातीत बनावट पोवाडे तयार करण्याचा सपाटा काही मंडळींनी लावल्याची तक्रार म. फुल्यांनी केली आहे. ती डॉ. गांगलांच्या या लेखाला सर्वस्वी लागू पडते. आपण पुन्हा मूळ पोवाड्याकडे वळूया–

या पोवाड्यात म. फुल्यांनी शिवचरित्रातील बहुतेक सर्व महत्त्वाचे प्रसंग सहजपणे व सरळ प्रवाही भाषेत ग्रंथित केले आहेत. मात्र या सर्व कथनात त्यांचा स्वतंत्र सामाजिक दृष्टिकोन प्रतिबिंबित झालेला आहे. सोपेपणा, समर्पकता व सफाई हे त्यांच्या पद्यशैलीचे खास वैशिष्ट्य आहे यात शंका नाही. शिवाजी राजांची बुद्धिमत्ता, चातुर्य, कर्तबगारी, सावधपणा, निर्लोभी वृत्ती, उदारता, लोक-संग्रह इत्यादी गुणांचे वर्णन जोतीरावांनी अगदी मोजक्या शब्दांत, रेखीवपणे, पवा-

डचाच्या धाटणीला साजेल असे केले आहे. यात कुठेही कृत्रिमता किंवा खडबडीतपणा आढळून येत नाही.[९१]

जिजाबाई–सईबाई

'या पोवाडचात शिवचरित्र सांगताना केवळ फुल्यांनाच सुचू शकतील असे काही उल्लेख आहेत. जिजाईचा उल्लेख करीत असता, शहाजीराजांनी नवी सवत आणली आणि जिजाईवर जन्माचा अन्याय केला, (घर सवतीने घेतले। छाती कोट करून सर्व होते साटिवले। मुख मुद्रेने फसिवले। चतुर शिवाजीने आईचे दुःख ताडले. सवतीवर लोटती बाळा। डाग लाविला कुणबी कुळा। सवतीला कसे तरी टाळा। छातीवर ठेवल्या शिळा! नाही रुचला सवतसोहळा।) या गोष्टीचा फुल्यांनी अगदी खोचून उल्लेख केलेला आढळतो ! नवी सवत येणे आणि त्यामुळे पराक्रमी नवऱ्याकडून आपली उपेक्षा होणे, या मानी स्त्रीच्या जिव्हारी भिडणाऱ्या शल्याचे वर्णन फुल्यांनी जितक्या सहानुभूतीने तितक्याच पोटतिडकीने केलेले आहे.

शिवाजीच्या प्रथम पत्नी सईबाईकडे बहुतेकांचे दुर्लक्ष होते; पण शिवाजी–सईबाई यांच्या दांपत्यप्रेमाचे मनोहर वर्णन फुल्यांनी केले आहे. त्याचप्रमाणे शिवाजी सईबाईचा सल्ला घेत असे, असेही आवर्जून म्हटले आहे. (विचारी आपल्या स्त्रियेस। साजे नाव सईबाई स्त्री सुचवी पतीस। ताडा दंडी दुसमानास। स्त्रीची सुचना सत्य भासली लिहिले पत्रास।) शिवाजीने आपल्या राज्यात स्त्रीला खरेखुरे अभयदान दिले, खऱ्या अर्थाने निर्भय केले या गोष्टीची अपूर्वाई अर्थातच फुल्यांना विशेष वाटावी, हे स्वाभाविकच आहे. शिवाजीच्या कल्याणकारी राज्याचे अनेक पैलू वर्णन करताना त्याने सगळ्यांच्या–शत्रूच्यासुद्धा–औषधपाण्याची व्यवस्था केली, या गोष्टीचा (इतरांना सहसा न सुचणारा) उल्लेख केला आहे. (एकसारखे औषधपाणी देई सर्वाला। निवडले नाही शत्रूला। जखमा बऱ्या होताच खुलासा सर्वांचा केला।) शिवाजीचा तिसरा भाऊ 'दासीपुत्र' संताजी याला शिवाजीने जवळ केला, मोठा राज्याधिकार दिला, या सहसा कोणाला न आठवणाऱ्या उपेक्षित घटनेचा उल्लेख केवळ फुल्यांनाच सुचण्यासारखा आहे! (दासीपुत्र संताजी बंधु होता शिवाजीला। करनाटकी मुख्य केला।)

अनैतिहासिक गोष्टींना थारा नाही

म. फुल्यांनी आपल्या पोवाडचात भाकड दंतकथांना स्थान देण्याचे कटाक्षाने टाळले आहे.[९२] त्याचप्रमाणे त्यांनी बाळ गांगलकृत अनैतिहासिक आणि बनावट पदव्यांनाही थारा दिलेला नाही. 'गोब्राह्मणप्रतिपालक' वगैरे यादी ही बनावट आणि हितसंबंधीयांनी मागाहून घुसडलेली आहे. २५ ऑगस्ट १६४८ चे राजांचे पत्र उपलब्ध झाले आहे, त्यात राजांचा उल्लेख 'राजश्री सिवाजि राजे' असा केलेला आहे, तर २२ सप्टेंबर १६७८ च्या राज्यभिषेकानंतरच्या पत्रात राजांना "क्षत्रिय-

कुलावतंस श्री राजा शिवछत्रपती" अशा प्रकारे संबोधले आहे.[९३]

शिवशाहीर बाबासाहेब पुरंदरे यांनीही 'क्षत्रिय कुलावतंस महाराज सिंहासनाधीश्वर राजा शिवछत्रपति' [९४] असाच राजांचा उल्लेख केलेला आहे.

'हिंदूंवर जिझिया कर लादण्याच्या मुसलमानांच्या कुराणदत्त अधिकाराचा अधिक्षेप शिवाजीने केला म्हणून कदाचित आपल्या महात्म्याचा शिवाजीवर राग असेल' इत्यादी डॉ. गांगल यांची विधाने किती विपर्यस्त आणि हेतुपूर्वक दुष्टावा करणारी आहेत याचे प्रत्यंतर या पोवाड्यावरून स्वच्छपणे दिसून येते. म. फुले अत्याचारी इस्लामी राजवटीचा फक्त निषेध करूनच थांबत नाहीत तर औरंगजेबाबद्दल चिडून लिहितात,

'जीधर उधर मुसलमानी । बीसमिलाहि हिंमानी ।
सच्चा हरामी शैतान आया । औरंगजीब नाम लिया ।
छोटे भाइकूं हूल दिया । बडे भाइकी जान लिया ।
छोटेकूंबी कैद किया । लोक उसके फिता लिया ।
सगे बापकू कैद किया । हुकमत सारी छिन लीया ।
आपण होके बेलगामी । शिवाजीकू कहे गुलामी ।
आपण होके ऐशआरामी । शिवाजीकूं कहे हरामी ।' [९५]

पुढे एके ठिकाणी म. फुले औरंगजेबाला कुलद्रोही म्हणतात.

'कुलद्रोही औरंगजीब योजी कपटास।'[९६]

डॉ. गांगल यांनी मुसलमानांविषयीची म. फुल्यांनी योजलेली वेगवेगळ्या संदर्भातील विशेषणे तेथून तोडून वेगळी काढली, व त्यांचा अर्थ बदलेल अशा रीतीने दुसरीकडे वापरून म. फुल्यांना शिवाजीविरोधी ठरविण्याचा दुष्टावा केला आहे.

दुष्ट शक्तींना म. फुल्यांनी कधीही पाठीशी घातलेले नाही. डॉ. गांगल वाचकांना मूर्ख समजतात काय? महात्मा फुल्यांनी म्हणे शिवाजीला शिवीगाळ केली आहे. म. फुले समग्र वाङमयात (आ. २ री) शिवाजीराजांचा उल्लेख पुढील पृष्ठांवर आलेला आहे–पोवाडा पृ. १ ते ३८, ११४, ११७, १२१, १९६, २०१, २५६, ३२५, ३५२, ३८४, ४७१, ४७३, ५३१. त्यांत कुठेही शिवाजी राजांना बावळट, दुधखुळा, अक्षरशत्रू, मूर्ख असे म्हटलेले नाही. डॉ. बाळ गांगल यांनी सदर उल्लेख कुठल्या पानावर आहेत ते दाखवून द्यावे म्हणजे आमच्या ज्ञानात (!) भर पडेल!

पोवाड्यामध्ये म. फुले लिहितात–

'शिवाचा गजर जयनामाचा झेंडा रोविला ।।
क्षेत्र्याचा मेळा मावळ्याचा शिकार खेळला ।।
माते पायी ठेवी डोई गर्व नाही काडीचा ।।
आशिर्वाद घेई आईचा ।।[९७]।।
' शिवाजीची किर्ती चौमुलखी डंका वाजला ।
मोगलाला धूर देऊन लुटले मुलखाला ।।'[९८]

पोवाड्याच्या सातव्या भागात प्रतापराव गुजर यांच्या वीरमरणाचा प्रसंग सांगून शिवाजी राजांनी आपल्या सेनापतीचे गुण न विसरता त्यांच्या पश्चात त्यांच्या कुटुंबाच्या पालनपोषणाची व्यवस्था केली, हा प्रसंग सांगतानाच पुढे **गागाभट्टांचा** उल्लेख आलेला आहे.

गागाभट्ट आणि सुवर्णतुला

शिवचरित्रातील महत्त्वाचे बहुतेक सर्व प्रसंग चित्रित करणारे म. फुले राज्याभिषेक सोहळ्याच्या वर्णनाला मात्र फाटा देतात यामागे त्यांचा दृष्टिकोन काय असावा ? बहुधा महाराजांनी वर्णलोपावद्दलचे घेतलेले प्रायश्चित्त आणि सुवर्णतुला करून त्याचे पुरोहितांना केलेले दान म. फुल्यांना खटकले असण्याची शक्यता आहे. म्हणून म. फुले म्हणतात–

'सेनापतीचे गुण मागे नाही विसरला।
पोशी सर्व कुटुंबाला।
प्रतापराव-कन्या सून केली आपल्याला।
व्याही केले गुजराला।
काशीकर गंगाभट घाली डौल धर्माचा।
केला खेळ गारूड्याचा।
लुटारू शिवाजी लुटला धाक गृहफौजेचा।
खर्च नको दारूगोळीचा।
बहुरूपी सोंग तूलादान सोने घेण्याचा।
पवाडा गातो शिवाजीचा।
कुळवाडी-भूषण पवाडा गातो भोसल्याचा।
छत्रपती शिवाजीचा ॥७॥'[९९]

याठिकाणी म. फुल्यांच्या विचारसरणीतील 'पुरोहितविरोध आणि धर्माच्या नावाखाली लोकांना लुबाडण्याचा धंदा' ह्यावद्दलची मते लक्षात घेणे गरजेचे आहे. म. फुल्यांना 'निर्मिक' आणि त्याची 'लेकरे' यांच्या मधल्या 'पुरोहित' नावाच्या 'दलालाचा' तिटकारा होता. आयुष्यभर म. फुल्यांनी पुरोहितशाहीला आणि वर्णवर्चस्वाच्या भूमिकेला कडाडून विरोध केलेला आहे.

ज्या शिवाजीराजांनी स्वराज्यासाठी–

'सोसिले उन्हातान्हाला। भ्याला नाही पाऊसाला।
डोंगर कंगर फिरला। यवन जेरीस आणला।
लुटले बहुत देशाला। वाढवी आपुल्या जातीला।
लढवी अचाट बुद्धीला। आचंबा भुमीवर केला।
बाळगी जरी संपत्तीला। तरी बेताने खर्च केला।
वाटणी देई शिपायाला। लोभ द्रव्याचा नाही केला।'[१००]

अशा महाराजांकडून केवळ धर्माच्या नावाखाली जर कुणी राजांच्या वजना-इतके सोने तुलादानात लुबाडीत असेल तर त्याचा म. फुल्यांनी निषेध करण्यात काय चुकीचे आहे ? राजांनी संपत्ती स्वराज्यासाठी जमवली. त्यासाठी अपार श्रम करावे लागले, कित्येकदा जिवाची बाजी लावावी लागली, प्रसंगी साथीदारांचे प्राणही खर्ची पडले ; अशा संपत्तीतला मोठा हिस्सा ऐतखाऊ पुरोहित 'गृहफौजेच्या धाकावर' परंपरागत संस्कारांच्या आणि धार्मिक समजुतींच्या बळावर बळकावतात आणि त्यासाठी काहीही कष्ट नाहीत, ना दारूगोळा खर्चावा लागतो, ना युद्ध करावे लागते. फक्त धर्माचा डौल घालणारा नजरबंदीचा खेळ तेवढा पुरे ! * याठिकाणी 'लुटारू शिवाजी' एवढेच शब्द बाजूला काढून म. फुल्यांनी शिवाजीला लुटारू म्हटले आहे अशी हाकाटी करण्यात गागाभट्टांना संरक्षण देण्याचा तर गांगलांना प्रयत्न करायचा नाही ना ? म. फुल्यांचा राग गागाभट्टावर आहे, शिवाजीवर नाही! हे स्पष्ट असतानाही म. फुल्यांनी शिवाजी महाराजांना शिवीगाळ केली आहे अशी दवंडी पिटण्यामागे डॉ. गांगलांचा हेतू शुद्ध आहे काय ?

१) म. फुल्यांचा हा पोवाडा ग्रँट डफ वगैरे इतिहासकारांवर आधारित आहे ग्रँट डफ शिवाजीला लुटारूच समजत होता.[१०१] आणि हीच समजूत पुढेही अनेक वर्षे अनेक इतिहासकारांची झालेली होती. १२० वर्षांपूर्वी म. फुल्यांना प्रगत संशोधित कागदपत्रे उपलब्ध नव्हती. त्यामुळे शिवाजीराजांना लिहिता येत होते की नाही याबद्दलही तेव्हा वाद होते. व त्याअर्थाने म. फुले राजांना अक्षरशून्य समजत होते. म. फुल्यांनंतर कितीतरी वर्षांनी महाराजांच्या हस्ताक्षराचा नमुना उपलब्ध झाला हे विसरून चालणार नाही.

२) आजही आपण 'महाराजांनी सुरतेची लूट केली' किंवा 'दसऱ्याला आपण सोने लुटायला जातो' अशी सर्रास विधाने करतो. तेव्हा लूट करणारा तो लुटारू या अर्थाने आलेल्या शब्दाचा गैरसमज निर्माण करण्यासाठी प्रयत्नपूर्वक वापर करणे हे निंद्य कृत्य होय.

३) 'लुटणे' या शब्दाचा शब्दकोशातला अर्थ– अपहार करणे, लुबाडणे, लूट करणे, नुकसान करणे, नाश करणे, नागविणे, धन हरण करणे, बळजबरीने किंवा कायद्याच्या जोरावर एखाद्याला किंवा एखाद्याची वस्तू हरण करून नेणे, एखाद्याला जिंकणे, त्याचे सर्वस्व हरण करणे, 'भक्ती बळेचि पहा हो। परमेश्वर आजि अर्जुने लुटिला।'– मोउद्योग?[१०२] असा आहे.

आणि 'लुटारू' या शब्दाचा अर्थ– वि. लुटणारा, लुबाडणारा, दरोडा घालणारा, 'गावोगावचे आले लुटारी। ती धरून घेऊन जाती।' ऐपो. २५९. असा दिलेला आढळतो. तेव्हा म. फुलेकालीन इतिहास, संशोधन, लोकसमजुती, म.

* 'गागाभट्ट' या शब्दाचा शब्दकोशातला अर्थ ऐतखाऊ, 'पोकळ पांडित्य दाखवणारा', असा आहे.

फुल्यांचा मूळ संदर्भ आणि त्यांची व्यापक समग्र आदरभावना यांचा एकत्रित विचार करता म. फुल्यांच्या मनात शिवाजीराजांबद्दल तीळमात्रही अनादराची भावना नाही ही गोष्ट सिद्ध होते. राजांबद्दलच्या अक्षरशून्य, अज्ञानी इ. उल्लेखांतही अनादराचा हेतू नाही. उलट त्यांच्या या स्थितीचा गैरफायदा पुरोहितांनी घेतला याचा राग आहे.


'नंतर थोडा काळ लोटल्यावर तुकाराम या नावाचा साधू शेतकऱ्यांमध्ये निर्माण झाला. तो शेतकऱ्यांतील शिवाजीराजांस बोध करून त्याचे हातून भट-ब्राह्मणांच्या कृत्रिमी धर्माची उचलबांगडी करून शेतकऱ्यांस त्यांच्या पाशातून सोडवील, या भयास्तव भटब्राह्मणांतील अट्टल वेदांती रामदासस्वामींनी महाधूर्त गागाभट्टांचे संगनमताने अक्षरशून्य शिवाजीचे कान फुंकण्याचे सट्टल ठरवून, अज्ञानी शिवाजीचा व निःस्पृह तुकारामबुवांचा पुरता स्नेहभाव वाढू दिला नाही. पुढे शिवाजी राजाचे पाठीमागे त्याच्या मुख्य भटपेशव्या सेवकाने शिवाजीचे औरस वारसास सातारचे गडावर अटकेत ठेविले.'[१०३]

या उल्लेखात अक्षरशून्य किंवा अज्ञानी हच्या शिव्या आहेत काय ?
शिवाजीच्या पोवाड्याची समाप्ती करताना म. फुले म्हणतात–

'राजा क्षेत्र्यांमध्ये पहिला। नाही दुसरा उपमेला।
— कमी नाही कारस्तानीला। हळूच वळवी लोकांला।
युक्तीने बचवी जीवाला। कधी भिईना संकटाला।
... टळेना रयत सुखाला। बनवी नव्या कायद्याला।
दाद घेई लहानसानाची। हयगय नव्हती कोणाची।
आकृती वामनमुर्तीची। बळापेक्षा चपळाईची।
सुरेख ठेवण चेहऱ्याची। कोंदिली मुद्रा गुण रत्नाची।
... जोतीराव फुल्याने गाईला पुत क्षुद्राचा।
मुख्य धनी पेशव्याचा।
जिजाबाईचा बाळ काळ झाला यवनाचा।
पवाडा गातो शिवाजीचा!
कुळवाडी-भूषण पवाडा गातो भोसल्याचा।
छत्रपती शिवाजीचा ॥८॥'[१०४]

'हा राजा इतका महान होता की त्याला उपमा द्यावी असा दुसरा कुणी नाहीच ! यासम हाच !' अशा गौरवपूर्ण भाषेत म. फुल्यांनी शिवाजीराजांना मात-वंदना दिलेली असतानाही डॉ. गांगल मात्र फुल्यांनी राजांना शिव्या दिल्या आहेत अशी आवई उठवतात !

* * *



शेतकरी-देशाचा भाग्यविधाता !

जिझिया कर

डॉ. गांगल यांनी ओढून ताणून जिझिया कराची कहाणी सांगून वाचकाला संभ्रमात पाडण्याचा प्रयत्न केला आहे.

'शूद्रादि अतिशूद्रांना दास्यत्त्वापासून मुक्त करण्यासाठी दयाघन निर्माणकर्त्याने पाठविलेल्या मुसलमानांनी प्रत्यक्षात काय केले ? जिझिया कर लावला.' असे सांगून पुढे पानभर त्यांनी या कराचा सगळा तपशील दिला आहे. म. फुल्यांना कुठूनतरी शिवीगाळ करायचीच असे ठरवून मग त्यात विनाकारण फुल्यांना ओढून आणले आहे. 'जिझिया कराचे ओझे सहन न झाल्यामुळे काही गरीब हिंदूंनी नाईलाजाने इस्लाम धर्म स्वीकारला. औरंगजेबाला परमसंतोष जाहला. म. फुल्यांनासुद्धा ही इतिहासवार्ता ऐकून झाला असेल. महात्मा फुल्यांच्या दुर्दैवाने सगळेच हिंदू (शूद्रातिशूद्र) काही स्वत्त्व विकून जगणारे नव्हते. ते औरंगजेबाच्या जुलमाविरुद्ध बंड करून उठले. ज्यांच्या नावाने जोतीबांनी 'असूड' लिहिलाय त्या जाट शेतकरी तिलपतच्या गोकल्याने २०,००० शेतकऱ्यांचा जमाव जमवला... म. फुल्यांच्या दृष्टीने हे सतनामी अर्थातच अट्टल मूर्ख होते. मुसलमान बनण्याचा प्रशस्त राजमार्ग सोडून ते हिंदू राहण्याच्या आडवाटेने गेले व खड्ड्यात पडले. फुल्यांच्या निर्भिकाने त्यांना योग्य सजा दिली.' (सोबत– ४।१२।८८ पृ. १५)

डॉ. गांगल यांची वरील विधाने अतिशय खोडसाळ आणि सत्याचा अपलाप करणारी आहेत. स्वतःच्या विद्वत्तेचे प्रदर्शन करण्यासाठी त्यांनी जिझिया कराचा दिलेला तपशील आणि पुढील बंडांचा वगैरे इतिहास कुठल्या ग्रंथातून घेतलाय त्याबद्दल त्यांनी कुठलीही संशोधकीय नोंद दिलेली नाही.

डॉ. गांगल यांनी ही सर्व माहिती, ऋणनिर्देश न करता, सर जदुनाथ सरकार यांच्या 'औरंगजेबाचा इतिहास' या ग्रंथातून उचलली आहे. स्वतःला हवी तशी ती विपर्यस्त करून वापरून अकारण म. फुल्यांवर आगपाखड केली आहे.

'मुसलमानी राज्यामध्ये राहण्यासाठी परवानगी मिळावी म्हणन बिगर मुसलमान अथवा अश्रद्धाळूंना जिजिया नावाचा कर देणे भाग असे. जिजिया म्हणजे (सबस्टिटचूट मनी अथवा प्राईस ऑफ इन्डल्जन्स) सरकारी अनुग्रह मिळावा म्हणून द्यावी लागणारी किंमत. हा कर पहिल्या प्रथम लादला तो महंमद पैगंबराने. त्याने आपल्या अनुयायांना अशी आज्ञा केली की 'खऱ्या धर्माचे जे पालन करीत नाहीत त्यांच्याबरोबर त्या क्षणापर्यंत लढा द्या की ज्या क्षणापर्यंत दाती तृण धरून ते जिजिया कर देण्यास तयार होत नाहीत.' (कुराण ९.२९)... भिक्षुक जर गरीब असले तर त्यांना हा कर द्यावा लागत नसे. परंतु ते जर श्रीमंत देवस्थानांशी संलग्न असले तर अशा धार्मिक देवस्थानांच्या प्रमुखांना हा कर द्यावा लागत असे. ज्यांचे उत्पन्न २०० दिरहामच्या वर नाही असा गरीबांचा वर्ग–१२ दिरहाम. २०० ते १०,००० दिरहाम एवढी ज्यांच्या मालमत्तेची किंमत असा मध्यमवर्ग–२४ दिरहाम. १०,००० दिरहामच्या वर ज्यांच्या मालमत्तेची किंमत असा श्रीमंतवर्ग–४८ दिरहाम: गरिबांवर पडणारा कराचा बोजा त्यांच्या कुल–उत्पन्नाच्या कमीतकमी ६ टक्के होता, मध्यमवर्गावर पडणारा हा बोजा ६ ते ०.२५ टक्के इतका होता आणि श्रीमंतावर अगदीच कमी म्हणजे जेमतेम दरहजारी २.५ टक्के एवढाच होता.

'शिंपी, रंगारी, मोची आणि जोडे बनविणारे वगैरे कारागिरांची गणना गरीब वर्गात करण्यात यई. ज्या या गरीब थरातील लोकांचे त्यांच्या धंद्यापासून त्यांना मिळणारे उत्पन्न हे त्यांच्या कुटुंबियांच्या पोषणार्थ लागणाऱ्या खर्चापेक्षा अधिक असे त्यावेळी त्यांना जिजिया कर द्यावा लागे. भिकारी आणि दरिद्री हे साहजिकच करमुक्त होते. अकबराने हा कर रद्द केला होता (१५६४). औरंगजेबाने २ एप्रिल १६७९ रोजी साम्राज्याच्या सर्व भागात काफर (अश्रद्धाळू) प्रजेवर जिजियाकर लादण्याची फर्माने काढली.'[१०५] डॉ. गांगल सांगतात त्याप्रमाणे जिजिया करामुळे जर तिलपतच्या गोकल्याचे आणि सतनामींची बंडे झाली असतील तर मग ती २ एप्रिल १६७९ नंतर व्हायला हवी होती. प्रत्यक्षात ह्या बंडांचा इतिहास पाहता असे दिसते की ही बंडे १६७९ आधी झालेली आहेत आणि सरळच त्यांची कारणे वेगळी आहेत. औरंगजेबाची राजवट आणि उपरोक्त जिजिया कर यांचे समर्थन करण्याचे काहीच कारण नाही, किंबहुना हा कर निश्चित निषेधार्ह होता; मात्र वडाची साल पिंपळाला लावण्याचा डॉ. गांगल यांचा हा प्रयत्न हास्यास्पद ठरतो यात शंका नाही.

१. गोकल्याचा उठाव

सर जदुनाथ सरकार लिहितात– '१० एप्रिल १६६५ रोजी औरंगजेबाने मुस्लीमांनी २.५ टक्के तर हिंदूंनी ५ टक्के विक्रीवर द्यावा असा हुकूम जारी केला. ९ मे १६६७ रोजी त्याने मुस्लीमांवरील विक्रीकर रद्द केला. १६६८ मध्ये

त्याने सर्व साम्राज्यभर जत्रा, मेळे यांवर बंदीहुकूम बजावला. दिवाळी, होळी आदी उत्सव गावाबाहेर साजरे करण्याचा आदेश काढला. मथुरेच्या अबदून नबीखान हचा फौजदाराने मंदिराच्या जागेवर जामा मशीद बांधली. केशव देवरायाच्या मंदिराचा चबुतरा त्याने सक्तीने हलवला. या सर्व प्रकारांमुळे संतापलेल्या हिंदू जनतेने १६६९ मध्ये मथुरा जिल्हयात बंड केले. तिलपतचा जमीनदार गोकला याच्या नेतृत्वाखाली जाट शेतकऱ्यांनी बंड केले. अबदून नबी या बादशाही अंमलदाराला ठार करून विजयोन्मादाने गोकलाने सदबादचा परगणा लुटून फस्त केला. ('सत्यनिष्ठ' संशोधक डॉ. गांगल ही गोष्ट वाचकांपासून सोयिस्कररीत्या दडवून का ठेवतात?) यामुळे औरंगजेबाने बंडाचा बिमोड करण्यासाठी फौज रवाना केली. या भीषण युद्धात मोगलांकडील चार हजार आणि बंडखोरांकडील पाच हजार माणसे ठार झाली. गोकल्याला ठार करण्यात येऊन त्याच्या कुटुंबियांना इस्लामची दीक्षा देण्यात आली."[१०६]

२. सतनामींचा उठाव – १६७२

'सतनामींच्या बंडाचे कारण निव्वळ प्रापंचिक (टेंपोरल) होते. एका सतनामीला सरकारी शिपायाने मारले म्हणून शेतकऱ्यांनी शिपायालाच ठार केले. अंमलदाराने पलटण पाठवून सतनामींना नामोहरम केले. पुढे याला धार्मिक वळण लागले... विजयी बंडखोरांनी नरनौळ लुटले, मशिदी पाडल्या आणि जिल्हयाचा ताबा घेऊन आपल्या नावे कारभार सुरू केला. १५ मार्च १६७२ रोजी औरंगजेबाने १० हजार फौज धाडून त्यांचा बिमोड केला."[१०७]

३. शिखांचे बंड

'शहाजहान गादीवर आल्यानंतर तो अमृतसरनजीक १६२८ मध्ये एकदा रपेट करीत असताना गुरू गोविंद हा शिकारीचा पाठलाग करीत त्याच प्रदेशात शिरला. त्याच्या शीख अनुयायांचे एका पक्ष्याच्या शिकारीवरून बादशहाच्या सैनिकांशी भांडण झाले. दोन्ही गटांच्या मारामारीत बादशाही सैनिकांना भरपूर मार खावा लागला, त्यातील काहीजण ठारही झाले. यावर बादशहाने फौज पाठवून संग्रण येथे युद्ध केले. त्यात शीख विजयी झाले. त्यानंतर मोठा फौजफाटा पाठवून बादशहाने गुरू गोविंदाला काश्मीरच्या डोंगराकडे पिटाळून लावले. तेथे तो १६४५ मध्ये मरण पावला. त्याचा सर्वांत धाकटा मुलगा तेजबहादूर नंतर गुरूपदी आला. आनंदपूर येथे तो वास्तव्य करीत असताना शीख धर्मावर जे विनाकारण हल्ले होत होते आणि त्यांच्या पवित्र गुरुद्वारांचा जो विध्वंस करण्यात येत होता व हिंदूंवर धर्मांतराची सक्ती करण्यात येत होती त्यामुळे बंडावा पुकारला गेला. बादशहाच्या फौजेने बंडाचा बिमोड करून १६७६ मध्ये त्याचा शिरच्छेद केला. आता मात्र शीख आणि मुसलमान यांमध्ये उघडउघड युद्धाचा वणवा पेटला. त्याचा पुत्र गुरू गोविंद-

राय याने उघडउघड इस्लामबरोबर शत्रुत्वाचे धोरण स्वीकारले. त्याचा काटा काढण्याकरिता आलेल्या फौजांचा त्याने वारंवार बिमोड केला. मात्र आनंदपूरच्या हल्ल्यात त्याला किल्ला सोडून नांदेडला (महाराष्ट्रात) १७०७ मध्ये आश्रयाला यावे लागले.'[१०८]

डॉ. गांगल आणि म. फुल्यांची विश्वासार्हता

डॉ. गांगल यांनी ३.१.८९ च्या Times of India मध्ये मुलाखत देऊन म. फुल्यांवर काही नवीन आरोप केले आहेत. डॉ. गांगल प्राथमिक गोष्टीसुद्धा किती चुकीच्या लिहितात याचा नमुना या मुलाखतीत आढळतो. 'महात्मा फुले गौरव ग्रंथ हा गौरवग्रंथ १९६९ मध्ये प्रसिद्ध झाला असून धनंजय कीर व स. गं. मालशे हे त्याचे संपादक आहेत.' अशी माहिती देऊन पुढे आणखी एकदा त्यांनी 'या गौरव-ग्रंथाचे सहकारी संपादक म्हणून स. गं. मालशे' यांचे नाव नमूद केले आहे.

वस्तुस्थिती अशी आहे की 'महात्मा फुले गौरवग्रंथ' जुलै १९८२ मध्ये प्रसिद्ध झाला असून त्याच्या संपादनाशी धनंजय कीर व स. गं. मालशे यांचा काहीही संबंध नाही. आमदार पी. बी. साळुंखे एम. जी. माळी, आमदार ग. प्र. प्रधान, आमदार एन. डी. पाटील, बॅ. पी. जी. पाटील हे त्याचे संपादक आहेत.

'S G. Malshe, co–editor of the Mahatma Phule Felicitation Volume, has raised doubts about the authenticity of literature attributed to the reformer. Malshe, in his book 'Taartamya,' had pointed out the absurdity of a reference to Darwin's theory of evolution in an 1834 article ostensibly by Mahatma Phule, entitled Nirmika Shodh', while the theory itself was put before the scientific community only in 1859.'

डॉ. गांगल यांना या माहितीद्वारे नेमके काय सूचित करायचे आहे हे पाहण्यासाठी त्यांचा पुढील मुद्दा लक्षात घ्यायला हवा.

According to Dr. Gangal– In his 'Shetekariacha Asud', Mahatma Phule has made the 'ridiculous observatifon thatour learned persons got disgusted with Brahmin cunningness and started Buddhism.' In the same work, he says, Mahatma Phule talks about electrical illumination at Brahmin marriages in Maharashtra, whereas the incandescent lamp and bulb were invented only in 1878 overseas.

विजेची रोषणाई

डॉ. गांगलांनी साप्ताहिक सोबत व्यतिरिक्त नव्याने म. फुल्यांवर केलेले

हे आरोप आहेत. या आरोपांमागे म. फुल्यांच्या विश्वासार्हतेवर बोट ठेवण्याचा डॉ. गांगल यांचा हेतू असावा असे वाटते. 'बल्ब आणि ट्यूबचा शोध परदेशात १८७८ साली लागला, म. फुले मात्र त्यांच्या 'शेतकऱ्याचा आसूड' या ग्रंथातच या बल्ब व ट्यूबच्या जादा वापरावर ब्राह्मणांच्या लग्नात खर्च होतो अशी तक्रार करतात' यांसारख्या विधानांतून डॉ. गांगलांनी पुढील गोष्टी सूचित केल्या आहेत.

१) म. फुल्यांनी दिलेली माहिती चुकीची आहे किंवा त्यांच्या नावावर मागाहून कुणीतरी हे शब्द घुसडले असावेत. कारण १८७८ साली परदेशात ज्याचा प्रथम शोध लागला, त्याचा उल्लेख 'शेतकऱ्याचा असूड' मध्ये फुले कसा काय करू शकतात?

२) 'शेतकऱ्याचा असूड' हा ग्रंथ बल्ब–ट्यूबचा शोध लागण्यापूर्वी लिहिला गेला असावा असा आभास 'whereas' हा शब्द वापरून त्यांनी तयार केला आहे. 'शेतकऱ्याचा असूड'चा प्रसिद्धीकाळ न सांगण्यामागे डॉ. गांगलांना तो या शोधाआधी प्रसिद्ध झाला असावा असे भासवायचे आहे.

प्रत्यक्षात 'शेतकऱ्याचा असूड' हा ग्रंथ म. फुल्यांनी लिहून पूर्ण केला तो १८ जुलै १८८३ रोजी. त्यांनी तो हस्तलिखित स्वरूपातच गव्हर्नर जनरल यांना अभिप्रायार्थ पाठविला. त्याची सूक्ष्मपट–फीत (Micro–Film) मिळवून तो डॉ. स. गं. मालशे–धनंजय कीर यांनी १९६७ साली प्रकाशित केला.[१०९]

'शेतकऱ्याचा असूड'चा नावीन्यपूर्ण भाग म्हणजे शेतकऱ्याच्या अवनत स्थितीचे वास्तव चित्रण, त्या अवनत स्थितीची केलेली मूलग्राही चर्चा आणि ती स्थिती सुधारण्यास्तव सुचविलेली उपाययोजना हा होय. शेतकऱ्याच्या वास्तव स्थितीचे चित्र रेखाटताना फुले यांनी त्यांच्या हीनदीन गृहस्थितीचे जे वेधक वर्णन केलेले आहे, ते एखाद्या ग्रामीण वास्तववादी कादंबरीला लाजवील इतके प्रत्ययकारी आहे. ते वाचकांनी मुळातूनच वाचले पाहिजे. शेतकरी हा अडाणी आणि अंधःश्रद्ध असल्याने जन्मापासून तो अंत्येष्टीपर्यंत पुरोहितवर्ग त्याची नाडणूक करीत असतो. शास्त्राने केलेल्या अटक-बंदीमुळे, परदेशात शेतकरी वर्गाची कशी प्रगती झालेली आहे, याची त्याला गंधवार्ताही नसते. इंग्रज सरकारचे व्यापारविषयक धोरण स्वार्थी आहे. ते यंत्राद्वारे इंग्लंडांत निर्माण होणाऱ्या मालाला उत्तेजन देते. त्यामुळे भारतातील छोटेमोठे उद्योगधंदे पार बसत चालले आहेत. शेतजमिनींचे अधिकाधिक तुकडे पडत चालले आहेत, उत्तरोत्तर जमिनीचा कसही घटत चालला आहे. सरकारने त्यातच शेतकरीवर्गाच्या डोक्यावर जबर कराची ओझी लादली आहेत. शेतकरी कर्जबाजारी होऊन व्याजबट्टा करणाऱ्या सावकारांचे फावले आहे. सर्वतोपरी गांजणूक होत असलेल्या शेतकऱ्याच्या या परिस्थितीत सुधारणा घडवून आणण्यासाठी फुल्यांनी सरकारला ज्या बारकाव्याच्या सूचना केलेल्या आहेत, त्यावरून त्यांचा द्रष्टेपणा दिसून येतो... या पुस्तकात भारतीय शेतकऱ्याचे गाऱ्हाणे एवढ्या सर्वंकषपणे प्रथमच वेशीवर टांगणाऱ्या म. फुल्यांना **'कृषिक्रांतीचा अग्रदूत'**

ही बिरुदावली खचितच शोभून दिसेल'[११०]

या ग्रंथाचे ४ थे प्रकरण 'शेतकऱ्यांसहित शेतकीची हल्लीची स्थिती' या विषयावर आहे. या प्रकरणात शेतकऱ्याच्या कंगाल व दीनवाण्या स्थितीचे अतिशय बारीक-सारीक तपशीलांनिशी चित्रांकन केले आहे. त्याच्या दरिद्री जीवनात लग्नाचा प्रसंगसुद्धा किती केविलवाण्या स्थितीत साजरा करावा लागतो याचे वर्णन करून त्याच्याबद्दल गैरसमजापोटी जे आक्षेप घेतले जातात त्यांचा समाचार घेतला आहे. म. फुले म्हणतात, 'येथील एकंदर सर्व गैरमाहित शहाणे ब्राह्मणातील विद्वान, आपल्या सभांनी लटक्या-मुटक्या कंडया उठवून कारभारींस सुचवितात की, शेतकरी आपले मुलाबाळांचे लग्नात निरर्थक पैसा खर्च करितात, यामुळे ते कर्जबाजारी झाले आहेत. अहाहा! हे सार्वजनिक पोकळ नावाच्या समाजात, एकतरी मांगमहार शेतकऱ्यास त्या समाजाचा सभासद करून त्यास आपल्या शेजारी कधीतरी घेऊन बसले होते काय? अथवा यांच्यातील गावोगाव वेदावर पांडित्य करणाऱ्या गृहस्थांपैकी एखाद्या स्वामीने तरी उघड जातीभेदाच्या उरावर पाय देऊन शूद्राच्या पंक्तीत बसून तेथील एखादा बरवटाचा फुरका मारून शेतकरी खर्चीक म्हणून म्हणावयाचे होते... हे कधीतरी शेतकीची कामे स्वत: हातांनी करितात काय? त्यांना शेतकीचा इंगा माहित आहे काय'?[१११] असा प्रश्न उपस्थित करून म. फुल्यांनी भटभिक्षुकांवरची लग्ने मात्र कशी थाटामाटात पार पडतात याचे पल्लेदार वाक्यांद्वारे वर्णन केले आहे. ते म्हणतात '...या कुभांड्यासारखे शेतकरी आपल्या मुलाबाळांच्या लग्नमंडपात **बिजेची रोषणाई** करून, आपल्या जातबांधवांस मोठमोठाल्या रकमांची उधळपट्टी करून, तूपपोळ्या व लाडू-जिलब्यांची प्रयोजने घालून, फक्त भटब्राह्मणांच्या सभा भरवून, त्यांस शेकडो रुपये दक्षिणा वाटून आपल्या घराण्यांतील गरती सुनाबाळांची परवा न करता त्यांच्यासमोर निर्लज्ज होऊन, गावातील वेसवा-कसबिणींच्या नाचबैठकांत बसून त्यांची वेडीविद्री गाणी ऐकल्यानंतर त्यांस मन मानेल तशा बिदाग्या देत नाहीत.'[११२]

या वाक्यातील 'बिजेची रोषणाई' या शब्दांचा संबंध 'बल्ब आणि ट्यूब' बरोबर जोडून डॉ. गांगलांनी म. फुल्यांच्यावर आक्षेप घेतला आहे.

शब्दकोश

१) महात्मा फुल्यांनी 'बल्ब अगर ट्यूब' असे शब्द याठिकाणी वापरलेलेले नाहीत.

२) 'बिजेची रोषणाई' म्हणजे नेमके काय हे समजून घ्यायचे तर त्या काळातील (इ. स. १८७३) परिस्थिती समजून घेणे गरजेचे आहे. मराठीमध्ये Light आणि Electricity या दोन्ही संज्ञांना आपण 'वीज' हा एकच पर्यायी शब्द वापरतो. 'वीज' शब्दाबद्दल क्र. पां. कुलकर्णींच्या व्युत्पत्तिकोशात पुढील माहिती दिली आहे. 'वीज. स्त्री. विद्युत, विद्युल्लता. Lightening (सं. विद्युत; प्रा. विज्जु

(पुं.) विज्जुआ, पं. बिज्ज; सि. विजु; गु. वीज, अकाम, विजू, विजूका, विज्जु, विजु, बिजली (> विद्युल्लता)''[११३]

मराठी शब्दकोशात 'वीज–स्त्री' १ घर्षणाने उत्पन्न होणारी एक निसर्ग-शक्ती, विद्युत, सौदामिनी, बिजली, 'जैसी वीजूची दाटी।,' (कवी चोंभाकृत 'उषा-हरण', प्रका. भा. इ. सं. मं. अहवाल शके १८३३)''[११४] अशी नोंद आहे. म्हणजे हा शब्द इ. स. १३७८ सालापासून मराठीत प्रचलित आहे. दुसरीकडे 'रोशणाई' शब्दाचा अर्थ 'रोशणाई-स्त्री. १. (दिव्यांचा) लखलखाट, चकचकाट २. असंख्य दिवे लावून सण करणे, दीपोत्सव, दिवाळी, २. (ल) आनंद, उत्साह, रमणीयता, शोभा (एखाद्या स्थळाची, प्रसंगाची) ३. आरास, शोभिवंत करणे, शृंगारणे,''[११५] असा आढळतो. हिंदी शब्दकोशात पुढील अर्थ आढळतो 'रोशनाई–संज्ञा. स्त्री. (फारशी) १. अक्षर लिखनेकी स्याही, काली, मसि, स्याही, २. प्रकाश, रोशनी, उजाला,''[११६] इंग्रजी शब्दकोशात 'Light – n (लाइट्) That by which we see, a lamp, that which gives light, day, प्रकाश, दिवा, उजेड, दिवस,''[११७] असे अर्थ दिले आहेत. या सर्व गोष्टींचा एकत्रित विचार केला आणि महात्मा फुल्यांच्याच लेखनातील अंतर्गत पुराव्याचा अभ्यास केला तर म. फुल्यांना इलेक्ट्रिसिटी या अर्थाने नव्हे तर 'लाईट' या अर्थाने 'वीज' हा शब्द अभिप्रेत असल्याचे दिसते. म. फुले समग्र वाङ्मयात पृ. १६० वर जमाखर्चाच्या नोंदीमध्ये एक नोंद पुढीलप्रमाणे आढळते– 'रुपये पांच आणे पंधरा पैसे तीन रोषणाईकरतां खोबरेल आणि गोडेतेल.''[११८] म्हणून म. फुल्यांना 'पेट्रोमॅक्सच्या बत्त्यांचा' निर्देश करायचा असावा असे म्हणता येते.

निर्मिकाचा शोध

डॉ. गांगल यांनी पुढे 'निर्मिकाचा शोध' या १८३४ च्या ग्रंथाचा निर्देश करून म. फुल्यांना वेठीला धरले आहे. १८५९ चा शोध १८३४ च्या ग्रंथात कसा काय असू शकतो, असा त्यांचा प्रश्न आहे. म. फुल्यांचा जन्म १८२७ सालचा; तेव्हा वयाच्या सातव्या वर्षी (शाळेत जाण्याआधीच) म. फुल्यांनी हा ग्रंथ लिहिला अशी नोंद जर डॉ. गांगलांना अभिप्रेत असेल तर हा एक विक्रमच मानावा लागेल. परंतु बहुधा हा मुद्रणदोष असावा. कारण त्यांनी उद्धृत केलेल्या 'तारतम्य' या ग्रंथात ही मूळ कालनोंद '१८५४' अशी आहे. डॉ. मालशे यांनी 'तारतम्य' मध्ये 'साहित्यातील तोतयेगिरी अर्थात डॉ. माळीकृत सवित्रीबाई फुले यांचे चरित्र' हा लेख लिहिला आहे.''[११९] त्या लेखात त्यांनी 'निर्मिकाचा शोध' हा ग्रंथ महात्मा फुल्यांचा का नसावा ते सप्रमाण दाखवून दिले आहे.

'सदर निवेदनात एक चकित करून सोडणारी बाब आहे. त्यात माकडापासून माणूस झाला, हा उत्क्रांतिवादाचा सिद्धांत डार्विनच्या नावासह येतो! गंमत अशी की, हा साहेबाचा सिद्धांत १८५९ पर्यंत प्रकाशातच आलेला नव्हता!''[१२०] 'पुरोगामी सत्यशोधक' त्रैमासिकाच्या एप्रिल–जून १९७९ च्या अंकातून प्रा. डॉ.

सीताराम रायकर यांनी महात्मा फुल्यांचे 'तृतीयरत्न' हे अप्रकाशित नाटक प्रथमच प्रकाशात आणले आहे. प्रस्तावनेच्या तळटीपेत पृ. ९ वर ते लिहितात, 'पुणे येथून प्रसिद्ध होणाऱ्या 'गावगाडा' या मासिकाच्या नोव्हेंबर १९६९ च्या अंकात महाधट शास्त्री यांनी १८९१ साली फुल्यांचे लिहिलेले 'अमर जीवन' हे छोटे चरित्र आणि म. फुले यांनी लिहिलेले 'निर्मिकाचा शोध' हे छोटेसे पद्यात्मक पुस्तक एकत्रित छापले आहे. महाधट शास्त्री यांच्या फुले चरित्रात 'निर्मिकाचा शोध' १८५५ साली लिहिले असा उल्लेख आहे. 'निर्मिकाचा शोध'च्या पहिल्या पानावर साल १८५४ छापले आहे, तर आत फुल्यांचा प्रास्ताविकाखालची तारीख १।१।५५ अशी आहे. तसेच या प्रास्ताविकात म. फुल्यांनी डार्विनच्या उत्क्रांतिवादाचा – डार्विनचे नाव घेऊन– उल्लेख केला आहे. १८५४–५५ च्या सुमारास हा उल्लेख येणे अशक्य वाटते. यामुळे 'निर्मिकाचा शोध'ची मुद्रित प्रत उपलब्ध झाल्याशिवाय याबद्दल अधिक निश्चितपणे लिहिणे शक्य नाही.'[१३१]

म्हणजेच जो ग्रंथ म. फुल्यांच्या नावावर निर्विवादपणे सिद्ध झालेला नाही, ज्याचा समावेश अधिकृत 'म. फुले समग्र वाङमय' या ग्रंथात झालेला नाही अशा ग्रंथावरून म. फुल्यांना वेठीला धरून डॉ. गांगल म. फुल्यांच्या विश्वासार्हतेबद्दल शंका उपस्थित करू पाहतात, हा त्यांचा प्रयत्न अनुचित म्हटला पहिजे.

दुसरीकडे म. फुल्यांनी डार्विनच्या सिद्धांताचा उल्लेख त्यांच्या 'शेतकऱ्याचा असूड' या ग्रंथात केलेला आढळतो.[१३२] म. फुल्यांनी बुद्धधर्माच्या स्थापनेबद्दल हास्यास्पद माहिती दिली आहे असा डॉ. गांगलांचा दावा आहे. म. फुले म्हणतात, 'पुढे काही काळाने चार निःपक्षपाती पवित्र विद्वानांस ब्रह्मकपटाविषयी बरे न वाटून त्यांनी बौद्ध धर्माची स्थापना करून, आर्य ब्राह्मणांच्या कृत्रिमी धर्माचा बोजवारा करून या गांजलेल्या अज्ञानी शूद्र शेतकऱ्यांस आर्यभटांचे पाशातून मुक्त करण्याचा झपाटा चालविला होता.'[१३३] या विधानात हास्यापद असे काय आहे?. महात्मा गौतम बुद्धांना 'अवतार' वगैरे न मानता एक महापुरुष मानून त्यांनी आपल्या सहकाऱ्यांशी चर्चा करून बौद्धधर्म स्थापन केला असे म्हटल्यामुळे काय बिघडते? नाव जरी प्रवक्त्याचे होत असले तरी कोणत्याही महान कार्यात चारचौघांचा वाटा असतो ही सरळ भूमिका व्यक्त करण्यात फुल्यांचे काय चुकले?

डॉ. गांगल यांची सभ्यता (?)

डॉ. गांगल यांनी आपल्या सुसंस्कृतपणाचा, विद्वत्तेचा आणि सभ्यतेचा स्वतःनि निर्देश केलेला आहे म्हणून त्यांना एक प्रश्न विचारावा असे वाटते. त्यांनी दवंगत विचारवंत आणि समीक्षक प्रा. गं. बा. सरदार यांच्याबद्दल खालील विधान केले आहे–

'... गं. बा. सरदार, काय, वयाची ऐंशी वर्षे उलटली, आतापर्यंत समाजवादी, पुरोगामी वगैरे वगैरे आपली प्रतिमा उज्ज्वल करून दाखविण्यासाठी खूप

बोटचेपेपणा केलात. तदनुषंगाने मिळणारे प्रसिद्धीदी सर्व फायदे उपटलेत. आता तरी खरं बोला. आपल्या इतिहासाचं तुमच्यासारख्या मंडळींनी जे विकृतीकरण करून ठेवले आहे त्याच्या साफसफाईला तुम्हीच लागा. कुणी मिखाइल गोर्बाचेव येथे जन्माला येईल ह्याची वाट पहायला आम्हाला लावू नका.' (सोबत–४।१२।८८ पृ. १४)

प्रा. गं. बा. सरदार यांचे १ डिसेंबर १९८८ रोजी निधन झाले. 'मरणान्तानि वैराणि...' या विचाराचा झेंडा घेऊन मिरवणाऱ्या डॉ. गांगलांनी त्यांच्या निधनानंतर असे लिहावे याचा खरं तर संताप येतो. हीच गांगल यांची सभ्यता काय? मुळात हा आरोप खोटा, त्यात तो गं. बा. सरदार यांचे निधन झाल्यानंतर ह्यांनी करावा, ह्यातून डॉ. गांगल ह्यांची एकूणच सभ्यता उघडी पडते असे म्हटल्यास वावगे होईल काय?

अर्थ चुकीचा लावतात

डॉ. गांगल एक अवतरण देऊन त्याचा लगेच अर्थ देताना जेव्हा तो सरळच चुकीचा लावतात तेव्हा त्यांच्या या शाखेतील कौशल्याची झळाळी उठून दिसते.

'भारतीय विषम व ब्राह्मणप्रधान समाजरचनेस बाहेरून आलेले ऋग्वेदिक आर्य मूलतःच कारण होत या विधानाला आता विशेष पुष्टी मिळत आहे,' हे तर्कतीर्थांचे अवतरण उद्धृत करून डॉ. गांगल पुढे म्हणतात, 'विशेष पुष्टी मिळत नाही, ही गुळगुळीत थापडी कशाला? सरळ सांगा की मुळीच पुष्टी मिळत नाही. ... आर्य इराणातून आले ह्या विधानाला तर्कतीर्थांची मऊमऊ भाषा वापरायची तर आता विशेष पुष्टी मिळत नाही आणि स्पष्ट सांगायचं तर काडीमात्र पुष्टी मिळत नाही.' (सोबत–११।१२।८८ पृ. १२)

'विषम समाजरचनेला आर्य मूलतःच जबाबदार आहेत असे दिसत नाही' असे तर्कतीर्थ सांगतात, तर डॉ. गांगल त्याचा अर्थ 'आर्य इराणातून आलेच नाहीत असे तर्कतीर्थ म्हणतात' असा सोयिस्कर परंतु चुकीचा लावून घेतात.

एवढेच नाही तर तर्कतीर्थांनी जे म्हटले आहे त्यातला अर्थनिर्णायक भाग वगळून ते अवतरण बदलून उद्धृत करण्याचे 'हस्तकौशल्य' व्यक्त करण्यातही डॉ. गांगल पटाईत आहेत.

तर्कतीर्थांनी म. फुले समग्र वाङमयाच्या प्रस्तावनेत म्हटले आहे– 'अलिकडे गेल्या शंभर वर्षांत प्राचीन भारतीय इतिहासाचे जे मौलिक संशोधन झाले आहे त्या संशोधनाने पूर्वीच्या संशोधकांचे बरेचसे निर्णय काही बाबतीत चुकीचे ठरले आहेत व काही बाबतीत अंशतः काल्पनिक ठरले आहेत. मत्स्यावतारापासून परशुराम अवतारापर्यंतच्या अवतारांचा जोतीरावांनी केलेला ऐतिहासिक अर्थ, वामन व परशुराम वगळल्यास, केवळ काल्पनिक आहे असे मानावे लागते.'[१३५]

या विधानांचा डॉ. गांगलकृत बदललेला अर्थ पुढीलप्रमाणे– 'लक्ष्मणशास्त्री लिहून गेले आहेत, 'अवतारांचा जोतीरावांनी केलेला अर्थ केवळ काल्पनिक आहे.' लक्ष्मणशास्त्रींना खरं तर म्हणायचंय की जोतीरावांनी केलेला अर्थ शुद्ध अडाणीपणाचा आहे. कोठल्याही गोष्टीचा अर्थ लावण्यासाठी आवश्यक ती उपजत बुद्धीही जोतीबांजवळ नव्हती, आणि अर्जित विद्वत्ताही नव्हती.' (सोबत–११–१२–८८ पृ. १२)

डॉ. गांगलांची विद्वत्ता आणि उपजत प्रतिभाशक्ती मात्र अशाप्रकारे 'हस्तकौशल्य' प्रदर्शित करण्यात वाया जावी ना?

असेच हस्तकौशल्य डॉ. द. न. गोखले यांनीही दाखविले होते. त्यांनी 'विष्णुशास्त्री चिपळूणकर आणि महात्मा ज्योतीबा फुले' या लेखात म्हटले आहे– 'त्यांच्या मते (तर्कतीर्थांच्या) मत्स्यापासून परशुरामापर्यंतच्या अवतारांचा जो अर्थ म. फुल्यांनी दिला आहे तो काल्पनिक आहे.'[१३५] असा 'पराचा कावळा' का केला जातो?

उपरोक्त लेखावर प्रतिक्रिया व्यक्त करताना सोबतचे संपादक श्री. ग. वा. बेहेरे हे लिहितात– 'विष्णुशास्त्र्यांवरचा अन्याय दूर केला।' विष्णुशास्त्री चिपळूणकर यांचेवर गेल्या काही वर्षांत जाणीवपूर्वक जो अन्याय होतो आहे, तो दूर करण्याचे कार्य कोणीतरी करायलाच हवे होते. १९३५ पर्यंत शास्त्रीबुवांना वैचारिक जगात मान्यता होती, आणि त्यानंतर त्यांचे अवमूल्यन करून फुले यांचे श्रेष्ठत्व प्रतिपादन करण्याचा उद्योग चालू झाला... शास्त्रीबुवांचा हेतू जर शुद्ध उदात्त आणि देशहिताचा होता तर त्यासाठी काही लोकांना खर्ची पडावे लागले–याकडे वेगळ्या दृष्टीने पाहिले पाहिजे... स्वातंत्र्याच्या चळवळीचा आद्य प्रणेता म्हणून चिपळूणकरांच्याकडे जर नजर टाकली तर स्वातंत्र्यविरोधी चळवळींना, व्यक्तींना आणि संप्रदायांना कठोर शब्दांत त्यांनी ठोकून काढले तर ते यथायोग्यच झाले असे म्हटले पाहिजे. कारण इंग्रजी राज्य हे वरदान आहे, इंग्रजी राज्य सुस्थिर झाले तरच तळागाळातील लोकांना न्याय मिळेल, शिवछत्रपतींनी स्वराज्य संपादन करून बहुजन समाजाच्या उद्धाराचा मार्ग बिकट केला, अशी विधाने करणाऱ्यांवर स्वातंत्र्यकल्पनेने भारलेल्या तरुणांनी कोणत्या शब्दांत हल्ला करायला पाहिजे? ... राजसत्तेचा आश्रय असणारे फुले आणि लोकहितवादी यांच्या विरुद्ध एकाकी असणाऱ्या तरुणांचे हे भांडण आहे... स्वातंत्र्य गेले ते काही सामाजिक विषमतेमुळे गेले नाही... फुले एकाकी पडले आणि त्यांची स्वप्ने पुरी होण्यासाठी पन्नास पाऊणशे वर्षे जावी लागली. याचे एकमेव कारण फुले हे **परधार्जिणे** आहेत, **इंग्रजांचे आणि मिशनऱ्यांचे हस्तक** आहेत आणि समाजात वेदिली माजवून इंग्रजी राज्य सुस्थिर करणारे आहेत असा फुल्यांच्याबद्दल लोकांचा समज झाला.'[१३६]

'सोबत' मध्ये डॉ. गांगल यांचे लेख प्रसिद्ध केल्याबद्दल ग. वा. बेहेरे यांच्यावर आज टीका करणाऱ्यांच्या नजरेतून त्यांचे १९८२ सालचे हे आक्षेप कसे काय निसटले? या लेखातील श्री. बेहेरे यांची विधाने गंभीर आणि आक्षेपार्ह नाहीत

काय? म. फुल्यांचा शिवाजीमहाराजांना विरोध होता, फुले स्वातंत्र्यविरोधी होते, फुले मिशनऱ्यांचे व ब्रिटिशांचे हस्तक होते, अशा आशयाचे आक्षेप श्री. बेहेरे यांनी या लेखात सूचित केले आहेत, त्यांचा समाचार का घेतला गेला नाही? असेच अक्षम्य दुर्लक्ष 'चिंतामण गणेश ओक' यांच्या 'जोतीबा फुले : कार्य व वाङ्मय यांचे सत्य-स्वरूप दर्शन'– (काळ प्रकाशन, पुणे ३०, १९८४, पृ. आठ + ५५) या पुस्तिकेकडे झाले आहे. या पुस्तिकेतील म. फुल्यांवरील आरोप तर अतिरेकी स्वरूपाचे आहेत. हचा पुस्तिकेचा सडेतोड परामर्श का घेण्यात आला नाही? 'म. फुल्यांचे नाव फक्त 'ब्राह्मणविरोधा' पुरते वापरायचे आणि आपले 'हितसंबंध' सुरक्षित ठेवायचे अशीच फुलेवाद्यांची वर्तणूक आहे' हा आक्षेप घेणारांना काय उत्तर द्यावे?

हचा पुस्तिकेची कठोर चिकित्सा झाली असती तर डॉ. गांगलांना पुनश्च असे लेखन करवले नसते. कारण या पुस्तिकेतूनच सगळा चोरीचा मामला डॉ. गांगलांनी सजवला आहे.

* * *

डॉ. गांगलांचे वाङ्मयचौर्य

विद्वानांकडून हे अपेक्षित नाही

डॉ. बाळ गांगल हे डबल पी. एच. डी. असलेले विद्वान प्राध्यापक आहेत. त्यांनी वाङ्मयचौर्य करून म. फुलेंविषयक लेखन केले आहे असे म्हणण्यापूर्वी मी पुन्हापुन्हा खात्री करून घेतली. अनेक पुरावे असे मिळाले की ज्यामुळे त्यांनी वाङ्मयचौर्य केले नसावे ही सदिच्छा आपोआपच बाद ठरली. 'कॉपी' पकडण्याची एक सोपी पद्धत असते. जेव्हा शेजारच्या बाकांवरील दोन विद्यार्थ्यांचे एक उत्तर सारख्याच पद्धतीने चुकीचे आढळते, दोघांनीही एकच चूक अगदी अक्षरशः सारखीच केलेली असते, तेव्हा ती कॉपी मानता येते. मला श्री. चिंतामण गणेश ओक आणि डॉ. बाळ गांगल यांच्या लेखनातल्या सर्व चुका एकच आढळल्या, एवढेच नाही तर अक्षरशः एकरूप आढळल्या. श्री. ओकांची पुस्तिका १९८४ साली प्रसिद्ध झालेली आहे. म्हणजे वाङ्मयचौर्य केले आहे ते डॉ. गांगलांनी! त्यांनी एवढ्या सगळ्या गोष्टी ओकांच्या पुस्तिकेतून उचलल्या तर निदान उल्लेख तरी करायचा! परंतु ऋणनिर्देश केला तर आपली विद्वत्ता कमी दर्जाची मानली जाईल असे वाटत असल्यामुळे की काय कोण जाणे, परंतु डॉ. गांगल ऋणनिर्देश सरसकट टाळतात. उदा.जिझिया कराची सर्व माहिती त्यांनी शब्दशः जदुनाथ सरकारांच्या 'औरंगजेबाचा इतिहास' या ग्रंथातून घेतली, परंतु ऋणनिर्देश नाही केला.

श्री. ओक यांच्या पुस्तिकेला हिंदुमहासभेचे प्रसिद्ध नेते मामाराव दाते यांची प्रस्तावना आहे. लेखक श्री. ओक आणि प्रस्तावनाकार श्री. दाते यांची माहिती परस्परविसंगत आहे याचे एक छोटेसे उदाहरण पुरेसे ठरावे– 'जोतिबा फुले व बाबाजी मनाजी डेंगळे हे फक्त सामान्य सभासद होते–[१७] अशी माहिती श्री. दाते देतात; तर हीच गोष्ट सांगताना लेखक श्री. ओक लिहितात– 'म्हणजे शाळा ब्राह्मणांच्या घरात, दरमहा पैशाची मदत करणारे ब्राह्मण, सरकारात शाळा रजिस्टर करण्यांत ब्राह्मण बहुसंख्य–जोतीराव फक्त **सेक्रेटरी**, अशी स्थिती अस-

ताना त्यांचे शिव्या देणे चालूच !''[१२८]

डॉ. गांगल तर म. फुल्यांना 'विद्यावैरी' आणि 'ज्ञानशत्रू' मानतात, त्यामुळे त्यांचा याबाबतीत काही मतभेदच नाही.

श्री. दाते यांच्या मते 'जोतीबांनी शाळेत फक्त दहा महिने व त्यांच्या पत्नीने नऊ महिने काम केले... जोतीबांच्या स्त्रीशिक्षणाच्या कामगिरीचा इतिहास काय तो एवढाच आहे'[१२९] म्हणजे हंटर कमिशनपुढे साक्ष देताना म. फुल्यांनी 'मी आणि माझी पत्नी अशा उभयतांनी कित्येक वर्षेपर्यंत त्या शाळेत काम केले'[१३०] अशी खोटीच साक्ष दिली होती म्हणायचे तर! म. फुल्यांच्या हातचा हा अस्सल पुरावा बाद ठरविण्यासाठी श्री. दाते यांना मात्र अस्सल तर सोडाच, परंतु कुठल्याही ४ थ्या, ५ व्या दर्जाच्या साधनाचाही पुरावा देता येत नाही हा भाग वेगळा!

श्री. दाते 'जोतीबांच्या ब्राह्मणद्वेषाचे मूळ या चिथावणीत आहे. जोतीबांनी ब्राह्मण समाजाविरुद्ध त्या काळात जो वेडाविद्रा, अश्लील व हीन मनोवृत्ती व्यक्त करणारा प्रचार केला त्याचा परिणाम ब्राह्मणेतर समाजावर खोलवर झाला.... ब्राह्मणद्वेषाचे बीज मात्र रुजले, अंकुरले व फोफावले... जोतीबांचे महात्मेपण कशात आहे हे यावरून दिसून येईल'[१३१] असे म्हणतात.

डॉ. गांगलांचे महात्मा फुल्यांवरील हे आक्षेप अशाच शब्दांत व्यक्त झाले आहेत.

प्रस्तावनेचा शेवट करताना श्री. दाते म्हणतात– 'श्री. ओक यांनी पुष्कळच परिश्रम घेऊन जोतीबांचा ब्राह्मणविरोधी दृष्टिकोन स्पष्ट केला आहे. ब्राह्मण समाजाने व इतर हिंदु लोकांनीही जोतीबांचे कशासाठी कौतुक करावयाचे याचा विचार करण्याची आवश्यकता आहे. हिंदु समाजाचे विघटन करण्यास निघालेल्या माणसाचे कौतुक करणे हे समाजसुधारकांचे उद्दिष्ट आहे काय? जोतीबांचा प्रचार ख्रिस्ती मिशनऱ्यांच्या उद्दिष्टपूर्तीसाठी होता, तो हिंदु समाजाच्या धारणेस बाधकच ठरला''[१३२]

डॉ. बाळ गांगल यांचा महात्मा फुल्यांवरचा मुख्य आरोप 'ते ब्राह्मणद्वेष्टे होते' हाच आहे.

वाङ्मयचौर्य – काही पुरावे

१) 'इराणातून पहिली टोळी लहान लहान मचव्यांतून आली. ते माशासारखे चालत म्हणून टोपणनाव मत्स्य पडले. (गुलामगिरी पृ. ९८)' (सोबत ११–१२–८८ पृ. १२) हे अवतरण डॉ. गांगलांनी कसे विकृत केले आहे ते यापूर्वी दाखवून दिले आहेच. ग्रंथनाम, पृष्ठक्रमांक आदी नोंदीही कशा चूक आहेत तेही स्पष्ट केले आहे. तर हचा चुका आणि अवतरणातील बदल कसे झाले?

याचे कारण श्री. ओक यांच्या पुस्तिकेत पृ. ९ वर आढळते. त्यांनीही हे अवतरण याच पद्धतीने विकृत केले आहे आणि त्यांनीही याच चुका केल्या आहेत. ही **'कॉपी'** असल्याने डॉ. गांगलांच्या हातूनही [illegible]ळत त्याच चुका घडून गेल्या.

२) 'इतक्यात इराणातून दुसरी टोळी .... टोपणनाव कच्छ पडले' या अवतरणाचे विकृतीकरण डॉ. गांगलांनी कसे केले आहे ते यापूर्वी स्पष्ट केले आहेच. तर हे अवतरण असे का झाले? उत्तर पुन्हा तेच. श्री. ओक यांच्या पुस्तिकेत ते तसे दिले आहे! (ओक, पृ. ९)

एकूण काय, मूळ अवतरणांचे विकृतीकरण करण्याचे 'कौशल्य' ओकांचे, आणि डबल पी. एच. डी. वाल्या डॉ. गांगलांचे 'कौशल्य' ते ऋणनिर्देश न करता ओकांच्या पुस्तिकेतून उचलण्याचे!

मैना– खोटेपणाचा कळस !

३) 'नानासाहेबांच्या ८–१० वर्षांच्या मुलीला जिवंत जाळले, पण त्याचा आमच्या कुसुमकोमल हृदयाच्या जोतीरावांवर काहीही परिणाम झाला नाही. कारण एकतर ती ब्राह्मण, आणि दुसरे म्हणजे मातेसमान पूज्य असलेल्या राणी-सरकारांशी लढणाऱ्या त्या पापी नानासाहेबाची ती मुलगी![१३३] (ओक–पृ. २०)

डॉ. गांगल लिहितात– 'नानासाहेब पेशव्याने इंग्रजांची कत्तल केली म्हणून हा स्वजनद्रोही महात्मा ढळढळा रडतो, पण त्याच नानासाहेब पेशव्याच्या आठ-दहा वर्षांच्या मुलीला–मैनेला–इंग्रजांनी जिवंत जाळली, तिच्याबद्दल हचा विघ्न-संतोषी महात्म्याच्या बेलगाम लेखणीतून एक करुणेचा नव्हे, सहानुभूतीचा नव्हे, साधा माणुसकीचा शब्द निघालेला नाही.' (सोबत ४–१२–८८ पृ. १४)

या दोघांनीही खोटेपणाचा कळस करणारी ही कहाणी कुठून मिळविली कोण जाणे ! पुरावा दोघांनीही दिलेला नाही.

नानासाहेब पेशव्यांचे अधिकृत चरित्रकार श्री. आनंदस्वरूप मिश्रा सांगतात की नानासाहेबाला मैना नावाची कुणी मुलगीच नव्हती.[१३४] आता बोला!

४) 'इतके अश्लील लिहू शकेल असा महात्मा या जगात हा एकटाच' [१३५] (ओक पृ. ८) 'मराठीत इतके गलिच्छ लिखाण दुसऱ्या कोणी केले नसेल.' (सोबत ११–१२–८८ पृ. १३)

५) 'फूट पाडा, सुखाने राज्य करा...त्यांनी जोतीरावांना छू छू करून ब्राह्मणां-वर भुंकायला लावले'[१३६] (ओक पृ. १५)

'ब्रिटीश फूटपाडयांनी छू केल्यानंतर स्वजनांवर जीव तोडून भुंकत राहणे....' (सोबत–११–१२–८८ पृ. १३)

६) 'मराठी स्त्रियांच्या दोन–चार लाख बांगड्या फुटल्या त्याचे या महा-त्म्यास दुःख नाही, पण भट पेशव्यांची फजिती झाली यात आनंद'[१३७] (ओक. पृ. ३०)

'महाराष्ट्रात दोन लाख बांगडी फुटली ती सगळी ब्राह्मणांच्या घरातील नव्हे. फुल्यांच्या भाषेत म्हणजे दोन लाख शूद्रातिशूद्र मायबहिणी विधवा झाल्या तरी चालतील, दोन ब्राह्मण मेल्याचा आनंदोत्सव मोठा!' (सोबत- ४–१२–८८ पृ. १५)

अशी कितीतरी उदाहरणे देता येतील वाङ्मयचौर्याची. म्हणजे आव संशोधनाचा आणि कृती वाङ्मयचौर्याची !

ओकांचे सामान्यज्ञान

श्री. ओक यांच्या पुस्तिकेत म. फुल्यांवर जे आक्षेप घेतले गेले आहेत त्यांचीच पुनरुक्ती डॉ. गांगलांनी केली आहे. त्यामुळे ओकांना वेगळी उत्तरे द्यायला नकोत. परंतु फरक इतकाच आहे की ओकांचा स्वतः 'विद्वान' असल्याचा निदान दावा तरी नाही. तरीही श्री. ओकांचे सामान्यज्ञान पाहाण्याजोगे आहे.

'इशारा' या म. फुल्यांच्या पुस्तिकेवर टीका करताना म. फुल्यांचे एक अवतरण श्री. ओक उद्धृत करतात–

'या ब्राह्मणांच्या एकातरी कुटुंबातील बायकामुलांस...उपाशीतापाशी शेतीकामे करण्याचा इंगा माहीत आहे काय?...एकाने तरी सोनखताच्या पाटचा टाकल्या आहेत काय?' (पृ.३११–१२) हे अवतरण देऊन झाल्यावर ते पुढे लिहितात– 'जोतीरावांच्या जातीतील किंवा त्यांच्या वरच्या जातीतील कोणीही असली कामे केली आहेत. काय?'[१३८]

म. फुले यांचे आईवडील माळी होते. त्यांच्या पिढ्यान् पिढ्या शेतात राबण्यात गेल्या. स्वतः म. फुले जात मानणारे नव्हते. तेही स्वतः शेतात रावत असत. अशा स्थितीत श्री. ओक यांच्या सामान्यज्ञानाला हसावे की रडावे ?

श्री. ओक किती भरमसाठ विधाने करणारे प्रचारी लेखक आहेत याचे एकच उदाहरण पुरे ठरावे. ते लिहितात, 'एक वेळी ते स्वतः (जोतीराव) ख्रिश्चन होण्याच्या तयारीत होते, पण मिशनऱ्यांना ते नको होते.'[१३९] या बाजारू प्रचारकाला आपल्या विधानाला काही पुरावा मात्र देण्याची गरज वाटत नाही.

म. फुले आणि स्वा. सावरकर

श्री. ओक हे हिंदुमहासभेचे कार्यकर्ते, त्यांचे प्रकाशक श्री. मामाराव दाते हे हिंदुमहासभेचे नेते, डॉ. गांगल हे राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे कार्यकर्ते, त्यांचे प्रकाशक श्री. ग. वा. बेहेरे हे सावरकरवादी हिंदुत्वनिष्ठ, ते 'हिंदुत्वाचे नुकसान होऊ नये यासाठी' दिलगिरी व्यक्त करतात. (शीर्षकात ' बेहेरे-गांगल ' असा संयुक्त उल्लेख करून लेखात मात्र संपादक अनेकदा 'मी' असा एकवचनी शब्द वापरतात.) डॉ. गांगल यांच्या लेखनाला हिंदुमहासभेचे नेते श्री. बाळाराव सावरकर यांनी जाहीर पाठिंबा दिला आहे. (लोकसत्ता– दि. १।२।८९ पृ. ७) या सर्वांचा अर्थ काय लावायचा ? चिपळूणकर ते गांगल, व्हाया ओक, हचा प्रवृत्तीची चिकित्सा करताना कोणते निकष लावायचे ?

राष्ट्रीय स्वयंसेवक संघाने एक पत्रक काढून म. फुलेंच्या ह्या बदनामीचा निषेध केला आहे.[१४०] 'नागपूर तरुण भारत'ने आपल्या २१।१२।८८ च्या अग्रलेखात श्री. गांगल व श्री. बेहेरे यांच्या हिंदुत्वनिष्ठेबद्दल शंका उपस्थित केली आहे.

स्वत: स्वातंत्र्यवीर सावरकर यांनी 'अभिनव भारत' या संघटनेच्या सांगता सोहळ्यात १० मे ५२ रोजी पुण्यात बोलताना महात्मा फुल्यांचा 'समाजक्रांतिकारक' या शब्दात गौरव केलेला असतानाही [१४१] इकडे त्यांचे अनुयायी म्हणविणारे दाते, ओक, बेहेरे, बाळाराव सावरकर आणि डॉ. गांगल हे मात्र म. फुल्यांवर अनुदार टीका करीत आहेत किंवा टीकेची भलावण करीत आहेत. त्याचवेळी हेही नमूद करतो की म. फुले यांचे वाङ्मय आणि विचार यांच्या संशोधनाच्या कार्यात अनेक सावरकरवाद्यांचे मौलिक योगदान आहे हे विसरणे कृतघ्नपणाचे ठरेल.

असे टीकाकार दोन्ही बाजूंचे आहेत

म. फुल्यांवर अनुदार आणि अभिरुचीहीन टीका फक्त ब्राह्मणच करीत आहेत असा एक गैरसमज पसरताना दिसत आहे, तो बरोबर नाही. कारण या टीकाकारांमध्ये ब्राह्मणेतर वर्गातील बाबूराव फुले, गणपतराव नलावडे आदींची टीका तर कमालीची गलिच्छ आणि अतिरेकी होती. म. फुल्यांचा पुतळा पुणे नगरपालिकेनें बसवावा हा केशवराव जेध्यांचा ठराव फेटाळला गेला तेव्हा नगरपालिका सदस्यांत बहुसंख्य सदस्य ब्राह्मणेतर होते हेही विसरायचे कारण नाही.

आज डॉ. गांगल यांना पाठिंबा देणारे किंवा त्यांची प्रत्यक्षाप्रत्यक्ष भलावण करणारे श्री. छगन भुजबळ, श्री. बाळासाहेब ठाकरे, श्री. शंकर सारडा हे कोण आहेत ? किंवा म. फुल्यांच्या प्रतिमेची किंवा पुतळ्याची पूजा करणारे आणि ऊठसूठ त्यांच्या नावाचा जयजयकार करून त्यांच्या समाजक्रांतिकारक विचारांना मात्र पद्धतशीरपणे मूठमाती देणारे तरी कोण आहेत ?

म. फुलेंच्या बदनामीचा धिक्कार करताना जुन्या ब्राह्मण–ब्राह्मणेतर वादाला पुन्हा तोंड फुटणार नाही याची मात्र काळजी घेण्याची गरज आहे. म. फुल्यांचा विरोध 'प्रवृत्तीला' होता, कुठल्याही विशिष्ट 'जातीला' नाही याचे भान ठेवायला हवे.

डॉ. गांगल यांनी विद्वत्तेचा गैरवापर केला असला तरी त्यांचा निषेध होताना एकूणच विद्वत्तेबद्दलचा आदर समाजातून नष्ट न होता ज्ञानार्जन-विद्यार्जनाची आच कशी वाढेल हे पहायला हवे. म्हणजेच हा निषेध वैचारिक पातळीवर कसा नेता येईल हे पहायला हवे.

म. फुले स्वत: साधनशुचिता मानणारे होते. एके ठिकाणी ते म्हणतात– 'चांगले काम शेवटास नेण्याकरिता वाईट उपाय योजू नयेत, नाहीतर त्या कामाच्या चांगुलपणाला बट्टा लागतो.'[१४२]

* * *

महात्मा फुले आणि १८५७ चे बंड

'अठराशे सत्तावनचे भव्योज्ज्वल स्वातंत्र्यसमर- महात्म्याच्या भाषेत भट-पांड्याचे चपातीचे बंड घडले, तेव्हा फुले स्वतः जिवंत होते. पण स्वजन, स्वधर्म, स्वदेश द्वेषाने आंधळे झाल्याने त्यांना त्याचा 'अर्थ' दिसला नाही. पण दयाळू इंग्रज सरकार सुरक्षित राहिल्याने आनंद झाला. तसाच आनंद तत्पूर्वी शहाण्णव वर्षे आधी झालेल्या मराठ्यांच्या पानिपतावरील पराभवामुळे आपल्या विघ्नसंतोषी महात्म्याला झाला आहे. आणि आपला हा आसुरी आनंद हचा महात्म्याने असा व्यक्त केला आहे–

'दांभिक पेशवे, पानीपती जाती, पालथी पडती, म्लेंच्छांपुढे.' आडवे पडल्याने महात्म्याला आनंदाच्या उकळचा फुटणे साहजिकच आहे...' (सोबत ४।१२।८८ पृ. १४-१५) डॉ. गांगल यांचे हे अवतरण वाचल्यावर काही प्रश्न निर्माण होतात– त्यांचा क्रमाने विचार करू. सुरुवात पेशवाईने करूया–

पेशवाईसंबंधी म. फुल्यांचे मत फारसे चांगले नव्हते. त्याला तशीच काही वास्तव कारणे होती. पेशवाईवर टीका करणे म्हणजे 'ब्राह्मणद्वेष' असे समीकरण करणे म्हणजे इतिहासाबद्दलचे अज्ञान प्रगट करणे होय.

रावसाहेब ना. गो. चाफेकर आपल्या 'पेशवाईच्या सावलीत' या ग्रंथाच्या प्रस्तावनेत (पृ. ४६) म्हणतात, "पेशवाईचे वर्णन करावयाचे तर ते दंगेधोपे, लढाया, युद्धे, दानधर्म, हव्यकव्य हचांच्या दंगलीचा काळ असे थोडक्यात करता येईल. भिक्षुक, शास्त्रीपंडित, हरिदास-पुराणिक हचा सर्वांचे उच्चग्रह एकादशस्थानी हचा काळात आले होते असे वाटते. अन्नसंतर्पण, दाने, व्रतवैकल्ये, प्रायश्चित्त वगैरे प्रकार सारखे चालू होते."[१४३]

'पेशवाई हे ब्राह्मणप्रधान राज्य असल्यामुळे विद्येचा उत्कर्ष या काळात व्हावा असे कोणी म्हणेल, तर तोही झालेला दिसत नाही. त्या काळी विद्या ही आधी ब्राह्मण जातीपुरती आकुंचित. ब्राह्मणांनी नवे काही संपादन करण्यासारखे आहे ही भावनाच अस्तित्वात नाही अशी स्थिती ... पेशवाईमुळे निरर्थक कर्मकांडाचे निर-

गेल स्तोम माजले, ज्यांच्या गायत्री जपाचा राष्ट्राच्या संवर्धनास तिळमात्र उपयोग नाही अशा भट्ट मजकुरांची तट्टे फुगली. अर्थात हिंदुस्थानची नव्या काळाकडे प्रगती होण्याऐवजी अंधश्रद्धा व पुराणाभिमान बोकाळून राष्ट्राची थोडीफार सामाजिक पीछेहाटच झाली !'[१४४] असे प्रसिद्ध इतिहासकार शेजवलकर म्हणतात.

लोकहितवादींनी शतपत्रामध्ये लिहिले आहे– 'बाजीरावाचा भाऊ अमृतराव पेशवा याच्या उदाहरणावरून हेच दिसते. त्याने पुणे शहर लुटले. मुले, बायादेखील ठार मारल्या व कितीएक बायांनी जीव दिले, पैशासाठी त्याने अनेकांना राखेचे तोबरे दिले, धुऱ्या दिल्या, तापल्या तव्यावर माणसांना उभे केले. तेल कढवून पोरांच्या डोक्यावर ओतले. अशा रीतीने अत्यंत हीन, भ्रष्ट, अधर्म्य मार्गांनी पैसा मिळवून तो काशीस गेला. त्यावेळी तेथील धर्मवेत्त्या ब्राह्मणांनी त्याला काही शासन केले काय ? मुळीच नाही. ... (ब्राह्मणांच्या सांगण्याप्रमाणे) त्याने अन्नछत्रे, ब्राह्मणभोजने, यज्ञयाग सर्व केले. लगेच ब्राह्मणांनी त्यास जातीत घेतले व ते त्याची स्तुति करू लागले.'[१४५] अशा पेशवाईत स्त्रिया आणि शूद्रातिशूद्र यांना तर अमानुष जीवन जगावे लागत असे. त्यामुळे त्यांचे कैवारी म. फुले यांनी तिखट शब्दांत पेशवाईवर हल्ला केला नसता तरच नवल.

पानिपतचा पराभव का ?

ज्ञानसत्ता, राजसत्ता आणि अर्थसत्ता यांचे ब्राह्मण्यवादी पेशवाईत केंद्रीकरण झाले होते. नानासाहेब पेशव्यांच्या काळातील पानिपताच्या पराभवाचा उल्लेख म. फुले करतात– 'भाऊसाहेबांच्या बखरी'त युद्धाचे तपशीलवार वर्णन आले आहे. पानिपतावरील पराभवाला बऱ्याच मोठ्या प्रमाणात पेशव्यांची धोरणेच कारणीभूत ठरली. युद्धावर गेलेल्या विश्वासरावाने सदाशिवरावांच्या पश्चात वडिलांना (नानासाहेब पेशव्यांना) पत्र लिहिले, आणखी पन्नास हजार फौज व क्रोड रुपये खजिना पाठविला तर तुमचे–आमचे दर्शन होईल. नाहीतर पत्र लिहिले हीच भेट समजावी.'[१४६] हे तातडीचे पत्र हाती पडताच नानासाहेब पेशव्यांनी मदतीसाठी जायचे ठरवून फौज जमा केली. ते पैठणला आले. ज्या नानासाहेबांच्या तीनही मुलांचे विवाह झालेले होते अशा वयाच्या नानासाहेबांनी, स्वतःचा मोठा मुलगा आणि चुलतभाऊ लढाईत तिकडे प्राण पणाला लावीत होते अशावेळी, इकडे पैठणला येऊन धूमधडाक्यात स्वतःचे लग्न केले. सात दिवस लग्नाचा जल्लोष उसळला. पंगती झडल्या. 'पुणेहून नानासाहेब पैठणावर आले होते. तेथे आपले लग्न केले.'[१४७] आणि मग सावकाश त्यांना मदतीला जायची आठवण झाली. अशा बेजबाबदार पेशव्यांना महात्मा फुले दांभिक म्हणतात म्हणून डॉ. गांगलांनी रागावण्याचे काय कारण ?

१८५७ चे बंड आणि महात्मा फुले

१८५७ चे स्वातंत्र्यसमर अयशस्वी झाले, ह्याचा ह्या महात्म्याला अत्यंत

आनंद वाटला होता... फुल्यांनी आपली सब्स्टॅण्डर्ड बुद्धिमत्ता दयाळू इंग्रज सरकारच्या चरणी वाहिली होती, त्याप्रमाणे लक्ष्मणशास्त्रींनी सुद्धा आपली प्रकांड बुद्धिमत्ता फुलेचरणी वाहिली आहे काय? ज्योतिबांचे इतिहास–भूगोल ज्ञान शून्य होते, पण त्याची भलावण तर्कतीर्थांनी करावी ? शुद्ध शास्त्रीय दृष्टीला महत्त्वाची वाटणारी ही कारणमीमांसा आहे तरी काय? 'त्या बंडात राज्य गेले असते तर इतिहासाची पुनरावृत्ती घडली असती. ब्राह्मण पेशव्याच्या राज्याचा पुनः अवतार झाला असता.' धन्य तर्कतीर्थ!'

डॉ. बाळ गांगल यांनी म. फुल्यांनी १८५७ च्या बंडाबाबत रोखठोक भूमिका घेतली म्हणून त्यांना स्वजनद्रोही आणि देशद्रोही ठरवले आहे आणि तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशींनी म. फुलेंची भूमिका शास्त्रीय असल्याचा निर्वाळा दिल्याबद्दल तर्कतीर्थांवर ही अनुदार शेरेबाजी केली आहे.

१८५७ च्या बंडाबद्दल इतिहासकारांची भूमिका काय होती? 'सिपॉय म्युटिनी ॲण्ड रिव्हॉल्ट ऑफ १८५७' या ग्रंथात आर. सी. मुजुमदार म्हणतात– 'इ. स. १८५७ च्या शिपायांच्या उठावाला स्वातंत्र्ययुद्ध हे नाव देणे म्हणजे एकोणिसाव्या शतकाच्या इतिहासाच्या खऱ्या ज्ञानापासून या शतकातील जनतेला अज्ञानात ठेवणे होय.'[१४८] 'प्रसिद्ध इतिहासकार एस. एन. सेन यांच्या मते– 'या बंडाचे नेतृत्व करणाऱ्यांपैकी एकाही नेत्याच्या मनात 'स्वातंत्र्याची' मुळी कल्पनाच नव्हती. म्हणून त्यांना स्वातंत्र्याचे उद्‌गाते म्हणणे सयुक्तिक होणार नाही. या बंडातील सर्वच नेत्यांना धर्मरूढींचे जबरदस्त आकर्षण होते. त्यांना ब्रिटिशांनी बदलून टाकलेल्या आपल्या जुन्या जीवनपद्धतीचेच पुनरुत्थान करावयाचे होते... या सर्व बंडखोर नेत्यांना ब्रिटिशांनी सुधारणेचे घडघाळ जे पुढे नेलेले होते ते पुन्हा पाठीमागे न्यावयाचे होते. एका अर्थाने हे सर्व बंडखोर नेते प्रतिक्रियावादी होते.'[१४९]

रियासतकार सरदेसाई म्हणतात, 'राष्ट्रीय स्वातंत्र्याची भावना किंवा आकांक्षा जी आज जनतेत दिसून येते ती त्यावेळी हिंदी लोकांत दिसत नव्हती. स्वातंत्र्य, स्वयंनिर्णय इ. कल्पना अगदी अलिकडच्या आहेत. सत्तावन सालात राष्ट्रीय जागृतीच नव्हती आणि आपणावर कोण राज्य करतो याची त्यांना परवा वाटत नव्हती. मध्यवस्तीतल्या घराला एकाएकी आग लागली म्हणजे हाहाःकार उडतो, तशातला सत्तावन सालातील प्रकार होऊन लोक भयभीत झाले स्तंभित झाले, पण आपले राष्ट्रीय कर्तव्य ओळखू शकले नाहीत... बंडवाल्यांचे बेत जनतेला कळले नाहीत, किंवा बेत असा काही ठरलाच नव्हता. जे घडले ते यदृच्छया घडले, विचारपूर्वक ठरविण्यात आले नव्हते.'[१५०]

'मराठे व इंग्रज' या ग्रंथाचे कर्ते न. चिं. केळकर म्हणतात, '१८५७ च्या युद्धात हिंदुस्थानातल्या संस्थानिकांपैकी एकानेही बंडवाल्यांना मदत केली नाही.... हिंदी लोकांच्या राष्ट्रीय बुद्धीत अशी उणीव दिसून आली की नेपाळच्या गुरख्यांनी व पंजाबच्या शीखांनी खुशाल दिल्लीच्या बंडवाल्या मुसलमानांवर हत्यार चालविले.'[१५१]

इतिहासाचार्य राजवाडे म्हणतात, 'शिक्षित व अशिक्षितांचा वर्ग विजयी होणाऱ्या सुयंत्र पक्षाकडे (ब्रिटीशांच्या पाठीशी) प्रथमपासूनच होता... बंगाल, राजपुताना व महाराष्ट्र या तीन प्रांतांतील कित्येक बडे नोकरलोक असे सांगतात की १८५७ च्या प्रचंड धडपडीचा अर्थच कळण्याची आपली ताकद नव्हती. मग स्वपक्ष किंवा परपक्ष घेण्याची गोष्ट दूरच राहिली!'[१५२]

१८५७ च्या युद्धाला कोणी 'बंड' म्हणो, किंवा गौरवार्थ कोणी त्याला 'स्वातंत्र्ययुद्ध' असे नाव देवो; खरी गोष्ट अशी आहे की, सारा हिंदुस्थान म्हणजे त्यातील बहुजन समाज त्यात पडलाच नाही. आणि गंमत अशी की ज्या संस्थानिकांच्या हक्काकरिता हे बंड होते त्या संस्थानिकांनीच इंग्रजांना मदत करून हे बंड मोडले... बहुतेक सर्व पलटणी शिपाई किंवा बंडात पडलेले जमीनदार लोक यांनी स्वतःवरील विशिष्ट अन्यायाच्या प्रतिकाराकरिता बंड केले होते. एकाही प्रमुख संस्थानिकाचे मनात राज्यक्रांतीकरिता बंड करावे ही कल्पना मूळ धरू शकली नाही.'[१५३] अशा या बंडाला न. र. फाटकांसारखे निर्भीड इतिहासकार 'शिपाईगर्दी' असेच म्हणत. ते त्याला स्वातंत्र्ययुद्ध मानायला तयार नसत.

डॉ. गांगलकृत १८५७ चा अवास्तव तपशील

भारतीय विद्याभवनने प्रकाशित केलेल्या 'मिळमिळीत इतिहासात' सुद्धा खालील माहिती मिळते.

१) खानदेशातील सावदा आणि चोपडा येथील शेतकऱ्यांनी १८५२ मध्ये बंड केले होते आणि पंचायत स्थापून प्रतिसरकार निर्मिले होते.

२) नागपूरला अप्पासाहेबांनी १८४८ मध्ये बंड केले होते.

३) एक राजपूत राजपुत्र पेशकरा सिंग यांच्या नावे नादिरखानाने १८५३ मध्ये रावळपिंडी येथे बंड केले होते.

४) १८४४ मध्ये मिठावरील कर वाढविल्याच्या निषेधार्थ सुरतेतील लोकांनी प्रतिकार केला होता. हे सगळे उठाव समाजातील निम्न स्तरावरील लोकांचे होते अशी साक्षात इंग्रजांची कल्पना झाली होती. एक सरकारी अहवाल म्हणतो, 'Till this time, the real character of the disturbances was not understood. They were generaly supposed to be occasioned by the lowest classes of Hindoos' विद्वत्तेशी हाडवैर असलेल्या महात्म्याला हे कळणे शक्य नाही, आणि इंग्रज गेले की पेशवे आले, असंच तो समजणार. पण विद्वत्ता कोळून प्यालेल्या तर्कतीर्थांनी हचा दुष्ट आणि तर्कदुष्ट पेशवेद्वेषाला शुद्ध शास्त्रीय कारणमीमांसा म्हणावे?' (सोबत ४।१२।८८ पृ. १४)

म. फुल्यांचे विद्वत्तेशी हाडवैर होते असा शोध लावणारे इतिहासाचे पीएच. डी. असणारे डॉ. गांगल आपल्या विद्वतेचे जे भव्य प्रदर्शन वरील माहितीतून

करू पहात आहेत, ती विद्वत्ता तरी काय दर्जाची आहे, याची जरा चिकित्सा करणे भाग आहे.

१) भारतीय विद्याभवनाने प्रकाशित केलेल्या मिळमिळीत इतिहासग्रंथाचे नाव, त्याचे लेखक, आवृत्ती, पृष्ठक्रमांक ही माहिती डॉ. गांगल का देत नाहीत? (कारण त्यांना तपशीलाचा जो विपर्यास करायचा आहे, आणि स्वतःच्या अनैतिहासिक मतांच्या सोयीसाठी जो बनाव घडवायचा आहे तो पडताळा घेताच उघडा पडेल ही त्यांची भीती असणार. ठीकय! नोंदी दिल्या नाहीत तरी त्या शोधून काढताच येणार नाहीत, असे थोडेच आहे?) ज्या विद्याभवनाच्या मिळमिळीत इतिहासाचा ते हवाला देतात तो फक्त १८५७ चा इतिहास देणारा ग्रंथ नाही, तर समग्र भारतीय इतिहासग्रंथातला एक खंड आहे. त्याचे नाव आहे– 'Bharatiya Vidya Bhavan's History & Culture of the Indian People vol. IX' BRITISH PARAMOUNTCY AND INDIAN RENAISSANCE Part I, (1818–1905 A. D.) या ग्रंथात डॉ. गांगलांनी उद्धृत केलेली माहिती कशी आहे?

डॉ. गांगल ज्या घटनांची यादी राष्ट्रीय स्वातंत्र्ययुद्धाचा जणू एक भाग असणाऱ्या घटना म्हणून सादर करतात त्यांची मुळातली वस्तुस्थिती वेगळी आहे. या उठावांची कारणे पूर्णपणे वैयक्तिक आणि प्रासंगिक आहेत. त्यांच्यावर 'स्वातंत्र्ययुद्ध' वगैरे कल्पनांची झूल चढवून डॉ. गांगल त्यांचे अवाजवी उदात्तीकरण करू पहात आहेत.

१) उपरिनिर्दिष्ट ग्रंथाच्या 'Disturbances and Armed Resistance या नावाच्या १४ व्या प्रकरणात इतिहासकार आर. सी. मुजुमदार लिहितात–

Distubances due to general discontent–

An apt illustration is furnished by the rising of the cult vators of Savda and Chopda in Khandesh in 1852. An order was issued in 1844 asking the landholders to provide stone boundary marks of their lands. When a revenue survey party under Davidson went to this region, there was a big demonstration against the order on the ground that neither stone nor labourers were available for the work.[१५] जमाव वाढत गेला. त्यातून तणाव निर्माण झाला व बळाचा वापर झाल्यामुळे हिंसाचार घडला. लोकांनी समांतर पंचायत पद्धतीची स्थापना केली. परंतु फौज धाडून शांतता प्रस्थापित करण्यात आली. या प्रकाराला 'स्वातंत्र्ययुद्ध' म्हणावे काय?

२) पुढे इतिहासकार म्हणतात, 'An Impostor, pretending to be Appa Sahib, the exiled Raja of Nagpur, succeeded in gathering

round him a band of Rohillas and others numbering about 4,000 men and declared war against the British in 1848... but was soon defeated and killed'[१५५] स्वतःचे संस्थान खालसा करण्यात आले या वैयक्तिक कारणासाठी सरकारविरोधी उभारलेल्या बंडाला स्वातंत्र्ययुद्ध म्हणता येईल काय? आणि खालसा राजा हा 'निम्न स्तरातील लोकांपैकी उठाव करणारा वगैरे' कसा काय ठरू शकतो ते डॉ. गांगलच जाणोत. एखाद्या गोष्टीचे उदात्तीकरण करायलाही काही मर्यादा असावी की नाही?

३) There was a similar outbreak at Rawalpindi in 1853... अशाच प्रकारच्या दुसऱ्या एका संस्थानिकाच्या उद्योगालाही स्वातंत्र्ययुद्ध आणि तेही **'निम्न स्तरातील लोकांचे'** इ. इ. ठरवून डॉ. गांगलांनी आपली इतिहास विषयातली पीएच. डी. आणि एकूणच विद्वत्ता झळाळून टाकली आहे.

४) तपशीलाचा विपर्यास करून स्वमतप्रतिपादनासाठी त्याचा सोयिस्कर वापर करण्यात पटाईत असणारे डॉ. गांगल हे किती अप्रामाणिक अभ्यासक आहेत ते यापूर्वी अनेक ठिकाणी प्रस्तुत लेखकाने दाखवून दिले आहेच. आता वरील सर्व उठावांस आणि शेवटच्या ४ थ्या प्रकरणास एकत्र बांधून त्यांनी जी हातचलाखी केली आहे ती पाहूया.

प्रत्यक्षात वरील तीन घटनांचा आणि पुढील चौथ्या घटनेचा परस्परांशी काडीमात्र संबंध नाही. डॉ. गांगल यांनी 'हस्तकौशल्य' दाखवून 'हे सगळे उठाव समाजातील निम्न स्तरावरील लोकांचे होते अशी साक्षात इंग्रजांची कल्पना झाली होती' वगैरे जी मनची थाप मारलीय ती किती खोटारडेपणाची आहे ते पाहा शिवाय 'एक सरकारी अहवाल म्हणतो' वगैरे संशोधनाचा आवही त्यांनी असा काही जमवून आणलाय की वाचक डॉ. गांगलांच्या विद्वत्तेपुढे चितपटच व्हावेत.

हा अहवाल अशा पद्धतीने डॉ. गांगलांनी उद्धृत केलाय की जणू या सर्व उठावांची पहाणी करून तो सादर केलेला आहे असा भास निर्माण व्हावा. प्रत्यक्षात हा अहवाल फक्त चौथ्या घटनेपुरताच मर्यादित आहे.

तर गोष्ट अशी आहे की 'The agitation in Surat against the raising of salt duty from eight annas to one Rupee is a striking illustration. According to the official report, as soon as the new Salt Act came to be known on August 27, 1844, there was a considerable degree of excitement among the poorer classes'[१५६] पुढे अशी अफवा पसरली की सरकारने जीवनावश्यक अशा सर्वच वस्तूंवर कर वाढविला आहे. त्यामुळे जमाव हिंसाचाराला प्रवृत्त झाला. पोलिसी बळाच्या वापरातून वातावरण चिवळले. परिस्थिती हाताबाहेर जाऊ लागली. The official report proceeds– 'Till this time the real character of the disturbances was not understood. They were generally supposed to

be occasioned by the lowest classes of the Hindus..."[१५७] पुढे सरकारला मिठावरील वाढविलेला कर रद्द करावा लागला आणि जनता शांत झाली.

या एकाच घटनेवरील अहवालाचा वापर सर्व घटनांसाठी करून डॉ. गांगल यांनी म. फुल्यांना 'विद्वत्तेशी हाडवैर असलेला' वगैरे शिवीगाळ करीत त्यांचे स्वत:चे प्रामाणिकपणाशी असलेले हाडवैरच सिद्ध केले नाही काय?

डॉ. गांगल यांचा अप्रामाकिपणा हा स्थायीभावच असावा अशी आत्तापर्यंच्या सर्व पुराव्यांवरून मला खात्री वाटू लागली आहे. या 'विद्वानांच्या' आजवरच्या सर्वच तथाकथित संशोधनाची चिरफाड करून पाहणे जरूरीचे वाटू लागले आहे. डबल पीएच. डी मिळविलेला 'विद्वान अभ्यासक' इतका अप्रामाणिक असू शकतो याचीच लाज वाटू लागते.

डमडम, बराकपूर, अंबाला, लखनौ, मीरत, दिल्ली, फिरोजपूर, कानपूर, या सर्व प्रवासातून वाचकाला फिरवून आणून डॉ. गांगल 'दिल्लीहून बंड पसरले फिरोझपूरपर्यंत, मग कानपूर. फुल्यांच्या दृष्टीने 'दयाळू' वगैरे असलेल्या इंग्रजांशी मैत्रीने वागणारा नानासाहेब पेशवा त्यानंतर बंडात ओढला गेला' (सोबत, ४।१२।८८ पृ. १४) असा दावा करतात. तो खरा आहे काय? डॉ. गांगल सोय–गैरसोय पाहून, ठरवून संशोधनाचा वापर सोयीने करण्यात पटाईत आहेत असे दिसते. याचा साधा पुरावा असा की त्यांनी आधीच असे म्हणून ठेवलेले आहे, 'स्वातंत्र्यवीर सावरकरांनी लिहिलेले 'स्वातंत्र्य–समर' फार जळजळीत असल्याने सोडून देऊया–' फार जळजळीत की गैरसोयीचे? कारण डॉ. गांगलांचा उपरोक्त दावा सावरकरांना मान्य होणारा नाही. डॉ. गांगल स्वत:ला सावरकरवादी म्हणतात तेव्हा त्यांना सावरकरांचाच पुरावा खरा वाटायला हरकत नसावी.

स्वातंत्र्यवीर सावरकर लिहितात, 'मागील प्रकरणात वर्णन केल्याप्रमाणे सर्व हिंदुस्थानभर क्रांतीची सामग्री अितस्तत: तयार होऊन पडत असता त्या सामग्रीची यथायोग्य घटना कशी करावयाची व त्यातून क्रांतियुद्धाची इमारत कशी उभारावयाची याचा नकाशा इकडे ब्रह्मावर्ताकडे (नानासाहेबांच्या वाडचात) तयार होत होता... श्रीमंत नानासाहेब व अझीम अुल्ला खान या दोघा महनीय विभूतींनी सुमारे १८५६ च्या आरंभापासून स्वातंत्र्याकडे हिंदुस्थानचे मन:प्रवर्तन व शरीरप्रवर्तन करण्यासाठी युद्धसंघटना सुरू केली! हिंदुस्थानात जेवढे राजे होते तेवढचांना जर इंग्रजांविरुद्ध उठण्याची इच्छा उत्पन्न झाली तर एका क्षणात आपला देश आपल्या ताब्यात येईल ही गोष्ट नानांच्या कधीच ध्यानात आलेली होती... त्यांची (संस्थानिकांची) मने स्वातंत्र्यगामी करण्यासाठी नानांनी प्रत्येक दरबारात आपले दूत धाडण्यास आरंभ केला. कोल्हापूर, दक्षिणेकडील सर्व पटवर्धनी संस्थाने, अयोध्येतील जमीनदार व दिल्लीपासून म्हैसूरपर्यंत असलेल्या सर्व राजधान्या वगैरे ठिकाणी नानांचे दूत व नानांची पत्रे सर्व हिंदुस्थानात स्वातंत्र्ययुद्धार्थ उठविण्याची चेतना देत हिंडत होते... श्रीमंत नानांच्या व अझीम उल्ला खानांच्या पत्रांनी व

उपदेशकांनी आता हजारो ठिकाणी त्या रचनेच्या शाखा उघडलेल्या होत्या... जो तो शिपाई दिवसा आपल्या बंदुकीला घासून–पुसून स्वच्छ करीत, रात्र पडताच त्या त्या रेजिमेंटच्या सुभेदार–मेजराचे बंगल्यावर भरणाऱ्या गुप्त सभेला जाऊन स्वातंत्र्य-युद्धाची शपथ कधी घेईन यासाठी उत्सुक होऊ लागला... ते बेत नानासाहेब किंवा अल्ली नक्कीखान यांना कळविण्यात येत... अशा रीतीने जिकडे तिकडे मनःप्रवर्तनाची लाट उसळून दिल्यानंतर मग श्रीमंत नानासाहेब हे सर्व केंद्रसूत्रांनाही सूत्रबद्ध करून टाकण्यासाठी व मुख्यमुख्य गुप्त मंडळाची एकवाक्यता करण्यासाठी ब्रह्मावर्त सोडून निघाले... अशारीतीने दिल्ली, लखनौ, काल्पी, जगदीशपूर वगैरे ठिकाणी असलेल्या मुख्य पुढाऱ्यांच्या प्रत्यक्ष गाठी घेऊन व त्यांच्या संमतीने पुढील क्रांतीचा नक्की नकाशा रेखाटून श्रीमंत नानासाहेब एप्रिलचे शेवटास ब्रह्मावर्ती परत आले...'[१५८] असें असूनही डॉ. गांगल मात्र म्हणतात 'नानासाहेब बंडात ओढले गेले!'

'कानपूरला चढविलेला हा शेवटचा हल्ला अगदीच व्यर्थ गेला नाही. त्या दिवशीच्या झटापटीनंतर इंग्रजांच्या सर्व आशा विनष्ट झाल्या. त्यांचा सर्व धीर सुटून गेला व यापुढे नानांच्या हातून बचावून सुटणे अशक्य आहे हे त्यांस स्पष्ट दिसून आले. २५ जून रोजी इंग्रजांनी आपल्या तटावर तहाचे निशाण उभारले ! हे निशाण पाहताच श्रीमंतांनी युद्ध तहकूब करण्याचा हुकूम दिला व कैदेतील इंग्रजांपैकी एका बाईबरोबर जनरल व्हीलर याला चिठ्ठी धाडली ... 'जे शस्त्रे' खाली ठेऊन शरण येतील त्यांना अलाहाबादेला सुरक्षित रीतीने पोचविण्यात येईल. ही चिठ्ठी अझीम उल्ला खानांच्या हस्ताक्षरांत असून ती नानांचे हुकुमावरून लिहिलेली होती.

'नानांना शरण रिघण्याचा निश्चय झाला... त्या रात्री सर्व ताबा नानांचे हाती दिला जावा व इंग्रजांनी दुसरे दिवशी पहाटे निघण्याची तयारी करावी अशा रीतीने उभयसंमत (तह झाला)... तटबंदीची जागा सोडून गंगेच्या काठी इंग्रजांना आणण्यासाठी उत्तम प्रकारची वाहने नानांनी धाडून दिली... कर्नल एवर्ट घायाळ झाल्यामुळे त्याला एका डोलीत घालून नेण्यात येत होते... (त्याला हिणवून शिपायाने) त्याला खाली ओढला व तलवारीने त्याचे तुकडे तुकडे केले ! त्या कर्नलची स्त्री शेजारीच होती, तिला काही जण म्हणू लागले, 'तू स्त्री आहेस म्हणून जा, घे तुला जीवदान!' पण एक विक्राळ गडी ओरडला, 'अरे हट जाव ! स्त्री ! पण ती गोरी आहे ना ? मग उडव तुकडा !' हे वाक्य संपण्याचे आधीच त्यातील भयानक अर्थाची पूर्तता झालेली होती !'[१५९]

ही अवतरणे आहेत स्वातंत्र्यवीर सावरकरांच्या इतिहासग्रंथातील! मात्र डॉ. गांगल हीच माहिती कशी देतात ? ते लिहितात 'महात्मा फुल्यांच्या आईसाहेब राणी व्हिक्टोरियाच्या जातभाईंची आणि भगिनींची कत्तल झाली ही गोष्ट खरी, पण ती तलवारीची लढाई नव्हती.'(सोबत ४।१२।८८ पृ. १४)

नानांच्या शिपायांनी घायाळ कर्नल एव आण त्याच्या पत्नीचे तलवारीने तुकडे तुकडे केले असे सावरकर सांगतात आणि डॉ. गांगल मात्र म्हणतात ती तलवारीची लढाई नव्हती. आता बोला! एवढेच नाही.. डॉ. गांगलांचा असा दावा आहे की 'Non Combantant वर, स्त्रीवर तर सोडाच, हिंदू योद्धयाने तलवार उगारल्याची उदाहरणे क्वचित!'

घायाळ कर्नल हा Non Combantant नव्हता काय? आणि त्याची पत्नी स्त्री नव्हती काय ? की त्या दोघांवर तलवार न उगारताच त्यांचे तुकडे तुकडे केले गेले?

स्वातंत्र्यवीर सावरकर लिहितात— 'नदीवर सर्व बोटी धान्यसामग्रीसुद्धा सज्ज होत्या हे इंग्रजांच्या कमिटीनेच शोधाअंती सिद्ध केलेले आहे.... शेवटी नावा निघण्यासाठी श्रीमंत तात्या टोप्यांनी आपला हात हवेत पुढे मागे फिरवून हुकूम सोडला. इतक्यात एका कोपऱ्यात त्या भयप्रद शांततेचा भंग करण्यासाठी कोणी एकाने एक बिगुल जोराने फुंकले! तो बिगुलाचा कर्कश हुंकार होताच तोफा, बंदुका, तरवारी, कटयारी, बायोनेटा एकदम कडाडू लागल्या. नावाडयांनी नावांतून उडया घेऊन ते जमिनीवर आले व जमिनीवरून शिपायांनी उडया घेऊन ते पाण्यात धावू लागले! 'मारो फिरंगीको,' 'छाटो गनीमको' ह्याशिवाय एक शब्द कुणी उच्चारील तर शपथ! इतक्यात सर्व नावांना आग लागली. इंग्रजांचे पुरुष, बायका, मुले सर्व गंगेमध्ये पटापट उडया घेऊ लागले. कोणी पोहू लागले, कोणी बुडू लागले, कोणी जळू लागले व सर्वजण, लवकर किंवा उशीरा, गोळया लागून चीत झाले ! मांसाचे गोळे, छाटलेली डोकी, तोडलेले केस, छिन्न झालेले हात, तुटलेले पाय, रक्ताचा पूर !... ही वेळ सकाळी दहाची होती. श्रीमंत नाना ह्यावेळी आपले दिवाणखान्यात एकटेच फेऱ्या मारीत होते असे म्हणतात ... तितक्यात घोडेस्वार दौडत आला व त्याने सतीचौडा घाटावर इंग्रजांची शिपायांनी सरसकट कत्तल चालविलेली आहे अशी वर्दी दिली. ही बातमी ऐकताच नानांनी त्यालाच परत दवडले व त्याच्या बरोबर सक्तीचा हुकूम धाडला की 'गोरा पुरुष तेवढा कापून टाकावा व गोऱ्या बायका-मुलांना बिलकूल धक्का लावू नये.'[१९०]

डॉ. गांगल मात्र म्हणतात, 'ती तलवारीची लढाई नव्हती. बंदुकीची आणि तोफांची होती... गोळीबाराच्या युद्धात Non – Combatants मरतात, त्याला इलाज नाही. ह्या सगळ्या प्रकारात नानासाहेबाचा हात होता काय?' आर. सी. मुजुमदारांचा हवाला देऊन नानांना निर्दोष सोडून डॉ. गांगल पुढे लिहितात– 'हे झालं सत्याची चाड असलेल्या इतिहासकाराचं मत. ज्ञानशत्रू महात्म्याला सत्याशी काहीच करायचे नसतें. तो खुशाल आपल्या कल्पनेने नानासाहेबाच्या हातून कत्तल घडवून आणतो आणि मग त्याला दोषी धरतो. महात्म्याच्या निरंकुशत्वाला हे साजेसंच आहे, पण तर्कतीर्थांचं काय?'

स्वा. सावरकर सांगतात– नानांनी हुकूम दिला 'गोरा तेवढा कापून टाकावा.' आणि ह्याच कत्तलीबद्दल म. फुले नानांना जबाबदार धरतात तेव्हा डॉ. गांगल त्यांना 'ज्ञानशत्रू,' 'निरंकुश महात्मा' वगैरे शिव्या देतात. सावरकरांनी लिहिलेला इतिहास सावरकरवादी असूनही न वाचणारे किंवा वाचूनही तो सोयीसाठी बदलून टाकणारे डॉ. गांगल म. फुल्यांना जेव्हा ज्ञानशत्रू म्हणतात तेव्हा ज्ञानशत्रू कोण आहे हे वाचकाला उघडच दिसते. वेगळे सांगण्याची गरजच नाही.

स्वा. सावरकर लिहितात– 'नानांचा निरोप येताच सर्व कत्तल बंद झाली व हुकमाप्रमाणे सुमारे १२५ स्त्रिया व मुले जिवंत बाहेर काढण्यात आली. त्यांना सावदा कोठीकडे कैद करून नेले व राहिलेल्या सर्व युरोपियन पुरुषांना अेका रांगेत उभे करून...शिपायांच्या तरवारीने त्यांची शिरे सपासप उडवून टाकली...सारांश, कानपूरला ता. ७ जून रोजी जी एक हजार इंग्रजी माणसे हयात होती त्यांपैकी ४ पुरूष व १२५ बायकामुले काय ती ता. ३० जूनला हयात होती. त्यातून ही १२५ बायकामुले नानांच्या कैदेत होती.[१६१] सावरकर यापुढे असेही सांगतात की, तत्कालीन मोठमोठचा इंग्रज लोकांनी खात्रीलायक माहितीच्या नावाखाली 'या बायांवर बळजोरी करण्यात आली, त्यांचे रस्त्यातून उरभंग करण्यात आले, खुद्द नानांनी त्यांच्यावर जबरदस्तीचा संभोग करण्याचा प्रयत्न केला' वगैरे गोष्टी प्रसिद्ध केल्या व त्या सत्य मानल्या गेल्या, वर्षानुवर्षे प्रमाण मानल्या गेल्या. सावरकरांनी १९०९ च्या आपल्या या लेखनात त्या झाडून खोटचा असल्याचे स्पष्ट केले. सावरकरांनी आपल्या याच ग्रंथात पृ. २५१ वर पुढे ह्या कैदेतील स्त्रियांची सरसकट निर्घृण कत्तल करण्यात आल्याचे स्पष्ट लिहिले आहे. कैदेतील गोऱ्या स्त्रिया फितुरीला मदत करतात असे लक्षात आल्यावर त्या दिवशीच्या खाजगी सभेत **टीकासिंग** (हे टीकासिंग श्रीमंत नानासाहेब पेशवे यांचे सेनाप्रमुख **'जनरल'** होते) म्हणाले, '...माझ्या मताने कानपुरास इंग्रज भिडण्याच्या आधी येथील अंतर्गत बातमी देण्यास एकही गोरे कातडे न उरावे'[१६२]. तळटीपेत सावरकर लिहितात–फॉरेस्ट म्हणतो, पुढे पुरावा मिळू नये म्हणून कत्तलीचा आग्रह, पहिले प्रपोजल म्हणून, टीकासिंगाने केला.'

'दुसरे दिवशी प्रथमतः त्या हेरांना व कैदेतील गोऱ्या पुरुषांना बाहेर ओढण्यात आले, एका रांगेत ते उभे राहिले व स्वतः नानासाहेबांच्या समोर प्रथमतः त्या हेरांची डोकी सपासप उडविण्यात आली व नंतर कैदेतील गोऱ्या पुरुषांना पुढे आणून गोळीसरसे ठार करण्यात आले...तिकडे बिबीगडावर असलेल्या पहारेकरी शिपायांस आत घुसून कत्तल करण्याचा हुकूम सुटला. पहारेकरी अशा कत्तली करण्यास धजेनात तेव्हा ... हातात नंग्या तरवारी व तीक्ष्ण सुरे पाजळणारे खाटीक लोक बोलवण्यात आले. ते त्या बिबीगडात दात कराकरा चावीत संध्याकाळचे सुमारास आत घुसले व रात्री काळोखाचे सुमारास बाहेर निघाले. बिबीगडात घुसताच त्यांनी हातातील तरवारींनी व सुऱ्यांनी भोसकून सुमारे दीडशे गोऱ्या

स्त्रिया व गोरी मुले कापून काढली! त्या खोलीत रक्ताचे तळे साचले व त्या रक्तात नरमांसांची खांडोळी तरंगू लागली. '[१६३]

या सैन्याचे प्रमुख नानासाहेब, त्यांना हुकूम देणारा जनरल टीकासिंग आणि प्रत्यक्षात कत्तल करणारे खाटीक (खाटीक फक्त मुसलमानातच असतात हा समज बरोबर नाही. हिंदूंमध्येही एक जात खाटीक या नावाची आहे.) या सर्वांवरून सत्सार अंक २ मध्ये[१६४] (लेखन ऑक्टो. १८८५) म. फुल्यांनी नानासाहेब पेशव्यांनी गोऱ्या स्त्रियांची व मुलांची कत्तल केली असे म्हटले आहे. सावरकरांचा इतिहास त्याला दुजोराच देत आहे. डॉ. गांगल मात्र सोयीसाठी नानांना निर्दोष व फुल्यांना विद्यावैरी ठरवीत आहेत! म. फुले 'सतीचौरा घाट' प्रकरणावर काहीच बोलत नाहीत, ते फक्त बिबीगड कत्तलप्रकरणी नानांना जबाबदार धरीत आहेत, डॉ. गांगल मात्र बिबीगड प्रकरणी मिठाची गुळणी धरून बसले आहेत. त्यांनी बिबीगड प्रकरणी नाना निर्दोष होते हे का सिद्ध केले नाही? म. फुल्यांचे समकालीन लेखक विष्णूभट गोडसे लिहितात, 'पलटणी फार तप्त होऊन आवेशाने तेथून निघोन कैदखान्यात येऊन तरवारीने व बंदुकांचे गोळ्यांनी दरोबस्त मुले व बायका त्या निर्दय चांडालांनी ठार मारली'[१६५]

आर. सी. मुजुमदार लिहितात– ' Nana issued orders for the massacre of the women and children in the Bibighar.'[१६६]

म्हणजेच मुजुमदारांनी 'सतीचौरा घाट कत्तलप्रसंगी' नाना हजर नव्हते हे सांगितले तेवढाच भाग सोयीसाठी उद्धृत करायचा, परंतु पुढे १२५ स्त्रियांमुलांची कत्तल नानांनी केली असा जो बिबीगड कत्तलीचा म. फुल्यांचा आरोप आहे त्या ठिकाणी मुजुमदारांची साक्ष गैरसोयीची ठरणार असल्याने तिकडे दुर्लक्ष करायचे आणि मुजुमदारांनी एकूणच नानांना निर्दोष ठरविले असल्याचा आभास निर्माण करायचा ही आहे डॉ. गांगल यांची हातचलाखी!

म. फुल्यांनी या बंडाला 'भट पांड्यांचे बंड, चपाती बंड, किंवा कोर्तुशी बंड' म्हटले त्यात डॉ. गांगलांनी संतापावे असे काय आहे? या बंडातला पहिला शहीद मंगल पांडे हा ब्राह्मण होता हे सावरकरांनीच लिहिले आहे,[१६७] तर या बंडात चपात्या वाटताना निरोप पोहचविले जात असत अशी माहिती सावरकर[१६८] व मुजुमदार[१६९] या दोघांनीही दिली आहे. 'कोर्तुशी' हा मूळ शब्द इटालियन भाषेतील असून तो 'कार्तोसांओ' या शब्दापासून तयार झाला असून त्याचा मराठी अर्थ 'काडतुसांचे निमित्त होऊन निर्माण झालेले बंड, असा आहे.[१७०] काडतुसांना आवरण म्हणून गाईच्या वा डुकराच्या चरबीचा वापर होतो आहे हे समजताच धर्मभावनेपोटी हिंदू व मुस्लीम शिपायांनी बंड केले ही तर जगजाहीर गोष्ट आहे. अशा अवस्थेत म. फुल्यांचे काय चुकले तेच समजत नाही.

झाशीची राणी

'नानासाहेब पेशव्यांचो मुलगी मैना' इ. सगळा किती बनावट कथेचा प्रकार श्री. ओक व डॉ. गांगल यांनी तयार केला आहे ते मागील प्रकरणात दाखविले आहेच. या दोघांनीही आणखी एक असाच विपर्यस्त आणि निंद्य कथाभाग तयार केलेला आहे.

'झाशीची राणी लक्ष्मीबाई : 'कालच्या चपाती बंडात विटाळसा होऊन बसणाऱ्या झाशीच्या राण्याची श्री'– पृ. ३०२. 'स्त्रियांसंबंधी जोतीराव किती क्षुद्रबुद्धी दाखवितात त्याचे हे उदाहरण.' [१७१] हे अवतरण ओकांचे असून दुसरीकडे याच संदर्भात ते लिहितात 'अन् हे जोतीराव सभ्यतेचे धडे शिकवणार ? राणी लक्ष्मीबाई ब्राह्मण होती ना!' [१७२] हा संदर्भ घेऊन म. फुल्यांबद्दल स्त्रियांमध्ये अनादर निर्माण करण्याचा हचा दोघांचा प्रयत्न असावा असे वाटते. म. फुल्यांचे हे मुळातले अवतरण आहे 'सत्सार'च्या दुसऱ्या अंकातले. त्या ठिकाणी स्त्रिया आणि पुरुष यांच्या गुणावगुणांची म. फुले आणि यशवंत यांची चर्चा चालू आहे. ताराबाई शिंदे यांच्या 'स्त्रीपुरुष–तुलना' या ग्रंथावर म. फुल्यांचे सहकारी भालेकर यांनी काही अनुदार टीका केली होती. त्यामुळे संतापून म. फुल्यांनी भालेकरांना चांगलेच सुनावले होते व न्या. रानड्यांनी आपल्या पत्नीला शिक्षण दिले याचा गौरव केला होता. स्त्रियांवर झालेला अन्याय किंवा निंद्य टीकेचा प्रयत्न म. फुले कधीही खपवून घेत नसत हेच यातून स्पष्ट होते. स्त्रियांवर टीका करणारा माणूस आपला सहकारी जरी असला तरी त्यालाही धारेवर धरण्याची त्यांची हिंमत होती. 'सर्व प्रकारचे दुर्गुण फक्त स्त्रियांचेच अंगी असतात' असा एक समज त्याकाळी पसरवून देण्यात काही हेकट वर्तमानपत्रवाले यशस्वी झालेले दिसत होते. त्यांच्यावर असुडाचा घणाघाती प्रहार करीत म. फुल्यांनी स्पष्टपणे सांगितले की, 'स्त्रियांपेक्षा पुरुषच अधिक पक्षपाती, दगेबाज, ठक, साहसी, क्रूर व नित्य नवीन ज्यास्ती भयंकर, धाडसी दुष्ट कर्मे आचरणारे आहेत.' [१७३]

पहिली पत्नी आवडत नाही म्हणून दुसरी, तिसरी आणि चवथीही करणारे पुरुष समाजात अनेक आहेत असे सांगून म. फुल्यांनी विचारले की नवरा 'दुर्वर्तनी' निघाला म्हणून तरी स्त्रीला दुसरा विवाह करण्याचा अधिकार आहे काय ? म. फुले स्पष्टपणे सांगतात 'या पक्षपाती आर्य ग्रंथकारांचे घ्यावयाचे माप एक आणि द्यावयाचे माप एक.' [१७४]

हिंदु आणि मुस्लीम या दोन्ही समाजांत स्त्रियांना दुय्यम वागणूक मिळते असा म. फुल्यांचा दावा आहे. पुरुष त्यांच्या धाडसीपणाचा उपयोग समाजाला युद्धाच्या संकटात लोटण्यासाठी करतात असा त्यांचा आक्षेप आहे.

म. फुले पुढे म्हणतात की 'मला जगात धाडशी अशा तीनच स्त्रिया माहीत आहेत– १) दैत्यमर्दिनी अंबिका २) सेमीरेमी ३) झांशीची राणी.

या ठिकाणी '**विटाळसा होऊन बसणाऱ्या राण्याची स्त्री**' हा उल्लेख नेमका लक्षात येण्यासाठी 'माझा प्रवास' या विष्णूभट गोडसे यांच्या ग्रंथातील माहिती घेणे उपयुक्त ठरेल. ते लिहितात '(झांशीचा) गंगाधरबाबा राजा हा, लौकिकात आठ प्रकारचे षंढ आहेत, त्याप्रमाणे हा राजा पंढ आहे. गंगाधरबाबाचे आचरण असे होते की, आपले वाडयात माडीवर दोहोचोहो रोजी पुरुष वेष टाकून स्त्रीचा वेष घ्यावा. पैठणी नेसून जरीकाठी चोळी अंगात घालीत असे... मूद वगैरे अलंकार सर्व घालीत असे. (अंगावर सर्व स्त्रियांचे दागिने घालून) स्त्रियांबरोबर बोलणें वगैरे करीत असे... हा राजा बहुत करून महिन्याचे महिन्यास स्त्रियांसारखा एकीकडे बसून अस्पर्श दशा तीन दिवस भोगून चवथे दिवसे नाहाणाचा समारंभ मोठा करीत असे.'[१७५] म्हणजे अशा नामर्द राजाची धाडशी पत्नी असा हा राणी लक्ष्मीचा गौरवपर उल्लेख म. फुले करतात. ओक– गांगल मात्र '**बसणाऱ्या**' या पुल्लिगी विशेषणाकडे दुर्लक्ष करून झाशीच्या राणीच्याच 'त्या' अवस्थेबद्दल फुले बोलतात असा भास निर्माण करतात.

वासुदेव बळवंत फडके

'वासुदेव बळवंत फडके' यांचा उल्लेख महात्मा फुले 'राजद्रोही बंडखोर' असा करतात म्हणून डॉ. गांगल यांना संताप आला आहे. आता स्वातंत्र्यात १९८८ साली हा संताप ठीक आहे, परंतु पारतंत्र्याच्या काळात वासुदेव बळवंतांचा गौरव करणे म्हणजेच राजद्रोह ठरत होता. (आणि ब्रिटिश राजवट उलथण्याचा प्रयत्न हा त्याकाळात राजद्रोह मानला जाण्यात चूक तरी काय ?) आज आपण फडक्यांचा उल्लेख तसा करता कामा नये, आपण त्यांचा सन्मानपूर्वकच उल्लेख करायला हवा हे मला मान्य आहे. परंतु फुल्यांनी तसा उल्लेख केला म्हणून गहजब करण्यात अर्थ नाही. स्वतः न्यायमूर्ती रानडयांनी वासुदेव बळवंताना 'ज्ञानप्रकाश' पत्रात लेख लिहून 'माथेफिरू देशभक्त' म्हटले होते. 'त्याच्या माथेफिरू देशभक्तीची त्याच्या विवेकशक्तीवर कुरघोडी झाल्यामुळेच आपल्या देशबांधवांपैकी बऱ्याच जणांना अवर्णनीय दुःखात लोटण्यास तो कारणीभूत झाला.... उद्या जर ब्रिटीश साम्राज्य उलथून टाकण्यात आले तर या देशावर त्याच्याहून दुसरे अधिक मोठे संकट येणार नाही. हिंदुस्थानातील ब्रिटीश राज्य हा एक शाप तर नाहीच, पण अगदी बावनकशी वरदान आहे'[१७६] असे न्या. रानडयांनी मत व्यक्तवले होते. न्या. रानडे काही ब्रिटीशधार्जिणे नव्हते. परंतु त्यावेळची परिस्थितीच अशी होती की हयापेक्षा वेगळी प्रतिक्रिया संभवत नव्हती.

'स्वातंत्र्याच्या चळवळीचा आद्य प्रणेता' म्हणून ओळखला जाणाऱ्या विष्णुशास्त्री चिपळूणकरांनी त्यांना 'यःकश्चित दरवडेखोर' म्हटले होते.[१७७] तत्कालीन वृत्तपत्रांतही त्यांच्याबद्दल '**दरोडेखोर फरारी**' अशाच शब्दांत बातम्या येत असत.[१७८]

स्वत: वासुदेव बळवंतांनी कोर्टामध्ये ते रामोशी वगैरे दरोडेखोर अशा वाईट लोकांना पकडून सरकारकडे देण्यासाठी त्यांच्यात सामील झाले होते असे सांगितले होते.[१७९]

वासुदेव बळवंत फडके हे जरी क्रांतिकारक होते तरी त्यांची सामाजिक वर्तणूक मात्र सनातनीपणाचीच होती. त्यांनी तुरुंगात 'ब्राह्मणाने शिजविलेलेच अन्न मी खाईन,' असे सांगून दुसऱ्याने काढलेले पाणी पिणे धार्मिक शुचितेविरुद्ध आहे म्हणून नाकारले होते.[१८०]

राजकीय स्वातंत्र्यासाठी क्रांतिकारक देशभक्तांनी केलेले बलिदान हे त्यांनी समर्पिलेले महान दान होते. परंतु त्यांच्या बुद्धीत कनिष्ठ वर्गाची दु:खे समजून घेण्याची कुवत नव्हती वा बदलत्या युगधर्माची लक्षणे ओळखण्याची कुवत नव्हती. ज्या समाजव्यवस्थेने त्यांना वंशपरंपरेने सर्वांत वरच्या पायरीवर उभे केले होते आणि बहुजनसमाजाला पायाशी कुजत, सडत ठेवून त्यांना उत्कर्षाची संधी ठेवली नव्हती त्या जातिसंस्थेविषयी त्यांनी ब्र सुद्धा काढला नाही.[१८१]

हुतात्मा दामोदर हरि चाफेकर यांनी आपल्या आत्मचरित्रात सुधारकांचा धेड' म्हणून धिक्कार केला आहे. महात्मा फुल्यांच्या सत्यशोधक समाजाचे कार्य ब्राह्मणद्वेष पसरविण्याचे आहे असा आरोप करून हचा समाजाचे वृत्तपत्र 'दीनबंधू' ब्राह्मणनिंदेने भरलेले असते व त्याचे संपादक लोखंडे हे अवकलशून्य आहेत असे म्हटले होते. यावरून या क्रांतिकारकांची सामाजिक भूमिका लक्षात यावी.

म. फुल्यांना वाटे की कंगाल शेतकऱ्याची मुले चोर-बंडखोरांच्या नादी लागून आपल्या जिवास मुकतात हे चांगले नाही. ते म्हणतात, 'भूदेव [या एकाच शब्दातून त्यांनी 'सनातनीपणाचा' निषेध केला आहे] वासुदेव फडकेच्या नादी लागून बहुतेक अज्ञानी, शूद्र रामोशी काळचा पाण्यास व कित्येक तर फाशी गेले.'[१८२]

वासुदेव बळवंतांच्यामुळे गरीब शेतकऱ्यांवर सरकारने पोलीसखर्च वसूल करण्यासाठी दंड लादला त्यामुळेही फुल्यांना त्यांचा राग आलेला असावा.[१८३]

दुसरीकडे ज्यांनी ब्रिटिशांना इथे यायला मदत केली तेच ब्रिटिशांविरुद्ध बंड करतात यामुळे त्यांच्याबद्दल फुल्यांना शंका वाटत असावी असे दिसते. ते म्हणतात– 'अरे, तुमच्यातीलच राघूभरारीने प्रथम इंग्रजांस उलटे दोन आणे लिहून देऊन त्यांस तळेगांवास आणिले. तुम्हीच गोरे गैरमाहितगार साहेब लोकांस लांडचालबाड्या सांगून आम्हा माळचा, कुणब्यांस भिकारी केले आणि तुम्हीच आता आपल्या अंगात एकीचे सोंग आणून इंग्रज लोकांचे नावाने मनगटे तोडीत फिरता?[१८४]

सर्व सरकारी महत्त्वाच्या पदांवर जाऊन त्याचे फायदे सर्वप्रथम घेणारेच लोक इंग्रजांविरुद्ध बोलतात हे पाहून त्यांच्याविषयी अविश्वास निर्माण होणे स्वाभाविकच होते. १८५७ च्या बंडाच्या धामधुमीत पुण्यात गणू माळी आणि मौलवी नुरुल हुदा यांना पकडून शिक्षा फर्माविण्यात आली होती. हे दोघेही जोतीरावांच्या मित्रपरिवारातील होते. त्यामुळे युरोपियन लोकांच्या मनात जोतीरावांविषयी

सशय निर्माण झाला. त्यांच्यापैकी बरेच जण जोतीरावांच्या कार्याला मदत करीनासे झाले.[१५५] म्हणजेच कार्याची हानी झाली. यास्तव त्यांना खेद वाटतो. वैयक्तिक फायदेतोटे यासाठी अगर स्वार्थासाठी त्यांनी कधीच विचार केला नाही. चिपळूणकर, लोकहितवादी, रानडे हे सरकारी नोकरीत होते तरी त्यांनी स्वाभिमान जपला. म. फुल्यांनी तर कधीही सरकारी नोकरी केली नाही की 'रावबहादूर' वगैरे पदव्यांच्या आशेने सरकारचे लांगूलचालन केले नाही. या प्रथम श्रेणीतील काही देशभक्तांचा अपवाद वगळता अनेक लोकांनी केवळ वैयक्तिक स्वार्थ, नोकरीतील बढती यासाठी सरकारचा अनुनय केला. म. फुल्यांनी सरकारबद्दल जर वाईट उद्‌गार काढले नसतील तर ते केवळ कार्यहानी होऊ नये, एवढ्याचसाठी. व्यक्तिगत स्वार्थासाठी ते कधीही असे वागले नाहीत.

म्हणून १८५७ चे बंड किंवा पेशवाई अगर वासुदेव बळवंत फडके यांच्याबद्दलची म. फुल्यांची मते पाहून त्यांना स्वजनद्रोही, देशद्रोही म्हणणे हा नुसताच अन्याय नाही तर ती जाणीवपूर्वक केलेली बदनामी होय.

पेशवाईतील वाईट गोष्टींचा किंवा बंडातील अनुचित कृत्यांचा अभिमान कशासाठी मिरवायचा? सावरकरांनी दुसऱ्या बाजीरावाच्या राष्ट्रद्रोही कारवायांचा निषेध करून 'असला हा बाजीराव मेला याबद्दल मृत्यूचे आभारच आहे' असे उद्‌गार काढले आहेत.[१५६] लोकमान्य टिळकांनी उत्तर पेशवाई बेजबाबदार आणि हीन दर्जाची होती असे म्हटले होते. लोकहितवादींनी तर पेशवाईवर अत्यंत जोरदार हल्ला केला होता. जोतीराव हे ब्राह्मण जमातीवर जितका कडाडून हल्ला करीत तितकेच उलट अंतरंगातून अत्यंत मऊ आहेत हेही त्यांच्या प्रत्यक्ष वर्तनावरून दिसून येते. ज्या ज्या ब्राह्मणांनी सहकार्य वा अल्पस्वल्प वा मोठी मदत सत्यशोधक समाजास केली तिची पावती अत्यंत नम्रपणे व प्रेमळ बंधुत्वाने त्यांनी दिलेली आहे. त्यांचा हल्ला पद्धतीवर होता, विशिष्ट जातीतील माणसांवर नव्हता. हा विवेक त्यांच्या हृदयात सतत जागृत होता.[१५७]

तटस्थपणे विचार करणाऱ्या अभ्यासकांना तर्कतीर्थांचे विवेचन पटायला हरकत नाही. ५७ सालचे बंड फसले याबद्दल जोतीरावांना यत्किंचितही विषाद न वाटता आनंदच वाटला. त्यांनी त्याची कारणमीमांसा जी केली आहे ती शुद्ध शास्त्रीय दृष्टीला महत्त्वाची वाटेल अशीच आहे. ते म्हणतात, 'त्या बंडात इंग्रजी राज्य गेले असते तर इतिहासाची पुनरावृत्ती घडली असती. ब्राह्मण पेशव्यांच्या राज्याचा पुन्हा अवतार झाला असता. श्रुति–स्मृति-पुराणातील हिंदुसंस्कृतीला पुन्हा जोर चढून शूद्र व अतिशूद्र असलेल्या बहुसंख्य जनतेच्या उद्धाराची आशा जी इंग्रजी राज्यामुळे अंकुरित झाली आहे, ती पार ठार झाली असती. सामाजिक अन्याय हा हजारो वर्षांचा आहे. त्याची मुळे फार खोल गेली आहेत. इंग्रजी राज्य आज आहे आणि उद्या नाही. मुख्य प्रश्न सामाजिक गुलामगिरी कशी नष्ट होईल हाच आहे. या सामाजिक गुलामगिरीचे मूळ ब्राह्मणी धर्मात व ब्राह्मणांनी निर्माण केलेल्या धर्मग्रंथांत आहे.'[१५८]

❋

म. फुल्यांचे कार्य

माणुसकीच्या सुगंधासाठी !

११ मे १८८८ रोजी मुंबईच्या मांडवी येथील कोळीवाडा सभागृहात हजारोंच्या संख्येने उपस्थित राहून सामान्य जनतेने जोतीरावांना 'महात्मा' ही पदवी उत्स्फूर्तपणे दिली.[१८९]

'महात्मा– महानुभाव पंथातील व्यक्ती, मोठा धैर्यवान, पराक्रमी मनुष्य, थोर मनाचा, उदार, महानुभाव (महाआत्मा)'[१९०]

महात्मा फुल्यांचे समग्र कार्य आणि विचार यांचे परिशीलन केल्यानंतर कोणीही तटस्थ वृत्तीचा अभ्यासक प्रांजलपणाने निश्चितच कबुली देईल की 'होय, जोतीराव फुले महात्माच होते.' त्यांच्या या ऐतिहासिक स्थानाला हात घालण्यापूर्वी डॉ. गांगल यांनी थोडा जरी सारासार विचार केला असता तरी त्यांच्या लक्षात आले असते की ज्या मुद्यांवर सगळी भिस्त ठेवून ते महात्मा फुल्यांची नालस्ती करू पाहत आहेत ते सर्व अतिशय ठिसूळ, तात्कालिक स्वरूपाचे, स्वभावदोषांमुळे उद्भवलेले किंवा कालसापेक्षतेमुळे निर्माण झालेले होते. त्यात एकही असा दोष नाही की ज्याच्या आधारावर जोतीरावांच्या महात्मापदाला आव्हान देता येईल.

डॉ. गांगल यांच्या अप्रामाणिक वृत्तींवर विदारक प्रकाशझोत टाकल्यावर लक्षात येते की त्यांनी मुद्दाम केलेला मतविपर्यास, तर्कदुष्टतेने जोडलेले संबंध, खोट्या साधनांनिशी नवसंशोधनाचा आव आणून बनावट पुराव्यांवर आधारित केलेले हे लेखन म्हणजे म. फुल्यांचे द्वेषपूर्ण अवमूल्यनच आहे यात शंका नाही

आता ज्या भाषेबद्दल स्वत: संपादक बेहेरे दिलगिरी व्यक्त करतात ती डॉ. गांगल यांची भाषा खरं तर बेमुर्वतखोरपणाचा एक नमुना म्हणून ओळखावी अशी भाषा आहे.

स्वत:च्या डबल पीएच. डी. ची आणि आजवरच्या सर्व लेखनाची विश्वासार्हता संपुष्टात आणणारा हा आत्मघातकी प्रयत्न त्यांनी का केला असावा असा

विचार करताना लक्षात आले की डॉ. गांगल यांची ठाम समजूत झाली आहे की म. फुले हे ब्राह्मणद्वेष्टे होते. आणि हे प्रमेय मनाशी ठाम करून ते सिद्ध करण्यासाठी शिवाजी महाराजांच्या नावाची चिथावणी, किंवा म. फुल्यांना स्वजनद्रोही अगर स्वदेशद्रोही ठरवायचा त्यांनी केलेला प्रयत्न हा या प्रमेयाच्या सिद्धतेसाठी वापरलेला एक डावपेच आहे.

म. फुल्यांनी अगदी कठोर भाषेत 'ब्राह्मण्या'वर हल्ला केलेला आहे हे नाकारण्याचे काहीच कारण नाही. महात्मा फुल्यांच्या भाषेने अनेक ठिकाणी तर अशिष्टरूप धारण केले आहे हेही खरे आहे. परंतु म्हणून गांगलांचे समर्थन करता येईल का ?

'न्या. रानडेपूर्व साऱ्याच विचारवंतांच्या, सर्वच क्षेत्रातील लेखकांच्या लेखनाचे स्वरूप सखोल तत्त्वचिंतनात्मक असण्यापेक्षा भावनात्मक, एकेरी स्वरूपाचे आढळते. प्राथमिक स्वरूपाच्या तात्कालिक प्रतिक्रियेतून हे असे होणे स्वाभाविकही असेल... लोकहितवादी, फुले या दोघांचाही तत्कालीन ब्राह्मणवर्गावर कटाक्ष दिसतो. त्या काळच्या समाजाचे धुरीणत्व ब्राह्मणांकडे असल्याने साऱ्या सामाजिक दोषांचे खापर त्यांनी या वर्गावर फोडले, यात एकांगीपणा असला तरी व्यक्तिद्वेषाचा भाग नव्हता व समाजसुधारणेची जिवंत तळमळ होती.' [११] ही डॉ. गो. म. कुलकर्णी यांची या बाबतीतली प्रतिक्रिया बोलकी आहे.

म फुल्यांनी नेतृत्व करणाऱ्या सर्वच गटांवर हल्ला केलेला आहे. क्षत्रियांचा वर्णविषयक अहंकारही त्यांना तितकाच आक्षेपार्ह वाटत होता हे त्यांच्या वाङ्मयातील 'एक खासा मराठा म्हणविणाराशी' त्यांनी केलेला संवाद वाचल्यास लक्खपणे स्पष्ट होते.

ज्यांच्या आईच्या आज्याची मावशी अथवा बापाच्या पंज्याची मुलगी, शिंद्याचे अथवा गायकवाडाचे घराण्यातील खाशा अथवा खर्ची मुलास दिली होती येवढचा कारणावरून माळी, कुणबी, धनगर वगैरे शेतकऱ्यांत मराठ्यांचा डौल घालून शेखी मिरविणाऱ्या कर्जबाजारी, अज्ञानी लोकांच्या अवस्थेवर म. फुल्यांनी बोचऱ्या उपरोधाने जो हल्ला केला आहे[१२] किंवा 'आपण टोपाजी मोऱ्याचे पूत हणगोजीराव आहोत असे म्हणवून घेणारे' जे कारभारी आहेत त्यांच्या मर्मावर, खोट्या प्रतिष्ठेवर त्यांनी केलेला प्रहार हा सर्वच प्रकारच्या दांभिकतेचा बुरखा फाडणारा आहे.

'अशाप्रकारचे अक्षरशून्य, मुजोर, अधम, कारभारी शेतकऱ्यांमध्ये पुढारी असल्यास त्या अज्ञानी शेतकऱ्यांची व त्यांच्या शेतांची सुधारणा कधी व कशी होणार बरे ?' ही त्यांची काळजी होती. म. फुल्यांनी इनामदार, जहागिरदार वगैरेनाही धारेवर धरलेले आढळते.

बहुतेक इनामदार– जहागिरदारांस आपल्या पूर्वजांनी काय काय पराक्रम केले, कसकशी संकटे भोगिली याची कल्पना मनात न येता, ते ऐत्या पिठावर रेषा

ओढून, अशिक्षित असल्यामुळे दुष्ट व लुच्चे लोकांचे संगतीचे रात्रंदिवस ऐषआरामात व व्यसनांत गुंग होऊन गेलेले असतात... धर्माचे योगाने अंध जहालेले, राज्यकारभार स्वतंत्र रीतीने पाहण्याचे आंगी सामर्थ्य नसल्यामुळे केवळ दैवावर भार टाकून ब्राह्मण कारभाऱ्यांच्या ओंझळीने पाणी पिऊन दिवसा गोप्रदाने व रात्री प्रजोत्पादन करीत स्वस्थ बसतात.'[१९३] महात्मा फुल्यांचा राग जातीचा तोरा मिरविणाऱ्यांवर किती असावा? असे अजाणते ठोंबे केवळ बडचा घराण्यातील सरदारांचे पुत्र असले म्हणजे त्यांस ऑनररी माजिस्तेटाचे हुद्दे देतात. 'जे आपण आपल्या जाती पोकळ श्रेष्ठपणाचा तोरा मिरविणारे असून, बाकीच्या एकंदर सर्व जातीच्या लोकांस नीच मानणारे असतात, त्या सर्वांवरून त्यांनी नीच मानलेल्या एकंदर सर्व जातींच्या लोकांनी त्यांच्या न्यायाच्या नावाने का शिमगा करावा?'[१९४] 'कित्येक तरुण खासे घोडचावर बसून भालेबोथाट्याची बरीच टूरटूर करिता, (प्रत्यक्षात) ते काळचा कपिला गाईचे वाप! ते आपल्या पागोट्याला पिळावर पिळ घालून वडिलांच्या अब्रूचा खराबा करून शूद्र शेतकऱ्यांचे उरावर खायला काळ आणि धरणीला भार मात्र झाले आहेत.'[१९५] 'वैल' म्हणून जेव्हा महात्मा फुले ठणकावतात तेव्हा त्यांचा संताप कसा उफाळून आलेला दिसतो.

म. फुले यांचा हल्ला दांभिकपणावरचा होता– मग तो ब्राह्मणांचा असो की ब्राह्मणेतरांचा. त्यामुळे म. फुल्यांनी ब्राह्मणांचा द्वेष केला हा आक्षेप वस्तुस्थितीला धरून नाही. आणि ब्राह्मणांवर/पुरोहितशाहीवर टीका काय फक्त म. फुल्यांनीच केलीय?

म. फुल्यांचा हल्ला मध्यस्थांवर होता. आम्ही जर निर्मिकाचे पुत्र आहोत (फुले परमेश्वराला निर्मिक म्हणत असत), तर मग त्याला भेटताना मधल्या दलालाची गरजच काय, हा त्यांचा रोकडा सवाल होता.

विवेकानंदाचा पुरोहितशाहीवर हल्ला

विवेकानंदांनीही पुरोहितशाहीवर कठोर आघात केलेला होता. 'आधी त्या दुष्ट पुरोहितांना दूर करून टाका, हे बिनडोक लोक कधीही चांगल्या गोष्टी ऐकायला तयार व्हावयाचे नाहीत. त्यांचे हृदयही शून्य होऊन बसले आहे, त्याचा विकास–विस्तार कधीही होणे शक्य नाही. शेकडो शतकांच्या खुळचट समजुतींमध्ये आणि अत्याचारांमध्ये यांचा जन्म गेला.'[१९६]

विवेकानंद फक्त पुरोहितांवरच हल्ला करून थांबत नाहीत. 'आपल्या आर्य बापजाद्यांची बढाई मारा, भारताच्या जुन्या जमान्यातील मोठेपणाचे गोडवे रात्रंदिवस गा, की आम्ही अमुक, आम्ही तमुक म्हणून. हवा तितका डमडम करून डांगोरा पिटा. तुम्ही उच्चवर्णीय जिवंत का आहात? तुम्ही आहात दहा हजार वर्षांच्या 'ममी'! पेंढा भरलेली मढी! आणि ज्यांची चालते–बोलते 'स्मशान' म्हणून तुमच्या पूर्वजांनी घृणा केली तेच खरोखर आज 'जिवंत' आहेत. भारतामध्ये जे

काही जीवन शिल्लक आहे ते केवळ त्या लोकांच्या ठायी आहे. आणि चालतें-बोलते स्मशान जर कुणी असेल तर ते तुम्हीच! तुम्ही उच्चवर्णीय!'[१९७]

प्रख्यात इतिहासकार त्र्यं. शं. शेजवलकर म्हणतात, 'महाराष्ट्रेतिहासाबद्दल निश्चित मते उघडपणे सांगण्यात आजवर ब्राह्मणांकडून अक्षम्य टाळाटाळ झालेली आहे. संशोधक ब्राह्मण, इतिहासलेखक व विवेचक ब्राह्मण, विषय ब्राह्मणांच्या अभिमानाच्या राज्याचा, संपादक ब्राह्मण, शिक्षक ब्राह्मण, व्याख्याते ब्राह्मण, चळवळी त्यांनीच काढलेल्या आणि या सर्वांचे श्रोते, वाचक व अनुयायी तेही ब्राह्मण. यात क्वचित कोठे अपवादात्मक ब्राह्मणेतर असेल. या सर्व बनावाचा दुष्परिणाम असा की ब्राह्मणांची कर्तबगारी... अशा तऱ्हेने फुगविण्यात, सोज्वळ करण्यात, चुकीची म्हणूनच खोटी करून सांगण्यात शक्य तेवढी जास्त कोशीस करण्यात आली आहे. याचा परिणाम मुख्यतः ब्राह्मणांवरच जास्त वाईट तऱ्हेचा झालेला आहे.'[१९८]

१८९५ साली प्रिन्सिपल शि. म. गोळेंनी 'ब्राह्मण आणि त्यांची विद्या' हा ग्रंथ लिहिला. त्याची प्रस्तावना मोठी उद्‌बोधक व तत्कालीन समाजावर चांगला प्रकाश टाकणारी आहे. 'ब्राह्मणादी पांढरपेशा साक्षर लोकांतील 'अज्ञ, अजगरवृत्ती, अजागळ, श्ववृत्ती' अशा बहुसंख्य ब्राह्मणांचा वर्ग सोडला तर बाकीच्यांत काही पेनलोप राणीच्या पाणिग्रहणार्थ जमलेल्या राजपुत्राप्रमाणे घमंडानंदन आहेत... त्यांचा अविचार, त्यांची नीच कृत्ये, त्यांचे औद्धत्य, त्यांचा अप्रामाणिकपणा व त्यांचा भेकडपणा यांपैकी कोणा एकाचेही आविष्करण केल्यास ते तत्काळ भरतभूमीचे प्रबल शत्रू होण्याचा आव घालतात... ते दुसऱ्याच्या आश्रयाने कृष्णसर्पाप्रमाणे राहिलेले दिसतात व त्यांच्या शेपटावर पाय पडताच ते फोफो करून बाहेर पडून जो पुढे दिसेल त्याचा चावा घेतात. तो अहंकाराच्या किल्ल्यात उपोषित पण सुरक्षित वसलेला आहे. त्यास सावध करण्यास भयंकर तोफखाना सुरू केला पाहिजे.'

लोकहितवादींनी अशा तोफा डागल्या होत्या, 'ब्राह्मणासारखा गर्विष्ठ पृथ्वीवर दुसरा कोणी नसेल; कारण त्यांनी जरी आपला धर्म व कर्म सोडिले, किती एक लबाड लुच्चे आहेत, किती एक मूर्ख आहेत, कितीएक भडवेपणाचे रोजगार करितात, किती एक रांडांचे मागे तबले वाजवितात, असे निर्लज्ज झाले आहेत, तरी त्यांस असे वाटते की आम्ही इतके केले तरी उत्तम कुळंब्यांपेक्षा आम्ही चांगले व श्रेष्ठ आहोत.'[१९९] खरं तर हे अवतरण इतके जळजळीत आहे की तेच जर फुल्यांनी लिहिलेले असते तर लगेच 'ब्राह्मणद्‌वेष्टा' असा त्यांच्यावर आरोप आला असता. म्हणजे परिस्थितीचं वास्तव वर्णन आहे की नाही यापेक्षा ते करणारा कोण यावरून जर आम्ही आरोप-प्रत्यारोप करणार असू तर मग हेतूचे आरोप कुणावरही करता येतील. पण त्यात काही अर्थ नसतो, हा विवेक जागवणे गरजेचे आहे. म. फुल्यांनी केलेली टीका, गुणात्मक आशय पाहता, याच प्रकारची आहे. एवढेच काय, न्या. रानड्यांसारख्या समन्वयवादी विचारवंतानेसुद्धा शास्त्रीय दृष्टीने अभ्यास

करूनही 'विद्या असो की नसो, ब्राह्मणांकरिता दक्षिणा आणि जेवण यांची भरपूर तरतूद सरकारने केली. त्यामुळे पुणे शहर हे ब्राह्मण भिकाऱ्यांचे मोठे जंगी केंद्रच बनले... ब्राह्मणशाहीचे वर्चस्व अठराव्या शतकाच्या शेवटच्या विभागात पराकाष्ठेला पोचले आणि हेच वर्चस्व अवनतीस कारण झाले'[२००] असा निष्कर्ष काढलेला होता.

म. फुले आणि इंग्रज

म. फुल्यांवर 'ते ब्रिटिशांचे एजंट होते' अशासारखे भरमसाठ आरोप करणारे काय, एकूण मूळ पुरावे न पाहता, केवळ दंतकथांवर, विश्वास ठेवून, अशा समजुती वर्षानुवर्षे पसरवीत राहतात. अभ्यासकही खोलात जाऊन चिकित्सा न करता निव्वळ विधाने करून मोकळे होतात याचे आश्चर्य वाटते.

इंग्रजांनी या देशात आधुनिक उत्पादनपद्धती, आधुनिक शिक्षण आणि सामाजिक समतेचे तत्त्व यांची प्रस्तावना केली. अंधश्रद्धेऐवजी आणि शब्दप्रामाण्याऐवजी वास्तव आणि तर्कशुद्ध विचारांची नवसंस्कृती इंग्रजांनी येथे आणली. इहवादाची, विज्ञाननिष्ठेची संकल्पना इथे आणली. संस्थात्मक जीवनाचा पाया घातला. समतेवर अधिष्ठित कायदा आणि सुव्यवस्था, शांतता, स्वातंत्र्य, हक्क आणि अधिकार ह्या संकल्पना आणल्या. म्हणूनच जोतीरावांनी इंग्रजांबद्दल भले उद्गार काढले. असे भले उद्गार पहिल्या आणि दुसऱ्या पिढीतल्या अनेक विचारवंतांनी काढलेले आहेत. त्यांना आपण ब्रिटीशधार्जिणे ठरवतो काय? अर्थात ठरविता कामा नये. तर ब्रिटिश आल्यावर इथल्या अनागोंदीच्या पार्श्वभूमीवर सर्वसामान्य जनतेने त्यांचे उत्स्फूर्त स्वागत केलेले होते हे विसरता कामा नये. लोकहितवादी म्हणतात- 'ईश्वरानेच या देशात इंग्रजांची प्रेरणा केली आहे.'[२०१]

न्या. रानडे म्हणत, 'इंग्रजी राज्य आपल्यावर आले ते ईश्वरी कृपेने, आपल्या कल्याणासाठीच आले. (Divine Dispensation)'[२०२]

बाबा पदमनजींनी म्हटले आहे, 'निष्पक्षपाताने विचार केला असता असे दिसून येईल की ह्या देशाच्या कल्याणार्थ ईश्वराने इंग्रजांस एथे आणिले.'[२०३]

लोकमान्य टिळकांसारखा पहिला राष्ट्रवादी लोकनेता ज्याअर्थी असे म्हणतो की, 'इंग्रजी राज्यात हिंदुस्थानात जे अनंत फायदे झाले ते व तसे इंग्रजांखेरीज इतरांच्या हातून कालत्रयीही झाले नसते'[२०४] ह्याचा अर्थ काय घ्यायचा?

विष्णुशास्त्री चिपळूणकरांनीही इंग्रजी विद्येचा गौरव 'वाघिणीचे दूध' असा केला होता.

ज्या राष्ट्रीय सभेने भारताला स्वातंत्र्य मिळवून दिले त्याही सभेत अनेक वर्षेपर्यंत अधिवेशनाच्या प्रारंभी इंग्लंडच्या महाराणीच्या भाग्योदयाकरिता प्रार्थना म्हटली जात असे!

बाळशास्त्री जांभेकर या पहिल्या मराठी वृत्तपत्रकाराने, जो देश बलात्कार,

जुलूम आणि कुनीती यांचे घर होता तो इंग्रजांमुळे निर्भयपणा आणि स्वतंत्रता उपभोगीत असल्याबद्दल इंग्रजांना 'दर्पण'च्या पाहिल्या लेखात धन्यवाद दिले आहेत.[२०५]

भारतातील इंग्रजी सत्तेविषयी कार्ल मार्क्स १८५२–५९ या काळातील आपल्या लेखनात म्हणतो 'हिंदुस्थानात सामाजिक क्रांती घडवून आणण्यात इंग्लंडची स्वार्थबुद्धी अत्यंत नीचपणाची होती हे खरेच, परंतु हिंदुस्थानात सामाजिक क्रांती आणण्यास ब्रिटन हे, स्वतःला नकळत का होईना, इतिहासाचे हत्यार बनले ही गोष्ट मान्य केलीच पाहिजे.' कार्ल मार्क्सचे संशोधन व दीर्घ व्यासंगातून आलेले प्रतिभाशाली विचार जोतीरावांच्या तोंडून स्वयंप्रज्ञेने बाहेर पडत होते.[२०६]

इंग्रज जाणारच

इंग्रजांची परकीय राजवट आज ना उद्या जाणार याची स्पष्ट कल्पना जोतीरावांना होती. म्हणून तर ते म्हणतात, 'इंग्रज लोक आज आहेत, उद्या नाहीत, ते आपल्या जन्मास पुरवतील म्हणोन कोणाच्याने खास करून सांगवत नाही. यास्तव त्या लोकांचे राज्य या देशात आहे, तोच आपण सर्व शूद्रांनी जलदी करून भटांच्या वडिलोपार्जित दास्यत्त्वापासून मुक्त व्हावे यामध्ये मोठा शहाणपणा आहे.'[२०७]

म. फुले ब्रिटिशधार्जिणे होते हे सांगण्यासाठी सदैव जे अवतरण उद्धृत केले जाते ते काय आहे? 'अशाप्रकारे मदांध होऊन प्रजेशी क्रूर रीतीने वागणारे जे राजे लोक व त्यांचे जातीचे लोक यांची सत्ता सर्वशक्तिमान जो परमेश्वर याने हरण करुन त्यांस त्यांचे अपराधानुरूप शासन दिले आणि कनवाळू होऊन आपले दुःखांनी पीडित अशा शूद्रादिअतिशूद्र प्रजेस परमन्यायी, हितावह, सौख्यकारक, सदाचारी आणि शांत असे राज्य इंग्रज सरकारच्या अंमलाखाली प्राप्त करून दिले. सबब ती **त्या प्रभूची फार फार ऋणी आहे व त्यास रात्रंदिवस अशी प्रार्थना करीत आहे की 'हे प्रभो, आम्हांस हे राज्य चिरकाल असो दे.'** कारण हे राज्य झाल्यामुळे प्रजेस पूर्वीच्या राज्यात (भटशाहीमध्ये) जे काही द्वेषामुळे, धर्मसंबंधाने, नीतिसंबंधाने, आणि दुसऱ्या अनेक गोष्टींच्या संबंधाने जुलूम होत असून, त्या सर्वांतून ती एकदाची सुटली.'[२०८] पुढे जोतीरावांनी इंग्रजी राज्यामुळे मालमत्तेची सुरक्षितता शिक्षण, दवाखाने, पूल, कॅनॉल अशा विविध सुविधा मिळाल्याचे वर्णन केले आहे. या ठिकाणी लक्षात घ्यावयाची गोष्ट अशी हे राज्य चिरकाल राहू दे अशी सर्वसामान्य लोकांची जी भावना आहे ती जोतीरावांनी फक्त शब्दांकित केली आहे, ते त्यांचे केवळ स्वतःचे मत नाही. जनता काय म्हणत आहे, ते नोंदविताना त्यांनी वास्तव सांगितले आहे, स्वतःला तसे वाटतेय असे कुठेही म्हटलेले नाही हे विसरता कामा नये.

एकतर इंग्रज येथे आले ते जोतीरावांमुळे नाहीत. ते आले इथल्या नादान राज्यकर्त्यांमुळे! जोतीरावांनी स्वतःला 'रावबहादुरी' वगैरे मिळावी म्हणून कधीही सरकारचे लांगूलचालन केलेले नाही. याउलट अनेकदा सरकारचा रोष पत्करून

स्त्रीशूद्रांच्या हितासाठी सरकारवर टीका केलेली आहे. ते म्हणतात 'लक्ष्मी वस्त्रहीन व ज्ञानहीन शेतकऱ्याला सोडून इंग्रजांकडे गेली. म्हणून इंग्रज आपल्या हस्तगत झालेल्या शूद्र शेतकऱ्यांपासून मन मानेल तसे द्रव्य गोळा करून त्यांना वरकांती गोड बोलून विद्या देण्याची मात्र चुकवाचुकव करतात. त्याचे मुख्य कारण हेच असावे की शेतकरी विद्वान झाल्यावरोबर लक्ष्मीस आपल्या घरी नांदावयास परत आणील हचा भयास्तव इंग्रज त्याला ज्ञान देत नाहीत. कारण तसे घडून आल्यास त्या सर्वांस (इंग्रजांस) दोम दोम करीत अमेरिकेत जाऊन तेथे रात्रंदिवस कष्ट करून आपली पोटे भरावी लागतील.'[२०९]

स्वातंत्र्याचे भाकीत करताना स्त्रीशूद्रातिशूद्रांना ज्ञान मिळण्याची पूर्वअटच जणू त्यांनी उद्घोषित केली आहे.

इंग्रजांवर टीकेचा आसूड

'इदर थापडी तिदर थापडी करणारे', 'जिकडे घुगऱ्या तिकडे उदय उदय म्हणणारे' सरकार अशा शब्दांत त्यांनी सरकारच्या संधिसाधूपणावर हत्यार धरलेले आहे. सरकारला भेकड म्हटलेले आहे.[२१०] ब्रिटिश सरकार स्वतःच्या देशातील मालाला उत्तेजन देण्यासाठी, आपल्या स्वार्थासाठी आयात वाढवून, नाना युक्त्या करून बेसमज रयतेचे बेलगामी द्रव्य लुबाडून आपल्या तुंबड्या भरीत आहे'[२११] असा परखड आरोप जोतीराव करू शकले ते स्वतःच्या निःस्पृहतेमुळेच ना?

आर्यभट ब्राह्मणांची वृत्ती म्हणजे कामपुरती एकी ! आणि काम भागल्यावर 'तू तिकडे आणि मी इकडे; कारण, ये गे कोयी, तुझी डोयी भाजून खाई आणि माझी डोयी ब्याला ठेवी' अशा नेमक्या शब्दांत जोतीरावांनी स्वार्थी वृत्तीवर बोट ठेवले आहे. जर त्यांना खरीच एकी करायची असेल तर त्यांनी दुष्ट धर्मास जलसमाधी देऊन, जातिभेदाच्या उरावर थयथया नाचून, भेदाभेद सोडले पाहिजेत व निर्मळपणे वागले पाहिजे. तरच सर्वांची एकी होईल व त्यातूनच या देशाची उन्नती होऊ शकेल[२१२] अशी त्यांची स्पष्ट घोषणा आहे.

मतलबी आर्यभट जोपर्यंत शूद्रातिशूद्रांस नीच मानतात, रोटीव्यवहार व बेटीव्यवहार करीत नाहीत तोवर आचारविचार, खाणेपिणे, रीतीभाती वेगळचाच राहणार व 'अशा अठरा धान्यांच्या कडबोळचातून एकमय लोक NATION (राष्ट्र) कसे होणार?'[२१३] हा जोतिरावांचा सवाल आहे.

'यावरून या बळीस्थानातील एकंदर शूद्रादि अतिशूद्रांसह भिल्ल, कोळी वगैरे सर्व लोक विद्वान होऊन विचार करण्यालायक होईतो पावेतो ते सर्व सारखे एकमय लोक झाल्याशिवाय Nation होऊ शकत नाही!'[२१४] असा दावा करणारी म. फुल्यांची तर्कशुद्ध भूमिका इतकी राष्ट्रवादी आहे की त्यांच्यावर ब्रिटीशधार्जिणेपणाचा आरोप करणारे डॉ. गांगल आणि त्यांचे समर्थक यांना थोडासा जरी सद्विवेक असेल तर त्यांनी आपला हा बिनबुडाचा आरोप बिनशर्त मागे घेऊन दिल-

गिरी व्यक्त करावी.

देशसुधारासाठी मांग–भट ऐक्य हवे

म. जोतीरावांचे स्वप्न होते— 'देशसुधारासाठी आमच्या रात्रंदिन ध्यानी। मांग भटा ऐक्य करू बसवू पंक्तीनी ।।'[२१५]

'धर्म राज्य भेद मानवा नसावे' अशी विश्वात्मक भूमिका घेणाऱ्या महात्म्याचे अंत:करण इतके व्यापक होते की–

'ख्रिस्त महंमद मांग ब्राह्मणाशी।
धरावे पोटाशी बंधू परी ।।
मानव भावंडे सर्व एकसहा।
त्यांजमध्ये आहा तुम्ही सर्व ।।'[२१६]

म. फुल्यांची नम्रता

म. फुले उदार, निरामय मनाचे होते म्हणूनच विनम्रही होते. 'जे काही मी माझ्या अल्पबुद्धीनुसार या ग्रंथात लिहिले आहे, त्यात जी आमच्या मानव स्त्रीपुरुष विद्वान व सूज्ञ वाचणाऱ्यांच्या ध्यानात व्यंगे दिसून येतील त्याविषयी त्यांनी क्षमा करून गुणलेशाचा स्वीकार करावा अशी त्या सर्वांस माझी विनंती आहे. आणि जरकरिता त्यांच्या अवलोकनात कोणताही भाग सार्वजनिक अयोग्य किंवा खोटा दिसला तो किंवा या ग्रंथाच्या दृढीकरणार्थ जर त्यांस काही सत्यविचार सुचविणे असेल तर ते त्यांनी वर्तमानपत्राद्वारे आम्हास कळवावे म्हणजे ते, खरेच विचारी पुरुषांचे असल्यास, आम्ही कृतज्ञतापूर्वक मान्य करून दुसऱ्या आवृत्तीत दाखल करू.'[२१७]

किती ही अभिजात नम्रता! अशा सुसंस्कृत, सभ्य, संवेदनशील मनाची काहीही दखल न घेता डॉ. गांगल जेव्हा म. फुल्यांच्या त्रुटींकडेच लक्ष देतात तेव्हा त्यांच्या दूषित दृष्टीची कीव वाटायला लागते.

पुरोहितांना जर पश्चात्ताप होत असेल तर सर्व शूद्रातिशूद्रांनी त्यांना त्यांच्या हल्लीच्या वा मागील नीच कर्माबद्दल सूड न घेता उदारपणे क्षमा करावी असे सांगणारी म. फुल्यांची उदारता डॉ. गांगलांनी याचा गंभीरपणे विचार करावा. ब्राह्मण विधवेचे मूल दत्तक घेण्याची निर्भयता, हरि गणेश पटवर्धन, भाऊ दाजी, गंगाधरशास्त्री, लोकहितवादी, गोवंडे, वाळवेकर अशा ब्राह्मण मित्रांना जाहीरपणे धन्यवाद देण्याची कृतज्ञता, या गोष्टी ब्राह्मणद्वेषाची साक्ष देतात काय?

'ब्राह्मण विधवांचे केशवपन थांबावे म्हणून म. फुल्यांनी केलेला आटापिटा आणि 'बालहत्त्या प्रतिबंधक गृह' काढून ब्राह्मण विधवांच्या बाळंतपणाची केलेली सोय ह्या गोष्टींतून म. फुल्यांचा जो अपार कळवळा व्यक्त होतो त्याला ब्राह्मणद्वेष म्हणता येईल काय ?

धर्मवेडाचा धिक्कार

* 'धर्मवेडेपणाने तर आमची सर्वस्वी हानी केली आहे'[३१८] अशी स्पष्ट धर्मातीत घोषणा केली.

* 'अज्ञानाने गांजलेल्या दुबळचा शूद्र शेतकऱ्यांस विद्यादान देऊन त्यांच्या बोडक्यावरील शेतसारा, टोल वगैरे पट्ट्या कमी न केल्यास थोडयाच काळात या जुलमाचा परिणाम फार भयंकर होणार आहे' [३१९] असा ऐषआरामी व उधळचा सरकारला जाहीर इशारा दिला, यातून सरकारवद्दलची त्यांची भूमिका किती परखड आहे ते दिसून येते.

* म. फुल्यांनी १८ जुलै १८८० रोजी दारूबंदीबाबत नगरपालिका अध्यक्ष प्लंकेट यांना खरमरीत पत्र लिहिले होते. 'थोडे दिन तरी मद्य वर्ज करा। तोच पैसा भरा ग्रंथासाठी ॥' अशी त्यांची शिकवणूक होती.

* २ मार्च १८८० रोजी डचूक आणि डचेस ऑफ कॅनॉट ह्यांना पुण्यात हरि रावजी चिपळूणकरांनी मेजवानी दिली तेव्हा शेतकरी वेषात अंगावर फाटकी घोंगडी घेऊन म. फुले समारंभाला गेले व त्यांनी 'खरा भारत खेडचात आहे' अशी राजपुत्राला माहिती दिली.

* ३० नोव्हेंबर १८८० रोजी पुणे शहरात हिंदुस्थानचे महाराज्यपाल लॉर्ड लिटन यांच्या स्वागताप्रीत्यर्थ एक हजार रुपये शहर सुशोभित करण्यावर खर्च करण्याच्या ठरावाला एकूण ३२ पैकी ३१ सदस्यांनी पाठिंबा दिलेला असताना एकटचा जोतीरावांनी ठरावाला विरोध केला व जनतेचा पैसा रोषणाईवर न उधळता तो विद्यादानाच्या कार्यी लावावा अशी सूचना केली.[३२०]

* पुण्यातल्या मंडईला राज्यपाल रे यांचे नाव दिल्यानंतरही म. फुल्यांनी आपला धोरणात्मक विरोध सोडला नाही. ह्या सर्व घटना पाहता त्यांच्यावर ब्रिटिश-धार्जिणेपणाचा आरोप करणे किती गैरलागू आहे ते स्पष्ट व्हावें.

* भारतात प्राथमिक शिक्षण सार्वत्रिक आणि सक्तीचे असावे अशी मागणी सर्वप्रथम म. फुल्यांनी केली होती.

* सर्व धर्मग्रंथ हे मानवनिर्मित आहेत, ते अपौरुषेय नाहीत अशी खणखणीत भूमिका घेऊन धर्मग्रंथांची चिकित्सा करण्याचे समाजक्रांतिकारक कार्य म. फुल्यांनी केले.

म. फुले माळी होते म्हणून त्यांनी 'माळी समाज' स्थापन केला नाही, तर सर्व स्त्री-शूद्रातिशूद्रांचा 'सत्यशोधक समाज' स्थापन केला अशी त्यांची व्यापक मानसिकता होती. जातिभेदाविरोधी तर ते आयुष्यभर झगडले. संपूर्ण आशिया खंडात सर्वप्रथम इहवादी, विज्ञाननिष्ठ, मानवी हक्कांची सनद मांडणारा आद्य समाजक्रांतिकारक म्हणून १९ व्या शतकाने त्यांच्या कार्यावर ऐतिहासिक शिक्कामोर्तब केलेले आहे.

फुल्यांची भूमिनिष्ठ शैली

शब्दाशब्दातील रूपभेदाकडे पाहणारा शैलीकार आणि संपूर्ण भूमिनिष्ठ शैलीचा अर्वाचीन मराठी साहित्यातील आद्यप्रणेता या शब्दांत भालचंद्र नेमाडे [३३१] यांनी त्यांचा गौरव केला आहे. उंटावरून शेळ्या हाकणाऱ्या ग्रंथकाराशी आमचे जमणार नाही असे स्पष्ट सुनावून म. फुल्यांनी मराठी ग्रंथकारसभेस (साहित्य-संमेलनास) उपस्थित राहायचे नाकारले होते. [३३२] डॉ. स. गं मालशे म्हणतात, 'अंतरीचा कळवळा आणि त्यामुळे बोलीभाषेशी असलेले नाते, प्रदीर्घ वाक्यरचनेचा जोरकसपणा, शब्दचित्ररेखाटनाचे सामर्थ्य, शब्दबंधातील नाट्यपूर्ण पदन्यास, विशेषणांची समर्पक योजना, उपहास, उपरोध, खावडावाचे अवगुंठन आणि उघडा-वाघडा रांगडेपणा आणि सर्वाधिक महत्त्वाची गोष्ट म्हणजे अनुभवाच्या क्षेत्राशी (त्यांनी) राखलेले इमान!' [३३३] ते पुढे म्हणतात, 'या लेखणीचे सामर्थ्य घणाघाती आहे. तिरीमिरीचे तडाखे हाणत असताना कधीकधी शिष्टसंमत औचित्याची लक्ष्मण-रेषाही ओलांडली गेली आहे. पण मनस्वीपणा हा फुल्यांचा प्रकृतीधर्मच आहे. त्यांच्याजवळ आतबाहेर काहीच नाही. जसा लेखक, तशी शैली म्हणतात, त्याचे याहून अधिक चांगले उदाहरण शोधून मिळणार नाही... बोलीभाषेशी नाते सांग-णारे एकोणिसाव्या शतकातले एक समर्थ गद्यशैलीकार म्हणून महात्मा फुल्यांचे स्थान मराठीत वैशिष्ट्यपूर्ण ठरते.'

म. फुल्यांनी समाजक्रांतिकारक म्हणून १९ व्या शतकावर ठसा उमटवला. परंतु त्यांचा मोठेपणा त्यांच्या समकालीनांपैकी, न्या. रानडे सोडले तर, इतरांना समजला होता असे दिसत नाही. त्यांच्या मतांचा विपर्यास तेव्हापासून आतापर्यंत सतत चालूच आहे. डॉ. गांगल हे 'त्या' परंपरेचे निष्ठावान पाईक आहेत. म्हणून डॉ. गांगल ही एक व्यक्ती न मानता प्रवृत्ती मानूनच त्यांचा विचार व्हायला हवा.

'धूर्त भटांनी मोठी कावेबाजी करून अज्ञानी शूद्रादिअतिशूद्रांना माझीच उलटी निंदा करावयास लावले आहे.' [३३४] ही गोष्ट फुल्यांनीच सांगितली आहे. फुल्यांनी त्याला 'कोल्हेभूक' म्हटले आहे.

'बहुजन समाजाला विद्याव्यासंगाचा वारसा नसल्याने त्यातील बंडखोर समाजचिंतकांनाही आपल्या कल्पनांची शास्त्रशुद्ध मांडणी करण्याची सवय नव्हती. तेव्हा जोतीरावांचे विचार जरी मौलिक, मूलगामी व ज्वलज्जहाल होते तरी त्यांचा आविष्कार अत्यंत अव्यवस्थित व ओबडधोबड स्वरूपात झाला असल्यास नवल नाही. मात्र त्यामुळे त्यांच्या विचारप्रणालीचा विपर्यास करून त्यांच्या मताचा अधिक्षेप करणे परंपराभिमानी उच्चवर्णीय लेखणीबहाद्दरांना सोपे गेले.' [३३५] हा म. फुले वाङ्मय आणि चळवळीचे भाष्यकार प्रा. गं. बा. सरदार यांचा अभिप्राय डॉ. गांगलांना किती सार्थपणे लागू पडतो!

प्रभाकर पाध्ये, गं. बा. सरदार, तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी, धनंजय कीर,

स. गं. मालशे, प्रभाकर वैद्य, भालचंद्र फडके, रा. ना. चव्हाण, मा. प. मंगुडकर, य. दि. फडके अशा अनेक विचारवंत—समीक्षकांनी म. फुल्यांच्या कार्य आणि वाङ्मयाची साधार चिकित्सा केलेली आहे. तिचे सर्वांनी स्वागतच केलेले आहे.

महर्षि वि. रा. शिंदे, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, राजर्षी शाहू, केशवराव जेधे, कर्मवीर भाऊराव पाटील या थोर महापुरुषांनी म. फुल्यांचे स्वप्न साकार करण्यासाठी योगदान केले व फुलेविचार पुढे नेला.

फुल्यांना मानणाऱ्यांच्याच हातून त्यांचे पुतळे उखडून काढता येतील अशा भ्रमात असणाऱ्या डॉ. गांगल आणि त्यांच्या समर्थकांना या देशातील सर्व धर्मांतील स्त्री-दलित-कष्टकऱ्यांनी आणि समतावादी अभ्यासकांनी, म. फुल्यांची शास्त्रीय समीक्षा करून, उत्तर देण्याचे दायित्व स्वीकारले पाहिजे असे माझे मत आहे. म. फुल्यांनी ज्या मूलगामी परिवर्तनाच्या चळवळीचा पाया घातला तिला पुढे नेण्यासाठी आता कालानुरूप संकल्पनांचा आणि कृतीचा व्यूह रचणे गरजेचे ठरले आहे.

फुले– आंबेडकरांच्या विचारांचा समन्वय व्हावा

डॉ. गांगल ज्या विषमतावादी प्रवृत्तीचे प्रतिनिधी आहेत तिचा फक्त निषेध करून भागणार नाही, तर फुले–आंबेडकरांच्या समाजक्रांतिकारक विचारांचा प्रसार करण्याचे व्रत निष्ठापूर्वक स्वीकारले पाहिजे.

१९९० साली म. फुल्यांची निर्वाणशताब्दी आहे, तर १९९१ साली डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची जन्मशताब्दी. या निमित्ताने व्यापक जनजागरणाची मोहीम हाती घेण्याची गरज आहे. त्यासाठी विधायक कृतीशील उपक्रम योजावे लागतील. फुले आंबेडकरांच्या विचारांचा सक्रिय सन्मान करण्यासाठी, त्यांना दैवते न मानता त्यांची कालोचित समीक्षा करीत, अभ्यासाच्या शिस्तीतूनच पुढे जाण्याला पर्याय नाही!

❋

संदर्भ सूची

*पृ. ७ वर- जोशी वसंत स, (संपा.) भाषा आणि संशोधन, खंड-१, महाराष्ट्र साहित्य परिषद, पुणे, १९८१, पृ. १-२

*पृ. ८ वर- चुनेकर सु. रा, संशोधन: स्वरूप आणि पद्धती, शिक्षण प्रसारक संस्था, संगमनेर, १९८३ पृ. बारा ते तीस

*पृ. १६ वर- कुलकर्णी कृ. पां, मराठी व्युत्पत्तिकोश, (ऐतिहासिक व तौलनिक) श्री लेखन वाचन भांडार, पुणे, आ. २ री, जाने. १९६४, पृ. ६१७

* A Dravidian Etymological Dictonary By T. Burrow & M. B. Emenevu, The Clarendon Press, Oxford, Rp. 1970, P. 305.

* **तमीळ मराठी शब्दकोश** (संपा.) रमाबाई जोशी–पु. दि. जोशी, म. रा. सा. संस्कृती मंडळ, मुंबई १९७६, पृ. ५२४

१) कीर धनंजय- मालशे स. गं, (संपा.) **म. फुले समग्र वाङ्मय** महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई, आ. २री, १९८०, पृ. ६७

२) कीर-मालशे, तत्रैव पृ. ६७

३) कीर-मालशे, तत्रैव पृ. ६९

४) कानिटकर वि. ग, **अब्राहम लिंकन–फाळणी टाळणारा महापुरुष**, राजहंस, पुणे, १९८४ पृ. ३७१

५) कीर- मालशे, उनि. पृ. ७१

६) रावसाहेब कसबे, **महाराष्ट्र साहित्य पत्रिका**, ऑक्टो.-डिसेंबर १९७७, पुणे, पृ. १७

७) कीर-मालशे, **उनि** पृ. ९८

८) कीर-मालशे, **तत्रैव** पृ. ९९ व १००

९) कीर-मालशे, **तत्रैव** पृ. ८३

१०) कीर-मालशे, **तत्रैव** पृ. ८३

११) कीर-मालशे, **तत्रैव** पृ. ८४

१२) कीर-मालशे, **तत्रैव** पृ. ८६

१३) साळुंखे पी. बी. व इतर, **महात्मा फुले गौरवग्रंथ**, महाराष्ट्र राज्य, शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई, १९८२, पृ. ११३

१४) साळुंखे पी. बी. व इतर, **उनि**. पृ. ११३ (तळटीप)

१५) कसबे, **उनि** पृ. १६

१६) कीर-मालशे, **उनि** पृ. सात.

१७) कीर-मालशे, **तत्रैव** पृ. ४११

१८) कीर-मालशे, **तत्रैव** पृ. ४११

१९) कीर-मालशे, **तत्रैव** पृ. ४१२

२०) कीर-मालशे, **तत्रैव** पृ. ४१२।४१३

२१) कीर-मालशे, **तत्रैव** पृ. ४१३

२२) कीर-मालशे, **तत्रैव** पृ. ४१४

२३) कीर-मालशे, **तत्रैव** पृ. ३५३

२४) कीर-मालशे, **तत्रैव** पृ. ४१५

२५) कीर-मालशे, **तत्रैव** पृ. नऊ

२६) कीर-मालशे, **तत्रैव** पृ. ४१७

२७) कीर-मालश, **तत्रैव** पृ. २६४

२८) कीर-मालशे, **तत्रैव** पृ. बारा

२९) कीर-मालशे, **तत्रैव** पृ. तेरा

३०) कीर-मालशे, **तत्रैव** पृ. ४८९

३१) कीर-मालशे, **तत्रैव** पृ. ४४९

३२) कीर-मालशे, **तत्रैव** पृ. ३६९

३३) कीर-मालशे **तत्रैव** पृ. ३८०

३४) कीर-मालशे, **तत्रैव** पृ. ३८४

३५) मालशे स. गं, **तारतम्य**, परचुरे, मुंबई, १९८७ पृ. १५

३६) मालशे **तत्रैव**, पृ. २६

३७) कीर- जोतीराव फुले, आमच्या समाजक्रांतीचे जनक, पॉप्युलर, मुंबई, आ. २ री, पुनर्मु. १९७५ पृ. ९९

३८) रायकर सीताराम (संपा.) **आम्ही पाहिलेले फुले** (पुरोगामी सत्यशोधक, जुलै-डिसें. १९८१), म. फुले समता प्रतिष्ठान पुणे, पृ. ६९

३९) रायकर, **तत्रैव** पृ. ६९

४०) रायकर, **तत्रैव** पृ. १९

४१) रायकर, **तत्रैव** पृ. ८३

४२) रायकर, **तत्रैव** पृ. ६०

४३) रायकर, **तत्रैव** पृ. ७०-७१

४४) फडके य. दि, **व्यक्ती आणि विचार**, श्रीविद्या, पुणे, आ. २ री, १९८५, पृ. ४३
४५) साठे वा. वि. (संपा.) **निबंधमाला**, चित्रशाळा प्रेस, पुणे, आवृत्ती ३ री, १९२६ पृ. ४५०
४६) साठे, **तत्रैव** पृ. ४४२
४७) नातू म. गं, देशपांडे दि. य (संपा.) **आगरकर वाङ्मय खंड** २, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, १९८५, पृ. २६६.
४८) फडके य. दि. **शोध बाळगोपाळांचा** श्रीविद्या, पुणे, १९७७, पृ. ७८
४९) रा. भि. गुंजीकर यांचे **संकलित लेख, प्रथम खंड**, पृ. ६३ (कीर, उनि. पृ. १३७ वरून उद्धृत)
५०) कीर **उनि** पृ. १३६–१३७
५१) देशपांडे अ. ना, **आधुनिक मराठी वाङ्मयाचा इतिहास, भाग १ ला**, व्हीनस, पुणे, पुनर्मु. १९७४, पृ. ८
५२) जावडेकर शं. द. **आधुनिक भारत** कॉंटिनेंटल, पुणे, पुनर्मु. १९७९, पृ. १०१- १०२
५३) देशपांडे अ. ना, **उनि** पृ. ८
५४) गोखले द. न, **महाराष्ट्र साहित्य पत्रिका**, एप्रिल- जून १९८२, पुणे, (अंक २२१) पृ. २७
५५) **विविध ज्ञानविस्तार** पु. ९ अंक ३, ३मार्च १८७७, (कीर, उनि. पृ. १६५ वरून उद्धृत)
५६) फडके य. दि, **केशवराव जेधे**, श्रीविद्या, पुणे, १९८२, पृ.७१ वरून उद्धृत.
५७) फडके, **तत्रैव** पृ. ६१ वरून उद्धृत.
५८) फडके, **व्यक्ती आणि विचार**, उनि. पृ. ७३
५९) रायकर, **उनि**. पृ. ५८-५९
६०) साठे, **उनि**. पृ. ४५३
६१) साठे, **तत्रैव**, पृ. १०२४
६२) अग्रलेख, **तरुण भारत**, नागपूर, २१.१२.८८
६३) सरदार गं. बा, **महाराष्ट्राचे उपेक्षित मानकरी**, स्वतः, पुणे, १९४१ पृ. १४०
६४) साळुंखे व इतर, **उनि**. पृ. २२
६५) कीर-मालशे, **उनि**. पृ. १७९
६६) कीर–मालशे, **तत्रैव** पृ. ४९५
६७) पाटील पं. सि, **म. जोतीराव फुले यांचा अल्पपरिचय**, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई, आ. २ री, १९७४, पृ. ४०-४१
६८) साळुंखे व इतर **उनि**. पृ. १७–१८

६९) आंबेडकर बी. आर Who Were the Shudras ठाकर्स, मुंबई, पुनर्मु. १९७०, अर्पणपत्रिका.
७०) कीर-मालशे, उनि. पृ. ३७०
७१) कीर–मालशे, तत्रैव पृ. ४५२
७२) गणवीर रत्नाकर, महाड समता संगर, रत्नमित्रा, भुसावळ, १९८१, पृ.३५
७३) फडकुले निर्मलकुमार (संपा.), निबंधमालेतील तीन निबंध, कॉंटिनेंटल, पुणे, १९७५ पृ. एकतीस.
७४) कुरुंदकर नरहर, परिचय, इंद्रायणी साहित्य, पुणे, १९८७, प. ९५-९६
७५) कुरुंदकर नरहर, छत्रपती शिवाजी महाराज जीवनरहस्य, जनबोध, (काळ नोंद नाही) पुणे, पृ. ५ ते ७.
७६) कीर, उनि. पृ. १९३–१९४
७७) रायकर, उनि पृ. १९
७८) फडके य. दि, शाहू छत्रपती आणि लोकमान्य, श्रीविद्या पुणे, १९८६, पृ. १३ वरून उद्धृत.
७९) कीर–मालशे, उनि. पृ. ७
८०) कीर-मालशे, तत्रैव पृ. २
८१) कीर–मालशे तत्रैव पृ. ९
८२) सरदर गं. बा. महात्मा फुले व्यक्तित्व आणि विचार, ग्रंथाली, मुंबई, १९८१, पृ. ८१
८३) कीर–मालशे, उनि. पृ. ९
८४) कीर-मालशे, तत्रैव, पृ. ९
८५) कीर-मालशे तत्रैव पृ. ११
८६) कीर-मालशे, तत्रैव पृ. १४
८७) सरदार, १९८१, उनि, पृ. ८२
८८) कीर-मालशे, तत्रैव पृ. ३१३-३१४
८९) साळुंखे व इतर, उनि पृ. १०९ तळटीप
९०) कीर-मालशे, उनि. पृ. ३२५
९१) सरदार, १९८१, उनि. पृ. ८१-८२
९२) वैद्य प्रभाकर, महात्मा फुले आणि त्यांची परंपरा, लोकवाङ्मय, मुंबई आ २री, १९८२, पृ.२५६
९३) काळे दि. वि. छत्रपती शिवाजी महाराज, पुणे, विद्यापीठ, पुणे, आ. ३ री, १९७१, पृ. २८६–२८७
९४) पुरंदरे बाबासाहेब, राजा छत्रपती, महाराजा शिवछत्रपति प्रतिष्ठान इस्ट, सातारा आ. ६ वी, १९७४, पृ. ७१२.
९५) कीर-मालशे, उनि. पृ २१


९६ कीर-मालशे, **तत्रैव** पृ. २९
९७ कीर-मालशे, **तत्रैव** पृ. १८
९८ कीर-मालशे, **तत्रैव** पृ. ३२
९९ कीर-मालशे, **तत्रैव** पृ. ३४
१०० कीर-मालशे, **तत्रैव** पृ. ३७
१०१ कुलकर्णी अ. रा., **जेम्स कनिंगहॅम ग्रँन्ट डफ**, पुणे विद्यापीठ, पुणे, १९७१, पृ. २३१
१०२ दाते-कर्वे, (संपा.) **महाराष्ट्र शब्दकोश**, विभाग ६ वा, वरदा, पुणे, १९८८ पृ. २७१०
१०३ कीर-मालशे **उनि**. पृ. २०१
१०४ कीर-मालशे, **तत्रैव** पृ. ३७–३८
१०५ कुंटे भ. ग. (अनु. जदुनाथ सरकार) **औरंगजेबाचा इतिहास**, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई, १९७८, पृ. ३५१–३५३
१०६ कुंटे, **तत्रैव** पृ. ३५३–३५६
१०७ कुंटे **तत्रैव** पृ. ३५६–३६०
१०८ कुंटे, **तत्रैव** पृ. ३६०–३६३
१०९ मालशे, **उनि**. पृ. ३
११० मालशे, **तत्रैव**, पृ. ७–८
१११ कीर-मालशे, **उनि**. पृ. २४५
११२ कीर-मालशे, **तत्रैव** पृ. २४५–२४६
११३ कुलकर्णी क्र. पां. **अुनि**. पृ. ७१२
११४ दाते-कर्वे **अुनि** पृ. २८६०
११५ दाते-कर्वे, **तत्रैव** पृ. २६५३–५४
११६ श्यामसुंदर दास व इतर, **हिंदी शब्दसागर भाग आठवा**, काशीनगरी प्रचारिणी सभा, सु. आ. १९७१, पृ. ४२१९
११७ अधिकारी ना. सी (संपा) स्टुडंट्स प्रोनाउन्सिग लिट्ल डिक्शनरी, इंग्लिश-इंग्लिश-मराठी, १९६३, पृ. ४२७
११८ कीर मालशे **अुनि**, पृ. १६०
११९ मालशे, **अुनि**. पृ. ४७
१२० मालशे, तत्रैव पृ. ५५
१२१ रायकर सीताराम, (संपा) **तृतीयरत्न** (म. फुले कृत नाटक), पुरोगामी सत्य-शोधक, एप्रिल–जून ७९, पुणे, पृ. ९
१२२ कीर-मालशे, **अुनि**, पृ. २१५
१२३ कीर-मालशे, **तत्रैव** पृ. २०१
१२४ कीर-मालशे, तत्रैव, पृ. दहा

१२५ गोखल द. न, **महाराष्ट्र साहित्य पत्रिका** एप्रिल-जून १९८२, पुणे, पृ. १८
१२६ बेहरे ग. वा. म. सा, पत्रिका, तत्रैव, पृ. ३२, ३३
१२७ दाते शं. रा, (प्रस्तावना) **जोतीबा फुले कार्य व वाङ्मय यांचे सत्यस्वरूप दर्शन,** (ले. चिं. ग. ओक), काळ प्रकाशन, पुणे, १९८४, पृ. चार
१२८ ओक चिं. ग. तत्रैव, पृ. १४
१२९ ओक, तत्रैव, पृ. चार
१३० कीर-**मालशे, अनि** पृ. १६८
१३१ ओक, उनि, पृ. पाच
१३२ ओक, तत्रैव, पृ. सात
१३३ ओक, तत्रैव, पृ. २०
१३४ मिश्रा आनंदस्वरूप, नानासाहेब पेशवे आणि १८५७ चे बंड, अनु. डॉ. वा. रा. ढमढेरे, महाराष्ट्र रा. सा. सं. मंडळ, मुंबई १९७३ पृ. ४६५–६६
१३५ ओक, उनि, पृ. ८
१३६ ओक, तत्रैव, पृ. १४—१५
१३७ ओक, तत्रैव, पृ. ३०
१३८ ओक, तत्रैव, पृ. २०
१३९ ओक, तत्रैव, पृ. ४२
१४० रमेश पतंगे, साप्ता. विवेक, मुंबई, १२।२।८९. पृ. आठ
१४१ कीर धनंजय, 'स्वातंत्र्यवीर सावरकर,' पॉप्युलर, मुंबई, आ. २ री, १९८३ पृ. ४६७
१४२ कीर– मालशे, उनि. पृ. १४०
१४३ शेजवलकर, त्र्यं. शं, शेजवलकरांचे लेख, पुस्तक २ रे, ह. वि. मोटे प्रकाशन, मुंबई १९५९ पृ. ९१
१४४ शेजवलकर, तत्रैव, पृ. २७
१४५ सहस्रबुद्धे पु. ग, (संपा.) लोकहितवादींची शतपत्रे, कॉंटिनेंटल, पुणे, आ. ५ वी, १९७७, पृ. २०—२१
१४६ पठाण यू. म (संपा.) भाऊसाहेबांची बखर, कॉंटिनेंटल, पुणे, सं. आ. १९७५, पृ. ८४
१४७ पठाण, तत्रैव, पृ. १०५
१४८ साळुंखे व इतर, उनि. पृ. १७२
१४९ सेन एस. एन. १८५७, पृ. ४१३, साळुंखे व इतर, उनि. पृ. १७२ वरून उद्धृत
१५० केळकर का. न, शमीपूजन (राज्यक्रांतीचा पहिला प्रयत्न–१८५७), पुणे विद्यापीठ पुणे, सु. आ. २ री, १९७४, पृ. २७३ वरून उद्धृत

१५१ केळकर न. चि, सह्याद्री, १९४६, केळकर का. न, तत्रैव, पृ. २७३–७४ वरून उद्धृत
१५२ राजवाडे वि. का, राजवाडे प्रस्तावना खंड ६, पृ. ३५५–५६, केळकर का. न, तत्रैव पृ. २७३ वरून उद्धृत
१५३ केळकर, का. न, तत्रैव, पृ. २६९–७०
१५४ Majumdar R. C, (editor) Bharatiya Vidya Bhavan 's History and Culture of the Indian People Vol. IX, British Paramountcy and Indian Renaissance– I, Bombay, 2nd edition, 1970, P. 459
१५५ मुजुमदार, तत्रैव, पृ, ४५९
१५६ मुजुमदार, तत्रैव, पृ. ४५९–६०
१५७ मुजुमदार, तत्रैव पृ. ४६०
१५८ सावरकर वि. दा, १८५७ चे स्वातंत्र्यसमर, मॅजेस्टिक, मुंबई, आ. २ री, १९६८ पृ. ५१ ते ६५
१५९ सावरकर, तत्रैव, पृ. १८२ ते १८६
१६० सावरकर, तत्रैव, पृ. १८६ ते १८७
१६१ सावरकर, तत्रैव, पृ. १८७
१६२ सावरकर, तत्रैव, पृ. २५०–५१
१६३ सावरकर, तत्रैव, पृ. २५१-५२
१६४ कीर मालशे, उनि, पृ. ३०३–४
१६५ पोतदार द. वा. (संपा) माझा प्रवास, ले. विष्णूभट गोडसे, व्हीनस, पुणे, पुनर्मु. १९७४, पृ. ४३
१६६ मुजुमदार, उनि, पृ. ५९५
१६७ सावरकर, उनि, पृ. ७३
१६८ सावरकर, उनि. पृ. ६५–६६
१६९ मुजुमदार, उनि. पृ. ६०९–६१०
१७० ढाबरे रमेश, म. फुल्यांचे विचार आणि कार्य, प्रशीक विद्यार्थी संघ, कोल्हापूर, १९८९, पृ. ४५
१७१ ओक, उनि, पृ. ३५
१७२ ओक, तत्रैव, पृ. १९
१७३ कीर–मालशे, उनि, पृ. २९९
१७४ कीर–मालशे, तत्रैव पृ. २९९
१७५ पोतदार, उनि, पृ. ३३–३४
१७६ जोशी वि. श्री. आद्य क्रांतिकारक वासुदेव बळवंत फडके, सावरकर प्रकाशन, मुंबई सु. आ. १९७४, पृ. ३१२

१७७ कीर, उनि, पृ. १७८
१७८ जोशी वि. श्री, उनि. पृ. २८७
१७९ जोशी, तत्रैव, पृ. २९३
१८० जोशी, तत्रैव पृ. ३३१–३२
१८१ कीर, उनि. पृ. ३१४
१८२ कीर–मालशे उनि, पृ. २४४ तळटीप
१८३ कीर–मालशे, तत्रैव, पृ. २१२
१८४ कीर–मालशे, तत्रैव, पृ. २३९
१८५ सरदार, १९८१, उनि. पृ. ६६
१८६ सावरकर, उनि. पृ. २७
१८७ कीर–मालशे, उनि. पृ. बारा.
१८८ साळुंखे व इतर, उनि. पृ. १०९–१०
१८९ कीर, उनि. पृ. २६९
१९० दाते–कर्वे, महाराष्ट्र शब्दकोश, भाग ६ वा, वरदा, पुणे, १९८८, पृ. २४३७
१९१ गो म. कुलकर्णी, मराठी वाङमयाचा इतिहास, खंड ४, (संपा) रा. श्री. जोग, म. सा. प. पुणे, आ. २ री, १९७३, पृ. ५७—६०
१९२ कीर– मालशे, उनि. पृ. २३३
१९३ कीर– मालशे, तत्रैव, पृ. १९०
१९४ कीर– मालशे, तत्रैव, पृ. ४२९
१९५ कीर– मालशे, तत्रैव, पृ. २५६
१९६ मुजुमदार सत्येंद्रनाथ, स्वामी विवेकानंद चरित्र, रामकृष्ण मठ, नागपूर, आ. ६ वी, १९८४, पृ. १७८
१९७ मुजुमदार सत्येंद्रनाथ, तत्रैव पृ. २७७– ७८
१९८ शेजवलकर, उनि. पृ. ८१
१९९ सहस्रबुद्धे पु. ग, (संपा.), उनि. पृ. १८९
२०० न्या. रानडे, म. गो. 'द मिसलेनिअस रायटिंग्ज', पृ. ३५०–३५२, साळुंखे व इतर, उनि. पृ. १०३ वरून उद्धृत.
२०१ सहस्रबुद्धे पु. ग, उनि. पृ. ३१४
२०२ कर्वे चिं. ग, मराठी साहित्यातील उपेक्षित मानकरी, व्हीनस पुणे, १९५७, पृ. ३५ वरून उद्धृत.
२०३ पदमनजी बाबा, महाराष्ट्र देशाचा संक्षिप्त इतिहास, १८६६, कर्वे, तत्रैव पृ. ३५ वरून उद्धृत.
२०४ टिळक बा. गं, केसरी, (अग्रलेख) ९।८।१८९२
२०५ जांभेकर बाळशास्त्री, दर्पण, १९३२, जावडेकर, उनि, पृ. ७३—७४ वरून उद्धृत

२०६ साळुंखे व इतर पृ. २६२–६३ वरून उद्धृत
२०७ कीर– मालशे, उनि, पृ. १३६
२०८ कीर– मालशे, तत्रैव, पृ. ३१४–१५
२०९ कीर– मालशे, तत्रैव पृ. २५०
२१० कीर– मालशे, तत्रैव पृ. २०२
२११ कीर– मालशे, तत्रैव पृ. २४७—४८
२१२ कीर– मालशे, तत्रैव पृ. २५९
२१३ कीर– मालशे, तत्रैव पृ. ४०७
२१४ कीर– मालशे, तत्रैव पृ. ४०९
२१५ कीर– मालशे, तत्रैव पृ. ४९३
२१६ कीर– मालशे, तत्रैव पृ. ४४९
२१७ कीर– मालशे, तत्रैव पृ. ३४९
२१८ कीर– मालशे— आ. ३ री, १९८८, पृ. ५७६
२१९ कीर– मालशे, उनि, पृ. २३३
२२० कीर– उनि. पृ. १८५
२२१ साळुंखे व इतर, उनि. पृ...
२२२ कीर– मालशे, उनि. पृ. ३०७
२२३ मालशे, उनि. पृ. ४१
२२४ कीर– मालशे, उनि. पृ. ३९६
२२५ सरदार गं. बा, आगरकरांचा सामाजिक तत्त्वविचार, व्हीनस, पुणे, १९७५, पृ. १७



❋

डॉ. बाळ गांगल यांचा अल्प परिचय

डॉ. विश्वनाथ वैजनाथ गांगल

14 B सायन कामगार हौसिंग सोसायटी, सायन, मुंबई 400022
फोन नं. 484302

जन्मदिनांक- २८ एप्रिल १९३२

प्रपाठक, अनंताचार्य इंडॉलॉजिकल रिसर्च इन्स्टिटचूट, जी. डी. सोमानी विद्यालय, कफ परेड, मुंबई– 400005 फोन नं. 214174

१) एस. एस. सी. १९५० साली बोर्डात १८ वा क्रमांक
२) बी. ए. १९५४ साली मुंबई विद्यापीठात प्रथम वर्गात प्रथम क्रमांक
३) एम. ए. १९५६ साली मुंबई विद्यापीठात प्रथम वर्गात प्रथम क्रमांक
४) पीएच. डी. १९६२ साली मुंबई विद्यापीठ, विषय– संस्कृत
प्रबंध– 'ऋग्वेदातील जलदेवता'
मार्गदर्शक– हरि दामोदर वेलणकर
५) पीएच. डी. १९७५ साली, मुंबई विद्यापीठ, विषय– इतिहास
प्रबंध– 'वैदिक काळातील सभा'
मार्गदर्शक- चिदंबर कुलकर्णी

चार लघुकथासंग्रह प्रकाशित.

इंग्रजी, मराठी, हिंदी, गुजराती, संस्कृत, पाळी, अर्धमागधी आणि जर्मन या भाषांवर प्रभुत्व.

अनेक विषयांवर विविध नियतकालिकांमधून लेखन.

राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे स्वयंसेवक म्हणून डॉ. गांगल ४० वर्षे कार्य करीत असल्याचे त्यांनी नमूद केले.

(एक खुलासा– साप्ता. सोबत मधील म. फुलेंविषयक लेखनाचा पीएच. डी. शी काडीमात्रही संबंध नाही असे डॉ. गांगल यांनी प्रस्तुत लेखकाजवळ कबूल केले. डॉ. गांगल यांनी म. फुलेंविषयक लेखनाबाबत अद्यापपावेतो लेखी स्वरूपात कुठेही दिलगिरी व्यक्त केलेली नाही ही गोष्ट मान्य करून त्यांनी प्रस्तुत लेखकाकडे तोंडी दिलगिरी व्यक्त केली, मात्र त्यांनी तसे लेखी दिलेले नाही. वरील सर्व माहिती १४।२।८९ रोजी डॉ. गांगल यांची प्रस्तुत लेखकाने प्रदीर्घ मुलाखत घेतलेली असताना मिळाली, ती वाचकांसाठी सादर केली आहे.)

परिशिष्टे

परिशिष्ट १

शिवाजी महाराजांना शिव्या देणाऱ्या हचा महात्म्याचे माहात्म्य तपासून पहा.

कासी हू की कला जाती,
मथुरा मस्जिद हो जाती।
गर न होते शिवाजी
तो सुन्नत होती सबकी ॥

उत्तर भारताचा भूषणकवी शिवाजीचे माहात्म्य वरील शब्दांत गाऊन गेला. साऱ्या भारताची सुन्ता करण्याचा पाक मुसलमानी इरादा हाणून पाडण्यास कारणीभूत झाल्यामुळे शिवाजीबद्दल ज्यांच्या मनात थोडा किंवा बहुत आकस आहे किंवा होता अशा नतद्रष्टांची यादी करता येईल. त्यातील परदेशीय, परधर्मीय, परप्रांतीय आपण सोडून देऊया. महाराष्ट्रात अलिकडे होऊन गेलेले विद्वान म्हणजे नरहर कुरुंदकर, आणि गेल्या शतकात होऊन गेलेले अविद्वान म्हणजे 'महात्मा' ज्योतिराव फुले. एरवी विद्वत्तापूर्ण, शिष्ट, पंडिती भाषेत लिहिणाऱ्या–बोलणाऱ्या नरहर कुरुंदकरांनी एका ठिकाणी 'शिवाजीच्या नावाला बाजारभाव आहे' असे सवंग, अशिष्ट विधान केले आहे आणि कधीही, कुणीही (त्या अर्थाने) न केलेला दावा 'शिवाजी हिंदूंचा धर्मनेता होता काय?' विनाकारण उपस्थित करून त्याचे आपल्या विकृत समाजवादी प्रणालीनें खंडन केले आहे. पण एवढेच!

महात्मा ज्योतिबा फुल्यांनी मात्र शिवाजीच्या व्यक्तिमत्त्वावर आणि कार्यकर्तृत्वावर जी चिखलफेक केली आहे ती मन विषण्ण करणारी आहे. अशा माणसाला 'महात्मा' म्हणणारे आपण सर्व अत्यंत अडाणी तरी असलो पाहिजे किंवा अत्यंत कोडगे. 'महात्मा' फुल्यांच्या शिवराळपणाचे लक्ष्य शिवाजी महाराज

का बनले? त्याचे मुख्य कारण शिवाजीचा हिंदुधर्माभिमान. महात्मा फुल्यांना हिंदु धर्माबद्दल आत्यंतिक द्वेष वाटत असे आणि हिंदू धर्म ही अत्यल्पसंख्य ब्राह्मणांची मिरास असल्याचीही त्यांची खात्री होती. महात्मा ज्योतिबांच्या बोटचेप्या चरित्रकारांनी गोड गोड शब्दांत ज्योतिबांनी 'इतिहासाचा मागोवा' वगैरे घेतल्याची कितीही भलावण केली असली तरी ज्योतिबांचे इतिहासाचे अज्ञान अगाध होते. त्याला तुलनाच द्यायची तर ती फक्त ज्योतिबांच्या व्युत्पत्तिविषयक अज्ञानाची देता येईल.

उदा. १) इराणातून दुजी टोळी आली, ती पाहिल्यावर एतद्देशीय घाबरून 'दुजी' च्या ऐवजी 'द्विज' म्हणाले. तेव्हापासून ब्राह्मणांना नाव पडले द्विज.

२) 'वराह' ने येथील क्षेत्री लोकांचा राजा हिरण्याक्ष त्याचा वध केला. क्षेत्री मंडळींनी त्याचा धिक्कार केला. 'धिक्कार' वरून नाव पडले डुक्कर.

३) इराणी लाक मचव्यांतून आले. मचवे माशांसारखे चालत. मचव्यावरून नाव पडले 'मत्स्य'.

४) दस्यू लोक महाबलवान, यवन लोक दस्यूंबरोबर नेहमी स्नेहभाव बाळगीत. यावरून यवन लोकांत दस्यू लोकांस दोस्त म्हणण्याचा प्रचार पडला असावा.

५) आता त्याच दस्यू शब्दाचा दुसरा पराक्रम पहावा. '...यावरून यवन व आर्य लोकांत दस्यू लोकांस वैरभावाने दुष्मन व दुष्ट म्हणण्याचा परिपाठ पडला असावा.'

एवढी उदाहरणे पुरेत. हा अशा अगाध व्युत्पत्ति–अज्ञानावर ब्राह्मण–द्वेषाचे आणि शिवाजी–निंदेचे प्रचंड इमले बांधणाऱ्या माणसाला आपण, कुणाच्या चिथावणीवरून, महात्मा म्हणू लागलो कुणास ठाऊक?

ज्योतिराव फुले हा माणूस अव्वल दर्जाचा स्वधर्मद्रोही तर होताच, पण त्याच दर्जाचा स्वजनद्रोही आणि देशद्रोही होता. त्यांच्या गद्यपद्य लिखाणात परकीय आक्रमकांना आणि अत्याचाऱ्यांना लावलेली विशेषणे आणि केलेली वर्णने आणि स्वकीयांना व शिवाजी महाराजांना लावलेली विशेषणे ह्यांची तुलना बरीच उद्‌बोधक ठरेल.

विक्टोरिया राणी– 'सोडीव ग आई'

'महाराणी विक्टोरिया आईसाहेब' 'सत्ता तुझी राणीबाई'

'धन्य राणीबाई, झोप कशी घेई, सोडवी दीन बंधूस'

इंग्रज नीतिमान धार्मिक सरकार– 'बहादर' 'दयाळू' 'परमन्यायी' 'हितावह' 'सौख्यकारक' 'सदाचारी' 'शांत'

'अंत्यजांनो, तुम्ही उपकार स्मरा, पोटी गच्च धरा इंग्रजास'

'मायाळू इंग्रज सरकार' 'इंग्रज स्मरती सद्विवेकास'

'इंग्रजांचे श्रम पहा डोळेभरी।' 'सुचवितो राणीबाईला।'

'सोपू नको ब्राह्मणाला' 'महातत्त्वज्ञानी खऱ्या एका देवास'

'भजणारे इंग्रज सरकार' 'बापुड्या गव्हर्नर जनरल . . .'

मुसलमान–'जाहांमर्द' 'पवित्र खिश्चन व मुसलमान राज्य'

'हजरत महंमद पैगंबराच्या निःस्पृह शिष्यमंडळीचे जेव्हा या देशात पाऊल पडले....'

१८५७ चे स्वातंत्र्यसमर–'भटपांड्याचे बंड'

'राजद्रोही बंडखोर वासुदेव फडके'

झाशीची राणी लक्ष्मीबाई–कालच्या चपाती बंडात विटाळसा होऊन बसणाऱ्या झाशीच्या राण्याची स्त्री.

शिवाजी–'अक्षरशून्य' 'अज्ञानी' 'शूद्रजातीमध्ये मोठा योद्धा'

'लुटारू' 'दादू कोंडदेव त्या (म्हणजे शिवाजीला) ठेवी अविद्वान'

अठराशे सत्तावनचे स्वातंत्र्यसमर अयशस्वी झाले, हचाचा हचा महात्म्याला अत्यंत आनंद वाटला होता. महाराष्ट्र शासनाने प्रकाशित केलेल्या 'फुले गौरव ग्रंथात' थोर, समाजवादी विचारवंत गं. बा. सरदार म्हणतात, 'याच सुमारास अठराशे सत्तावनचे बंड उद्भवले. बंडवाल्यांचा बीमोड होऊन इंग्रज सरकारचा जय व्हावा असेच ज्योतिबांना मनापासून वाटत होते. या सशस्त्र उठावाची त्यांनी 'भटपांड्याचे बंड' 'कोर्तुशी चपाती बंड' अशा शब्दाने संभावना केली आहे.'

'धिक्कार असो त्यांच्या चपातीतील आणि वरणभातातील गूढास' 'नानासाहेब, तात्या टोपे या बंडवाल्यांच्या पुढाऱ्यांचे वाभाडे काढले आहेत'. नुसते वाभाडे काढून हा महात्मा थांबलेला नाही तर माणुसकीला सोडून त्याने नानासाहेब पेशव्यांची निर्भर्त्सना केली आहे. नानासाहेब पेशव्याने इंग्रजांची कत्तल केली म्हणून हा स्वजनद्रोही महात्मा ढळढळा रडतो, पण त्याच नानासाहेब पेशव्याच्या आठ-दहा वर्षांच्या मुलीला–मैनेला–इंग्रजांनी जिवंत जाळली, तिच्याबद्दल हचा विघ्नसंतोषी महात्म्याच्या बेलगाम लेखणीतून एक करुणेचा नव्हे, सहानुभूतीचा नव्हे, साधा माणुसकीचा शब्द निघालेला नाही. असल्या स्वजनद्रोही माणसाला आपण महात्मा बनवून ठेवलं आहे. त्याचे लिखाण उघड्या डोळ्यांनी अभ्यासून सुद्धा गं. बा सरदार, लक्ष्मणशास्त्री जोशी, स. गं. मालशांसारखे विद्वान त्याबद्दल एकही निषेधाचा शब्द लिहीत नाहीत, इतका बौद्धिक आंधळेपणा त्यांनी का स्वीकारला?

त्याच गौरवग्रंथात महाविद्वान तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी म्हणतात, '५७ सालचे बंड फसले याबद्दल ज्योतीरावांना विषाद न वाटता आनंदच वाटला. त्यांनी त्याची कारण-मीमांसा जी केली आहे ती शुद्ध शास्त्रीय दृष्टीला महत्त्वाची अशीच वाटेल'. फुल्यांनी आपली सब्–स्टँडर्ड बुद्धिमत्ता दयाळू इंग्रज सरकारच्या चरणी वाहिली होती, त्याप्रमाणे लक्ष्मणशास्त्रींनी सुद्धा आपली प्रकांड बुद्धिमत्ता फुले-चरणी वाहिली आहे काय? ज्योतिबांचे इतिहास–भूगोलज्ञान शून्य होते, पण त्याची भलावण तर्कतीर्थांनी करावी ? शुद्ध शास्त्रीय दृष्टीला महत्त्वाची वाटणारी ही कारण-मीमांसा आहे तरी काय? 'त्या बंडात राज्य गेले असते तर इतिहासाची पुनरावृत्ती

घडली असती. ब्राह्मण पेशव्याच्या राज्याचा पुनः अवतार झाला असता.' धन्य तर्कतीर्थ! पेशवे शिवाजीच्या वारसदारांच्या, छत्रपतींच्या, नावे राज्य करीत हा भाग सोडला तरी इंग्रजांच्या पराभवामुळे भारतात ब्राह्मणी पेशव्यांचे राज्य आले असते, ही मीमांसा तर्कतीर्थांना शुद्ध, शास्त्रीय वाटते?

स्वातंत्र्यवीर सावरकरांनी लिहिलेले 'स्वातंत्र्य–समर' फार जळजळीत असल्याने सोडून देऊया. भारतीय विद्याभवनाने प्रकाशित केलेल्या मिळमिळीत इतिहासात सुद्धा खालील माहिती मिळते–

१) खानदेशातील सावडा आणि चोपडा येथील शेतकऱ्यांनी १८५२ मध्ये बंड केले होते आणि पंचायत स्थापून प्रतिसरकार निर्मिले होते.

२) नागपूरला अप्पासाहेबांनी १८४८ मध्ये बंड केले होते.

३) एक राजपूत राजपुत्र पेशकरा सिंग याच्या नावे नादिरखानाने १८५३ मध्ये रावळपिंडी येथे बंड केले होते.

४) १८४४ मध्ये मिठावरील कर वाढविल्याच्या निषेधार्थ सुरतेतील लोकांनी प्रतिकार केला होता. हे सगळे उठाव समाजातील निम्न स्तरावरील लोकांचे होते अशी साक्षात इंग्रजांची कल्पना झाली होती. एक सरकारी अहवाल म्हणतो, 'Till this time, the real character of the disturbances was not understood. They were generally supposed to be occasioned by the lowest classes of Hindoos.' विद्वत्तेशी हाडवैर असलेल्या महात्म्याला हे कळणं शक्य नाही, आणि इंग्रज गेले की पेशवे आले, असंच तो समजणार. पण विद्वत्ता कोळून प्यालेल्या तर्कतीर्थांनी हचा दुष्ट आणि तर्कदुष्ट पेशवेद्वेषाला शुद्ध शास्त्रीय कारणमीमांसा म्हणावे?

गाईच्या आणि डुकराच्या चरबीचे जे कारण घडले आणि हिंदू–मुसलमान दोन्ही जमातींचे शिपाई बंडाच्या पवित्र्यात उठले ते कलकत्त्याजवळ डमडम येथे, भट पेशव्यांच्या पुण्यात नव्हेत.

पहिली ठिणगी बराकपूरला पडली, दुसरी अंबाल्याला, तिसरी लखनौ येथे. सर्वत्र भट पेशव्यांचे राज्य होते काय? इंग्रजांविरुद्ध उघड बंड सुरू केले ते मीरतच्या तिसऱ्या घोडदळाने. त्याला भट पेशव्यांनी चिथावणी दिली होती? मीरतच्या शिपायांनी दिल्लीला जाऊन बादशहा बहादुरशहाला बंडाचे नेतृत्व करण्याची विनंती केली. इंग्रजांचा पराभव झाला असता तर दिल्लीमध्ये महात्मा फुल्यांना अत्यंत प्रिय असलेल्या 'जाहांमर्द मुसलमानांचेच राज्य आले असते! तरीही आमचे तर्कतीर्थ आम्हाला सांगतात की फुल्यांची कारणमीमांसा शुद्ध शास्त्रीय आहे. दिल्लीहून बंड पसरले फिरोझपूरपर्यंत, मग कानपूर. फुल्यांच्या दृष्टीने 'दयाळू' वगैरे असलेल्या इंग्रजांशी मैत्रीने वागणारा नानासाहेब पेशवा त्यानंतर बंडात ओढला गेला. कानपूर येथे महात्मा फुल्यांच्या आईसाहेब राणी व्हिक्टोरियाच्या जातभाईंची आणि भगिनींची कत्तल झाली ही गोष्ट खरी. पण ती तलवारीची लढाई नव्हती.

बंदुकांची आणि तोफांची होती. Non-combatant वर, स्त्रीवर तर सोडाच, हिंदू योद्धचाने तलवार उगारल्याची उदाहरणे क्वचित. ह्या कत्तलीतही इंग्रजांनी आधी गोळीबार सुरू केला होता ही गोष्ट लक्षात ठेविली पाहिजे. 'आपण चाळीस होड्यांत आहोत. प्रतिशोधाच्या भावनेने पेटलेले हिंदी शिपाई किनाऱ्यावर उभे आहेत. बोटी-मध्ये बायकामुले आहेत'. हा विचार करून इंग्रजांनी गोळीबाराला सुरुवात करायची नव्हती. ती केली. गोळीबाराच्या युद्धात Non-combatants मरतात. त्याला इलाज नाही. ह्या सगळ्या प्रकारात नानासाहेबाचा हात होता काय ? R. C. Majumdar म्हणतात, 'Nana was not present on the riverside. Though, as the leader of the sepoys, he must bear full responsibility of their action, there is nothing to indicate that he had deliberately plotted to murder the Englishmen.' हे झाले सत्याची चाड असलेल्या इतिहासकाराचं मत ज्ञानशत्रू महात्म्याला सत्याशी काहीच करायचे नसते. तो खुशाल आपल्या कल्पनेने नानासाहेबांच्या हातून कत्तल घडवून आणतो आणि मग त्याला दोषी धरतो. महात्म्याच्या निरंकुशत्वाला हे साजेसंच आहे. पण तर्कतीर्थांचं काय?

ग्वाल्हेरचे शिंदे सरकार स्वस्थ बसले होते. पण त्यांच्या सैन्याने बंड केले, त्या सैन्यातील शिपाई भट-पांडे होते? इंदोरला होळकरांच्या शिपायांनी बंड केले, तेही भट-पांडे नसावेत. त्यांचा मोड करायला, आपल्या महात्म्याला प्राणाहूनही प्रिय असलेल्या 'सदाचारी आणि शांत' इंग्रजांनी भोपाळ पायदळाच्या दोन पलटणी आणि तीनशे भिल्लांचे सैन्य पाठविले, पण ते बंडवाल्यांनाच सामील झाले. भिल्ल म्हणजे तर भट-पांडे नव्हेत. आणि त्यांना फितवायला तेथे गागा-भट्ट किंवा रामदास नव्हते. फितवण्याइतका वेळही नव्हता. महात्म्याला आवडणाऱ्या इंग्रज जातीचा एक इतिहासकार म्हणतो, ' By one impulse, the whole of the troops deserted to the mutineers.'

एका सहजप्रेरणेने ते भिल्ल-भट-पांडे नव्हेत-बंडवाल्यांना मिळाले. आपला कोण नि परका कोण हे त्या अज्ञानी भिल्लांना कळलं. पण अक्षरशत्रू शिवाजीचे मात्र गागाभट्ट आणि रामदास ह्या दोघांना मिळून ब्रेनवॉशिंग करावं लागलं असं फुले म्हणतात नि आपण त्यांना 'महात्मा' म्हणतो. ग्वाल्हेरच्या सैन्यातले अफगाण आणि मकरानी मुसलमान बंड करून उठले, तरी महात्मा म्हणणार की हे भट-पांड्यांचे बंड होते. भट-पेशव्यांच्या महाराष्ट्रात फक्त कोल्हापुरात एक दिवसापुरता छोटासा उठाव झाला आणि तरीही महात्मा फुले आम्हाला सांगतात, 'त्या बंडात इंग्रजी राज्य गेले असते तर इतिहासाची पुनरावृत्ती झाली असती. ब्राह्मण पेशव्यांच्या राज्याचा पुनः अवतार झाला असता.' आणि तर्कतीर्थ सांगतात की ही शुद्ध शास्त्रीय कारण-मीमांसा आहे. तर्कतीर्थ काय, गं. बा. सरदार काय, वयाची ऐंशी वर्षे उलटली, आतापर्यंत समाजवादी, पुरोगामी वगैरे वगैरे आपली प्रतिमा उज्ज्वल करून दाखवण्यासाठी खूप बोटचेपेपणा केलात. तद-

नुपंगाने मिळणारे प्रसिद्धीदी सर्व फायदे उपटलेत. आता तरी खरं बोला. आपल्या इतिहासाचं तुमच्यासारख्या मंडळींनी जे विकृतीकरण करून ठेवले आहे त्याच्या साफसफाईला तुम्हीच लागा. कुणी मिखाइल गोर्बाचेव्ह येथे जन्माला येईल, ह्याची वाट पहायला आम्हाला लावू नका.

अठराशे सत्तावनचे भव्योज्ज्वल स्वातंत्र्यसमर–महात्म्याच्या भाषेत भट–पांड्यांचे चपातीचे बंड– घडले तेव्हा फुले स्वत: जिवंत होते. पण स्वजन, स्वधर्म, स्वदेश द्वेषाने आंधळे झाल्याने त्यांना त्याचा 'अर्थ' दिसला नाही, पण दयाळू इंग्रज सरकार सुरक्षित राहिल्याने आनंद झाला. तसाच आनंद तत्पूर्वी शहाण्णव वर्षे आधी झालेल्या मराठ्यांच्या पानिपतावरील पराभवामुळे आपल्या विघ्नसंतोषी महात्म्याला झाला आहे. आणि आपला हा आसुरी आनंद ह्या महात्म्याने असा व्यक्त केला आहे, 'दांभिक पेशवे पानीपती जाती, पालथी पडती, म्लेच्छांपुढे.' पेशवे ब्राह्मण असल्यामुळे ते म्लेंच्छांपुढे आडवे पडल्याने महात्म्याला आनंदाच्या उकळ्या फुटणे साहजिकच आहे. पण तत्पूर्वी अब्दालीने दत्ताजी शिंद्याला पालथा घातला होता. पानीपतच्या युद्धात दिल्लीच्या तख्तावर घणाघात घालणारे सदाशिवराव भाऊ आणि विश्वासराव पालथे पडले ही अत्यंत संतोषजनक बाब आहे. पण जनकोजी आणि तुकोजी शिंदेही पडले. महाराष्ट्रात दोन लाख बांगडी फुटली ती सगळी ब्राह्मणांच्या घरातली नव्हे. फुल्यांच्या भाषेत म्हणजे दोन लाख 'शूद्रातिशूद्र' मायबहिणी विधवा झाल्या तरी चालतील, दोन ब्राह्मण मेल्याचा आनंदोत्सव मोठा! इतका स्वजनद्रोही माणून पृथ्वीतलावर दुसरा सापडायचा नाही. आणि त्याला 'महात्मा' ठरविणारेही नतद्रष्ट आमच्यासारखे आम्हीच.

हिंदुधर्माच्या आणि तो हिंदुधर्म फक्त भटा–ब्राह्मणांची मिरास आहे अशी आपली समजूत करून घेतल्याने त्यांच्या द्वेषाच्या, खुनशीपणाच्या, आकसाच्या आगीत हा महात्मा सतत जळत होता. तो हिंदुधर्म जितका शंकराचार्य, ज्ञानेश्वर, एकनाथ, रामदासांचा होता, तितकाच तुकाराम–नामदेवाचा, कबीर–नानकांचा, सूरदास–कबीरांचा, तुळसीदास–मीराबाईचा, गोऱ्या कुंभाराचा, दामाजीचा, चोखामेळ्याचा होता ह्या गोष्टीकडे महात्मा फुले पूर्णपणे दुर्लक्ष करतात. एवढेच करून ते थांबत नाहीत, तर गोब्राह्मणप्रतिपालक क्षत्रिय कुलावतंस, सिंहासनाधीश्वर, छत्रपती शिवाजी महाराजांस अक्षरशत्रू, दूधखुळा, बावळट ठरवतात.

माता जिजाईने आणि गुरू दादोजी कोंडदेवांनी शिवाजीला उत्तम शिक्षण दिले असे आपण मानतो. महात्म्याची माहिती वेगळी आहे. 'दादू कोंडदेव त्या ठेवी अविद्वान' ह्यात आपण दादू कोंडदेवाला दूषण देत नसून माता जिजाईला आणि साक्षात शिवाजीला मूर्ख ठरवीत आहोत ह्याचे भान महात्म्याला रहात नाही. शिवाजीला दादोजी कोंडदेव अज्ञानी ठेवीत होते ते कोणत्या पद्धतीने, हे त्या महात्म्यालाच माहीत. पण आपल्या मुलाला गुरू अज्ञानात ठेवत असल्याचं जिजा-

माता उघड्या डोळ्यांनी पहात होती, की आपला मुलगा 'अज्ञानी' रहावा अशीच तिचीही इच्छा होती? अखिल हिंदुस्थानातल्या मुसलमानी पातशाहयांना आपल्या तलवारीने आणि मुत्सद्दीपणाने चळचळा कापायला लावणारे शिवाजीमहाराज काशीकर गागाभट्टाकडून हातोहात फसविले गेले असे हा महात्मा खुशाल सांगतो आणि शिवाजीमहाराजांबद्दल मतलबी किंवा सार्थ आदर बाळगणारे कट्टर कम्युनिस्टांपासून तो अचल हिंदुत्ववाद्यांपर्यंत आपण सर्व निमूटपणे ऐकून घेतो हे हास्यास्पद आहे की लांछनास्पद? महात्मा उवाच–'काशीकर गंगाभट्ट घाली डौल धर्माचा, केला खेळ गारुड्याचा, लुटारू शिवाजी लुटला !' शिवाजी लुटारू खराच, पण त्यालाही लुटणारा गागाभट्ट शिवाजीपेक्षाही चलाख असला पाहिजे, कारण हाती खड्ग न धरता दर्भांकुर धरून त्याने 'शिवाजी लुटला' किंवा महात्म्याच्या मतानुसार, शिवाजी अगदीच भोळसट आणि बावळट असला पाहिजे.

भारतात मुसलमानी राज्य आलें ही घटना आपल्या महात्म्याला अत्यंत स्वागतार्ह वाटत होती. अर्थात इतिहासाचे ज्ञान काडीमात्र नसल्यामुळे 'सार्वजनिक सत्यधर्म पुस्तक' नावाच्या चोपड्यात पृ. ३६ वर महात्मा फुले म्हणतात, 'दयाघन निर्माणकर्त्याने कृपाळू होऊन धूर्त आर्य भट्टांच्या दास्यत्वापासून पंगु शूद्रादि अतिशूद्रांस मुक्त करण्याकरिता, जातिभेदाचा समूळ नाश करणारे मुसलमान लोकांस या देशात पाठविले.' त्या दयाघन निर्माणकर्त्याने ज्या कामासाठी जाहांमर्द मुसलमानांस भारतात पाठविले ते, म्हणजे सर्वांची सुन्ता करण्याचे, काम मुसलमानांनी केले नाही ह्याबद्दल महात्मा फुले चक्क खंतही व्यक्त करतात. उपर्युक्त चोपड्यात (पृ. ६४) महात्मा जोतीराव म्हणतात, 'शूद्रादी अतिशूद्रांस मुसलमान करून त्या सर्वांस आपल्यासारखे पवित्र मानवी अधिकाराचा उपभोग घेण्यास लावले नाही ही सर्व बेफाम मुसलमानांची चूक आहे म्हणून मी कबूल करतो.' अरेरे! महात्म्याच्या कुसुम–कोमल मनाला केवढे हे कष्ट! मुसलमानांनी सर्व शूद्रादी अतिशूद्रांची सुन्ता केली असती तर महात्म्याचे वैचारिक वारसदार पु. ल. देशपांडे ह्यांना पोटतिडिकीने 'शूद्रांनी 'खुशाल' मुसलमान व्हावे' असा आदेश देण्याची पाळी आली नसती.

उपजत बुद्धी बेताची, अभ्यास करण्याची कुवत आणि इच्छा नाही, चिथावणी आणि (खोटे) मोठेपण देऊन छू करायला टपलेले परकीय राज्यकर्ते आणि मिशनरी ह्यांतील 'एकैकमप्यनर्थाय,' पण फुल्यांच्या ठायी हे सर्व एकत्र आलेले होते. इस्लाममधील समता ही एक मिथ आहे, असं मे. पुं. रेग्यांनी साधार दाखवून दिलं आहे. समता फक्त नमाज पढताना. कुराणाचा गुलामगिरीला पाठिंबा आहे. कुरेश जमात इतर सर्वांहून श्रेष्ठ मानली जाते. शिवाय हिंदू समाजातील लोकाचार निर्मित श्रेष्ठकनिष्ठभावना मुस्लिम समाजात सर्वत्र आहे. सय्यद लोक स्वत:ला ब्राह्मणसदृश समजतात. शिया सुन्नींना पाण्यात पाहतात. सुन्नी शियांना, कादियानींना, बहाईंना, बोहरांना मुसलमान मानायलासुद्धा तयार नसतात. हिंदुत्वा-

विषयी तिळमात्र प्रेम नसलेल्या अ. भि. शहांनी म्हटलं आहे, 'The traditional and dominant Islamic world view for, more than thirteen hundred years now, is basically ANTI-HUMANIST'. पुढे अ. भि. शहांनीच म्हटलं आहे, 'As to equality, one has only to note that the Quran permits slavery and treats woman as inferior to man'. अर्थात, हचा सूर्यप्रकाशा-इतक्या सत्य गोष्टी सिद्ध करायला विद्वानांच्या साक्षी काढायला नकोत. आपल्या महात्म्याने त्याबाबतीत डोळे आणि मन गच्च मिटून घेतले होते आणि धादांत खोटी विधाने शिवराळ भाषेत करताना त्याला बिलकूल संकोच वाटत नसे.

शूद्रादि अतिशूद्रांना दास्यत्वापासून मुक्त करण्यासाठी दयाघन निर्माणकर्त्याने पाठविलेल्या मुसलमानांनी प्रत्यक्षात केले काय? जिझिया कर लावला. शेरशहाने (इ. स. १५३८ ते १५४५) लावला, औरंगजेबाने (२ एप्रिल १३७९) लावला. आणि ज्या गरिबांच्या नावाने वेळीअवेळी आपला महात्मा चौपदरी गळा काढून रडतो त्या गोरगरिबांना जिझियाचा फटका सर्वात अधिक बसला

ज्यांचे उत्पन्न १०,००० डिरॅम्स त्यांना जिझिया ४८ डिरॅम्स

ज्यांचे उत्पन्न २०० ते १०,००० त्यांना २४

ज्यांचे उत्पन्न २०० डिरॅम्सच्या खाली त्यांना १२.

उत्पन्नाच्या प्रमाणाचा विचार केला तर गोरगरीब हिंदूंना (व त्यात महात्मा फुल्यांचे शूद्रादि अतिशूद्र आणि गरीब ब्राह्मण असणार, क्षत्रिय सरदार आणि वैश्य व्यापारी-सावकार नसणार) श्रीमंतांच्या बारा पटीहून अधिक ! जिझिया कराचे ओझे सहन न झाल्यामुळे काही गरीब हिंदूंनी नाइलाजाने इस्लाम धर्म स्वीकारला. औरंगजेबाला परमसंतोष जाहला. महात्मा फुल्यांनासुद्धा ही इतिहासवार्ता ऐकून झाला असेल. महात्मा फुल्यांच्या दुर्दैवाने सगळेच हिंदू (शूद्रातिशूद्र) आपले स्वत्व विकून जगणारे नव्हते. ते औरंगजेबाच्या जुलमाविरुद्ध बंड करून उठले. ज्यांच्या नावाने ज्योतिबांनी 'असूड' लिहिलाय त्या जाट शेतकरी तिलपतच्या गोकल्याने २० हजार शेतकऱ्यांचा जमाव जमवला. स्वधर्मासाठी लढून बहुतेकजण मेले. गोकल्याला पकडून ठार मारण्यात आले आणि त्याच्या कुटुंबियांना जबरदस्तीने मुसलमान करण्यात आले. (ही अर्थातच महात्म्याच्या आत्म्यास 'थंड' करणारी गोष्ट!) मग उठले सतनामी शेतकरी. त्यांनी औरंगजेबाच्या सैन्याला अनेकदा धूळ चारली. पण शेवटी तोफखान्यापुढे त्यांचा टिकाव लागला नाही. महात्मा फुल्यांच्या दृष्टीने हे सतनामी अर्थातच अट्टल मूर्ख होते. मुसलमान बनण्याचा प्रशस्त राजमार्ग सोडून ते हिंदू राहण्याच्या आडवाटेने गेले व खड्डयात पडले. फुल्यांच्या निर्मिकाने त्यांना योग्य सजा दिली.

मग उठले शीख शेतकरी– गुरू तेग बहादुर आणि गुरू गोविंदसिंहाच्या नेतृत्वाखाली.

हिंदूंवर जिझिया कर लादण्याच्या मुसलमानांच्या कुराणदत्त अधिकाराचा

अधिक्षेप शिवाजीने केला म्हणून कदाचित आपल्या महात्म्याचा शिवाजीवर राग असेल. शिवाजीने औरंगजेबाला खरमरीत पत्र लिहून जिझिया रद्द करण्याची सूचना केली. कारण महात्म्याचा अनुभव असा होता, 'महंमदी धर्मात नीतीने आचरण करून आपल्या निर्मिकास संतोष देणारे बहुतेक आहेत.'

शिवाजी महाराजांना माणसाची पारख अचूक होती. त्यांनी गुणांकडे, कार्यकर्तृत्वाकडे पाहून माणसे जोडली, जातीकडे पाहून नव्हे. महात्मा फुल्यांच्या पोटदुखीचं हे कारण. शिवाजी महाराजांना जशी इतर अनेक जातींत गुणी माणसं आढळली तशी ती ब्राह्मणांतही आढळली आणि महात्मा फुल्यांप्रमाणे गोब्राह्मणप्रतिपालक शिवाजी महाराज जात्यंध नसल्यामुळे त्यांनी त्या ब्राह्मणांना जवळ केले. नुसतेच जवळ केले नाही तर त्यांना चक्क आपल्या प्रधानमंडळात नेमले. महात्मा फुल्यांच्या समाजज्ञानात यच्चयावत् ब्राह्मण 'भीकमागे'. अशा एका भीकमाग्या मोरोपंत पिंगळ्याला शिवाजीने आपला पंतप्रधान करून ठेवला. महात्म्याचं डोकं उठलं. आणि सरनोबत हंबीरराव मोहिते सोडले तर बाकीही ब्राह्मणच. महात्म्याला प्रचंड पोटदुखी लागली. महात्मा फुल्यांच्या मते ब्राह्मण म्हणजे धूर्त, रजस्वला स्त्रीसारखा सोवळा, आळशी, निरुपयोगी, अधम, कृतघ्न, 'दिसे शूद्रावाणी,' भ्याड, धर्मलंड, नास्तिक, वाचाळ, चांडाळ, नीच, वगैरे वगैरे. अशा नालायक ब्राह्मणांना मंत्री करणारे शिवाजी महाराज, महात्मा फुल्यांच्या मतानुसार काय लायकीचे असणार?

कारण मुळातच शिवाजी महाराजांनी स्वराज्यसंस्थापनेसाठी केलेला खटाटोप मूर्खपणाचा होता, असे फुल्यांचे मत होते. महाराष्ट्र सरकारने प्रकाशिलेल्या 'फुले गौरव ग्रंथा'त पृष्ठ १०९ वरील तळटीपेत लक्ष्मणशास्त्री जोशींनी हे मत नमूद केले आहे–'शिवाजी राजाने मुसलमानी राज्य हाणून पाडले व नवीन हिंदू राज्य स्थापिले याची काही गरज नव्हती, मुसलमानी राज्य काही वाईट नव्हते.'

शिवाजी महाराजांच्या जीवितकार्याचे मूल्यमापन एखादा माणूस इतक्या अधम पातळीला जाऊन करू शकतो म्हणून संतापावे की अशा माणसाला आपण महात्मा पदवी देऊन गौरविले म्हणून शरमेने मान खाली घालावी?

(सोबत दि. ४–१२–८८ वरून पुनर्मुद्रित)

परिशिष्ट २

हा कसला महात्मा– फुले म्हणवणारी ही केवळ दुर्गंधी

स्टालिन हा मनोरुग्ण होता, हे डोळे उघडे असलेल्या अ- कम्युनिस्टांना सतत जाणवत असलेलं सत्य आता प्रत्यक्ष रशियन तज्ज्ञांनीच मान्य केलं आहे. त्या स्टालिनच्या पवित्र मुखातून जे जे बाहेर येईल ते भक्तिभावपूर्वक चाटणारे आमचे गावठीभाई, शरमेनं मान खाली न घालता उजळ माथ्याने अजूनही हिंडतात, हे पाहून आश्चर्य वाटतं. पण त्यात आश्चर्य तरी कसलं ? कम्युनिस्टांनी रशियाची बौद्धिक वेठबिगारी, राजीखुशीने आणि व्होडकापाणी न करता, स्वीकारली होती आणि ती निष्ठापूर्वक निभावली. इतकी प्रचंड, संपूर्ण निष्ठा की तिच्यापुढे इमानी म्हणून जगभर गाजलेल्या कुत्र्याच्या जातीनेसुद्धा लाजावे. असो.

महात्मा स्टालिनचे जर पुनर्मूल्यांकन होऊ शकते तर आपल्या देशात ज्या स्वजन-स्वधर्म-स्वदेश-घातकी लोकांना आपण, परधार्जिणेपणा करून, महात्मापदी प्रतिष्ठापित केले आहे त्या सर्वांचे पुनर्मूल्यांकन झाले पाहिजे. त्यातील महाराष्ट्रातला आदिमहात्मा म्हणजे ज्योतिबा फुले. आपल्या राज्याच्या विधानभवनासमोर सदरहू महात्म्याचा पुतळाही उभा करण्यात आलेला आहे. ज्योतिबांपाशी असं काय होतं ? एतद्देशीय समाजाचा मनोभंग करण्यासाठी सर्व प्रकारचे उपाय योजणारे ब्रिटिश राज्यकर्ते आणि मिशनरी ह्यांचा भक्कम पाठिंबा आणि शिव्यांचा प्रचंड साठा ! शिव्या देण्याला शहाणपण लागत नाही, ज्ञानही लागत नाही. ज्योतिबांजवळ ह्या दोन्ही गोष्टींची तीव्र टंचाई होतीच. पण साधी खरी माहितीसुद्धा करून घेण्याच्या भानगडीत हा महात्मा पडला नाही. 'ज्योतिबा फुले– विचारसमीक्षा' करताना लक्ष्मणशास्त्री जोशांनीसुद्धा जोतिबांच्या अडाणीपणाचं पितळ उघड करून दाखविलं आहे. अर्थातच, आपल्या पुरोगामी प्रतिमेला धक्का लागणार नाही, अशा गुळमुळू भाषेत !

तर्कतीर्थ उवाच (नवभारत, फेब्रुवारी १९६९)–

'भारतीय विषम व ब्राह्मणप्रधान समाजरचनेस बाहेरून आलेले ऋग्वेदिक आर्य मूलतःच कारण होत या विधानाला आता विशेष पुष्टी मिळत नाही.'

'विशेष पुष्टी मिळत नाही' ही गुळगुळथापडी कशाला ? सरळ सांगा की मुळीच पुष्टी मिळत नाही. डॉ. इरावती कर्व्यांनी हे व्यवस्थितपणे सिद्ध केले आहे. त्या विषम समाजरचनेबद्दल ब्राह्मणांवर शिव्यांचा भडिमार करणाऱ्यांना (जोतिबांना, पण तें आता आपल्यात नसल्याने त्यांच्या नावाने बेलभंडार उचलून गालिप्रदानाचे शतकृत्य अजूनही करणाऱ्यांना) लक्ष्मणशास्त्रींनी ठणकावून सांगायला हवं की, 'बाबांनो, हव्या तुमच्या शिव्या अगदी गैरलागू आहेत. आणि ज्याला शिव्या द्यायच्या त्याला त्या लागू नसतील तर त्या देणाऱ्याकडे, जशाच्या तशा, परत येतात.'

लक्ष्मणशास्त्री लिहून गेले आहेत, 'अवतारांचा जोतिरावांनी केलेला अर्थ केवळ काल्पनिक आहे.' लक्ष्मणशास्त्रींना खरं तर म्हणायचंय की जोतिरावांनी केलेला अर्थ शुद्ध अडाणीपणाचा आहे. कोठल्याही गोष्टीचा अर्थ लावण्यासाठी आवश्यक ती उपजत बुद्धीही जोतिबांजवळ नव्हती आणि अर्जित विद्वत्ताही नव्हती.

महात्मा जोतिराव फुले म्हणतात, 'इराणातून पहिली टोळी लहान लहान मचव्यांतून आली. ते माशांसारखे चालत म्हणून टोपण नाव मत्स्य पडले.' (गुलामगिरी पृ. ९८) हया एका वाक्यात महात्मा जोतिबांनी इतिहास, भूगोल आणि व्युत्पत्तिशास्त्र हया तीन शास्त्रांचा व्यवस्थित खून पाडला आहे. 'आर्य इराणातून आले' हया विधानाला तर्कतीर्थांची मऊमऊ भाषा वापरायची तर 'आता विशेष पुष्टी मिळत नाही', आणि स्पष्ट सांगायचं तर काडीमात्र पुष्टी मिळत नाही. बरं, समजा आर्य लोक इराणातून आले, पण ते लहान लहान (म्हणजे किती लहान?) मचव्यांतून आले हयाला पुरावा काय? महात्म्याचे वचन, एवढाच पुरावा! ते मचवे, म्हणे, माशांसारखे चालत. ठीक आहे, चालू देत. म्हणून टोपण- नाव मत्स्य पडले? मनुष्याने लहान लहान मचवेच काय, लहानलहान होडच्या, नोहास अर्क किंवा मनूची नौका बघण्यापूर्वी कित्येक लक्ष वर्षे माणूस पृथ्वीवर रहात होता आणि 'मत्स्य' पाण्यात रहात होते. तेव्हा टोपण नाव पडायचेच तर ते 'मत्स्य' वरून मचवा पडणार की 'मचवा' वरून मत्स्य? हा प्रश्न तुम्हा-आम्हाला, अभ्यास करणारांना पडणार! ज्यांचे अभ्यासाशी वाकडं आणि विद्वत्तेशी वैर त्यांनी काय वाट्टेल ते बोलावं आणि आपण त्यांना 'महात्मा' म्हणावं.

कृ. पां. कुलकर्णींनी संपादिलेल्या व्युत्पत्तिकोशात 'मचवा' चा प्रवास संस्कृत मंच- मल्याळम् मचि- मल्याळम्मधून पोर्तुगीज भाषेत, तेथून पुन्हा मराठीत मचवा असा वर्णिला आहे. Dravidian Etymological Dictionary (प्रविष्ट ४६३८) असे अर्थ देते–

मंचि (तमिळ) Cargo boat with a raised platform, मंचि (मल्याळम्) A large sort of boat, single- masted pattimer in coasting trade holdidg 10 to 40 tons, कानडीमध्ये हेच रूप मच्चिवे असे आहे. हे सगळे देऊन झाल्यावर द्रविडियन शब्दकोशाचे विद्वान संपादक अतिसावधपणे 'possibly IA' मंचवरून हे सगळे शब्द उद्भवले असावेत असे सांगतात. विद्वान माणसांना ठामपणे बोलायला भीतीच नाही, तर शंका वाटते. मूर्ख आणि महात्मे मात्र निर्भीक आणि निःशंक असतात.

अशा तऱ्हेने माशाचं कालवण वाढून झाल्यावर सदरहू महात्मे आपल्याला कासवाचं जेवण वाढतायत. 'इतक्यात इराणातून दुसरी टोळी कचव्यामधून बंदरात येऊन उतरली. कचवे मचव्यापेक्षा मोठे असल्यामुळे पाण्यावर कासवासारखे चालत म्हणून, टोपण नाव कच्छ पडले.' कासव पाण्यावर चालतं काय? सर्रास सारी कासवे साऱ्या माशांपेक्षा मोठी असतात काय? १० ते ४० टन माल वाहून नेणारे

मचवे जर लहान लहान, तर मोठे मोठे 'कचवे' किती मोठे असतात? बाकी सगळे इतिहास-भूगोल-व्युत्पत्तिशास्त्रविषयक प्रश्न आहेतच. फुल्यांच्या माहात्म्याचा अंश आपल्यालाही लाभावा म्हणून त्यांची जाडजूड चरित्रे लिहिणाऱ्यांनी जोतिबांच्या ह्या अफाट ज्ञानाविषयी थोडा खुलासा करावा.

अवतार-कल्पना समजून घ्यायची तर डोकं आणि हृदय स्वच्छ पाहिजेत. त्यात फक्त गलिच्छ शिव्या भरलेल्या असतील तर ज्ञानाचा शिरकाव होत नाही.

जगातल्या अनेक देशांत कासव हा प्राणी पुराणकथांत येतो. विश्वोत्पत्ती, विश्वरचना, वंशावळी ह्या सर्वांत कश्यपाचा उल्लेख आढळतो. पृथ्वी स्थिर कशी राहते? कासवाच्या पाठीवर! ही सुंदर कवि-कल्पना आहे आणि ती तशीच समजून घ्यायला हवी. समुद्रमंथन हे एक भव्योदात्त, काव्यात्म रूपक आहे. वासुकीचा दोर बांधलेली मंदार-पर्वताची रवी समुद्रात घुसळायची तर तिला आधार म्हणून प्रचंड कासवच हवे. हे सगळं एक सुंदर मिथ आहे.

त्रिपिटकातील मज्झिमनिकायात वम्मीकसुत्तन्तात भगवान बुद्ध स्वतः 'कूर्म म्हणजे पाच उपादान–स्कंध' असल्याचे सांगतात. मिलिंदपण्हात मिलिंद विचारतो, 'भन्ते नागसेन, कूर्माची पाच अंगे स्वीकारावी असे आपण म्हणता, ती कोठली?' 'ज्याप्रमाणे जलचर कूर्म जळात वसती करतो त्याप्रमाणे योग्याने मेत्ता (मैत्री) ह्या ब्रह्मविहारात वसती करावी.' 'ज्याप्रमाणे, मिलिंद, कूर्म पाण्यावर डोके काढून बसतो, कुणी दिसल्यावर बुडी मारतो, त्याप्रमाणे योगी बौद्धाने आरम्मण सरोवरात खोल बुडी घ्यावी.' 'ज्याप्रमाणे कूर्म पाण्यातून बाहेर येऊन शरीर वाळवतो, त्याप्रमाणे योग्याने मनाचे निरीक्षण करून सम्मपधानात आपले मन वाळवावे आणि ज्याप्रमाणे, महाराज, कूर्म पृथ्वी खणून एकांतात वसती करतो त्याप्रमाणे योग्याने लाभ–सत्कार–कीर्ती सोडून निर्जन वनात वस्ती करावी. आणि महाराज (पाचवी गोष्ट म्हणजे) कासव ज्याप्रमाणे चालत असता, त्याला काही दिसतं, काही ऐकू येतं, त्याबरोबर तोंडासकट आपली सारी अंगे कवचात ओढून घेतो त्याप्रमाणे योग्याने शब्द-रूप-स्पर्श-गंध युक्त काही आढळले की आपल्या शरीराची सहा दारे बंद ठेवून मन सावध ठेवावे.' भगवान देवाधिदेव बुद्धाने संयुत्तनिकायात कुम्मूपमसुत्तन्तात म्हटलेच आहे– 'ज्याप्रमाणे कूर्म स्वतःच्या कवचात .. वगैरे.'

वराह–अवतार म्हणजे, खरं म्हणजे रानडुक्कर. पण डुक्करच. तेव्हा ज्योतिबांची गालि-प्रसू लेखणी हर्षातिरेकाने घाणीत बुचकळ्या घेईल ह्यात नवल ते काय? सगळेच अवतार, खरं म्हणजे myth आहेत. त्याप्रमाणे वराहही. पृथ्वीला समुद्राच्या तळाशी बुडविणाऱ्या हिरण्याक्ष ह्या राक्षसापासून विष्णूने वराहरूपाने वाचविली अशी ती मिथ्यकथा. काव्य आणि पुराण–काव्य (mythological poetry) वाचण्याइतकी रसिकता ज्यांच्या अंगी असेल त्यांनीच या गोष्टींच्या नादी लागावं. वालिश बुद्धिवादाने (native rationalism) त्यांची चिरफाड करू नये.

डुक्कर हा प्राणी शेतकऱ्याचा आणि मळेवाल्याचा म्हणून जगातील सर्व

पुराणांत (myths) प्रसिद्ध आहे. फ्रेझरसारख्या जगप्रसिद्ध समाजशास्त्रज्ञाने रान-डुकरासंबंधीच्या पुराणकथांचा अभ्यास करून शोधनिबंध प्रकाशित केले आहेत. केल्टिक आणि जर्मन लोकांच्या कथांत वराहाला हवामानाची चाहूल आधीच लागते असे मानले गेल्याचे आढळते. डुकराच्या शरीराचे निरनिराळे भाग औषध म्हणून, वशीकरण-मंत्रांमध्ये आणि जादूसाठी वापरले जात असत. वराहाचा संबंध शेतीशी आणि सुपीकतेशी सर्वत्र जोडण्यात येतो. जर्मनीमध्ये आणि बाल्टिक राष्ट्रात कापणीच्या हंगामातील शेवटचा विधी Rye-boar म्हणून करीत असत. स्कॅण्डिनेव्हियन देशात डुकराला धान्यात्मा (corn spirit) मानीत. सुदैवप्राप्तीसाठी डुकराच्या डोक्याला उद्देशून नवस करीत. Freyr हा कृषिदेव आणि Freyja ही त्याची बहीण हयांची स्वत:ची विशेष डुकरे असत.

ग्रीस देशात कृषिदेवता Demeter आणि Dionysus हयांना डुकराचा बळी देत असत. महाकवी होमरने ग्रीकांचा एक विधी वर्णिला आहे. (Ieus) पृथ्वी, सूर्य इत्यादी देवतांना डुकराचा बळी देत. त्याच्याशी संबद्ध सुंदर मिथ्यकथा आहे. ती सांगायचे हे स्थान नव्हे. ग्रीक स्त्रिया थेस्मीफोरिया नावाच्या उत्सवप्रसंगी डुकरांना गुहांमध्ये लोटीत. त्यांच्याबरोबर पिठाची लिंगे, साय, काटक्या-कुटक्या टाकीत. काही दिवसांनी त्या गुहांमधून हया सगळ्याचे अवशेष बाहेर काढून ते वियाण्यांमध्ये मिसळत. त्यामुळे पीक हे चांगले येते अशी ग्रीकांची श्रद्धा होती.

रोमन शेतकरी टेलस नावाच्या धरणीदेवतेला आणि सेरेस नावाच्या धान्यवृद्धिदेवतेला डुकरिणीचा बळी देत असे. जगप्रसिद्ध जर्मन पुराणकथातज्ज्ञ Grimm याने एक जर्मन परंपरा नमूद करून ठेविली आहे. तिच्यानुसार, आपल्या सुळ्याने जमीन उकरणाऱ्या डुकराने माणसाला शेतीविद्या शिकविली. शेतकऱ्यांचा कैवारी असल्याचा आव आणणाऱ्या महात्म्याने शेतकरीमानसात, लोककथांत, लोकाचारात, लोकपरंपरेत वराहाचे स्थान लक्षात घेऊन त्याला देवत्वाला चढविणाऱ्या सुंदर हिंदू परंपरेचे गुणगान करण्याऐवजी फक्त चिखल चिवडावा ?

'समुद्रावरून दुजी इराणी टोळी आली... म्हणताना घाबरल्यामुळे द्विज आले, द्विज आले असा शब्द करीत.' असली संस्कृत शब्दांची महामूर्ख व्युत्पत्ती देणाऱ्या महात्म्याने संस्कृतातील पोत्र शब्दाचे 'वराहाचे लांबलचक मुस्कट' आणि 'नांगराचा फाळ' असे अर्थ आहेत, आणि ' वराह ' हा प्राणी लोकजीवनात शेतीशी निगडित आहे, हयाचा शोध घ्यायला हवा होता.

ज्योतिबांचा अत्यंत लाडका द्वेषविषय आर्य आणि ब्राह्मण. त्यांच्या जीवनपद्धतीचा स्वीकार पूर्णपणे न करणाऱ्या भारतातील जमातींमध्ये वराहाचे स्थान काय आहे ते बघू या. गोंड जमातीचे लोक आपल्या वासुदेवाला वराहाचा बळी देतात. पीक चांगले यावे म्हणून राजगोंडा लोक भूमातेला डुकराचा बळी देतात. धान्यसमृद्धीसाठी डुकराचे मांस खाण्याचा समारंभ रोमा नागा लोक अजूनही करतात. योग्य मुहूर्तावर डुकराचे मांस खाल्ले नाही तर पीक चांगले येणार नाही असे

ते मानतात. संताळांची श्रद्धा अशी आहे की, वराह नांगरणी करतात. खारिया जमातीचे लोक कापणी केल्यावर शेवटचे कणीस शेतामध्ये आपल्या धोरिया देवासाठी ठेवतात.

ऋग्वेदामध्ये एक वराहसम्बद्ध मिथ्यकथा आहे. एमुष नावाच्या वराहाच्या ताब्यात असलेले शेकडो रेडे आणि शिजवलेला भात विष्णूने नेल्याचा उल्लेख आढळतो. हा एमुष निश्चितपणे Non Aryan आहे. ऋग्वेदोत्तरकालीन रुद्र आणि विष्णू हया देवतांचा विकासही Non Aryan प्रभावाखाली झालेला आहे. पण शिव्या देणे एवढे एकच काम वाणी-लेखणीचे, असे मानणाऱ्या मंडळींना ज्ञानाचे वावडे असते. अशांपैकी एका माणसाला महात्मा म्हणणे हा आपला गाढवपणा.

यजुर्वेदात एक कथा येते. हे सारे विश्व प्रथम जलमय होते. प्रजापती वायू बनून त्यावर हिंडत होता. त्याला पृथ्वी (तरंगताना) दिसली. त्याने वराहरूप घेऊन ती उचलली. गॅलिलिओची ओवडधोबड दुर्बिणसुद्धा जेव्हा उपलब्ध नव्हती तेव्हाच्या मानवाने जगदुत्पत्तीसंबंधी रचलेली ही भव्य सुंदर रूपके आहेत. शतपथ ब्राह्मणातील एक विधी डुकराने उकरलेल्या मातीला पवित्र मानतो. Non Aryan जमातीत प्रचलित असलेली वराह-पृथ्वी जोडप्याची परंपरा वेद–ब्राह्मणे रचणाऱ्या आर्यांनी उचलली आणि वराहाला त्यांच्या पद्धतीप्रमाणे प्रजापतीचे रूप दिले. महाभारत–पुराणांनी त्या वराहाचे विष्णूशी साधर्म्य कल्पिले.

आता आपल्या महात्म्याने हया अवताराविषयी काय गलिच्छ लिहून ठेवले आहे ते पहावयाचे.

'वराह डुकरिणीला झाला' 'त्याने क्षत्रियांशी लढाया केल्या' म्हणून त्यांनी त्यांचे नाव डुक्कर पाडले. डुक्कर हा शब्द संस्कृत भाषेत आहे काय ? कवी काव्य-रचनेच्या बाबतीत निरंकुश असतात, महात्मे व्युत्पत्तीच्या बाबतीत !

'नरसिंह आर्य क्षेत्र्याने दस्यू लोकांचा तरुण राजपुत्र प्रल्हाद याचे कोवळे मन धर्मभ्रष्ट केले.'

'वामन नावाच्या आर्य क्षेत्र्याने येथील महाप्रतापी दस्यूंपैकी बळीराजास रणांगणी पाडताच' वगैरे.

वामन क्षत्रिय होता काय ? त्याने बळीराजाशी रणांगणावर युद्ध केले काय ? भारतातल्या शाळकरी मुलाला वामनावताराची जितपत माहिती असते तितपतही नसलेल्या माणसाने जगाचा इतिहास उलगडून दाखवण्यास धजावे, हयातच त्याचे माहात्म्य साठविलेले आहे.

ज्योतिरावांनी परशुरामाच्या पराक्रमात प्रचंड भर घातली आहे. 'त्याने दस्यू लोकांवर एकवीस वेळा मोठमोठाल्या स्वाऱ्या करून त्यांची शेवटी इतकी वाताहत केली की... चीन देशाजवळ एक पायमार्ग होता त्या मार्गाने पाताळी अमेरिकेतील अरण्यात जावे लागले.' आमच्या इतिहासज्ञ महात्म्याच्या मतानुसार अमेरिकेचा शोध कोलंबसाने अलिकडे लावलेला नसून आमच्या देशातील दस्यू

बहाद्दरांनी तत्पूर्वी कित्येक हजार वर्षे लावलेला आहे. मुळात सर्वच अवतार Myths. त्यातून वामन, परशुराम, राम, कृष्ण ही माणसे खरोखरीच होऊन गेली असतील तरी त्यांची व्यक्तित्वे आणि कार्ये ह्यावर पुराणांची प्रचंड पुटे चढली आहेत. त्यांची चरित्रे वाचताना एकतर भक्ताची श्रद्धा पाहिजे, नाहीतर अद्‌भुत-पुराण-काव्य-रसिकाची सहृदयता. ह्यांपैकी एकही ज्यांच्याजवळ नसेल त्या अडाणी बुद्धिवाद्यांनी ह्या गोष्टींच्या वाटेस जाऊ नये. वामन आणि परशुराम ब्राह्मण असल्याने त्यांच्यासंबंधी लिहिताना ज्योतिबांची लेखणी नरकाची दुर्गन्धी ओकील ह्यात काही नवल नव्हे. पण राम आणि कृष्ण चरित्रांवर बालिश बुद्धिवादी आक्षेप घेणारे त्यांना जवळजवळ ब्राह्मणच मानतात, त्यांचे आश्चर्यच वाटते. राम आणि कृष्ण दोघेही क्षत्रिय; ब्राह्मण नव्हेत. त्यात कृष्ण तर लहानपणाचा गवळी. त्यांची चरित्रे गाणारे वाल्मिकी आणि व्यास कोळी. आणि व्यास-वाल्मिकी शेवटचा हात फिरवणारे संपादक मानले तरी महाकाव्ये उत्पन्न झाली सूतगायकांच्या कथांतून. आणि सूत तर ब्राह्मण नव्हेत, ते क्षत्रियाच्याही नंतरचे. शिव्या देणे एवढेच ज्यांचे जीवित-कार्य त्यांना एवढे भान ठेवण्याची आवश्यकता नसते. Riddles of Rama and Krishna च्या निमित्ताने ह्या विषयाचा विस्तृत उहापोह झालेला आहे. तेव्हा विष्णूच्या अवतारकृत्यांची येथेच रजा घेऊन महात्मा ज्योतिबा फुल्यांनी आणखी अकलेचे तारे काय तोडले आहेत ते पहावयाचे.

'ब्राह्मणास जन्म देणारे ब्रह्माचे मुख दरमहा दूरसे झाल्यामुळे तो चार दिवस सोवळा होऊन बसत होता की काय?' आपला महात्मा ही गलिच्छ भाषा लिहितो आणि आपल्या पुरोगामी बुद्धिवाद्यांना वाटते, 'वा! काय बिनतोड सवाल!' घाणीचा नुसता निर्देश करून ज्योतिबांचे समाधान होत नाही. कोपरापर्यंत हात बुडवून ती व्यवस्थितपणे ढवळून काढली नाही तर आपल्या माहात्म्याला उणेपणा येईल असे त्यांना वाटत असावे. 'ब्रह्माच्या मुख, बाहू, जंघा व पाय या चार ठिकाणच्या योनि दूरशा झाल्यामुळे त्यास सोळा दिवस सोवळे होऊन बसावे लागत असेल. तो गर्भ ब्रह्माच्या मुखात कोणत्या ठिकाणी नऊ महिने राहून वाढला?' मराठीत इतके गलिच्छ लिखाण दुसऱ्या कोणी केले नसेल.

पुरुषसूक्तातील जगदुत्पत्ती हे एक cosmological रूपक आहे. ते तसंच समजायला हवं. फुल्यांना परमादरणीय वाटणाऱ्या बायबलात आदमच्या बरगडीपासून ईव्हची उत्पत्ती देवानं केल्याचं म्हटलं आहे. त्या बरगडीच्या कोठल्या भागात योनी होती, कुठे गर्भाशय होता, गर्भधारणा कशी झाली, त्या बरगडीलासुद्धा 'दूरसे' बसावे लागत होते काय, असले प्रश्न ज्योतिबांनी आपल्या उपदेशकांना विचारले की नाही कुणास ठाऊक. पण त्यांच्या लिखाणात कुठे उल्लेख नाही.

ह्या गोष्टी बहुतेक ठिकाणी मिथ म्हणून तर कुठे 'अलंकारिक भाषा' म्हणून स्वीकारायच्या असतात. Myth किंवा 'अलंकार' जाणायचे इन्द्रिय ज्याच्याजवळ नसेल त्याने असल्या विषयांना स्पर्श करू नये. पण एवढं तारतम्य ठेवील तो महात्मा कसला?

गौतम बुद्ध हा तर ऐतिहासिक व्यक्ती होता. हाडामांसाचा माणूस. महात्मा फुल्यांच्या द्वेष-विषय ब्रह्मासारखा नव्हे. त्याच्या संदर्भात साक्षात त्रिपिटकात काय भाषा वापरली आहे ती विद्यावैरी ज्योतिबांना माहीत असण्याचं कारण नाही, पण त्यांची गलिच्छ भाषा वाचून ज्यांना आनंद होतो त्यांच्या उद्‌बोधनासाठी उद्‌धृत करायची.

थेरी गाथेमध्ये सुन्दरी नावाची भिक्षुणी गौतमाला म्हणते, 'तूच बुद्ध, तूच शास्ता, तुझी कन्या मी, ब्राह्मणा, औरस, मुखातून उत्पन्न झालेली ...' (गाथा ३३७)

दीघनिकायामध्ये वासेट्ठाला उपदेश करताना स्वत: गौतमबुद्ध सांगतो, 'ज्यांची, वासेट्ठा, तथागताच्या ठायी दृढ श्रद्धा असेल त्याने असं बोलणं उचित, भगवानाचा मी पुत्र औरस, तोंडातून जन्मलेला.'

हाच शब्दप्रयोग संयुत्तनिकायात, मज्झिम निकायात, जातकात, विमान-वत्थूत अनेकश: आला आहे.

'ब्राह्मणास जन्म देणारे ब्रह्माचे मुख दरमहा दूरसे झाल्यामुळे ...' वगैरे गलिच्छ प्रश्न महात्मा फुल्यांनी विचारल्यामुळे ज्यांना आनंदाच्या उकळ्या फुटतात, त्यांनी गौतम बुद्धाच्या 'मुखतो जाता' पुत्री आणि पुत्र ह्याबाबतीत तसेच प्रश्न विचारता येतील, हे लक्षात ठेवावे. पण मी ते विचारणार नाही. घाण चिवडावी फुल्यांसारख्या महात्म्यांनी, आपल्यासारख्या सहृदय रसिकांनी नेहमीच वाच्यार्थाच्या पलिकडे पहायचं– जाणायचं असतं.

ह्याच संदर्भात 'महात्मा' फुल्यांनी पुढं अनेक प्रश्न उपस्थित केले आहेत 'तो गर्भ ब्रह्माच्या मुखात कोणत्या ठिकाणी नऊ महिने राहून वाढला? त्यास आपल्या स्तनाचे दूध पाजले काय? त्याची बाकीची तीन डोकी तर या लचांडा-पासून मुक्त होती ना?' ह्यातील पहिले दोन प्रश्न गौतम बुद्धाच्या बाबतीतही विचारता येतील.

पुढे तर सगळ्या मराठी-भाषकांनी लाजेने मान खाली घालावी अशी घाणे-रडी भाषा ज्योतिबांनी लिहून ठेविली आहे, 'त्यास (म्हणजे ब्रह्मास) रांड्या राघोबा म्हणावे तर त्याने सरस्वती नावाच्या कन्येशी व्यभिचार केला, त्यामुळे त्याचे आडनाव बेटीचोद पडले.' शी: ! असल्या माणसाला चारचौघांसारखा सभ्य गृहस्थ सुद्धा म्हणता येणार नाही. त्याला आपण महात्मा करून ठेवलाय.

जगाच्या पाठीवर, सर्वत्र, mythology मध्ये incest (जवळच्या नातेबाइ-कांचा लैंगिक संबंध) हा विषय येतो. तो मुळात, नैसर्गिक घटनांचे मानवी वर्णन असतो. ब्रह्माच्या वरील मिथ्यकथेच्या अगदी मुळाशी आकाश (पिता), पृथ्वी (त्याची मुलगी), वीर्य (पडणारा पाऊस), गर्भधारणा (तृण- वनस्पतींची वाढ) ही नैसर्गिक घटना असते. काव्यातही अनेकदा असे घडते. दार्ष्टान्तिक (मुख्य वस्तू, जिच्या स्पष्टीकरणासाठी उपमा, रूपक, अतिशयोक्ती वगैरे वापरायचं) बाजूलाच पडतो आणि दृष्टांताचा विस्तार कवी करीत राहतो. अडाणी, असंस्कृत आणि

शिस्नोदराच्या पलिकडे ज्यांना कशात इंटरेस्ट नाही अशा मंडळींच्या हाती ही पुराण– कथा पडली की तिला जे अनेक फाटे फुटतात, त्यांचे वर्णन करणे कठीण. हच्या असल्या पुराण–कथांचा समन्वय High Tradition मध्ये रूपकाच्या स्वरूपात करण्याचा प्रयत्न होतो. आणि म्हणून हा सर्व प्रकार अतिशय हळूवार सहृदयतेने हाताळावा लागतो. हे समजण्याइतकी विद्वत्ताही फुल्यांजवळ नव्हती आणि सहृदयताही. गलिच्छपणा मात्र भरपूर होता. स्वतःला मोठे विद्वान, समीक्षक, विचारवंत समजणाऱ्या फुले–चरित्रकारांनी फुल्यांच्या या भाषेचा कुठेही धिक्कार केलेला नाही, ही नामुष्कीची गोष्ट आहे. उलट, त्यांच्या भाषेचा परखड, स्पष्ट, रांगडी म्हणून गौरवच केला आहे.

परखड, रांगडी, स्पष्ट, एवढेच नव्हे तर ग्राम्य भाषासुद्धा महाराष्ट्राला नवीन नाही. ती संत तुकारामाने वापरलेली आहे आणि विसाव्या शतकातले श्रेष्ठ संत गाडगे महाराज- त्यांनीही वापरलेली आहे आणि तरीही ती केव्हाही गलिच्छपणाकडे झुकत नाही, कारण तुकारामाचा किंवा गाडगेबाबांचा उद्देश शुद्ध होता. ख्रिश्चन पाद्र्यांनी आणि ब्रिटिश फूटपाडयांनी छू केल्यावर स्वजनांवर जीव तोडून भुंकत राहणे हा त्यांचा उद्देश नव्हता.

संसारात माणूस खोट्या आशेने कसा गुरफटतो ते सांगताना तुकाराम महाराज म्हणतात–

'देखोनि हरखळी अंड। पुत्र झाला म्हणे रांड...'

पण तोच दिवटा निघाला की कायमचे दुःख.

दुष्ट माणूस सज्जनांची सदैव निंदा करतो हे सांगताना तुकोबा म्हणतात– 'गुदद्वारावाटे। मिष्टान्नाचा नरक लोटे।।'

देवाचे नाव घेत नाही त्याला तुकाराम महाराज फटकारतात, 'कैसा सिंदळीचा!'

वाईट ब्राह्मणाची निंदाही तुकारामाने केली आहे. 'अभक्त ब्राह्मण जळो त्याचे तोंड। काय त्यांस रांड प्रसवली।' पण त्यात फुल्यांसारखी द्वेषबुद्धी, आकस नाही.

आज आपल्याला ग्राम्य वाटतील असे शब्द तुकारामाने वापरले आहेत, 'खद्योते फुलविले रविपुढे ढुंग।' ज्याला हरिकथा आवडत नाही, 'तुका म्हणे त्याच्या थुंका तोंडावरी'

'लेकराची गांड स्वयें धांवे क्षाळूं। न म्हणे प्रक्षाळूं द्विज पाया।'

'वेदा निंदी तो चांडाळ' (ज्योतिबांनी वेदाची आणि विद्वत्तेची यथेच्छ निंदा केली आहे.)

'काय ऐसे पोट न भरेंसे गेले। हालविसी कुले सभेमाजि।'

संतश्रेष्ठ गाडगे महाराज तर अगदी निजिकच्या भूतकाळात होऊन गेले. त्यांची भाषा रांगडी होती, परखड होती, तिखट होती, उपहासपूर्ण होती आणि

ग्राम्यसुद्धा होती. पण फुल्यांसारखी घाणेरडी, गलिच्छ नव्हती.

मराठी आणि भारतीय भाषांत संत आणि महात्मा हे शब्द एका द्वंद्वसमासात नेहमी वापरलेले आढळतात. आणि हे शब्द आपण आतापर्यंत कुणाच्या संदर्भात वापरीत आलो ?

ब्राह्मण–बुवांची खरडपट्टी काढणाऱ्या, पण खऱ्या ब्राह्मण्याचा सदैव उदो-उदो करणाऱ्या, स्वतःला आवर्जून ब्राह्मण म्हणवून घेणाऱ्या, पण कधीही सभ्यतेची मर्यादा न सोडणाऱ्या गौतम बुद्धाला आम्ही महात्मा म्हणतो.

ज्ञानियांच्या राजाला– ज्ञानेश्वराला-आम्ही संत म्हणतो. रामदास-नामदेव-एकनाथ-गोरा-चोखा-सावता-सेना-तुका–बहिणाबाई-जनाबाई-कान्होपात्रा हे आमचे संत. तुलसीदास, सूरदास, कबीर, नानक, मीराबाई, नरसी मेहता हे आमचे संत.

त्यांच्या संतपणाचा आठव करताना त्यांचा प्रांत, जात, भाषा कधी आमच्या मनात येत नाही. कारण त्यांनी कधी आकसाने, द्वेषबुद्धीने, परधार्जिणेपणा करून मनाला उबग आणणारं भाषण–लेखन केलं नाही. उलट,

'ऐसी बानी बोलिये मनका आया खोय
औरन को सीतल करै आपहि सीतल होय,' पद्धतीचं लिखाण केले.

ज्योतीराव फुल्यांनी मात्र गलिच्छ, बीभत्स, उबगवाणं, जुगुप्सा उत्पन्न करणारं लिखाण सदैव केले. महाराष्ट्राच्या समाजकारणात, राजकारणात जी परस्पर-द्वेषाची गटारगंगा आजपर्यंत दुथडी भरून वहात आहे, तिची गंगोत्री फुल्यांच्या लिखाणात आढळते. असल्या माणसाचं महात्मापण टिकवून धरणं म्हणजे ती घाण perpetuate करणं. महाराष्ट्राचं नष्टचर्य संपलं नसेल, तर हेही दळभद्री कृत्य आपण आणखी काही पिढ्या करीत राहू !

माणुसकीशून्य क्रौर्याच्या जोरावर आपल्या देशबांधवांना आणि इतरांनाही दहशतीत ठेवून चळचळ कापायला लावणाऱ्या स्टालिन आणि माओ झेडाँगना त्यांची जागा दाखवून देणाऱ्या रशियन आणि चिनी लोकांची हिंमत आपण भारतीय-विशेषतः महाराष्ट्रीय– दाखविणार की नाही ? की साम्राज्यवादी इंग्रजांनी हवा भरभरून कुजवलेलं हे घाणीचं बोचकं 'महात्मा' म्हणून खांद्यावर घेऊन मिरवत राहणार आहेत ?

(सोबत : दि. ११-१२-१९८८ वरून पुनर्मुद्रित)

परिशिष्ट ३

एक दिलगिरी : महात्मा फुले–
ग. वा. बेहेरे आणि बाळ गांगल

गेल्या सोबतच्या अंकात फुले यांच्यावरील एका लेखाने महाराष्ट्रात खूप खळबळ उडाली. विधानसभेत हक्कभंग प्रस्ताव एकमताने स्वीकारला गेला, पुणे म. न. पा. त निषेधाचा ठराव पास झाला व मोर्चा काढून सोबत कचेरीसमोर अंक जाळण्यात आला. इतरही अनेक लहान–मोठ्या संघटनांनी त्या लेखाचा निषेध केला. शिवसेनेचे रमेश प्रभू, भा. ज. प. चे राम कापसे इथपासून सर्वजण या हक्कभंग प्रस्तावात एकमुखाने सामील झाले. याचा अर्थ लोकांच्या भावना प्रक्षुब्ध व्हाव्यात असे काहीतरी या लेखात होते. या लोकक्षोभाची नोंद मी घेतली आहे आणि इतक्या लोकांच्या रागाला कारणीभूत होणाऱ्या घटनेशी आपला संबंध आला याबद्दल मला वाईटही वाटते.

गेली पाच–सहा वर्षे मी बऱ्याच गंभीर रोगाने आजारी आहे व हॉस्पिटल-मधून जाऊन–येऊन राहणे नित्याचेच झाले आहे. पूर्वीप्रमाणे सोबतमधील प्रत्येक ओळन्‌ओळ तोलूनमापून पाहण्याची आता शक्यता उरलेली नाही. कोणत्या क्षणी मी हॉस्पिटलमध्ये जाईन ते सांगता येत नाही. हा लेखही मी हॉस्पिटलातूनच लिहीत आहे. लेखकाचा व्यासंग, त्याचे पूर्वीचे लेखन या गोष्टी विचारात घेऊन लेख वरवर चाळून तो प्रेसकडे पाठवला जातो. माझी वैयक्तिक अडचण काहीही असली तरी हा लेख छापल्याने येणारी जबाबदारी मी टाळू इच्छित नाही. जे काही लेखन छापले गेले आहे, त्याच्या परिणामांची जबाबदारी लेखकाइतकीच माझीही आहे, असे मी मानतो. त्यात मी पळपुटेपणा करणार नाही.

फुले, आंबेडकर, शाहूमहाराज फार मोठ्या समाजाची आदरस्थाने आहेत

महाराष्ट्रात फुले, आंबेडकर व शाहूमहाराज या तीन व्यक्ती अशा आहेत की, ज्यांच्यावर लिहिताना सावधगिरी बाळगायला पाहिजे, फार मोठ्या समाजाची ही आदरस्थाने आहेत. त्यांच्यावर टीका करण्याचा हक्क मान्य करूनसुद्धा ती टीका सावधानपणे करायला हवी. आजपर्यंत मी ती करत आलो आहे आणि कोणताही क्षोभ निर्माण झाला नाही, याचे कारण टीका करण्यापूर्वी प्रथमतः त्या व्यक्तीचे सामाजिक योगदान, इतिहासातील त्यांच्या कर्तृत्वाचा आलेख व त्याची उपयुक्तता याचा मी संपूर्ण उल्लेख करतो. त्यामुळे टीकेचा तेवढाच विषय सोडून बाकी त्या व्यक्तीबद्दलचा आदर लेखातून व्यक्त झालेला असतो. समाज एवढा

उदार निश्चित आहे की, तो त्याला न आवडणारी टीकासुद्धा तारतम्याने व सोदाहरण केली तर स्वीकारतो. अनेक व्यक्तींच्यावर, संस्थांच्यावर मी कडकपणे टीका केलेल्या आहेत तरी मी कोणाचेही वैमनस्य ओढवून घेतलेले नाही. याचे मुख्य कारण, मतभेदाच्या मुद्याव्यतिरिक्त त्या व्यक्तीची सामाजिक उपयुक्तता माझ्या ध्यानात असते.

बाळ गांगल यांचा लेख मी छापला त्याअर्थी मी त्याला जबाबदार आहे. मी हा लेख लिहिला असता तर फुल्यांचे बहुजन समाजातील जागृती करणाऱ्यांतील पहिले स्थान, स्त्रियांसाठी त्यांनी काढलेली पहिली शाळा, बहुजन समाजाबद्दलचा, विशेषत: शेतकऱ्यांसंबंधीचा त्यांचा कळवळा या गोष्टींसंबंधी मी आधी लिहिले असते. हे सगळे करण्यासाठी हिंदू धर्मातील धर्मग्रंथांतील विधानांवर वेडेवाकडे हल्ले करण्याची गरज नव्हती, असे जरूर लिहिले असते. बाळ गांगल हे विद्वान आहेत, पण त्यांना लोकांच्या गळी एखादी गोष्ट कशी उतरावी याचे ज्ञान दिसत नाही. या लेखातील भाषा व मांडणी आक्षेपार्ह आहे, हे विधान कुणी केले तर ते मुळीच चूक नाही. पण हा लेख सोबतमध्ये छापला गेला त्या संधीचा फायदा घेऊन माझ्यावर असणारा अनेकांचा राग नव्याने उफाळून येतो आहे, हे पाहून मात्र वाईट वाटते.

मी दलितांची बाजू सतत मांडत आलो आहे

समाजवादी व कम्युनिस्ट माझ्यावर रागावले तर ते समजण्यासारखे आहे कारण त्यांच्यावर मी सतत टीका केली आहे. काँग्रेसवर तर सर्वांप्रमाणे मीही टीका केली असल्यामुळे त्यांनाही या संधीचा फायदा घ्यावा असे वाटणे स्वाभाविकच आहे. पण दलितांनी माझ्या विरोधात भूमिका घ्यावी यासारखे दु:ख दुसरे कोणतेही नाही. त्यांची बाजू मी सतत घेतलेली आहे. मी नामांतरवादी आहे. नामांतरासाठी पुण्यात जो पहिला अर्ज केला गेला त्यावर पहिली सही माझी आहे.

शंकरराव खरात साहित्य संमेलनाचे अध्यक्ष व्हावेत यासाठी प्रयत्न केले

साहित्य संमेलनाचे अध्यक्षपद खरातांना मिळावे यासाठी फक्त मी धडपड केली. ती काही दलितांच्यावर उपकार म्हणून नव्हे तर दलित साहित्याला साहित्याच्या मूळ प्रवाहात आणल्याशिवाय साहित्याची निकोप वाढ होणार नाही, अशी माझी भूमिका होती, म्हणून. नामांतराचा बार्शी संमेलनातला ठराव मीच मांडलेला आहे. मी अरुण कांबळे व लक्ष्मण माने यांच्या काही एकांतिक मतांबद्दल जरूर काही लिहिले–बोललो आहे. पण त्याचा हेतू त्यांच्या एकांतिक वागण्याने

दलित समाजाचे नुकसान होत आहे, हा होता. मी स्वतःला सावरकरांचा कट्टर अनुयायी मानतो. बाकी कुणाचेही शत्रुत्व मला परवडेल, पण दलितांचे नाही. ज्या समाजावर अनेक तऱ्हेचे अन्याय झाले, त्याची भरपाई करण्यासाठी काही संकेत मोडावे लागतील. शंकरराव खरातांना निवडून आणताना गोविंदराव तळवलकर, अनंतराव भालेराव, नारायण आठवले, यदुनाथ थत्ते या व अशा सर्व तथाकथित पुरोगाम्यांच्या मी शिव्या खाल्लेल्या आहेत.

फुले, आंबेडकर व शाहूमहाराज या तीन नाजूक विषयांवर आवश्यक ती सावधगिरी बाळगली नाही, तर काय घडू शकते याचा सोबतमधला हा लेख हे उदाहरण आहे. पण 'सोबत'नेच 'महाराष्ट्रातील विचारधन' या नावाची एक लेखमाला एका दिवाळी अंकात छापलेली आहे. फुल्यांनी जे विचारधन महाराष्ट्राला दिले त्याचा आदरपूर्वक आढावा त्या लेखात घेतलेला आपल्याला आढळेल आणि हे काही नंतर सुचलेले शहाणपण नव्हे. तेव्हा फुल्यांचे सामाजिक असे जे योगदान आहे, त्याबद्दल माझ्या मनात यत्किंचितही शंका नाही.

पण अलिकडे हिंदूधर्मावर वाटेल तशी बेफाम टीका करण्याची प्रवृत्ती वाढत चालली आहे. हिंदू धर्मात काही दोष आहेत, उच्चनीचता आहे, वर्णव्यवस्था आहे, इहवादाबाबत अप्रियता आहे, अंधश्रद्धा आहेत, त्यावर टीका केलीच पाहिजे. सावरकरांनीही ती केली आहे. कारण या विज्ञानयुगाशी जमवून घेतल्याशिवाय यापुढे हिंदू समाज टिकणारच नाही. पण हिंदू धर्म सुधारण्याच्या दृष्टीने त्याच्या उणीवा शोधणे वेगळे आणि उगाच सनसनाटी निर्माण करण्यासाठी अर्वाच्य विधाने करणे वेगळे. हिंदू धर्मावरील या टीकेचा आरंभ केव्हा झाला याचा विचार करता हे लक्षात आले की, फुले यांचा हेतू कितीही चांगला असला तरी, हिंदू धर्मशास्त्राची त्यांनी केलेली चिकित्सा ही अशास्त्रीय आहे. फुले यांचे समग्र वाङ्मय महाराष्ट्र सरकारने प्रसिद्ध केले आहे. ते कुणालाही सहजी उपलब्ध होईल. आज हिंदू धर्मावर जे नानाविध आरोप केले जातात त्यांचा उगम शंभर वर्षांपूर्वी झाला आहे. खरे तर इतिहासात घडून गेलेल्या घटना चिवडण्यात अर्थ नसतो. कारण सगळे संदर्भ आपल्याला माहीत नसतात. म्हणून फुल्यांच्या त्या काळातील विधानांचा संदर्भ लक्षात घेण्यात आज स्वारस्य नाही. पण तीन हजार वर्षांपूर्वी होऊन गेलेल्या रामायण-महाभारत या ग्रंथातील घटना टीकाविषय होऊ शकतात, तर मग फुल्यांची विधाने टीकाविषय झाली तर रागावण्याचे काय कारण? मी घेतलेली कडवी हिंदूधर्मविषयक भूमिका, शिवसेनेने स्वीकारलेल्या आक्रमक हिंदुत्वाची मी केलेली भलावण, महाराष्ट्रातील बहुजन समाजात हिंदुत्वाची शिवसेनेने केलेली जागृती या सगळ्याचा वचपा कुठेतरी काढायचाच, अशी भूमिका पुष्कळांनी घेतलेली आहे. मोठे उद्दिष्ट साधायचे असेल त्यांनी लहान उद्दिष्टांचा त्याग केला पाहिजे असे माझे मत आहे. माझ्यालेखी हिंदुत्व हे एक मोठे उद्दिष्ट असल्याने त्याची नुकसानी होऊ देणे मला परवडणारे नाही. आणि त्यासाठी प्रसंगी वैयक्तिक अहंकाराचा त्याग करून माझ्या हातून

हा लेख छापला गेला याबद्दल मी दिलगिरीही व्यक्त करतो. हा जो हिंदुत्वाचा जयजयकार होतो आहे, त्यावर माझ्या वागण्याचा कोणताही परिणाम होऊ नये अशी इच्छा आहे. मात्र याचा अर्थ मी पळपुटपणा करतो आहे असा करू नका. हक्कभंग समितीच्या चौकशीला मी सामोरा जाईन व त्यात जो निष्कर्ष निघेल तोही हसतमुखाने मान्य करीन. कोर्टात माझ्यावर भरलेल्या खटल्यांनाही मी सामोरा जाईन. केलेल्या कृत्याच्या परिणामाची जबाबदारी स्वीकारलीच पाहिजे, याबद्दल माझ्या मनात संदेह नाही. पण माझ्यामुळे पुष्कळांच्या हातात जे कोलीत मिळाले आहे, की जे जागृत झालेल्या आक्रमक हिंदुत्वाला धोकादायक आहे, ते विझवण्यासाठी, मी कितीही भांडखोर व आग्रही असलो तरी, दिलगिरी व्यक्त करणे हे आवश्यक आहे. काँग्रेस, कम्युनिस्ट, समाजवादी या मंडळींच्याबरोबर पुढे भांडावेच लागणार आहे. त्याला काही इलाज नाही. पण सावरकरांचे नेतृत्व मानणाऱ्या माझ्यासारख्या अनुयायांनी दलित समाजाला दुखावण्याचे पाप करू नये. त्यांच्या भावना दुखवल्या असतील तर त्यांची स्वतंत्रपणे माफी मागतो.

(सोबत दि. १–१–१९८९ वरून पुनर्मुद्रित)

परिशिष्ट ४

SCHOLAR CLARIFIES CRITICISM OF PHULE

A city scholar's views on the renowned social reformer of Maharashtra Mahatma Jyotiba Phule published in the Marathi weekly 'Sobat' has opened a virtual Pandora's box of new 'Riddles' after the hullabaloo over another luminary– Dr. B. R. Ambedkar's 'Riddles of Rama and Krishna.'

Was the Maratha Emperor Shivaji a 'looter'? Were his efforts to establish 'Hindvi Swaraj' (independent Hindu nation) 'unnecessary as Mughal rule was good'? Was the 1957 mutiny, also called the first war of independence, just a Brahmin uprising? Was the revolutionary freedom-fighter Vasudev Balwant Phadke a 'traitor'?

These questions have been posed by Dr. Vishwanath Vaijnath Gangal, a reader in Sanskrit and Ancient Indian Culture at the

Ananthacharya Indological Research Institute here, in a recent critique of Mahatma Phule's works in the Pune–based Marathi weekly. Pleads Dr. Gangal : ' I deeply regret if feelings of some people have been hurt as my intention is only to study history and arrive at a perspective '

Two articles by Dr. Gangal on the 19th century reformer that were published in the weekly's issues of December 5 and December 11, have generated a State-wide controversy. However, in the dust and din of a general condemnation of the articles largely on account of their aggressive headlines challenging the honorific of 'Mahatma' bestowed on Phule, the validity of the questions themselves remains buried.

Says Dr. Gangal 'I started researching Mahatma Phule as an educationist after reading a 1986 'Illustrated Weekly' review of the book. 'Beautiful Tree' by Dharampal, former research director of the all India Panchayat Parishad, on the indigenous Indian educational system in the 18th century prior to the advent of the British '

The book had made out a case, supported by statistics from British Raj collectors' records, that Sudras and other backward castes were not really deprived of educatiodal opportunities as generally believed and propagated by Mahatma Phule and other social reformers.

So, Dr. Gangal claims that he started studying the premises of Mahatma Phule's views culling information, among other sources, from two volumes published by the Maharashtra Government – the Mahatma Phule ' Samagra Vangmay' entire works of the reformer, and the 'Mahatma Phule Gaurav Granth' a felicitation volume printed in 1969 and edited by Dhananjay Kheer and S. G. Malshe.

Researching the volumes, he had come across statements by Mahatma Phule 'which will be unpalatable to any objective scholar'. 'For instance' explains Dr. Gangal, 'Shivaji has been described as a plunderer and looter in a ballad to him by Mahatma Phule published in page 34 of the 'Samagra Vangmay.'

Then in the 'Phule Gaurav Granth' eminent litterature Tarkateerth Laxmansastri Joshi himself notes that 'in Phule's opinion, Shivaji's attempt to establish Hindvi Swaraj was unnecessary because Muslim rule was good.'

Mahatma Phule, observes Dr. Gangal, also 'dismisses the

1857 war of independence as a mutiny inspired by Bhat Pandyas- a clearly derogatory reference to Brahmins and Mangal Pandey. And then when he describes Vasudev Phadke, one of the pioneer armed revolutionaries during the freedom struggle, as a traitor, one begins to wonder whether Mahatma Phule was siding with the British.

Notwithstanding the tremendous contribution to social reform and women's education by Mahatma Phule, there have been some critical assessments of his works.

A celebrated treatise of Mahatma Phule on 'Slavery in civilised British Government under the clock of Brahminism' published in the ' Samagra Vangmay', was however censured in a supple ment of the 1873 British Government gazette as 'a most virulent production, mostly consisting of most wild and ludicrous fancies. In a few places, it is even indecent.'

S. G. Malshe, co-editor of the Mahatma Phule felicitation volume, has raised doubts about the authenticity of literature attributed to the reformer. Malshe, in his book 'Taar-Tamya', had pointed out the absurdity of a reference to Darwin's theory of evolution in an 1854 article ostensibly by Mahatma Phule entitled 'Nirmika Shodh' while the theory itself was put before the scientific community only in 1859.

According to Dr. Gangal, in his 'Shetekariacha Asud', Mahatma Phule has made the 'ridiculous observation that four learned persons got disgusted with Brahmin cunning and started Buddhism.' In the same work, he says, Mahatma Phule talks about electrical illumination at Brahmin marriages in Maharashtra, whereas the incandescent lamp and bulb were invented only in 1878 overseas.

Dr. Gangal who has already published an apology in the Sobat, alongwith its editor, Mr. G. Behere, following objections to his articles, is at pains to reiterate that his intention was never to defame Mahatma Phule though he may have used strong words in his criticism and in fact, he would have given due credit to the outstanding contributions made by the social reformer in his succeeding articles in a eight-part series originally planned by him for the weekly. 'However, now in the uproar, my voice is stifled and I no longer feel interested in continuing the critical review' he added.

परिशिष्ट ५

विचारकलहाचे पडसाद

(म. फुलेंच्या बदनामीवर उलट सुलट प्रतिक्रिया व्यक्त करणारे बरेच लेखन झाले आहे. प्रस्तुत यादीत लेखकाला उपलब्ध झालेल्या साहित्याची नोंद केली आहे.)

पुस्तिका

प्रा. रमेश ढावरे, **म. फुल्यांचे विचार आणि कार्य**, वस्तुस्थिती आणि विपर्यास, प्रशीक विद्यार्थी संघ, कोल्हापूर, २६ जाने. ८९, (पृ. १२+६४) कि. १०रु.

नीळकंठ खाडिलकर, **महात्म्यांचा महात्मा जोतीराव फुले**, शलाका प्रकाशन, मुंबई, ३ फेब्रुवारी ८९, (पृ. ४०) कि. ७ रु.

अग्रलेख

दै. तरुण भारत, पुणे, २१।१२।८८

दै. तरुण भारत, नागपूर, २१।१२।८८

दै. लोकमत, औरंगाबाद, २३।१२।८८

दै. मराठवाडा, औरंगाबाद दि. २६।१२ व २७।१२।८८

साप्ता. साधना, पुणे ३१।१२।८८

साप्ता. विवेक, मुंबई १।१।८९

साप्ता. बहुजन संघर्ष नागपूर, १५ जानेवारी ८९

दै. समाजवादी भारत, धुळे, २९:१२।८८

दै. नवाकाळ, मुंबई २२ जाने. ते ३० जाने ८९, एकूण आठ अग्रलेख.

दै. संचार, सोलापूर १०।१।८९

विकल्प, मुंबई, जानेवारी १९८९

समतेसाठी बहुजन संघर्ष, नागपूर, ३०।१२।८८

प्राजक्त, ठाणे, जाने–फेब्रु. ८९

लेख

हरि नरके, दै. सकाळ, पुणे, १५।१।८९

हरि नरके, सुगावा, पुणे, फेब्रुवारी ८९

हरि नरके, घोषणा, पुणे, जानेवारी ८९

हरि नरके, साप्ता. बंडखोर, सोलापूर, १६।१।८९

हरि नरके, साप्ता. परिवर्तनाच्या पाऊलखुणा, गंगाखेड (परभणी), ६।२।८९

डॉ. बाबा आढाव–हरि नरके, दै. लोकसत्ता, मुंबई–पुणे, २९।१।८९

डॉ. बाबा आढाव–हरि नरके, दै. केसरी, पुणे–नगर–सांगली–सोलापूर २९।१।८९

डॉ. बाबा आढाव–हरि नरके, साप्ता. साधना, पुणे, २१।१।८९


डॉ. बाबा आढावं–हरि नरके, पुरोगामी सत्यशोधक, पुणे, ऑक्टो-डिसें ८८
डॉ. बाबा आढाव–हरि नरके, साप्ता. सत्यता, मुंबई, १४।२।८९
विनायक कुलकर्णी डॉ. बाबा आढाव–हरि नरके, दै. महाराष्ट्र हेरॉल्ड, १३।१।८९
विठ्ठल साठे, साप्ता. सोबत, पुणे, ८।१।८९
बी. व्ही. जोंधळे, साप्ता. सोबत, पुणे, १५।१।८९
हुसेन दलवाई, दै. लोकसत्ता, पुणे–मुंबई १।२।८९,
डॉ. रमेश जाधव, दै. सत्यवादी, कोल्हापूर, ३।१।८९
डॉ. रमेश जाधव, दै. सत्यवादी, कोल्हापूर, १५।१।८९
प्रा. रमेश ढावरे, दै. सकाळ, कोल्हापूर, २८।१२।८८
प्रा. सुधीर गव्हाणे, दै. लोकमत, औरंगाबाद, १।१।८९
प्रा. सुधीर गव्हाणे, दै लोकमत, औरंगाबाद, ८।१।८९
प्रा. सुधीर गव्हाणे दै. लोकमत, नागपूर, २२।१।८९
अरविंद कुळकर्णी, साप्ता. सत्यता, मुंबई, १०।१।८९
'अरविंद,' साप्ता स्वराज्य, पुणे, २८।१।८९
ॲड. भवार एस. डी., युगप्रबोधन, वाशी, नवी मुंबई, फेब्रुवारी ८९
ज्ञानेश महाराव, साप्ता विवेक 'मुंबई, १२।२।८९
मा. गो. वैद्य, दै. तरुण भारत, पुणे, २९।१।८९
विनायक जामगडे, पाक्षिक 'समतेसाठी बहुजन संघर्ष' नागपूर २६।१।८९
सोबतच्याच लेखाची कॉपी धुळ्याच्या दै. अविरोध' ने केली (संपादक-प्रभाकर पाटील) अशी माहिती समतेसाठी बहुजन संघर्षने २६।१।८९ च्या अंकात दिली आहे.
'अंकुश,' साप्ता. राष्ट्रवीर, बेळगाव, ११।१।८९
नितीन चौधरी–समतेसाठी बहुजन संघर्ष नागपूर, ३०।१२।८८
नाना ढाकुलवार, सोबत, पुणे, २६।२।८९

पत्रक

बहुजन संघर्ष समिती, नवजवान शक्ती संघटना, सत्यशोधक युवक संघटना, नागपूर– समतेसाठी बहुजन संघर्ष, ३०।१२।८८, साप्ता बंडखोर, सोलापूर, २६।१२।८८, सुगावा, पुणे, फेब्रु ८९, साप्ता. राष्ट्रवीर, ११।१।८९

म. फुले विचार संवर्धन समिती, धुळे, समतेसाठी बहुजन संघर्ष, नागपूर २६।१।८९

म. फुले–आंबेडकर विचारसंवर्धन समिती, चंद्रपूर स. बहुजन संघर्ष, नागपूर २६।१।८९




REFBK-0025892



हरि रामचंद्र नरके
(जन्म / १ जून १९६३)
बी.ए. मराठी (विशेष) - पुणे विद्यापीठ
'दिल्ली महाराष्ट्रीय सुवर्णपदक १९८६
एम्.ए. मराठी - पुणे विद्यापीठात प्रथम वर्गात प्रथम
एम्.फिल् - 'म. फुले आणि आगरकर यांचे
स्त्री सुधारणा विषयक विचार - चिकित्सक अभ्यास'
ह्या विषयावरील प्रबंधिका लेखनाचे काम चालू.
सर्व शिक्षण स्वावलंबनातून.
टेल्को, पुणे येथे पूर्णवेळ नोकरी करून महाविद्यालयीन शिक्षण.
महाराष्ट्र राज्य पातळीवरील आघाडीचा विद्यार्थी वक्ता.
पदवी शिक्षणापर्यंत महाराष्ट्र, गुजरात, मध्य प्रदेश, कर्नाटक
राज्यात एकूण १३३ वादविवाद, वक्तृत्व स्पर्धांची पारितोषिके
अनेक वृत्तपत्रे, नियतकालिकांमधून वैचारिक लेखन,
म. जोतीराव फुले समता प्रतिष्ठानच्या 'पुरोगामी सत्यशोधक'
त्रैमासिकाचा संपादक मंडळ सदस्य.

सुगावा प्रकाशन, पुणे